म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक कृष्णराव भाऊ जाधव-वसा-डेके

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव सुमनावली

सुमनावली

कृष्णराव भाऊ जाधव-वसा-डेके

किंमत २॥)

बृहत्कथासागर.

हा रम्य मनोरंजक असून ऐतिहासिक व या **भरतखंडांतल्या** नृत्या चर्चांनीनी राजकीय मानगडी वगैरे ज्यांत ठिकठिकाणीं वर्णन केल्या आहेत आद्यप्रकाशचा सरस ग्रंथ मराठीभाषेंत याच्याएवढे मोठे पुस्तक कोणतेंच झालेले नाहीं. हा समग्र ग्रंथ हेमा अठरा ४००० पद्यांचा असून याचे निरनिराळे दहा भाग केले आहेत. प्रत्येक भागाची पृष्ठ ८०० जवळ आहेत. टाईप सुरेख व कागद चांगला असून भागांही एकसारखा ठेविला आहे.

भाग पहिला किंमत रु. २।४ ट. ख. ०३
" दुसरा " २।४ " ०३
" तिसरा " २।४ " ०३

चवथा व त्याच्या पुढचे भाग छापत आहेत.

कर्पूरमंजरी.

हा मनोरंजक व चटकदार लहानशी गोष्ट प्रसिद्ध महाकवि भाषेंत— **शंकर** यांणीं बालभाषेंत रचलेल्या **कर्पूरमंजरी**वरुन नाहीं, ग्रंथाच्या आधारानें तयार केली आहे. उत्तम बाइंडिंग किंमत अगदीच माफक, म्हणजे अवघे ०८ ट० व वर्ग **मुसलमान** गुरुच्या साहाय्यावांचून संस्कृ **शिक्षणाचें साधन.**

काव्यार्थ दीपिका.

(सुधारलेली दुसरी आ

म्हणजे महाकवि **श्रीकालिदासकृत** ची टीका. हें पुस्तक संस्कृत शिकणारांच ज्याचा मराठीचा अभ्यास शिस्तवार झ. शुद्ध शैली, वगैरे गोष्टी साहाय्याची जरुर नपडतां केवळ या पुस्तकद्वारां आपल्या लोकांस करितां येतो. यांत मूळ श्लोक, प्रत्येक अर्थ, भावार्थ, व्याकरणाचे नियम अर्थगर्भ, ऐतिहासिक स्थलांची समावेश केला आहे कि ज्यायोगें करून

थती समजल्यानें आशा वाटते.

एकत्र्यास **फारसी** न या भाषेंतील एक आले. त्यांपैकीं या वराच्या ठिकाणीं निस्सीम होईल असें वाटल्यावरून, या कवीनें केलेल्या **बोस्तान्** सहृदय वाचकांस

(श्रीमंत महाराज शिंदेसरकार यांस अर्पण केलेली ग्रंथमाला.)

सुमनविकास

किंवा

शेख सादीकृत बोस्तान्नामक फारसी ग्रंथाचें मराठी भाषांतर.

जनाबवाला राव कृष्णराव वापूसाहेब ज

मुख्तत्यार उद्दौला मदारुल् महाम, फिरोज जंगबहादूर मे
कौन्सिल ऑफ् रीजन्सी ग्वाल्हेर यांच्या आज्ञे
व उदार आश्रयानें

माधवराव लेले

माजि स्टेट इंजिनियर इंदूर व
ग्वाल्हेर म्युनिसिपल्सेक्रे
यांनीं तयार करून

'तत्त्वविवेचक' छापखान्यांत छा

मुंबई,
इ. सन १८
किंमत १।

या
ाज
कांचा
ादश-
मविषयक
आजपावेतों
ी, व इति-
शी भाषेंत—
आढळत नाहीं,
दू व मुसलमान
स्थती समजल्यानें
आशा वाटते.
तरकर्त्यास फारसी
ानें त्या भाषेंतील एक
आले. त्यां न्न त्या
श्वराच्या ठिकाणीं निस्सीम
ा शुद्ध शैली, वगैरे गोष्टी
पांतरद्वारां आपल्या लोकांस
होईल असें वाटल्यावरून,
या कवीनें केलेल्या बोस्तान्
यार करून सहृदय वाचकांस

समर्पण केलें आहे. यांत कोणकोणचे विषय आले आहेत तें उपोद्घातावरून व त्यांचें प्रतिपादन कशा उत्तम तऱ्हेनें केलेलें आहे तें समग्र ग्रंथ वाचल्यावरून रसिक जनांच्या सहज लक्षांत येईल. हें भाषांतर करितांनां होईल तेथवर विद्यार्थ्यांसही त्याचा उपयोग व्हावा या हेतूनें मूळास धरून बहुतेक शब्दशः व सामान्य वाचकांसही कंटाळवाणें न व्हावें अशा हेतूनें सरळ अर्थ धरून तयार केलें आहे.

आतां हा या भाषांतरकर्त्याचा हा प्रथमच प्रयत्न असल्यानें त्यांत अनेक तऱ्हेचे दोष राहिले असतील. तरी त्या दोषांकडे विशेष लक्ष्य न देतां त्यांतील गुणांचें ग्रहण करण्याविषयीं **सादी**च्याच वचनानें सर्वत्रांची प्रार्थना केल्यास कांहीं वावगें होणार नाहीं:—

'हे वाचकहो, थोर व विद्वान् लोक दोषदृक् नसतात असें ऐकण्यांत आहे. तें तुम्ही ध्यानांत ठेवा. माझ्या या कृतींत तुम्हांला कांहीं दोष दिसला तर त्याबद्दल ईश्वराप्रमाणें क्षमा करा. यांतील हजारों वाक्यांतून एक जरी तुम्हांला पसंत पडलें तर थोरपणानें तेवढ्याकरितां तरी या ग्रंथाची निंदा करण्यास प्रवृत्त होऊं नका.'

या **बोस्तान्** शिवाय **सादी**चे **गुलिस्तान्** व **पंद्-नामा** ⁊ **मस्नवी** इत्यादि अनेक लहानमोठे ग्रंथ आहेत. त्यांतून **गुलिस्तान्** हा ग्रंथ सर्वमान्य व सर्व फारसी ग्रंथांत बालबोध, सुगम व अत्यंत व्यवहारोपयोगी असल्यानें त्याचेंही भाषांतर बहुतेक तयार केलें गेलें आहे. व तेंही, या हल्लींच्या भाषांतरास लोकांचा उदार आश्रय मिळाला म्हणजे छापून प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

इतर कामें करून फुरसतीच्या वेळीं...

अल्पसा यत्न केलेला, वाचकांस यत्किंचितही मान्य झाला म्हणजे भाषांतरकर्ता आपल्या परिश्रमाचें वरेंच सार्थक झालें असें समजेल.

हें भाषांतर तयार करण्याच्या कामीं, मौलवी **मीर हसन अल्ली** यांणीं व छापून प्रसिद्ध करण्याच्या व वेळोवेळीं उपयुक्त व योग्य सूचना करण्याच्या कामीं आमचे विद्वान् मित्र **पंडित वामनशास्त्री इस्लामपूरकर** व रा. रा. **लक्ष्मणराव गणेश गंधे**, बी. ए. असिष्टंट सेक्रेटरी कौन्सिल् ऑफ रीजन्सी ग्वाल्हेर यांणीं उत्तम प्रकारें साह्य केल्याबद्दल भाषांतरकर्ता त्यांचा अत्यंत आभारी आहे.

माधवराव व्यंकटेश लेले.

सूचना:—यांतील पुष्कळशा टीपा व इतर माहिती देण्याच्या कामीं **लखनौ** येथें छापलेल्या **सादी**च्या सर्व ग्रंथसंग्रहाच्या प्रतीचा व चरित्र लिहिण्याच्या कामीं **प्लाट** साहेबांनीं केलेल्या **गुलिस्ता**न्च्या इंग्रजी भाषांतराचा उपयोग केला आहे.

मा. व्यं. लेले.

शेख सादी याचें चरित्र.

पार्शिया किंवा, हिंदुस्थानी कवींनीं वर्णन केलेल्या **पारसीक** देशांत, **अतावुक** या घराण्यांतील बादशहा राज्य करीत असतांना, त्या प्रदेशाची राजधानी **शिराज** येथें, **शेख सादी** या प्रसिद्ध कवी व महात्म्याचा इ० स० ११७५–७६ वर्षाच्या सुमारास जन्म झाला. कांहीं ग्रंथकारांचें मत, याचा जन्म ११८४।८५ या सालीं झाला असें आहे. परंतु याच्या जन्मकाळाचा अद्याप व्हावा तसा निर्णय झालेला नाहीं. त्याच्या पित्याचें नांव **अबदुल्ला** असें होतें व त्याच्याकडे कांहीं सरकारी काम असून, तो चांगला हुषार व शहाणा होता असें दिसतें. याशिवाय इतर ग्रंथकारांच्या ग्रंथांवरून किंवा स्वतः **सादी**च्या ग्रंथावरून, **सादी**च्या मातापितरांची विशेष कांहीं माहिती मिळत नाहीं. ते उभयतांही, **सादी** लहान वयाचा असतांना परलोकवासी झाल्याचें मात्र कळून येतें, व त्यांच्यापासून **सादी**ला विशेष मालमत्ता मिळाली नाहीं व मरणसमयीं त्यांची गरीबीची स्थिती होती हेंही स्पष्टपणें कळून येतें.

अतावुक घराण्यांतील पांचवा बादशहा **साद** बिन **जंगी** याच्या कारकीर्दीत **शेख सादी** यांची प्रसिद्धी होण्यास आरंभ झाला व त्याचें **सादी** हें टोपण नांव देखील त्यानें याच बादशहाच्या नांवावरून, आपण त्याचाच अंकित असून तो आपल्यास इतका प्रिय आहे हें दाखविण्याकरितां घेतलें असावें असें दिसतें. पण **सादी** हा

मुसलमान लोकांत केवळ **शेख** व **मुस्ले उद्दीन,** किंवा धर्मसंशोधक या नांवानेंच प्रसिद्ध आहे.

लहानपणापासूनच **सादी**ला विद्येचा व्यासंग विशेष होता, व त्यानें धर्मविषयाकडे विशेष लक्ष दिलें होतें. बालपणींचा विद्याभ्यास आटपल्यावर तो **बगदाद** येथील **निजामिया** नांवाच्या पाठशाळेंत गेला, तेथें त्याला पुढें उपशिक्षकाची जागा मिळाली होती. त्या पाठशाळेंत **अबुल्फराज** बिन् **जौजी** व **शिहाबुद्दीन सहरावर्दी,** हे त्याचे गुरु होते. त्यांच्या सहवासानेंच **सूफी** किंवा **मुसलमानी** वेदांती मतांकडे त्याचें मन लागलें. व पुढें तो त्या मतवाल्यांपैकीं एक मोठा नामांकित विद्वान् झाला. सुमारें तीस वर्षेंपर्यंत अश्रांत शास्त्राध्ययन केल्यावर **सादी**ला देशपर्यटण करण्याची उत्कट इच्छा होऊन तिसांहून अधिक वर्षेंपर्यंत त्यानें यात्रा केल्या. प्रथमतः तो **सीरिया** देशांत गेला व तेथें कांहीं दिवस त्यानें भिस्त्याचा धंदा पतकरून वास केला.

याच प्रवासाविषयीं **सादी**नें **गुलिस्तान्,** भाग दुसरा, गोष्ट ३१ वी यांत स्वतःविषयीं लिहिलें आहे कीं, "एकदां मीं, **दमास्कस** शहरांतील मित्रांच्या सहवासाला कंटाळून, **जरुसलेम**च्या आसपासच्या जंगलाचा रस्ता धरला व तेथें श्वापदांच्या संगतीनें काळ क्रमित असतांना **फिरंगी** लोकांच्या हातीं सांपडलों. त्यांनीं मला धरून नेऊन एका **यहुद्या**च्या टोळीवरोवर **त्रिपोली** शहराच्या खंदकांत काम करण्यास लावलें." अशा स्थितींत तो काम करीत असतांना त्याला त्याच्या एका **अलेपो** येथील परिचित गृहस्थानें ओळखून कृपा करून दहा दीनार देऊन

बंदींतून सोडविलें, व पुढें त्याचें आपल्या मुलीशीं लग्न करून दिलें. हें लग्न शेवटीं फार त्रासदायक झाल्याविषयीं **बोस्तान**मध्यें उल्लेख आहे.

यानंतर **सादी**चें पुनः लग्न झालें असावें असें वाटतें. कारण त्यानें आपला एक मुलगा **यमन** किंवा **अरबस्थान**ची राजधानी **सनआ** येथें, मरण पावल्याबद्दल बरेंच कळवळ्यानें **बोस्तान**च्या नवव्या भागांत लिहिलें आहे.

दौलतशाह यांच्या ग्रंथावरून कळतें कीं **सादी**नें चौदा वेळ **मक्के**ची महायात्रा पायींपायींच केली. तसेंच **दमास्कस, बालबक, वसा, कूफा, इराण**च्या अखातांतील **कीप** बेट, **मिसर, काशगर, दियरबकर,** उत्तर **आफ्रिका, दैलकाँन, रूदबार, तुर्कस्थान**चे सर्व प्रदेश, **हिंदुस्थान,** व **अबिसिनिया,** इत्यादि देशांत **सादी** फिरल्याबद्दल, त्याच्या ग्रंथांत आधार सांपडतात.

शेख सादी यानें **हिंदुस्थाना**च्या प्रवासांत **गुजराथें**तील प्रसिद्ध **सोमनाथा**च्या देवालयांत गेल्याविषयीं व तेथील हकीकतीविषयीं वर्णन '**बोस्तान**' या ग्रंथाच्या आठव्या भागांत दिलें आहे. त्यांत त्या देवळांत चाललेला मूर्तिपूजेचा (त्याच्यामतें) निंद्य प्रकार पाहून ह्या कट्या महंमदभक्तानें संतापानें तेथील पुजाऱ्यास एका विहिरींत लोटल्याबद्दलचेंही वर्णन केलें आहे !

प्राच्य चरित्रकारांनीं **सादी**च्या प्रवासांच्या निर्विवाद तारखा मिळविण्याविषयीं कांहीं साधन ठेवलें नाहीं. त्यांणीं एव्हढेंच लिहून ठेवलें आहे कीं, **सादी**नें बाराव्या वर्षी अंदाजें **निजामिया** पाठशाळेंत पाय ठेवल्यापासून तीस वर्षें विद्याव्यासंगांत व पुढील तीस वर्षें [illegible]त घालविलीं.

खुद **सादी**च्या ग्रंथांत जागजागीं आलेल्या वर्णनावरून, त्याच्या प्रवासांचे काळ आपणास बऱ्याच अंशीं ठरवितां येतात. **अबुलफर्ज** बिन् **ज्यौजी** ज्याच्याजवळ **सादी** आपल्या तरुणपणांत अभ्यास करीत होता. तो इ. स. १२०१ त मरण पावला. त्यानंतर **सादी इराक** किंवा **इराण** देशांत गेला तो सुमारें पंधरा सोळा वर्षांनीं गेला होता. तसेंच **सादी**नें **तुर्कस्थानां**तील प्रवासाच्या हकीकतींत, सुल्तान **खता, काशगर** येथें जाण्यापूर्वी त्याचा **महमद ख्वार्जमशहा** याच्यावरोवर नुकतांच तह झाला असल्याचें लिहलें आहे, त्यावरून हा **तुर्कस्थान**चा प्रवास त्यानें याच सुमारास केला असावा असें सिद्ध होतें. आणि त्यानें आपले मुख्य दोन ग्रंथ रचण्याच्या ४० वर्षे पूर्वीच त्याची कवित्वाविषयीं कीर्ती, **शिराज** शहरापासून **काशगर** इतकें दूर असूनही, तेथें पोहोंचली असल्याचें सिद्ध होतें.

तसेंच **ताब्रेज** येथील तत्कालीन प्रसिद्ध **हामामुद्दीन** कवी व **शेख सादी** यांची भेट झाल्याविषयींची पुढील गोष्टही याच सुमारास घडली असावी. ती गोष्ट येणेंप्रमाणें:—

सादीनें **ताब्रेज** येथें गेल्यावर **हामाम** कवीविषयीं शोध केला, तेव्हां त्यास इतर गोष्टींबरोबर असेंही कळून आलें कीं, **हामाम** यास एक अतिसुंदर व सुस्वरूप मुलगा होता. त्याला तो परकी लोकांपासून इतका जपत असे कीं, तो त्यास स्नानास देखील एका खानगी हामामांत किंवा स्नानगृहांत नेत असे. ज्या दिवशीं त्या स्नानगृहांत **हामाम** यावयाचा होता, त्या दिवशीं **सादी**ही तेथें जाऊन, तो आपल्या मुलासह येईपावेतों, एका कोपऱ्यांत लपून बसला

होता. आणि तो येतांच **सादी**नें अंगावरील दरवेशी कपडे काढून हामामांत उडी टाकिली. हें पाहून ख्वाजा **हामाम** याला त्रास व राग येऊन, त्यानें मुलाला आपल्या मागें वसवून, **सादी**ला, 'तू कोण व कोठून आलास व काय उद्योग करितोस?' ह्मणून विचारिलें. **सादी**नें **शिराज**च्या पुण्य-भूमीहून आल्याचें कळविलें. तेव्हां ख्वाजा ह्मणाला, 'ईश्वर साक्ष, या देशांत **शिराज**चे लोक कुत्र्याहून अधिक आहेत! **सादी**नें उत्तर दिलें, 'आमच्या देशांत याच्या अगदीं उलट प्रकार आहे, कारण तेथें **ताब्रेज**चे लोक कुत्र्याहून कमी योग्यतेचे आहेत.' त्यावर ख्वाजानें त्रासून व शरमिंदा होऊन, '**शिराज** येथें **हामाम** याची कविता कोणी ह्मणतात कां?' ह्मणून विचारतां **सादी**नें होय ह्मणून **हामाम**च्या एका कवनाच्या अखेरच्या पुढील अर्थाच्या दोन ओळी ह्मणून दाखविल्या.

'मी व माझें मापूक यांच्यामध्यें **हामाम** हाच आड-पडदा आहे व हा उभयतांमधील पडदा निघून जाण्याची मला उमेद आहे.'

हें ऐकून **हामाम**नें ह्मटलें, 'मला वाटतें तुह्मीच **शेख सादी** आहांत, कारण त्यांच्याशिवाय अशी वाक्पटुता दुसऱ्यांत असणें कठिण.' त्यावर **सादी**नें होय ह्मणतांच ख्वाजानें त्याच्या हाताचें चुंबन करून मुलाकडूनही तसें करविलें व त्याला घरीं नेऊन बरेच दिवस राहून घेऊन त्याचा मोठा आदरसत्कार केला.

सादीचे समकालीन व ज्यांच्या बरोबर त्याचा पत्रव्यहार होत असे, असे **कोहिस्थान** येथील **नजीरी** व **दिल्ली** येथील **अमीर खुसरू**, हे कवी होते. त्यांत **खुसरू**

हा दिल्लीचा सुलतान **महमदखान बलबन्** याच्या दरबारीं होता. या सुलतानानें, **सादी**ला दोन वेळ मोठ्या आग्रहानें बोलावणें पाठवून **मुलतान** येथें त्याच्याकरितां एक मठ स्थापन करून त्यांच्या खर्चास आसपासचे कांहीं गांव लावून देण्याचें कबूल केलें. पण **सादी**नें ह्यातारपण व अशक्तपणाच्या सबबीनें त्याचें ह्मणणें मान्य केलें नाहीं व त्याला आपल्या ग्रंथांची एक स्वहस्तलिखित प्रत मात्र पाठवून दिली. त्याचप्रमाणें त्यानें **खुसरू**च्या काव्याची प्रशंसा लिहून, त्याला एक उपदेशपर पत्रही पाठविलें. **सुलतान महमदखान** इ. सन १२८३ या वर्षीं **मोंगलां**बरोबरच्या लढाईंत मारला गेला त्या अर्थीं, वरील पत्रव्यवहार सन १२८० च्या सुमारास झाला असावा याबद्दल **तारिख फेरिष्ता,** या ग्रंथाच्या दुसऱ्या भागांत वर्णन केलें आहे.

सर्व प्रवास आटोपल्यावर **सादी**नें आपल्या शहराच्या बाहेरच्या एका आश्रमांत वास करून आंपलें सर्व बाकीचें आयुष्य धर्मकृत्यें व ग्रंथरचना करण्यांत घालविलें. या आश्रमांत राजे सरदार व साधुलोक, त्याच्या भेटीस येऊन त्याला खाण्यास आणून देत असत. त्यांपैकीं एक भाग तो स्वतः खाई व दुसरा दान करीत असे व तिसरा भाग एका पाटींत घालून आश्रमाच्या द्वाराशीं जाणाऱ्या येणाऱ्या गरीब विचाऱ्या लांकडें तोडून आणणाऱ्या लोकांकरितां टांगून ठेवीत असे.

गुलिस्तान् मधील पुष्कळ वर्णनावरून, त्या वेळच्या दरबारांतील मोठमोठे कामदार व सरदार लोक **सादी**ला फारच पूज्य मानीत होते असें सिद्ध होतें. तसेंच हीं

पूज्य बुर्द्धा, **अतावुक** घराण्यांतील राजे राज्य करीत होते तों पावेतोंच राहिली असें नसून, त्यांच्या मागेंही हि० सन ६६३ किंवा इ० स० १२६५ या वर्षीं **मोगल** घराण्याचे राजे राज्य करूं लागले, त्यांच्या कारकीर्दींत व थेट **सादी**च्या मरणापर्यंत ती कायम राहिली होती. उदाहरणार्थ, मलिक **शमसुद्दीन ताजगुई** याच्या कारकीर्दींत, त्याला न कळत **शिराज** येथील लष्करी अंमलदारांनीं कांहीं निरुपयोगी खारका, भाजीवाले व इतर व्यापारी लोकांनां मनास वाटेल तसे दाम घेऊन जबरदस्तीनें विकत दिल्या होत्या. या लोकांमध्येंच **सादी**चा एक भाऊ, राजवाड्याच्या दारासीं भाजीचे दुकान लावून बसत होता, तोही सांपडला होता. **सादी**नें ही हकीकत ऐकतांच पुढील मजकुराचें एक कविताबद्ध पत्र बादशहाकडे पाठविलें.

'माझ्या भावाची हकीकत, आपल्यास माहीत नाहीं, असें मी खास समजतों. अतिशय दारिद्र्यामुळें त्याला घालण्यास इजार देखील नाहीं, असें असूनही त्याला कामदारांनीं अतिशय महाग दरानें खारका विकत घ्यावयास लावलें आहे. याहून अधिक कष्ट ते कोणते असणार? मुलें, पक्षी व गरीब लोक, ज्यांच्याजवळ द्रव्याचा लेश नाहीं, त्यांनांही खारका फुकट खावयास मिळतात. आपण जो कर वसूल करणारा नेमला आहे, तो केवळ एक **तुर्की** राक्षस आहे. त्याच्याहून वाईट मनुष्य सांपडणें कठिणच. महाराज, एखादे दिवशीं, लोक त्याला असें मारतील कीं, त्याला पुनः घरांतून बाहेर पडणें मुष्कील पडेल.'

मलिक **शमसुद्दीन** यानें हें पत्र वाचतांच हंसून, ज्यांना ज्यांना खारका जबरदस्तीनें विकत घ्याव्या लागल्या होत्या त्यांना, कांहीं सांगावयाचें आहे त्याकरितां त्या सर्वांनीं समक्ष हाजर व्हावें म्हणून आज्ञा दिली. सर्व व्यापारी लोक जमा झाल्यावर त्यानें त्यांना कच्ची हकीकत विचारली. व कामदारांच्या हुकूमानें त्यांनां जितके दाम द्यावे लागले होते, ते सर्व ज्यांचे त्यांस परत देऊन ज्यांनीं देणें बाकी होते त्यांस ते माफ केले. नंतर स्वतः **शेख सादी**कडे जाऊन त्यानें माफी मागून त्याजवळ दुवा मागून म्हटलें, 'अहो **शेख**, आपल्या भावाकडे गेलेले सर्व खारकांचे गोण मी त्यास फुकट दिले आहेत. शिवाय माझी एक आपल्यास विनंती आहे कीं, आपला भाऊ गरीब असल्याचें ऐकून त्याला देण्याकरितां मी हें थोडेंसें द्रव्य आणलें आहे, तें आपण कृपा करून त्यास द्यावें.' असें बोलून त्यानें, **सादी**, स्वत:करितां एक कवडीही घेणार नाहीं हें माहीत असल्यानें, बरोबर आणलेले एक हजार दिरम, मोठ्या लीनपणानें पुढें ठेवून, नमस्कार करून त्याची रजा घेतली. यावरून पुढें, मलिक **शमसुद्दिनानें सादी**च्या भक्तीमुळें सर्व भाजीवाल्या लोकांस खारका फुकट मिळण्याचा हुकूम केला, अशी सर्वतोमुखीं प्रसिद्धी झाली.

याचप्रमाणें **सादी** व **इराण**चा दुसरा मोंगल बादशहा **आबाकान** याचा वजीर ख्वाजा **शमसुद्दीन** व त्याचा भाऊ 'जहान् कुशाई' या ग्रंथाचा कर्ता **अल्लाउद्दीन**, यांच्या मध्यें असलेला स्नेहसंबंध पुढील गोष्टीवरून व्यक्त होईल.

सादी स्वतः लिहीतो कीं, 'मी **काबा**च्या यात्रेहून परत **ताब्रेज**च्या राजधानींत आलों व तेथील विद्वान,

हकीम व साधू लोकांचा परिचय करून घेतला, व तशा थोर लोकांमध्येंही माझी मानमान्यता झाली. नंतर तेथील वजीर **अल्लाउद्दीन** व ख्वाजा **शमसुद्दीन** यांच्या व माझ्यामध्यें पुष्कळ स्नेहसंबंध असल्यामुळें त्यांची गांठ घेण्याच्या इच्छेनें एके दिवशीं मी त्यांच्या सेवेंत हजर होण्याकरितां निघालों, तों ते दोघेही त्या पृथ्वीपती बादशहाच्या बरोबर घोड्यावर बसून चालतांना पाहून, मी थोडा आड होऊं पाहात होतों, इतक्यांत तेच मजकडे वळले व घोड्यावरून उतरून मजकडे येऊं लागले. त्यांणीं जवळ येतांच मला मोठा प्रेमभाव दाखवून, मोठ्या आदरानें सलाम करून, माझ्या हातापायांचें चुंबन करून झटलें, 'आपण अह्मांस सूचना न करितां याल, असें अह्मांस वाटलें नव्हतें.'

'बादशहानें हा सर्व प्रकार पाहून झटलें, 'हा **शमसुद्दीन** आज इतके वर्षेपर्यंत माझ्याजवळ आहे, व मी एवढा सार्वभौम राजा असल्याचें त्याला माहीत असून, त्यानें आज या गृहस्थाची जशी बडेजाव व जसें मानमरातब्याचें वर्तन ठेवलें, तसें मजशीं कधींही ठेवलें नाहीं.'

ते दोघेही परत येऊन घोड्यावर स्वार झाल्यावर बादशहानें, **शमसुद्दीना**कडे पाहून झटलें, 'तुह्मी ज्याला इतक्या प्रेमानें व मानसन्मानानें वागविलें असा हा कोण आहे?' ते झणाले, 'महाराज, ते आमचे वडील आहेत.' बादशहा झणाला, 'मी पुष्कळदां तुमच्या वडिलांविषयीं तुह्मांस विचारतां ते वारल्याचें तुह्मी कळविलेंत'. त्यावर ते झणाले, 'महाराज, ते आमचे **शेख**, किंवा गुरू आहेत. त्यांचें नांव व यश बहुधा महाराजांच्या कानांवर आलेंच

असेल. **शेख सादी** ते हेच आहेत, व यांची कविता सर्व पृथ्वीवर प्रसिद्ध आहे.'

हें ऐकून, **आवाकानानें**, त्यांना माझी भेट करून देण्यास सांगितल्यावरून, मी त्यांच्याकरितां जाऊन बादशहाची भेट घेतली. मी परत यावयास निघालों तों बादशहानें मला कांहीं उपदेश करण्याविषयीं प्रार्थना केली. तेव्हां मी झटलें, 'या जगांतून तुला सुकर्माचा बदला किंवा दुष्कर्माबद्दल शासन, यांशिवाय दुसरें कांहीं बरोबर नेतां येणार नाहीं. व याची आवड निवड तुझ्या हातीं आहे.' यावर **आवाकान** यानें याच अर्थाचें कवन करण्यास सांगितल्यावरून, पुढील अर्थाचें कवन मी त्यास झणून दाखविलें.—

'प्रजेच्या हिताविषयीं तत्पर असणाऱ्या राजाला, त्यानें प्रजेपासून घेतलेला करभार फलप्रद व मोक्षदायक होतो. कारण तो त्यांच्या संरक्षण करण्याबद्दलच्या बक्षिसाप्रमाणें होतो. परंतु तोच जर प्रजापालक नसेल तर, तो त्याला सर्पविषाप्रमाणें होतो. कारण तो जें कांहीं हरण करून खातो, तें खऱ्या मुसलमान लोकांवर एक जुलमाचा कर बसविल्याप्रमाणें होय.'

'हें ऐकून **आवाकान** यानें गहिवरून, 'मी प्रजापालक आहें किंवा नाहीं?' झणून विचारलें. तेव्हां मी उत्तर दिलें कीं, 'तूं खरा प्रजापालक असलास तर वरील कवितेचे पहिले दोन चरण तुला योग्य आहेत, व नसलास तर शेवटचे दोन चरण पुष्कळ आहेत.'

शमसुद्दीन वरचेवर **शेख सादी** यांच्याकडे दानधर्मा-करितां पुष्कळ पैसा पाठवीत असे. त्याचा, **सादी** अगदीं

अपंग व दीन लोकांच्या उदरनिर्वाहाकरितां उपयोग करीत असे.

पुढें **सादी** बरेच वर्षेंपर्यंत वांचला व त्यानें **आबाकान** याच्या मरणाची व त्याच्या मागें त्याच्या पुत्रानें **शम-सुद्दीना**ची विटंबना केल्याची सर्व हकीकत ऐकिली.

सादीच्या जन्मकालाप्रमाणेंच त्याचा मरणकालही अनिश्चित आहे, परंतु, पुष्कळांच्या मतें, तो हि० स० ६९१ किंवा इ० स० १२९२ या वर्षीं **शावाल** महिन्यांतील एक्या शुक्रवारीं मरण पावला. त्याला **शिराज**च्या थोड्या अंतरावर बाहेर नेऊन पुरलें. त्या जागीं त्याची कबर व तिच्या शेजारीं एक मोठें भव्य विद्यालय, व एक मठ बांधलेला आहे. त्या ठिकाणीं प्रति बुधवारीं त्या शहरचे व आसपासचे पुष्कळ लोक नेमानें अद्याप दर्शनास जातात.

कवि, या नात्यानें **सादी**चा फार मोठी योग्यता आहे. कांहीं लोक तर त्याला **इराण**चे अति प्राचीन व फार नामांकित असे जे **फर्दूसी, निजामी** व **अनवारी,** हे तीन कवी होऊन गेले, त्यांच्याबरोबर मानतात. त्यांचीं काव्यें **अरबी** व **फारसी** भाषेंत पुष्कळ व पुष्कळ विषयांवर आहेत., तीं बहुतेक गझलच्या वृत्तांत आहेत व या वृत्तांतील **सादी**चीं काव्यें अप्रतिम असल्याबद्दल लौकीक आहे. किंवहुना लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, **सादी**च्या पूर्वी गझल या छंदांतील नांव घेण्याजोगें एकही काव्य नव्हतें.

त्याच्या सर्व ग्रंथांतून **गुलिस्तान्*** हा ग्रंथ अप्रतिम व

---

* या ग्रंथाच्या किंचित् खालोखाल, असा त्याचा दुसरा ग्रंथ **बोस्तान्**–ज्याचें प्रस्तुत भाषांतर केलें आहे–तो होय. तो सर्व पद्यरूप आहे. त्यावरून **सादी**ची कविताशक्ति व्यवहारचातुर्य,

अव्वल नंबरचा असल्याविषयीं सर्वमान्य व सार्वत्रिक मत आहे. हा ग्रंथ अतोनात लोकप्रिय आहे. हा ग्रंथ बहुतेक सर्व लोक वाचतात इतकेंच नाहीं तर त्या पैकीं पुष्कळसा भाग मुखपाठ करतात व विद्वान् लोकही, वर-चेवर दाखल्याप्रमाणें त्यांतील वेंचे म्हणून दाखवितात. या ग्रंथाचें सौंदर्य, एक तर त्याची रचना फार साधी व रसाळ आहे यावरून, व शिवाय त्याच्यांत निरनिराळ्या तऱ्हेची विषयरचना व गद्यपद्यात्मक व विनोदपर चुटके व उपदेशपर बोधवचनें, यांची जी मजेदार सांगड घातलेली आहे त्यावर अवलंबून आहे.

सादीच्या अंगच्या स्वभावाविषयीं त्याच्या ग्रंथांतून जागजागीं, अनेक द्योतक दाखले आढळून येतात. त्याव-रून असें स्पष्ट दिसून येतें कीं, त्याच्या अंगीं खरी प्रेमळ भक्ति, निस्सीम स्नेह, व मनुष्यमात्रांविषयीं दया, हे गुण असल्याचें स्पष्ट दिसून येतें. परमेश्वराच्या आज्ञेनुसार निमू-

---

वैराग्य, ईश्वराच्या ठिकाणीं निःसीम भक्ति, भूतमात्रांविषयीं निःसीम प्रेम परधर्मसहिष्णुता वगैरेंचें यथार्थ ज्ञान होतें. हा ग्रंथ पद्यरूप अस-ल्यानें **गुलिस्तान्** व याहून कांहींसा कठिण असल्यानें विद्वान् लोकां खेरीज, सामान्य लोक बहुशः तो समग्र क्वचित वाचतात, व यामुळें त्याचें खरें स्वरूप सहजपणें प्रत्येकांच्या ध्यानांत येत नाहीं. हा ग्रंथ "बाहरी मुत्करीब," या वृत्तांत लिहिलेला आहे. व हें वृत्त कांहीं अंशीं संस्कृतांतील भुजंगप्रयात वृत्ताप्रमाणें आहे.

याशिवाय **सादी**नें **पंदनामा, मस्नवी** व दुसरे अनेक ईश्वर-भजनपर व बोधपर चुटके केलेले प्रसिद्ध आहेत. त्याच्या ग्रथांत प्रसाद, सुबोधपणा, अर्थगांभीर्य व सदुपदेश, हे गुण जणों ओतप्रोत भरलेले आहेत.

टपणें वर्तन करणें व तो ठेवील त्या स्थितींत तृप्त राहणें यांविषयीं तो केवळ लोकांस उपदेशच करीत होता असें नसून तदनुरूप स्वतः वर्तन करीत असे. तो श्रीमान सहज होऊं शकता, परंतु तो सर्व धनद्रव्यास अगदीं तुच्छ मानीत असे, व जेव्हां कोणी कांहीं त्यास देई तेव्हां तावडतोब तें तो दान करून धर्मकृत्यांकडे लावून टाकीत असे. एका विद्वान ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं, '**सादी** हा इतर ढोंगी व मतलबी **सुफी** लोकांप्रमाणें इतर मुसलमानांच्या खर्चानें स्वतः ऐषआरामांत व चैनींत राहणाऱ्यापैकीं **सुफी** नव्हता, कारण अशा वर्तनानें त्या धर्मावर अपयश आणणाऱ्या लोकांना, तो फार तुच्छ समजून त्यांस झिडकारीत असे. त्याचे आचार व वर्तन सामान्यतः शुद्ध असून अतिशय चेंगटपणाचें किंवा तुच्छ असें नव्हतें. केवळ वेदांतमत, ज्याच्या योगानें मनुष्य अगदीं प्रारब्धवादी व सुस्त होऊन जातो, किंवा विचारस्वातंत्र्याचें मत, ज्याच्या योगानें, मनुष्य अतिशय स्वतंत्र व स्वयंमन्य होऊन परमेश्वरासही जुमानीनासा होतो, या दोन्ही मतांच्या, मध्यमस्थितीचें मत स्वीकारून तदनुरूप वर्तन कसें ठेवावें, हें तो चांगलें जाणत होता.'

सादीचे सर्वच ग्रंथ निर्दोष आहेत असें नाहीं, त्याच्या ग्रंथांत कांहीं कांहीं भाग बरेच अश्लील व अग्राह्य आहेत व त्यांचे ते दोष कोणत्याही निमित्तानें कमी होऊं शकत नाहींत. **गुलिस्तान्** व **बोस्तान्** ग्रंथांतही त्याच्या सामान्यतः उत्तम स्वरूपास दूषण आणणारे, असे पुष्कळसे अश्लील भाग आढळून येतात. त्यांवरून तत्कालीन लोकस्थितिरीतीचा मात्र बोध होतो, परंतु ग्रंथकर्त्याच्या शुद्ध

हेतूंवर कांहीं आक्षेप येतो असें नाहीं. **सादी**च्या **गुलिस्तान्** व **बोस्तान्** इत्यादि ग्रंथांत हा एक विशेष गुण आढळून येतो कीं त्यांत अतिशयोक्ती व दुसरे असंभाव्य अलंकार इतर प्राच्य कवींच्या मानानें फारच बेताबातानें उपयोगांत आणलेले आहेत. व त्याच्या अलंकारांत काठिण्य व दुर्बोधपणा किंवा वेडगळपणा, क्वचितच आढळून येतो.

गुलिस्तान् व **बोस्तान्**, हे दोन ग्रंथ **सादी**नें हिजरी सन ६५३ व ६५५ किंवा इसवी सन १२५८ व १२५७ यांसालीं केल्याचें त्यानें त्या त्या ग्रंथांतच लिहिलें आहे.

माधवराव व्यंकटेश लेले.

सुमनविकास.

मंगलाचरण व उपोद्घात.

या जगताचा स्वामी व सकल जीवांस उत्पन्न करणारा, रसनेच्या ठायीं वाणी उत्पन्न करणारा, परमश्रेष्ठ, कृपा करणारा, साहाय्यकर्त्ता, अपराधांची क्षमा करणारः, असा जो **परमेश्वर** त्याचें नांव घेऊन मी या ग्रंथास आरंभ करितों. तो असा परमशक्तिमान् व समर्थ आहे कीं, त्याच्या द्वारापुढून कोणी मागें फिरला तर त्यास दुसऱ्या कोणाच्याही दरवाज्यापुढें मान मिळत नाहीं. मोठमोठे मानी बादशहा आपलीं मस्तकें त्याच्या पुढें नम्र करून जमीनीवर लोळतात. तो गर्विष्ठलोकांना एकदम धरून शिक्षा देत नाहीं, किंवा क्षमा मागणारांना झिडकारीत नाहीं. तो वाईट कर्म केलें तर रागावतो, परंतु पुनः त्याबद्दल क्षमा मागितली तर तें वाईट कर्म विसरून जातो.

या जगांत कोणी आपल्या पित्याबरोबर भांडूं लागेल तर त्या प्रत्यक्ष पित्यालाही तेव्हांच पुष्कळ राग येतो, तसेंच कोणी आपसांत भांडून, भांडण न मिटलें, तर ते एकमेकांचा शत्रूप्रमाणें द्वेष करून नाश करूं इच्छितात. सेवक आपल्या कामांत चपल नसल्यास धनी त्यांच्यावर प्रेम ठेवीत नाहीं. आपल्या मित्राबरोबर कोणाचा स्नेह न राहिला तर तो त्यापासून कोसोंगणती दूर जातो, तसेंच कोणी शिपायानें आपलें काम नीट न केलें तर त्याचा सेनापति किंवा

वादशहा त्याच्यावर नाराज होतो; परंतु कोणीही अपराध केला ह्मणून त्रिलोकेश भगवान् नाराज होऊन त्याला अन्न-पाणी मिळणें बंद करितो असें नाहीं. हीं तीन्हीं जगतें त्याच्या ज्ञानसागरांत एका बिंदूप्रमाणें आहेत. तो मनुष्याचा अपराध पाहून त्यावर आपल्या क्षमाशीलपणानें पांघरूण घालतो.

हें जगत् त्यानें सर्वांकरितां घातलेलें मुक्तद्वार अन्नछत्र आहे; तेथें शत्रु मित्र सर्व सारखे. तोच जुलूम करूं लागेल तर त्याच्या जबरदस्त हातांतून कोण वांचेल? कोणी त्याच्या बरोबरीचा आहे किंवा कोणी त्याच्या योग्यतेचा त्याचा वैरी आहे असा नुसता त्याच्यावर आळ सुद्धां येऊं शकत नाहीं. मनुष्य व भूतजाती यांच्या प्रार्थना त्याच्या गांवींही जाऊं पावत नाहींत. सर्व वस्तुमात्र, मानवजाति, पक्षी, मुंग्या, माशा वगैरे झाडून त्याचे केवळ ताबेदार आहेत. त्यानें असें सर्वव्यापी अन्नछत्र घातलें आहे कीं त्यांत **सीमुर्ग*** किंवा **शहामृग**पक्षी यासही **काफ**† नांवाच्या पहाडांत दाणा-पाणी मिळतें. तो परमशुद्ध, कृपारूप बिछायत पसरणारा, कार्यसाधक, सर्व जगाचा सांभाळ करणारा व सर्व गुह्यें जाणणारा असा आहे. खरोखर अहंपणा व गर्व त्यालाच

---

* **सीमुर्ग** नांवाचा एक कौराणिक पक्षी आहे; त्याची मान फार लांब असून त्याच्या पंखाचे रंग इंद्रधनुष्याप्रमाणें चित्रविचित्र आहेत. त्याचें आयुष्य अनंत असून पृथ्वीवर महाप्रलय झालेले त्यानें अनेकवेळ पाहिले आहेत. या पक्ष्याचा एकच जोडा आहे, असें **कुराणांत** सांगितलें आहे.

† **काफ** नांवाचा एक कौराणिक पर्वत आहे. तो सर्व भूमंडलास वेढून राहिला आहे व त्याची उंची २५०० मैल आहे. याच पर्वतावर **सीमुर्ग**पक्ष्यांचें वसतिस्थान आहे.

शोभतो, कारण त्याचें राज्य फार प्राचीन आहे व तो स्वतःसिद्ध राजा आहे. तो एकाच्या शिरावर बादशाही मुकुट ठेवतो व दुसऱ्याला सिंहासनावरून ओढून धुळीस मिळवितो. तो कोणाच्या डोक्यावर सुदैवरूप टोपी घालतो व कोणाच्या बगलेंत दुर्दैवाची घोंगडी देतो.

त्यानें **खलीला**करितां आपल्या इच्छामात्रेंकरून आगींत बाग उत्पन्न केला व **नील** नदीच्या पाण्यावर आग उत्पन्न करून एक सेनेची सेना जाळुन टाकली*. त्याची

* या ठिकाणीं **कुराणां**तील दोन प्रसिद्ध दंतकथांचा संबंध आहे. तो येणें प्रमाणें:—

इब्राहीम खलीलुल्ला पैगंबर हा **नमरुद** नांवाच्या **मिस**रच्या बादशहाच्या वेळेस होता. पदरच्या पंडितांच्या सांगण्यावरून बादशहानें **खलीला**स नास्तिक ठरवून जिवंत जाळण्याचा हुकूम दिला व त्याकरितां कित्येक कोसोंगणतीं विस्तीर्ण चिता तयार केली व तिच्यामध्यें सैतानाच्या सूचनेवरून त्यांना एका उंच झुल्यास लटकावून फेकून दिलें. पुढें कांहीं दिवसांनंतर चितेच्या आंत पाहतात तों **खलीला** एका सुंदर व शोभिवंत बागेंत **कुराण** वाचीत व परमेश्वराचें चिंतन करीत बसला आहे. परमेश्वरानें त्याच्याकरितां त्या आगींतही शीतळ असा बाग उत्पन्न केला होता.

मूसा पैगंबर हा **मिसर**देशचा बादशहा **फिरओन** जो आपणास प्रत्यक्ष परमेश्वर म्हणवीत होता, त्याच्यावेळीं झाला. ज्योतिष्यांनीं बादशहास सांगितलें होतें कीं, तुला तूंच पाळलेल्या एका मुलापासून मृत्यु येईल. तेव्हां पहिल्यापासून त्यानें नियमित दिवशीं उपजलेली मुलें जिवंत न राहण्याविषयीं बंदोबस्त केला व त्याच्याच एका नोकराच्या पोटीं **मूसा** जन्मास आला त्यांला आईबापांनीं भीतीमुळें पेटींत घालून **नील** नदींत सोडून दिलें. ती पेटी धीवरांस सांपडली, त्यांनीं तो मुलगा पाहून बादशहास अर्पण केला. त्याच्या बायकोनें

पहिली, आगींत बाग बनविण्याची इच्छा, त्याच्या कृपेची व दुसरी पाण्यावर जाळण्याची इच्छा, त्याच्या नाराजीची द्योतक होय. तो पडद्याआड असलेलींही वाईट कर्में पाहतो; व त्याच पडद्याच्यायोगानें कृपा करणार असलातर त्या वाईट कर्मांवर पांघरूण घालूं शकतो. त्यानें भिवविण्याकरितां आपली आज्ञारूप तरवार खेंचली असतां **फिरिष्ते*** किंवा देवदूतही भयानें बहिरे व मुके होतात. तसेंच त्यानें कृपा करून गरीबलोकांवर अनुग्रह करण्याकरितां आरोळी दिली तर प्रत्यक्ष **अजाजिल**† यालाही त्या कृपेंतून आपण एक अंश घ्यावा असें वाटेल.

त्याचें पाळण केलें. पांचव्यावर्षींच त्यानें बादशहाचें सिंहासन लीलेनें मोडलें. पुढें मोठेपणीं त्याचें व बादशहाचें वैर पडून पुष्कळ लढाया झाल्या. शेवटीं एका लढाईत **मूसा**चा पराभव होऊन तो **नील**-नदीच्या तीरावर येतांच त्याच्या माहात्म्यामुळें नदीनें दुभागून त्यास रस्ता दिला. मागून **फिरओन** पाठलाग करीत आला. त्याला नदीनें आपल्यास भिऊन वाट दिली आहे असें वाटून तोही नदींत शिरला. इतक्यांत परमेश्वरास **मूसा**चें साहाय्य करणें इष्ट असल्यानें त्याच्या लीलेनें नदीचें पात्र पूर्ववत् झालें व त्यांतून ज्वाला निघून बादशहाचा फौजेसुद्धां नाश झाला.

* **फिरिष्ते** किंवा देवदूत हे अग्नीपासून उत्पन्न झालेले परमेश्वराची स्तुती हेंच अन्न खाऊन स्वर्गलोकीं राहणारे, गंधर्वविशेष होत.

† **अजाजिल** हा सर्व फिरिष्त्यांचा मुख्य सरदार होता. परमेश्वरानें **आदम** यास उत्पन्न करून सर्व देवदूतांस त्याला नमस्कार करण्यास सांगितलें तेव्हां **अजाजिला**नें गर्वानें ती गोष्ट मान्य न करितां ईश्वराशीं सामना केल्यावरून त्यानें त्याला कैद करून सर्व दुष्टपणाचा पुतळा बनवून त्याच्या गळ्यांत बेडी घालून त्यास प्रलयापर्यंत नरकांत टाकलें. यासच सैतान म्हणतात.

त्याचा मोठेपणा व कृपा यापुढें मोठमोठ्या महात्म्यांनींही आपला मोठेपणा सोडून दिला आहे. गरीबीनें वागणाऱ्यांना तो कृपेच्या द्वारानें फार जवळ आहे; व क्षमा मागणाऱ्यांची प्रार्थना तो मान्य करणारा आहे. न घडलेल्या गोष्टीही तो स्वबुद्धीनें जाणतो व अकथित गुप्त गोष्टीही त्यास त्याच्या मोठेपणानें कळतात. भूगोल व अंतराल यांचा तो नैसर्गिक रक्षण करणारा आहे व अखेरच्या न्यायाच्या दिवशीं* तोच न्यायासनाधीश होईल. त्याची भक्ती न करणारा असा नाहीं व त्यानें लिहिलेलीं अक्षरें कोणीही आपल्या बोटानें खोडूं शकत नाहीं. तो परम पुरातन असून स्वतः सुकर्म करणारा व सुकर्मप्रिय असा आहे

---

* महाप्रलयाच्या वेळीं परमेश्वर एक मोठें दरबार करून त्या दिवसापर्यंत पृथ्वीवर उत्पन्न होऊन गेलेल्या सर्व लोकांचा एकेदिवशीं न्याय करून पुण्यवान् लोकांस अक्षय्य सुखवासांत व पाप्यांस अक्षय्य नरकवासांत टाकील, असे व त्या दिवशीं **महंमद** पैगंबर हा परमेश्वराजवळ हस्तक असा उभे राहून जे लोक त्याच्यावर भरंवसा ठेवण्यास तयार असतील त्यांना पापमुक्त करण्यास तयार राहील. तसेंच त्या दिवशीं तांब्याची जमीन व लोखंडाचे आकाश होईल व सूर्य जो हल्लीं चौथ्या आकाश पटलावर आहे तो जमिनीपासून सव्वा भाल्या इतका जवळ येईल यामुळें अतिशय गरमी होऊन लोकांची मस्तकें भाताच्या हंडीप्रमाणें शिजूं लागतील. अशा त्या भयंकर प्रसंगी आजवर झालेले सहस्रशः पैगंबर लोक केवळ आपापल्या जिवाची काळजी करीत राहतील; पण एक **महंमद** पैगंबर मात्र सर्व लोकांच्या उद्धाराकरितां तयार राहील. त्यादिवशीं **इस्राफील** फिरिष्ता मोठी तुतारी वाजवील. तिचा नाद सर्व भुवनांतराल भेदून जाईल व त्या आवाजानेंच सर्व मृत लोक जागे होतील, असें मुसलमानी धर्मग्रंथांत लिहिलें आहे.

व आपल्या नैसर्गिक विचित्र कलमानें तो गर्भांतही नक्षी काढणारा आहे. त्यानें चंद्रसूर्यांस पूर्वेकडून पश्चिमेकडे गती दिली व पाण्यावर पृथ्वी वसविली. जमीन कांपूं लागून दीन झाली तेव्हां त्यानें तिच्या कडेवर पर्वतरूप मेखा गाडल्या.

तो चंचल अशा रेताला अप्सरेप्रमाणें सुंदर रूप देतो; अशी चंचल जलावर चित्रकारी आजवर कोणी केली आहे!! तो रत्नें व पीरोजे यांना कठीण अशा दगडांत उत्पन्न करितो व हिरव्या वृक्षशाखेपासून रक्तवर्णाचीं फुलें उत्पन्न करतो. तो स्वातिमेघयाचेजलबिंदूं समुद्रांत व पिल्याच्या पाठीपासून रेत-बिंदूं मातेच्या उदरांत आणितो व त्या बिंदूंपासून चमकणारीं मोतीं व या दुसऱ्या बिंदूंपासून एक सुंदर पुतळा उत्पन्न करितो.

त्याच्या शहाणपणापुढें एक अणुरेणूही छिपलेला नाहीं व त्याच्याजवळ प्रकट व गुप्त एकच आहे. साप व मुंग्या व कितीएक हस्तपादबलहीन प्राणी आहेत त्यांनांही दररोज अन्नपाणी देण्यांत तो तत्पर आहे.* त्याच्याच आज्ञेनें शून्यापासून अस्तित्व उत्पन्न झालें. त्याच्यावांचून अशी अघटितघटना करणें कोण जाणतो? तोच पुनः शून्यत्व-रूप पडद्याआड हें सर्व जग नेऊं शकतो व तेथून पुनः तें महाप्रलयानंतर न्यायाकरितां आणूं शकतो. सर्व जग एकत्र होऊन त्याच्या वैभवाची साक्ष देत आहे.

---

* पूर्वी हें जग, आकाश, सूर्य, चंद्र, नक्षत्रें, प्रकाश अंधकार वगैरे कांहीं एक नसून सर्व शून्यमय होतें. पुढें परमेश्वरानें इच्छामात्रें करून कुन् या शब्दाचा उच्चार करण्याबरोबर सर्व उत्पन्न झालें असे **कुराणांत** लिहिलें आहे.

त्याचीं वर्में व थोरपणा यांचा शोध करितांना सर्व लोक थकले परंतु त्यांना त्याच्या वैभवाशिवाय कांहीं आढळलें नाहीं व स्वतःच्याच शहाणपणानें कोणास त्याच्या सौंदर्याचा अंत लागला नाहीं. त्याच्या नैसर्गिक मोठेपणापर्यंत शंका व विचाररूप पक्षी उडून पोहोंचूं शकत नाहींत व त्याच्या गुणरूप पदरापर्यंत समजरूप हात पोहोंचूं शकत नाहींत. या ईश्वरविचाररूप भोंवऱ्यांत हजारों नावा बुडाल्या व त्यांच्यांतून एक फळीही पुनः वर येऊन किनाऱ्यास लागली नाहीं.

कितीएक रात्रीच्यारात्री मी या सृष्टीचा विचार करीत बसलों होतों; पण मूर्तिमंत भयानें माझा हात धरून मला उठवून लाविलें. ईश्वरशक्ति व ज्ञान या विस्तृत भूमंडलास कसें घेरा देऊन राहिलें आहे! हे जिवा, तुझा विचार त्याला कधींही घेरा देऊं शकणार नाहीं. त्याच्या नैसर्गिक वर्माला तुझी बुद्धी व त्याच्या गुणांच्या पूर्ण विचाराला तुझे विचार पोहोंचूं शकत नाहींत. विद्वत्तेच्या संबंधांत **सेहवा*** नांवाच्या प्राचीन थोर पुरुषाचीही बरोबरी एखादा करूं शकेल, परंतु अद्वितीय व परम पवित्र अशा ईश्वराच्या वर्मांची व ज्ञानाची बरोबरी कोणीही करूं शकत नाहीं. मोठमोठ्यांनीं या विचाररूप मार्गांत घोडे दवडले, परंतु त्याचा कांहीं अंत न लागल्यानें ते थकून स्वस्थ राहिले. प्रत्येक ठिकाणीं असा घोडा दवडला जात नाहीं.

---

* **सेहवा** हा बनीइस्राइल या अरबीलोकांत एक फारच विद्वान् होऊन गेला. त्याची अशी गोष्ट सांगतात कीं तो धर्मोपदेश करतांनां एकदां जो शब्द तोंडांतून निघाला तो पुनः एक वर्षभर न काढितां दुसऱ्या शब्दांनीं तोच अर्थ व्यक्त करून सांगत असे.

बहुतेक जागीं थकून हात टेंकावे लागतात. कोणी **ईश्वरा**चें धर्म जाणणारा झालाच तर तें ज्ञान प्रकट करण्याकरितां परत येण्याचा दरवाजाच त्याला बंद होतो व त्याला त्या धर्मासंबंधी माहिती संसारी लोकांस सांगतां येत नाहीं. या ईश्वरस्वरूपज्ञानविचार करणाऱ्यांच्या पंक्तींत जर कोणास ईश्वरज्ञानरूप अमृताचा प्याला प्राप्त झालाच तर तो त्यास, जणूं चिरकाल उन्मत्त करून टाकणारा मद्याचा प्यालाच होतो.

या जगांत दोन पक्षी आहेत त्यांतील एका पक्ष्याचे झणजे, संसाऱ्याचे जणूं डोळे बांधलेले आहेत व दुसऱ्याचे झणजे फकीराचे डोळे खुले आहेत ; परंतु त्याचे पंख जळाले आहेत. संसारी, मौलवी वगैरे लोक ईश्वरज्ञानाविषयीं आंधळे असतात, परंतु ते उगीच उपदेश व उपासना वगैरे पंख फडफडावीत असतात. दुसरे फकीर व वली* लोक आहेत त्यांस तें ज्ञान होतें, परंतु ते तल्लीन मस्त व सुस्त होऊन गेलेले असतात. एक तर कोणालाही **कारून**च्या†

---

* मुसल्मानांत महात्मे लोक अनेक प्रकारचे आहेत. त्यांत सर्वांत मुख्य **पैगंबर**. त्यांच्या मागून झालेले चार **खलीफा** नंतर बारा **इमाम** व यांहून कमी योग्यतेचे **अवलिया** लोक व त्यानंतर **गोस, कुतब, अबदाल** वगैरे आहेत. हे सर्व लोक केवळ विरक्त व या सर्व जगास तुच्छ मानणारे होते. व त्यांचें वर्तन संसारी लोकांस मस्ताप्रमाणें वाटत होतें.

† **कारून** हा **मूसा**पैगंबराचा भाऊ मोठा धनलोभी होता. त्यानें **मूसा**जवळून किमया शिकून चाळीस भांडारें धन संपादन केलें. पुढें **मूसा**नें त्यांतून शास्त्राज्ञेनुसार चाळीसावा भाग धर्माच्याकामीं देण्यास सांगितल्यावरून त्या लोभ्याला **मूसा**विषयीं मत्सर उत्पन्न होऊन त्यानें एका स्त्रियेकडून **मूसा**वर जार कर्माचा आळ आणण्याची खटपट केली त्यावरून **मूसा**नें त्यास त्या चाळीस भांडारें धनासुद्धां पृथ्वींत गाडून टाकलें.

खाजिन्याकडे जाण्याचा किंवा ईश्वरज्ञानाचा मार्ग सांपडत नाहीं व कोणास सांपडलाच तर पुनः बाहेर येण्याचा मार्ग त्यांस सांपडलेला नाहीं.

मी या ईश्वरविचाररूप अपारसागराच्या लहरींत गर्क होऊन मरण पावलों आहें. या समुद्रांतून कोणीही आपली नाव नीट पार लावूं शकला नाहीं. या ईश्वरज्ञानविचाररूप अरण्याच्या पार जाण्यास कोणी इच्छील तर त्यानें प्रथम मनरूपी अश्वाच्या पायाच्या परावर्तनेच्छारूप शिरा तोडल्या पाहिजेत. प्राण्या, आपल्या मानसरूप आरशांत न्याहाळून पाहशील तर हळूं हळूं तुला स्वच्छता प्राप्त होईल; परंतु कदाचित् ईश्वरज्ञानाचा गंध तुला मस्त करील व तो गंध तुला "अलस्त बिरब्बेकुम्*" या महावाक्याचा घोष करूं इच्छिणारा करील.

ईश्वरज्ञानेच्छारूप पायांच्या द्वारानेंच तुला येथून रस्ता मिळेल. व येथून ईश्वरप्रेमरूप पक्षांनीं तुला उडतां येईल. तूं त्या जागीं पोंहोंचशील तेव्हां निश्चयात्मक मन तुझे संशयरूप पडदे फाडील व नंतर त्याच्या मोठेपणावांचून तुह्मां उभयतांमध्यें दुसरा कोणचाही पडदा राहणार नाहीं.

ऐहिक ज्ञानरूप दुसऱ्या घोड्याची येथें गतीच नाहीं. त्या घोड्याचा लगाम आश्चर्यानें पकडून त्याला मागे परत-

---

* ईश्वरानें मनुष्यास प्रथम उत्पन्न करितांच वरील वाक्य ह्मटलें. याचा अर्थ "मी तुझा पालन करणारा आहें," असा आहे. यावर मनुष्याला ज्ञान नसल्यानें त्यानेंही तेंच वाक्य ह्मटलेलें पाहून ईश्वरानें त्यास ज्ञान दिलें. तेव्हां मनुष्यानें "होय तूंच पाळण करणारा आहेस," असा जबाब दिला. यावरून ईश्वरप्राप्ति, ज्ञानरूप पडद्याच्या आड आहे असें ज्ञानीलोकांचें मत आहे.

विलें या सागरांत दुवा करणाऱ्या **पैगंबरा**शिवाय कोणीही पार गेला नाहीं* व जो कोणी त्याच्यावर भरंवसा ठेऊन गेला नाहीं तो मार्ग चुकला. या **पैगंबरा**च्या मार्गाशिवाय दुसरा मार्ग कोणी धरला तर तो कधींही मुक्कामावर पोंचणार नाहीं. **पैगंबरा**च्या द्वाराशिवाय कोणीही सुमार्गाला लागूं शकेल असें हे **मादी**, तूं केव्हांही समजूं नको.

पैगंबरांची स्तुती व त्यांचें वर्णन.

पैगंबर हे शुद्धसत्त्व व सन्मार्गी असून या जगांत **ईश्वरा**च्या आज्ञा प्रकट करणारे व सर्व मुसलमान समूहाचे साहाय्यकारी आहेत. ते इतर सर्व **पैगंबरां**चे नायक व सर्व लोकांस सन्मार्गदर्शक व **परमेश्वरा**चे अत्यंत भरंवशाचे कामगार आहेत. **जिब्रईल**† देवदूताची पृथ्वीवर उतरण्याची जागा तेच आहेत. ते सर्व जगाचे साहा-

*पांचव्या पानावरील टीप पहा.

†**जिब्रईल** हा फिरिष्टयांच्या चार सरदारांपैकीं एक आहे. त्याच्याकडे या भूलोकावर अवतरलेल्या पैगंबराकडे परमेश्वराचे निरोप आणण्याचें काम आहे. त्याचें वास्तव्य चौथ्या आकाशपटलावर एका **सिद्रतुलमुंत** हा किंवा सिद्रा नांवाच्या बदरिकाश्रमांत आहे. फिरिष्टयांचे सरदार चार जिब्रईल, मिकाईल, इस्राफील व इज्राईल. जिब्रईल यांचें वर्णन वर केलेंच आहे. मिकाईल याचेकडे पर्जन्यवृष्टी करण्याचें काम आहे. इस्राफील हा अखेरच्या न्यायाच्या दिवशीं लोकांस उठविण्याकरितां तुतारी हातीं घेऊन वाजविण्यास सिद्ध होऊन सारखा उभा आहे व चौथा इज्राईल याजकडे प्राणिमात्राच प्राण हरण करण्याचें काम आहे. या प्रत्येकांचे वास्तव्य निरनिराळ्या आकाशपटलांवर आहे.

ग्यकारी सन्मार्ग दर्शकांचे अग्रणी व शेवटच्या दिवशींच्या दरबारांत अग्रस्थानीं वसणारे प्रतिनिधी आहेत. **पैगंबर** हेच सर्व जगांत **ईश्वरा**बरोबर भाषण करणारे आहेत. **मूसा*** **पैगंबरा**चे **ईश्वरा**बरोबर बोलण्याचें स्थळ ज्याप्रमाणें **तूर**† नांवाचा पहाड होता त्याप्रमाणें हें सर्व भुवनांतरालच त्यांची **ईश्वरा**बरोबर बोलण्याची जागा आहे. जगांतील सर्व प्रकाश त्याच्या प्रकाशाचीच छाया आहे.

ते **पैगंबर** असे उपजत विद्वान होते कीं त्यांनीं स्वतः पोरके असूनही **कुराण**शिक्षणाशिवायच इतर धर्मवाद्यांचीं ग्रंथालयें जणों धुवून टाकिलीं होतीं. ज्यावेळीं त्यांनीं दुष्ट लोकांस भिवविण्याच्या इराद्यानें स्वेच्छेनें अंगुलीरूप तरवार खेंचली त्यावेळीं त्यांच्या अद्भुत शक्तीनें ती **चंद्रा**च्या कंबरेंत लागून त्याचे दोन तुकडे झाले‡. त्यांच्या पैगंबरीबद्दल सर्वतोमुखि प्रसिद्धि झाली तेव्हां **नोशेरवान**§ बादशहाचा महाल

---

* पृ० ३ टीप पहा.

† **तूर**नांवाचा एक पर्वत **अरबस्थानां**त आहे. या पर्वतावरच **मूसा** पैगंबराचें परमेश्वराशीं भाषण होत असें. **मूसा**च्या नेत्राग्नीनें हा पर्वत जळून भस्म होऊन त्याचा सुर्मा झाला. तो हल्लीं **मक्के**च्या यात्रेस जाणारे लोक डोळ्यांत घालण्यास आणतात.

‡ **महंमद**पैगंबर यानें लोकांची खात्री करण्याकरितां एकदां सर्वांसमक्ष आपल्या बोटानें इषारा करण्याबरोबर चंद्राचे दोन तुकडे होऊन ते त्याच्या दोन्हीं बगलेंतून निघून गेले, अशी दंतकथा आहे.

§ **नोशेरवान** नांवाचा एक **इराण**देशांत मोठा नामांकित बादशहा न्यायाच्या कामांत विख्यात होऊन गेला. त्यानें प्रत्यक्ष आपल्या पुत्राला त्याच्या अपराधाकरितां देहांत शिक्षा दिली.

कपायमान झाला. त्यांनीं **कल्मा*** म्हणून **लात**† या देवाच्या **काब्या**‡तील मूर्तींचे लाथेनें तुकडे तुकडे केले. व धर्माच्या वैभवानें व इज्जतीनें **उज्जा**ची तेथेंच असलेली मूर्ति फोडून तिची इज्जत घेतली. त्यांनीं **लात** व **उज्जा** यांच्या मूर्तीचाच नाश केला असें नाहीं तर **तोरेत** व **इंजील**§; जे यहुदी व ख्रिस्ती लोकांचे धर्मग्रंथ‖ यांनां ही रद्द केलें.

ते एका रात्रींत **बुराक**¶ घोड्यावर बसून सर्व साही आकाशपटलांवर फिरून आले. व थोरवीमध्यें व मानस-

---

* 'कल्मा' हा ब्राह्मणलोकांच्या गायत्रीप्रमाणें प्रत्येक मुसल्मानानें नेहमीं म्हणण्याचा मंत्र. "लाइलाहा इल्लल्लाहो मुहंमदुर्रसूलुल्लाः" अर्थः—पूजनीय असा, शिवाय परमेश्वराच्या कोणी नाहीं व **महंमद** हा परमेश्वरानें पाठविलेला आहे."

† **लात** व **उज्जा** हे **मक्का** येथील प्राचीन देवालयांत मुसलमानी धर्म प्रकट होण्यापूर्वी दोन देवतांचे पुतळे होते.

‡ **काबा** हें, **मक्का** येथील मुसलमानांचें मुख्य पूजेचें व दर्शनाचें स्थल होय. त्याचें महाद्वार, **इब्राहीम** खलील पैगंबर यानें बांधविलें होतें.

§ आजवर परमेश्वराने दिलेले धर्ममंथ प्रकटकरणारे पैगंबर चार झाले आहेत:— १ **मूसा**पैगंबर यहुदी किंवा ज्यूलोकांचा. हा **जुडिया** प्रांतांत होऊन गेला. याचा धर्ममंथ **तोरेत**. २ **दावूद** पैगंबर याचा धर्ममंथ **जबूर**. हाही यहुदीलोकांतच झाला ३ ईसा, किंवा **येशूख्रिस्त** हा ख्रिस्तीलोकाचा पैगंबर. याचा धर्ममंथ, **बायबल**, यालाच **इंजील** म्हणतात. ४ **मुहंमद** हा पैगंबर मुसल्मानलोकांचा. याचा धर्मग्रंथ **कुराण** आहे.

¶ **बुराक** नावाचें स्वर्गींचें वाहन **महंमद** पैगंबर यांस परमेश्वराकडून प्राप्त झालें होतें. त्याचें मुख माणसांप्रमाणें व शरीर अश्वाप्रमाणें असून त्यास पंख होते.

‖ हिंदूलोकांत ज्याप्रमाणें सप्तस्वर्ग आहेत त्याचप्रमाण मुसलमानलोकांत सहा आकाशपटलें मानलीं आहेत. तेथील स्थिती निरनिराळी असून त्यावर निरनिराळ्या देवदूतांची वगैरे वस्ती आहे.

न्मानांत देवदूतांपेक्षांही वरचढ झाले. ईश्वरसान्निध्यरूप मैदानांत त्यांनीं अशा वेगानें तो **बुराक** घोडा दवडला कीं **जिब्रईल** हा **सिद्रानांवा**च्यामध्येंच त्याच्या राहण्याच्या आकाशपटलावर थकून मागें राहिला, हें पाहून त्या **काव्या**चें स्वामी अशा **पैगंबरां**नीं त्याला झटलें, 'हे **देवदूता**, पुढें चल, स्नेहसंबंधांत मला तूं खरा समजतोस तेव्हां आतां बरोबर येण्यास मागें कां घेतोस!' त्यानें सांगितलें, 'यापुढें जाण्याची माझ्यांत शक्ति नाहीं, मी येथेंच राहतों. कारण माझे पंख थकले, मी याहून एक केंसभर पुढें जाईन तर ईश्वरतेजाचा अग्नि माझे पंख जाळून टाकील.'

शेंवटच्या न्यायाच्या दिवशीं मुसलमानांतून कोणीही पापामुळें मागें नरकांत गहाण राहणार नाहीं. कारण त्याच्या करितां असा मोठा अग्रणी मार्गदर्शक जिम्मेवार आहे.

हे भुवनैक**पैगंवरा** तुह्मांला मान्य होईल अशी स्तुति मी किती करूं, करावी तेवढी थोडीच आहे. तुमचा सर्वत्र जयजयकार असो. **फेरिष्ते** यांचा, दरूद* तुमच्यावर, तुमच्या मित्रावर व धर्मवृद्ध्यर्थ झटून तुमची पैरवी करणाऱ्या सर्व लोकांवर होवो.

त्या मित्रांपैकीं वृद्ध **अबूबकर**‡ हे आपले प्रथम शिष्य होत. दुसरे मगरूर अशा वनांतील देवतेबरोबर लढून तिचा हात तोडणारे असे **उमर**‡ होत. तिसरे रात्रीं जागणारे व ज्ञानी असे **उस्मान**‡ हे होत, व चौथे **दुलदुल**वर† स्वार होणारे **अल्लीशाहा**‡ हे होत.

---

* **पैगंबरा**चें नांव येतांच प्रत्येकानें म्हणण्याची स्तुति.

† **दुलदुल** नांवाचा एक **पैगंबरा**चा उंट होता.

‡ **महंमद** पैगंबराचे चार विश्वासुक स्नेही व सरदार होते. ते

हे **ईश्वरा,** धर्मवाक्यांनीं तुझी स्तुती करीत असतांना मला मरण येवो. ही माझी प्रार्थना तूं मान्य कर किंवा नको करूं; परंतु माझा हात शेवटच्या न्यायाच्या दिवशीं **रसूल पैगंबराचे** नातू व **फातमाचे*** पुत्र **हसन*** व **हुसेन*** यांच्या पदरास धरलेला राहो. मी त्यांच्या नांवावर ओवाळून टाकला गेलों तरी बेहतर आहे.

त्याच्या मागून त्याधमाचे प्रवर्तक व गुरू व सरदार झाले. यांपैकीं हजरत-**अबूबकर** व हजरत **उमर** हे पैगंबराचे सासरे व हजरत **उस्मान** व हजरत **अल्ली** हे त्यांचे जामात होते. या चौघांसच मुख्य पैगंबरचे खलीफे म्हणतात.

*__फातमा__ पैगंबराची कन्या हजरत **अल्ली**ची बायको होय. **हसन** व **हुसेन** हे इचेच पुत्र होते. यांची दंतकथा अशी आहे कीं, पैगंबराच्या शिष्यांमध्यें **उमर** बिन **सुफियान** नांवाचा त्याप्रांतांचा एक सरदार होता. एकेदिवशीं पैगंबरानें त्यांस म्हटलें कीं तुमच्या वंशांतील एकाच्या हातून आमच्या वंशाचा नाश होणार आहे. हें ऐकून **उमर** यांनीं वंशवृद्धी न व्हावी म्हणून आजन्म स्त्रीसंग केल्यावांचून राहण्याचा निश्चय केला. शेवटीं तो अतिवृद्ध झाल्यावर एकदां लघवीस बसला असतांना त्याच्या इंद्रियास विंचवानें दंश केला व त्यामुळें प्राणांतिक अवस्था झाली व ती टळण्याला स्त्रीसंगाशिवाय इलाजच नसल्यानें नाइलाजानें त्याचा एका वृद्धेशी संग झाला. तिच्या पोटीं गर्भ राहिला व त्याच्यावंशांत, **सिमर जिल्जोवन** उर्फ **यजीद** हा राजा उत्पन्न झाला होता. पैगंबर व खलीफा यांच्या मागें बारा इमाम धर्माधिकारी झाले त्यांत प्रथम इमाम **हसन** हा होता. त्यास त्याच्या बायकोनें राज्यलोभानें विष देऊन मारले. त्याच्या मागून त्याचा धाकटा भाऊ **हुसेन** हा इमाम झाला. त्याला **यजीद** यानें आपलें वर्चस्व कबूल करण्यास आज्ञा केली ती त्यानें मान्य न केल्यानें उभयतांमध्ये युद्ध झालें. त्यांत **यजीदा**नें **हुसेन** यास **करबला** येथें गांठून घेरा घालून त्याचें पाणी बंद केलें. त्यास अतिशय त्रास दिला व शेवटीं दाहावे दिवशींच्या हल्ल्यांत तो मारला गेला. अलीकडे **ताजिये** किंवा **ताबूत** होतात ते याच गोष्टीच्या स्मरणार्थ होतात.

हे कृपावंता **पैगंबरा,** तुमच्या प्रसादानें फकीर व भक्त-मंडळींतून थोडेसे लोक जर तुह्मांवरोबर स्वर्गलोकाचे पाहुणे झाले तर त्यापासून तुमच्या थोरपणांतून व वैभवांतून ईश्वरी दरबारांत काय कमी होणार आहे? त्या **ईश्वरानें** स्वतः तुमची प्रशंसा केली व तुह्मांला मोठेपणा दिला व **जिब्रईल** यास तुमच्या वैभवापुढें लीन केलें. अत्युच्च असें आकाशही तुमच्या थोरवीपुढें लज्जित आहे. तुह्मी उत्पन्न झालां तेव्हां खुद्द **आदम*** हा मृण्मय व जलमय व अभूत होता. अस्तित्वाचें तुह्मी आदिमूल आहां व ही सृष्टी तुमची शाखा आहे. मी तुह्माला कोणची एक गोष्ट सांगूं तें मला कळत नाहीं, कारण मी गोष्टी सांगेन त्या सर्वांपेक्षां तुह्मी फार थोर व श्रेष्ठ आहां. तुह्मांप्रमाणें तुह्मीच आहां व तुमचा खरा श्रेष्ठपणा व तुमची खरी प्रशंसा ह्मणजे **कुराण**च होय. व तुमचें रूपही त्यांतच यथार्थ वर्णिलें आहे. तुमची तारीफ हा दास **सादी** काय करील? तुह्मांवर **दरूद** असो व तुह्माला नमस्कार असो.

ग्रंथ रचण्याचे हेतु.

मी या भूमंडलावर बहुतसें भ्रमण केलें व नाना तऱ्हेच्या लोकांशीं अनेक दिवस पर्यंत माझी सोबत राहिली. तसेंच जगाच्या प्रत्येक कोपऱ्यांतील मी फळें खाल्लीं व जणों प्रत्येक खळ्या पासून मूठभर धान्य पावलों आहें. पण †**शिराज**च्या प्रमाणें नम्र व शुद्ध अंतःकरणाचे लोक मला

---

* सर्वांत प्रथम परमेश्वरानें उत्पन्न केलेल्या मनुष्याचें हें नांव.

† हें **इराण**देशचें एक प्राचीन राजधानीचें शहर होतें.

इतरत्र आडळले नाहींत. **परमेश्वरा**ची त्या शहरावर कृपा असो. या पुण्यभूमींतील लोकांच्या स्नेहानें माझें मन **रूमशाम**वरूनही* उठविलें.

या सर्व **रूमशाम** वगैरे कडील प्रदेशरूप उपवनांतून आपल्या मित्रांकडे रिक्तहस्तानें परत जाणें मला अयोग्य वांटून मी विचार केला कीं, इकडून आपल्या मित्रांकरितां भेटी दाखल उत्तम वस्तु अशी जी साखर ती न्यावी. मज-जवळ ती खरी साखर नव्हती, परंतु साखरेपेक्षांही सुरस अशा कथा होत्या. लोकांनीं प्रत्यक्ष घेऊन खाण्यासारखी ही शर्करा नसून ती विद्वान् लोकांनीं कागदांत बांधून घेऊन हमेषा मनानें खाण्या जोगी होती.

मी हें ग्रंथरूपी टोलेजंग मंदीर रचिलें तेव्हां त्याच्यांत दशभागात्मक दहा द्वारें ठेवलीं. पहिल्या भागांत न्याय, चांगुलपणाच्या युक्तिप्रयुक्ति, शहाणपण, ईश्वराचें भय व ईश्व-राच्या हातून होणारें जगाचें रक्षण इतके विषय आहेत. दुसऱ्या भागांत परोपकाराचा पाया रचिला आहे, कारण, परोपकारी मनुष्य **ईश्वरा**चे उपकार स्मरून त्याचें स्तवन करितो. तिसऱ्या भागांत **ईश्वर**प्रेम व भजन व प्रेम व तज्जन्य मद यांबद्दल विस्तार आहे—ज्याच्या योगानें मनुष्य आपल्या स्वतःच्याही ताब्यांत न राहतां उन्मत्त होतो तें हें प्रेम नव्हे. चौथ्या भागांत नम्रता व आगतस्वागत हे विषय, पांचव्यांत तृप्ति हा विषय व सहाव्यांत ईश्वरीनेमानेम मान्य करून संतुष्ट राहणाऱ्या भक्तांविषयीं लिहिलें आहे. सातव्यांत लोकांस सदुपदेश व आठव्यांत **ईश्वरा**नें आप-

---

* **रूमशाम** यासच हल्लीं **कान्स्टांटिनोपल** म्हणतात. हें **तुर्कस्थान**ची राजधानी आहे.

ल्यास नानाप्रकारचें सुख दिलें आहे त्याच्याबद्दल त्याचें उपकारस्मरण हे विषय आहेत. नवव्या भागांत पापाचा पश्चात्ताप व सुमार्गावलंबन व दहाव्या भागांत ईश्वरप्रार्थना करून ग्रंथ समाप्ती केली आहे.

शुभवार शुक्रवार व शुभ साल *हिजरी ६९९ त व शुभ तारखेस व दोनी **ईदीच्या** †मधील जिल्काद महिन्यांत, हा सुगद्यरत्नभांडाररूप ग्रंथ सुगद्यमौक्तिकांनीं‡ जणों भरून गेला.

हे विद्वान् व सुस्वभाव सज्जन हो, खरे थोर व विद्वान् असे लोक दोषदृक् नसतात असें ऐकण्यांत आहे, तें तुम्ही ध्यानांत ठेवा. अंगरखा हरीर§ किंवा परनियान§ सारख्या कितीही उंची कपड्याचा असो त्याच्यांत उबेकरितां रुईची भरती नाइलाजास्तव भरली जातेच. तुम्ही स्वतः परनियान् कपड्याप्रमाणें सुंदर आहां म्हणून मला दोष काढून दुःख देण्याचा यत्न न करितां कृपा करून माझे भरतीरूप दोष छपवा. मी आपल्या जवळील विद्वत्तारूप पुंजीची घमंड करतों असें नसून, गरीबीनें हात पसरून आपल्या जवळ ही भिक्षा मागत आहें. पापीजनांस भयप्रद व

---

* हिजरीसन, पैगंबर यांनीं **मक्का** शहरांतून **मदीना** येथें प्रयाण केलें त्या दिवसापासून मोजतात. ही गोष्ट ई० स० ५८० त घडली.

† ईदुल्फितरव ईदुज्जुहा, सव्वाल महिन्याची पहिली तारीख रमजान याउपासाच्या महिन्याच्या नंतर येणारी व जिल्हेज महिन्याची दहावी तारीख या दोन ईदी होत. यां दोनीमध्ये जिल्काद महिना येतो.

‡ मूळफारसी ग्रंथ पद्यबद्ध आहे.

§ दोन उत्तम जातीचे रेशमीकपडे **इराण** देशांत उत्पन्न होतात.

पुण्यवानांस तोषद अशा शेवटच्या न्यायाच्या दिवशीं ईश्वर पुण्यवानांकरितां पाप्यांवरही कृपा करील असें ऐकतों.

हे वाचकहो, माझ्या या ग्रंथांत तुह्माला कांहीं दोष दिसला तर त्याबद्दल ईश्वराप्रमाणें क्षमा करा. यांतील हजार कवितांतून एक जरी पद्य तुह्माला पसंत आलें तर थोरपणानें तेवढ्या पद्याकरितां तरी या ग्रंथाची निंदा करण्यास प्रवृत्त होऊं नको. हा माझा ग्रंथ खरोखर **पारस*** देशांत **खुतन**† देशांतील कस्तूरीप्रमाणें बिनमोल आहे. ढोलाच्या आवाजावरूनच दुरून मोठी भीति असते तसा प्रकार नाहीं.

आजवर माझे दोष पडद्यांआड छिपल्या प्रमाणें होते. जसें कोणी वेडेपणानें **हिंदुस्थानां**त मिऱ्यें न्यावीं त्याप्रमाणें **सादी**नें बगीच्यांत बाहेरून फुलें आणलीं आहेत. मी खजूराप्रमाणें बाहेरून मात्र गोडगोड सालीनें लपेटलेला आहें, ती साल काढली कीं आंतून कठीण दगडाप्रमाणें बीच निघणार.

महंमद‡ अताबुक बिन साद जंगी बादशाहाची प्रशंसा. (त्याची कबर प्रकाशयुक्त राहो.)

बुद्धया राजेलोकांची व्यर्थ प्रशंसा करणें मला मुळींच

---

* **पारस**, इराणदेश.

† **खुतन** ह्मणजे **तिबेट**च्या आसपासचा एक प्रदेश.

‡ हा **शीराज**चा बादशहा हिजरी स. ५९९ त **अताबुक तुगरल** यास मारून गादीवर बसला. सुल्तान **महंमद ख्वारज्म** यास खंडणी देत असे. तो मरण पावल्यावर **साद अबुबकर** बिन **साद जंगी** हा गादीवर बसला. याच्याच वेळीं शेख **सादी** होता. **अताबुक** या घराण्यांतील पहिला बादशहा **अताबुक सनुक्र** हा हि.स. ५४४ त, सुल्तान **मसऊद**च्या कारकिर्दीत गादीवर बसला व १३ वर्षें राज्य

मनापासून आवडत नाहीं, परंतु अमुक राजाच्या वेळीं मी हा ग्रंथ केला असल्यानें थोर मनाचे लोक कदाचित् म्हणतील कीं, **अबुबकर**बिन **साद** याच्या कारकिर्दीत **सादी** विद्वत्तेच्या संबंधांत शिरोमणी होऊन गेला असून त्यानें त्याच्याबद्दल कांहींच न लिहिणें योग्य नव्हतें.

नोशेरवान बादशहाच्या कारकिर्दीत जसे **पैगंबर** त्याच्या भरंवशावर निर्धोर होतें, तसें या बादशहाच्या भरंवशावर मीही घमंड केल्यास मलाही योग्यच होईल. दुसरा खलीफ**उमर** याच्या नंतर खरा पृथ्वीपालक, धर्मसंरक्षक व न्यायी असा बादशहा **अबूबकरा**प्रमाणें दुसरा कोणी झाला नाहीं. हे प्रजाजनहो, त्या सार्वभौम व श्रेष्ठजनमुकुटमणीच्या न्यायी राज्यांत सुखानें काल-क्रमण करा. कोणीही विपन्न मनुष्य आश्रयाकरितां आल्यास त्याला येथें आश्रय मिळतो व त्याला याशिवाय अधिक सुखावह दुसरें स्थळच मिळत नाहीं.

या बादशहाचा दरवाजा **काबा**च्या दरवाज्याप्रमाणें आहे. त्याच्यापासून अतिशय सुख होतें, कारण, या जागीं फार दूरदूरचे लोक येऊन सफलेच्छ होऊन जातात. अशा तऱ्हेची संपत्ति, देश व गादी, इतरत्र पाहण्यांत नाहीं. कारण, हें सर्व येथें आबालवृद्ध व दरवेशी यांच्याचकरितां

करून मरण पावल्यावर **अताबुक जंगी** बिन **मोदूद** हा गादीवर बसला. तो १४ वर्षें राज्य करून हि. स. ५७० त मरण पावला. त्याच्या मागून त्याचा मुलगा **अताबुक तुक्ता** बिन **जंगी** हा गादीवर बसला. त्यानें २० वर्षें राज्य केलें. त्याच्या मागून **तुगरल्** बिन् **सनकर** हा गादीवर बसून त्यानें ९ वर्षें राज्य केलें. त्याच्या मागून हि० स० ५९९ त गादीवर बसल्याची हकीकत वर लिहलीच आहे.

जणों फुकट वाढून ठेवलेलें आहे. या बादशहाजवळ कोणीही असा दुःखी कष्टी आला नाहीं कीं, ज्याच्या व्रणित मनावर त्यानें योग्य मलम लावलें नाहीं. तो सर्वदां कल्याणेच्छु असून तें प्राप्त होण्याची त्यास फार उत्कंठा आहे, तर हे परमेश्वरा त्याचें वांछित परिपूर्ण कर. त्याच्या मुकुटाचें सुयशरूप शिखर गगना इतकें उंच आहे तथापि त्याचें शिर जमीनीवर विनयानें नम्र आहे.

नम्रता व विनय, थोर व मानी लोकांस शोभा देतात, फकीर नम्र असला तर काय नवल? त्याची त्याला संवयच आहे. गरिबाच्या नम्रतेपासून काय फल? जबरदस्त नम्र होईल तर **ईश्वर** त्याचा साहाय्यकारी होतो. त्याच्या चांगुलपणार्चा कीर्ति न छिपतां त्याच्या कृपेचा लौकिक सर्व जगभर पसरतो.

त्याच्याप्रमाणें ज्ञानी व सुशील, उदार व थोर बादशहा या जगांतील प्रजेच्या आठवणींत झाला नाहीं. त्याच्या राज्यांत कोणीही कष्टी किंवा कोणाच्या जुलुमामुळें अन्याय झाला म्हणून रडणारा आढळणार नाहीं. त्याच्या-सारखा नियमितपणा, व्यवस्था व कायदा कोणीही चालूं ठेविला नाहीं. **फरेदून*** बादशाहा इतका मोठा असूनही असा भाग्यवान् झाला नाहीं. त्याचा गरीब लोकांस पुष्कळ आधार आहे यामुळेंच त्याची योग्यता **ईश्वरा**पुढें **फरेदून**पेक्षां अधिक आहे. या जगतावर

* **फरेदून** हा एक विख्यात व शूर असा **इराण**चा बादशहा ई. स. पूर्वी सुमारें ८०० वर्षें होऊन गेला. त्याला **गाव** नांवाच्या एका लोहारानें **जुहाक** यास मारून, त्याच्या पूर्वजांच्या गादीवर बसविलें होतें.

पसरलेल्या त्याच्या न्यायरूप छायेमुळें एखाद्या कंगाल म्हातारीस सुद्धां प्रत्यक्ष **रुस्तुमाचें*** भय वाळगण्याचें कारण नाहीं. कालचक्राच्या व **ईश्वरी** क्षोभाच्या नांवानें सर्वदां लोक रडत होते परंतु, हे न्यायी बादशाहा, तुझ्या राज्यांत यामुळें कोणीही कष्टी नाहींत. तुझ्या राज्यांत पृथ्वी सुखांत असलेली मी पाहतों परंतु तुझ्या मागें या राज्याचा वंदोबस्त कसा होईल कोण जाणें.

तुझ्या कारकिर्दींत **सादी** उत्पन्न झाला यावरून तूं मोठा दैववान खरा, कारण, आचंद्रार्क तुझें नांव या ग्रंथांत कायम राहील. इतर बादशाहांनीं सुयश मिळविलें तें त्यांनीं प्राचीन बादशाहांपासून शिकून घेतलें परंतु, तूं आपल्याच सन्मान्यवर्तनानें त्या सर्वांच्या पुढें पाऊल टाकलेंस. †**शिकंदर** बादशाहानें दगड व कांसें यांची भिंत रचून ‡**याजूज**नामक दैत्यांचा मार्ग रोंकला, परंतु तूं त्यां धर्म-

---

* **रुस्तम** नांवाचा एक विख्यात पहिलवान **इराण**देशांत होऊन गेला. त्याच्या बापाचें नांव **जाल** होतें. तो **काणनियन्** कुलांतील बादशाहांचा सेनापती होता. त्यांनीं त्याला त्याच्या पराक्रमावरून **सीस्तान** व **जाबुलिस्तान**चें राज्य दिलें होतें. त्यानें **अस्फंदयार**शीं द्वंद्व युद्ध करून त्यास ठार मारलें. तसेंच त्याच्या हातून द्वंद्व युद्धांत चुकून त्याचा पुत्र **सोहराब** हा मरण पावला.

† **शिकंदर** बादशहा खिस्ती शकापूर्वी सुमारें ३५० म्यासिडोनिया देशांत होऊन गेला. त्यानें **ग्रीस, मिसर, इराण** व **अफगाणिस्थान** हे देश जिंकून **हिंदुस्थाना**वरही स्वारी केली होती. त्याच्यावेळीं हिंदुस्थानांत **चंद्रगुप्त** नांवाचा सार्वभौम राजा होता असें म्हणतात.

‡ **याजूज** व **माजूज** नांवाच्या दोन शूर व रानटी लोकांच्या जाती होत्या, त्यांपासून **शिकंदरा**च्या प्रजेस फार त्रास होत असे. तो मिटविण्याकरितां व त्यांनीं आपल्या राज्यावर स्वारी करूं नये म्हणून **शिकंदरा**नें एक दगडाचा कोट बांधला होता. त्यांस त्यांच्या क्रूरपणामुळें लोक दैत्य म्हणत होते.

द्वेष्टया **याजूजां**करितां सोन्याची भिंत बांधलीस, **शिकं-दरा**प्रमाणें कांशाची नव्हे.

प्रजारक्षण व न्याय यांवद्दल मनोभावेंकरून जो कोणी कवी तुझी प्रशंसा करणार नाहीं त्याची वाचा वसो. वा: तुझा कृपारूप सागर व दानरूप खाण किती थोर आहे, यामुळें हें सर्व जग तुझ्या जिवावर निर्भर आहे. या बादशहाची प्रशंसा व थोरवी इतकी अवर्णनीय व अनंत आहे कीं, तिचा या ग्रंथरूप लहानशा मैदानांत समावेश होऊं शकत नाहीं. त्याच्या सर्वच गुणांचें हा **सादी** वर्णन करूं लागला तर त्याला दुसरा नवा ग्रंथ रचावा लागेल.

मी अशा सौजन्याची व थोरवीची प्रशंसा व धन्यवाद करितां करितां थकलों तेव्हां आतां त्याच्याकरितां हा आशीर्वादार्थक हात **ईश्वरा**जवळ पसरून पुढील आशीर्वाद मागावा हेंच योग्य होय.—हा भूगोल तुझें वांछित पुरविणारा व हें आकाश तुझे मनोरथ सिद्ध करणारें व साहाय्यकारी होवो व जगत्स्रष्टा **परमेश्वर** तुझें संरक्षण करणारा होवो. तुझें उन्नत ग्रह हल्लीं या जगावर प्रकाशमान असून त्यांनीं तुझ्या शत्रूंचे ग्रह अवनत करून त्या शत्रूंचाही नाश केला आहे. कालचक्रभ्रमणानें तुला त्रास न होवो व तुझ्या अंत:करणावर संशयरूप धूलिपटलही न येवो, कारण, बादशहास होणाऱ्या अशा भावी त्रासाच्या भीतीमुळेंच सर्व प्रजेसही त्रास होतो. तुझें मन व तुझें राज्य शांत व संपन्न असोत व तुझ्या राज्यापासून सर्व प्रकारचे कष्ट दूर राहोत. तुझी तनु तुझ्या धर्माप्रमाणें सर्वदां ओजयुक्त राहो व तुझ्या शत्रूचें चित्त एखाद्या सुस्त उपायाप्रमाणें शिथिल राहो. तुझें मन ईश्वरीसाहाय्यानें

सुखी राहो. तुझें मन, तुझा धर्म व तुझें राज्य उन्नत राहोत. **सर्वोत्पादका**ची सर्व प्रकारें तुजवर कृपा असो.

यापेक्षां जास्त प्रार्थना व लेखन व्यर्थ होय. थोर **परमेश्वरा**जवळ तुजकरितां एवढींच प्रार्थना पुरे आहे कीं, तो तुला सुमार्गानें चालण्यास सर्वथैव मदत करो. हें जग सोडून जाण्यांत **सादजंगी** यास दुःख झालें असें नाहीं. कारण, त्यानें तुजसारखा नांव राखणारा पुत्र आपल्यामागें ठेवला; व यांत फारसें नवलही नाहीं कारण, ही पुत्ररूप शाखा त्या पवित्र मुळापासूनच निघालेली आहे. त्याचा आत्मा वर स्वर्गांत व त्याचें शरीर खालीं जमीनींत आहे. हे **परमेश्वरा**, त्याच्या थोर व प्रसिद्ध कबरीवर आपल्या थोरपणानें कृपाजलाची वृष्टि कर. **सादजंगी** हा आतां नुसता नामशेष झाला आहे तेव्हां **सादअबुबकर** याच्यावर आकाशस्थदेवता कृपा करोत.

धर्मसंरक्षक अबुबकर विन साद याची प्रशंसा.

तो दैववान, जनमनोरंजक, वैभवधुरीण, व वयानें युवा पण उपाय व ज्ञान यांनीं वृद्ध असा आहे. तो ज्ञानसागर, धैर्यनिधि, अतुलबल व उदारमनाचा असा आहे. वाः आपल्या ओटींत असा सुपुत्र पाळणारी हल्लींची वेळारूप माता किती भाग्यवान आहे! त्यानें आपल्या कृपारूप हस्तांनीं सागरासही लाजविलें व आपल्या उन्नतीनें कृत्तिका पुंजाचीही उन्नति कमी केली. वाः, मोठमोठे मानी बादशहा स्वतः संपन्न असून तुजपुढें दीन झाले, हें खरोखर केवढें आश्चर्य आहे! मोत्यांच्या अनेक दाण्यांनीं भरलेली शिंप असते, तिच्यांतील दाण्यांची किंमत जिच्यांत एकच चांगला मोत्याचा दाणा असतो त्याच्या

इतकी नसते. तूं मूर्तिमंत राजलक्ष्मीच जणों, असा एक उत्तम मोत्याचा दाणा आहेस.

हे **ईश्वरा,** तू कृपादृष्टीनें त्याचें रक्षण कर व त्याला दृष्ट लागूं देऊं नको. हे ईश्वरा त्याचें सर्व जगांत यश गाजीव व आपल्या कृपेच्या साहाय्यानें त्यांस श्रेष्ठ कर. न्याय व सद्वर्तन यांत त्याला कायम राख व त्याचें ऐहिक व पारलौकिक मनोरथ सिद्ध कर.

हे बादशहा दुष्ट व शूर शत्रूंचा तुला त्रास न होवो व कालचक्रभ्रमणानें तुला नुकसान न पोंहचो. प्रत्यक्ष कल्पवृक्षही तुजप्रमाणें फल उत्पन्न करूं शकत नाहीं, कारण, तूं स्वतः नामांकित पिता असून तुझा पुत्र आपलें नांव वर काढतो आहे.

या घराण्यास नांवें ठेवणारीं जीं इतर घराणीं असतील त्यांच्यांत चांगुलपणाचा अभावच समजला पाहिजे. वाहवा, याच्या अंगीं किती थोर धर्म व ज्ञान आहे!! किती चांगला न्याय व निःपक्षपात आहे!! व किती सुंदर राज्य व लक्ष्मी आहे!! हीं सर्व नेहमीं अशींच सुस्थिर राहोत!!

सुमनविकास.

भाग पहिला.

राजेलोकांचा न्याय, हुषारी व युक्तिप्रयुक्ति यांविषयीं.

ईश्वरी कृपा मनुष्यमात्रांस अतर्क्य आहे. तीविषयीं स्तुति करून वाणी कोठवर उतराई होणार? हे ईश्वरा, तूं या दीनबंधू व प्रजाजनांस कल्पवृक्ष अशा बादशहास चिरकाल गादीवर कायम ठेऊन आपल्या कृपामृतानें त्याचें अंतःकरण प्रफुल्लित ठेव, त्याचा मनोरथवृक्ष सुफल कर, त्याचें मस्तक तरतरीत व मुख कृपाप्रकाशानें स्वच्छ व निर्मल ठेव.

हे **सादी**, तूं व्यर्थ फाजील स्तुति करण्याचा मार्ग सोडून तुजपाशीं सत्य असेल तेंच काढ. तू एक विश्रांति-स्थान व बादशहा हा एक पथिक आहे. तू सत्यवादी व बादशहा सत्यप्रिय आहे. स्तुतिपाठक अशा **जहीरफायर-यावी*** कवीनें जसा स्तुति करण्याचा कळस करून मत्तस्वर्ग व **परमेश्वरा**चें सिंहासन ठेवण्याची जागा व

* **जहीरफायरयावी** नांवाचा एक अतिशय लाघवी कवी इराणदेशांत होऊन गेला. त्यानें **कजलअर्सला** नांवाच्या तत्कालीन बादशहाची स्तुति केली कीं, मत्तस्वर्ग, परमेश्वराचें सिंहासन ठेवण्याची जागा व प्रत्यक्ष तें सिंहासन अशीं नऊ मुख्य आसनें एकावर एक रचावीं तेव्हां या बादशहाच्या रिकाबीपर्यंत कदाचित् पोंहोचतील.

प्रत्यक्ष तें सिंहासन अशीं, नऊ आसनेंही कजल्ल अर्मल्ला* बादशहाच्या पादतळीं लीन केलीं, तसें करण्याची तुला काय जरूर आहे?

थोरवीच्या संबंधानें आकाशासही लाथ मारण्यास बादशहास न मांगतां, त्यास. आपलें शिर प्रेमानें भूमीवर नम्र करण्यास व ईश्वरपूजनरूप द्वाराच्या उमरठ्यावर ठेवण्यास सांग, कारण सन्मार्गगाम्यांचा सरळ मार्ग हाच आहे. खरा भक्त असशील तर आपलें मस्तक या द्वारांत उंच किंवहुना आपल्या थोरपणाचा मुकुट शिगावरून काढ, असें सांग.

ईश्वरभजनसमयीं बादशाही डौल न करितां संन्यस्तप्रमाणें मोठ्यानें "हे जगत्पालका, तूंच सर्वेश्वर, समर्थ व अनाथ या दोघांचाही पोषक तूंच आहेस. तसेंच तुजपुढें मी राजा, सत्ताधीश किंवा अनुशासक नसून या पवित्र प्रार्थनामंदिरांतील दीन व अनाथ प्राण्यांपैकीं एक आहें. तुझा वरद हस्त साहाय्यकारी होणार नाहीं तोंवर स्वतः माझ्या हातून कोणाचा काय फायदा होणार? तूं सद्वर्तन व सभ्यपणा यांमध्यें मला आधार दे, त्यांवांचून माझ्यानें कोणाचें काय भलें होणार?" असें स्तवन कर.

दिवसां बादशाही करूं इच्छिशील तर रात्रीं फकीराप्रमाणें खऱ्या भावानें मनांतील मल जाळणारें असें भजन कर. मोठमोठ मानी लोक कंबर बांधून तुझ्या दारासीं सेवेंत तत्पर आहेत, तेव्हां तू भजनरूप द्वारावर आपलें मस्तक सेवेंत तत्पर ठेव.

* या नांवाचा एक **शीराज**चा बादशहा सल्जूकिया या घराण्यांतील होता. या घराण्याच्या मागून अताबुक या घराण्यातील बादशहा झाले.

वाः, सेवकास योग्य मालक व धन्याची यथावत् सेवा करणारा सेवक असणें परस्पर किती सुंदर आहे !!

गोष्ट पहिली.

रोदबार* शहराच्या मैदानांत वाघावर स्वार होऊन मजकडे येतांना एकाला मी पाहिलें, तेव्हां मजला अशी भीति वाटली कीं तिच्यामुळें माझें पाउलच पुढें चालेना. हें पाहून थोडेंसें हंसून, वोट ओंठावर ठेवून, तो ह्मणाला, "**सादी**, तूं याचें आश्चर्य मानूं नको. कारण तूं ईश्वराज्ञा उल्लंघन करूं नको, ह्मणजे तुझीही आज्ञा कोणी उल्लंघन करणार नाहीं."

ईश्वराज्ञेनुसार वागणाऱ्या राजाचा **ईश्वर** संरक्षक व साहाय्यकारी होतो. तुझा खरा मित्रच तुला शत्रूच्या हातीं सोंपून देईल असें होणें अशक्य आहे. **ईश्वरी**-मार्गावर दृष्टि ठेऊन त्याच मार्गानें चालून इच्छित मनोरथ पूर्ण करून घेणें हाच सन्मार्ग होय.

ज्यास **सादी**चें बोलणें पसंत पडेल त्यासच हा उपदेश फायदेशीर होईल.

नोशेरवान बादशहाचा हुर्मज नांवाच्या पुत्रास उपदेश.

असें ऐकण्यांत आहे कीं **नोशेरवानानें** मरतांना **हुर्मजला** ह्मटलें, "तूं स्वसुखाभिलाषीच न होतां गरीबांचीं

* **रोदबार** नांवाचें एक शहर **गीलान्** व **कजवीन्** या शहरांच्या जवळ एशियामायनर देशांत **कास्पियन** समुद्राच्या किनाऱ्यावर होतें.

मनें संतुष्ट ठेवणारा हो. तूं केवळ स्वसुखाभिलाषी होशील तर तुझ्या राजधानींत कोणासही सुख मिळणार नाहीं. धनगर निद्रिस्त व लांडगा बकऱ्यांच्या कळपांत, ही गोष्ट शहाण्यांस पसंत नाहीं. जा. आपल्या गरीब व अनाथ प्रजेचें संरक्षण कर. कारण, राजा रयतेमुळेंच राज्यपद पावतो. हे पुत्रा, प्रजा हें मूळ व राजा हा वृक्ष होय. वृक्षांस मुळांमुळेंच बळ येतें. होईल तेथवर प्रजेचें मन दुखवूं नको, दुखविशील तर आपलें मूळ खोदल्याप्रमाणें होईल.

तुला सुमार्ग हवा तर भक्तजनांचा मार्ग जो आशा व भीती यांनीं युक्त आहे. त्याचें अवलंबन कर. आपल्या राज्यास इजा पोहोंचेल अशी भीति असणाऱ्याला कोणास दुःख देणें आवडत नाहीं. स्वभावतःच दुसऱ्यास इजा न देण्याची खोड राजाच्या अंगीं नसेल तर त्याच्या राज्यांत सुखाचा लेश रहात नाहीं. आपलें राज्य कायम रहावें असें इच्छिशील तर प्रथम प्रजेस राजी राख, आणि त्याचा त्याग करूं चाहशील तर मनास वाटेल तसा वाग. राजापासून प्रजेस त्रास होत असेल त्या राज्यांत स्वातंत्र्य व सुसंपन्नता कधींही सांपडणार नाहीं. धृष्ट व अविनीत व ईश्वरासही न भिणारे अशा लोकांस भीत जा. जो राजा प्रजेचें मन प्रसन्न ठेवीत नाहीं त्यास त्याचें राज्य स्वप्नांतही संपन्न दृष्टीस पडत नाहीं.

जुलूमजबरदस्तीपासून दुर्लौकिक व नुकसान होतें असें थोर लोकांनीं फार विचार करून ठरविलें आहे. प्रजेस अन्यायानें मारणें योग्य नाहीं, कारण मुख्यत्वें प्रजाच राज्याचा आधार व भरंवसा आहे. जमीदाराची मनधरणी

स्वतःच्या फायद्याकरितां करीत जा, कारण मनसतुष्ट असलेला मजूर अधिक काम करितो. तुजशीं बहुत सद्वर्तन केलेल्या मनुष्याशीं प्रतरणा करणें हा थोरपणा नव्हे."

शेरूया बादशहास त्याचा बाप खुस्रूपरवेज याचा उपदेश.

असें ऐकण्यांत आहे कीं, *खुस्रूपरवेजबादशहानें अंतकाळीं †शेरूयास सांगितलें कीं, "आपल्या प्रजेविषयीं जे नियम आपल्या मनांत करशील त्यांवर कायम राहून प्रजेच्या हितावर लक्ष ठेव. सुविचार व सद्बुद्धी यांपासून मन फिरवूं नको म्हणजे लोक तुझ्या सेवेंतून आपलें मन फिरविणार नाहींत."

अन्यायी राजापासून प्रजा पळून जाते व त्याच्या नांवास सर्व जगांत कालिमा आणते. वाईटपणाचा पाया घालणारा मनुष्य जणूं लौकरच स्वतःचा पाया खोदतो. व्याघ्र किंवा शस्त्रधारी यांच्या हातूनही नुकसान होतें; पण ते, स्त्रीबालादिकांच्या दुःखी अंतःकरणांतून निघणाऱ्या दुःखोद्गारांपासून होणाऱ्या नुकसानाइतकें नाहीं. अनाथ स्त्रीनें प्रज्वलित केलेल्या हायहायरूप अग्नीनें अनेक शहरें दग्ध झाल्याचें तू ऐकिलें असशील. आपल्या

---

* इराणचा बादशहा **खुस्रूपरवेज** याचा मुलगा यानें पुष्कळ वर्षें राज्य केलें. शेवटीं, बलवृद्धिकारक औषध आहे असें समजून विष खाल्यानें तो मरण पावला.

† **खुस्रूपरवेज हुर्मजचा** पुत्र व **नोशेरवानचा** नातू हा **इराणचा** बादशहा होता.

राज्यांत न्यायानें जीवन करणाऱ्या राजाप्रमाणें या संसारांत दुसरा कोण दैववान् आहे? तो इहलोक सोडून परलोकांस जातो तेव्हां लोक त्याच्या जीवास सुखी राखण्या करितां ईश्वराची प्रार्थना करतात.

सज्जन व दुर्जन, दोघांसही शेवटीं मरणें आहेच, त्या अर्थीं लोकांनीं तुला मागें चांगलें म्हणावें हेंच योग्य आहे. ईश्वरास भिणाऱ्या लोकांस प्रजापालनार्थ नेम. कारण असे सन्मार्गी लोक राज्य साधन करणारे असतात. प्रजेस त्रास देऊन तुझा स्वार्थ पाहतो, तो तुझा शत्रू व प्रजेचें रक्त पिणारा असें जाण. ज्यांच्या हाताखालीं राहून प्रजेचे हात ईश्वराकडे दाद मागण्यास वळतात अशांच्या हातीं सत्ता असणें अयोग्य आहे. सुवृत्तरक्षकाचें कधीं वाईट होत नाहीं. दुर्वृत्ताचें पोषण करशील तर स्वतःचा वैरी होशील. हाडवैऱ्याला नुसता बदला घेऊन सोडूं नको, त्याला निर्मूल केलें पाहिजे. जुलुमी कामगारास क्षमा न करितां तो पुष्ट न व्हावा म्हणून त्याला वरचेवर छळीत जा. लांडग्याचें डोकें प्रथमच कापलें पाहिजे, लोकांच्या शेळ्या खाल्ल्यावर नव्हे.

गोष्ट दुसरी.

एका व्यापाऱ्यास चोरांनीं बाणांनीं अडविलें तेव्हां तो काय उत्तम बोलला कीं, "चोर प्रबळ होतील तर प्रजारक्षक काय व स्त्रीसमाज काय, एकच!"

व्यापाऱ्यांस त्रास देणारा राजा जणूं आपलें नगर व सेना यांच्या वैभवाचें द्वारच बंद करतो. जुलूम चाल-

ल्याचा बोभाटा असेल तेथें शहाणा मनुष्य पुनः कशास पाय ठेवील. तुला लोकांनीं चांगलें ह्मणण्याची व कीर्तीची इच्छा असेल तर व्यापारी व परराष्ट्राचे वकील यांनां चांगल्या रितीनें वागीव.

थोर लोक प्रवाशांचा जिवापाड प्रतिपाळ करितात, कारण ते त्यांचें यश देशोदेशीं प्रसिद्ध करितात. ज्या राज्यांतून प्रवासी विरस होऊन जातात तें राज्य लौकर नाश पावतें.

दीनदयाळ व पथिकांचा मित्र हो. कारण प्रवासी हा दिगंत कीर्ति नेणारा आहे. पाव्हणे व पथिक तुला प्रिय असोत; तरी त्यांच्या लबाडीमुळें नुकसान न होण्याची खबरदारी घे. परक्यांशीं सावध राहणें चांगलें, कारण शत्रू मित्ररूपानेंही येत असतात. जुन्या लोकांची जास्त काळजी घे. कारण फार दिवस पालन केलेल्यांच्या हातून कधींही दगा होत नाहीं. तुझा सेवक वृद्ध झाल्यावरही त्याला वेतन देण्यास तूं विसरूं नको. कारण वार्धक्यामुळें त्याच्या हातून सेवा न घडली तरी तुझा कृपारूप दान करण्याचा हात कायमच आहे.

गोष्ट तिसरी.

असें ऐकण्यांत आहे कीं, **खुस्रूनें शापूर** * कवीचें जेव्हां पटांतून नांव काढलें तेव्हां **शापूरानें** दुःखोद्गार काढले.

* **शापूर** नांवाचा एक फार विद्वान् व चतुर गृहस्थ **खुस्रूपरवेज** बादशहाच्या वेळीं होऊन गेला. तो वृद्धपणामुळें कामालायक न राहिल्यामुळें **खुस्रूनें** पटांतून त्याचें नांव कमी केलें होते.

गरीबीमुळें त्याचे फार हाल होऊं लागले तेव्हां त्यानें पुढील लेख बादशहाकडे लिहून पाठविला. "हे न्यायी व राज्यास समृद्ध करणाऱ्या बादशहा, मी जरी सेवेयोग्य न राहिलों, तरी तूं अद्याप उपकारक्षम आहेस. मी आपलें तारुण्य तुझ्या सेवेंत खर्चिलें आहे तेव्हां या वार्धक्यांत माझा त्याग करूं नको."

सर्वदां कलहप्रिय अशा एखाद्या प्रवाश्याला सुद्धां तूं दुःख न देतां राज्यांतून काढून दे, किंबहुना त्याच्या वर न रानावलास तरी बरेंच. कारण त्याची ती वाईट संवयच प्रबल शत्रूप्रमाणें त्याच्या मागें लागली आहे. तो खास **पारस**देशचाच जन्मलेला असेल तर त्यास **सनआ,*** **सकलाब,†** किंवा **रूम** या देशांत न पाठवितां, त्याला तेथें होईल तेथवर क्षणभरही टिकूं देऊं नको. आपलें संकट दुसऱ्यावर धाडणें योग्य नाहीं, कारण जेथून असे लोक बाहेर पडतात तो देश धुळीस मिळो असें तेथील लोक म्हणतील.

सरकारी काम सांगण्यास चांगला संपन्न मनुष्य पहा, कांकीं दरिद्रास राजभय नसतें. असा मनुष्य लबाडी करून कांहीं खाऊन बसला तर त्याच्या पासून रडण्या ओरडण्या शिवाय कांहीं निष्पन्न होणार नाहीं. कोणी कामगार त्याच्या हातीं सोंपलेल्या वस्तूचा अपहार करील तर त्याच्यावर एक तपासनीस नेमावा, तोही त्याच्याशीं मेळ करील तर त्या दोघांसही दूर कर. ईश्वरास भिणारा

---

* **सनआ** नांवाचें **यमन**देशांत एक शहर होतें.

† **सकलाब** व **रूम**, तुर्कस्तान व त्याच्या जवळीलच एक देश.

मनुष्य निधी सोंपविण्यास असावा. फक्त तुलाच भिणाऱ्याम कामावर ठेवूं नको. स्वतः दक्ष राहून चांगली परीक्षा करून सेवक पसंत कर व आपल्या वस्तूंची वरचेवर झडती घेत जा, कारण शंभरांत एखादाही इमानी आढळणार नाहीं.

एक जातीच्या व बहुकाल एकत्र लिहिणाऱ्या, दोन कारकुनांस एकाच स्थळीं कामावर पाठविणें योग्य नाहीं. ते आपसांत मिळून, स्नेही होऊन, एक चोर व दुसरा त्याचा साथी होणार नाहींत कशावरून? चोरांतच अपसांत भय व संशय असला कीं त्यांच्या हातून व्यापारी निर्भय पार पडतो.

कामावरून काढून टाकलेल्याला कांहींदिवसांनीं सवडीनें तूं पुनः क्षमा कर. हजार कैदी सोडल्यापेक्षां एका उमेदवार अर्जदाराचें काम करून देणें बेहतर आहे.

विद्वानास मोठें काम दे ह्मणजे तो डगमगणार नाहीं व नाउमेदीनें हिंमत हरणार नाहीं, उमेदीनें काम नीट रून उन्नतीची उमेद ठेवील. पिता पुत्रावर रागावतो तद्वत स्वाम्या आज्ञाधारक सेवकावरही केव्हां केव्हां न्यायी राजा कोप करतो. कधीं त्याला दुःख व्हावें ह्मणून मारतो व कधीं त्याचे अश्रू पुसतो.

तुझे शत्रु नरमीनें उद्धट व रागानें पादाक्रांत व नरम होतील. तूं शूर, आनंदवृत्ति व कृपाळू हो. ईश्वराची तुजवर कृपा आहे त्याअर्थीं तुझीही सर्व प्रजेवर कृपा असूं दे. अंगमर्दन करणारा केव्हां शिरा तोडून रक्त काढतो व केव्हां जखमेवर मलम लावतो, त्याप्रमाणें नरमी व गरमी दोन्हीही परस्पर उपयोगी आहेत. मागील राजांची

आठवण तुला होत नशीच तुझी आठवण पुढें लोकांस होईल, अमें वर्तन ठेव.

या जगांत चिरंजीव असा कोणी जन्मला नाहीं, ज्याचें मागें सुयश राहिलें तोच खरा चिरंजीव. ज्यानें बनविलेले पूल, तलाव, विहरी, अन्नछत्रें व धर्मशाळा मागें राहिल्या तो कांहीं मेला नाहीं. ज्याचें मागें नांव राहिलें नाहीं, ज्याच्या शरीररूप वृक्षाला कांहींच फळ आलें नाहीं, ज्यानें मागें सुयश व उपकार सोडले नाहींत, त्याच्या करितां "अल्हम्द*" पढणेंही योग्य नाहीं. आपलें नांव मागें रहावें अशी इच्छा असेल तर मागील थोर लोकांचें नांव बुडवूं नको, कारण तेही तुजप्रमाणेंच सत्ता, चैन व सुख उपभोगून शेवटीं सर्व सोडून गेले. कोणी जगांत चांगलें नांव मागें सोडून गेले व कोणी कुमार्गवर्ती झाले त्यांचें हेमपा करितां वाईट नांव राहिलें आहे.

कोणाच्याही दुःखाची वार्ता सुखानें ऐकत बसूं नको. ती तुला कोणी कळविलीच तर तें दुःख नाहींसें करण्याच्या तजवीजीस लाग. आपल्या हातून चुकून अपराध झाला, असें कोणी अपराधी म्हणेल तर त्याची ती चूक माफ कर. जे कोणी तुजपाशीं आश्रय मागण्यास येतील, त्यांना आश्रय दे. कोणी अपराधी तुला शरण येईल तर पहिल्याच अपराधाकरितां त्याला शासन करणें योग्य नाहीं. एकदां उपदेश करून तो न मानील तर मग त्याला कैद करून शिक्षा दे. उपदेशानें किंवा कैदे-

* मेलेल्या माणसाच्या पापनाशनार्थ त्याच्या कबरेवर व त्याच्या नांवानें ईश्वराची केलेली प्रार्थना.

नेंही त्यास उपयोग झाला नाहीं तर त्याचा शरीररूप वृक्षच वाईट आहे, त्यास समूळ खोदून टाक.

कोणाच्या अपराधामुळें तुला राग आला तर त्याला शिक्षा करण्यांत त्वरा च अवकाश कर; कारण **बदकशान*** येथील 'लाल' हें दुर्मिळ रत्न फोडणें सोपें आहे, परंतु फोडल्यावर तें जोडणें अशक्य आहे.

गोष्ट चौथी.

राजेलोकांनीं सर्व गोष्टींत व विशेषतः शासन करण्यांत विचार व अवकाश करण्यासंबंधें.

पुष्कळ भूजल पर्यटण केलेला एक मनुष्य **उंमान**† शहराजवळील लवणसरोवराच्या मार्गानें आला. त्यानें **अरबस्थान, तुर्कस्थान ताजीकस्थान**‡ व रूम हे देश पाहिले असून त्याच्या शुद्ध देहांत नाना तऱ्हेचे गुण भरलेले होते. तो जगत्प्रवासी, ज्ञानसंपन्न व पुष्कळांचा स्नेह संपादन केलेला होता. तो थोर, बलवान् व गतपर्ण वृक्षाप्रमाणें भव्याकृति परंतु नष्टवैभव असा दिसत होता. असंख्य ठिगळांची एक कंथा त्याच्या अंगावर होती तिच्या उबेनें तो जणूं शिजत होता.

त्या सरोवरावरून तो एका शहरांत आला. तेथील राजा फार थोर असून स्वभावतः यशेच्छू होता व तो साधु-

* मध्यएशियांतील एक देश. तेथें माणकें फार चांगलीं निघत असत.

† **उंमान** नांवाचें एक शहर यमनप्रांतांत एका मोठ्या नदीच्या तीरावर होतें, व यामुळेंच त्या नदीला **उंमान**ची नदी म्हणत असत.

‡ **ताजीकस्थान** हा तुर्कस्थान व इराण यांच्याजवळच एक प्रदेश.

जनांच्या पायीं मस्तक नम्र करीत असे. त्या राजाच्या सेवकांनीं त्या प्रवाशास स्नान घालून त्याच्या अंगावरील रस्त्यानें बसलेली धूळ धुतली. राजवाड्याच्या देवडीवर येतांच त्यानें सलाम करून नम्रपणानें आपला हात छातीवर ठेऊन बादशहाची स्तुती चालविली व महालांत पोंचतांच "तुझी भाग्यवृद्धि होवो, व तुझें वैभव चिरस्थायी होवो" ह्मणून त्यानें त्याला आशीर्वाद दिला व ह्मणाला, "कोणाचेंही मन दुःखग्रस्त अमलेलें मी याराज्यांत कोणत्याही मुक्कामावर पाहिलें नाहीं, तसेंच कोणीही मद्य सेवनानें मस्त व खराब झालेला आढळला नाहीं, तर कलालांचीं दुकानें मात्र खराबीस पावलेलीं आढळलीं. हे राजा, आपल्या प्रजेपैकीं कोणास इजा झाली तर संतुष्ट न होणें, हेंच राज्याचें व राजाचें मुख्य भूषण होय."

त्यानें अशी वचनरूप मुक्ताफळांची वृष्टि केली तेव्हां बादशहानेंही त्यास शाबासकी देऊन त्याची तारीफ केली. त्याचें भाषण त्यास फार पसंत पडलें व त्यानें त्याला जवळ बोलावून त्याचा मोठा सन्मान करून त्याच्या मोहकभाषणाच्या बदल्यांत त्याला बहुत द्रव्य व मोतीं देऊन त्याचें नांवगांव विचारलें, तेव्हां त्यानें आपला इत्थंभूत वृत्तांत सांगितला. राजाची त्याच्यावर सर्वांपेक्षां जास्त कृपा झाली व त्यानें मनांत विचार केला कीं असा मनुष्य या राज्याची वजीरी देण्यायोग्य आहे; परंतु ही गोष्ट हळूं हळूं केली पाहिजे, नाहींतर दरबारचे लोक मला मूर्ख समजून हंसतील. प्रथम त्याचें शहाणपण अनुभवून नंतर त्याच्या गुणाप्रमाणें त्याची योग्यता वाढविली पाहिजे.

नवखा मनुष्य प्रथमच काम करूंलागला ह्मणजे तो मनांत फार त्रासतो, भितो व कष्टी होतो. काजीनें प्रथमच फार विचारानें फैसल्हा लिहिला तर त्याला वरिष्ठापुढें शर्मिंदें व्हावें लागत नाहीं. तीर धनुष्याच्या दोरीवर हातांत आहे तोंवर विचार करावा. हातांतून सुटून गेल्यावर काय उपयोग? **युसफ*** सारख्या समजदार व बुद्धिवान मनुष्यालाही वजीरी मिळण्यास एक दोन वर्षें गुजरलीं. पुष्कळ दिवस होईपर्यंत कोणाची खरी परीक्षा होऊं शकत नाहीं.

बादशहानें त्याच्या स्वभावाची हरतऱ्हेनें माहिती करून घेतली तेव्हां तो बुद्धिमान्, धार्मिक, सुमार्गी, सुजाण,

* **यूसफ**, हा एक प्राचीन काळीं महात्मा विद्वान् व सुंदर पुरुष होऊन गेला. त्याच्या दुष्ट भावांनीं त्याला मारण्याच्या हेतूनें शिकारीकरितां वनांत नेलें, आणि पुढें त्यास एका कुव्यांत लोटून त्यांनीं घरीं येऊन **यूसफाला** श्वापदांनीं मारलें ह्मणून पित्यास सांगितलें, त्या वरून त्याला अत्यंत शोक झाला. इकडे **यूसफाला** कांहीं लमाणांनीं बाहेर काढून आपल्या बरोबर मिसरदेशांत नेलें. तेथील बादशहा त्याचें रूप व गुण पाहून प्रसन्न होऊन त्यानें त्याला हळूहळूं मोठ्या पदास चढविलें. बादशहाची कन्या **जुलेखा** ही **यूसफचें** रूपलावण्य पाहून अत्यंत मोहित झाली, पण ती परधर्मी व आपल्या स्वामीची कन्या जाणून **यूसफ** तिच्या ह्मणण्यास कबूल झाला नाहीं. पुढें तो त्या दरबारांत फारच मोठ्या पदवीस चढला. इकडे त्याच्या जन्मभूमींत भयंकर दुष्काळ पडल्यानें त्याचा बाप व त्याचे ते दुष्टभाऊ भीक मागत **मिसर**देशांत आले. तेथें मोठ्या चातुर्यानें **यूसफनें** त्यांस ओळखून बापाचा बहुमान केला व भावांस योग्य शासन केलें.

या गोष्टीस अनुसरूनच फारशींत "यूसफ जुलेखा" व मराठींत रा. र. कीर्तने कृत "जयपाळ नाटक" हे ग्रंथ रचलेले आहेत.

मितभाषी व लोकांची यथावत् परीक्षा करणारा अमल्याचें दिसून आलें. तो सर्व थोरलोकांपेक्षां विशेष योग्य व बुद्धिवान् आहे असें पाहून बादशहानें त्याला वजीरापेक्षांही श्रेष्ठ केलें. त्यानें आपल्या बुद्धिचातुर्यानें व योग्य उपायानें अशी उत्तम राज्यव्यवस्था केलीकीं त्याच्या विधिनिषेधात्मक आज्ञा पाळण्यांत एकाच्याही मनाला वाईट वाटलें नाहीं. तसेंच त्यानें सर्व प्रदेश अशा सदुपायानें हस्तगत केलेकीं त्यामुळें तेथील कोणाही मनुष्यास दुःख झालें नाहीं. त्याच्या हातून दोष असा घडलाच नाहीं व त्यामुळें त्याच्या सर्व शत्रूंची तोंडें बंद झालीं. त्याचा तिळभर तरी दोष सांपडावा ह्मणून शत्रूंनीं मत्सरानें शिजत असलेल्या गव्हाप्रमाणें पुष्कळ तडफड केली; पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

त्याच्या विमल मनानें राज्यास नवीन शोभा आली व जुन्या वजीरास नवीन खेद उत्पन्न झाला. कोणालाही दोषारोप करितां येण्याजोगा त्या बुद्धिवानाच्या अंगीं एकही अवगुण दिसून आला नाहीं. तो वजीर हा एका चांदीच्या ताटाप्रमाणें व त्याचे शत्रू एखाद्या छिद्रान्वेषी मुंगीप्रमाणें होते, तिच्यांत ताटास छेद पाडण्याचें सामर्थ्य कसचें येणार?

त्या बादशहा जवळ सूर्याप्रमाणें सुंदर असे दोन दास नेहमीं कंबर बांधून तयार रहात असत. ते दोघही रूपानें अद्वितीय व फारच सुंदर, जणों हूर व परी* किंवा सूर्य व चंद्र असे होते. दोघांचीं रूपें अगदीं एकसारखीं

* हूर किंवा परी, मुसलमानी स्वर्गांतील अप्सरा होत.

होतीं. एक दुसऱ्यापेक्षां अधिक नव्हता, जणों ते एकमेकांचें प्रतिबिंबच होते. त्या दोघांही सुंदर मुलांच्या मनांत त्या वजीराच्या शहाणपणाचीं व बुद्धिमत्तेचीं भापणें रुचलीं होतीं व ते त्याचे गुण व प्रेमळ स्वभाव पाहून त्याला भुलले व त्याचे प्रियकर झाले. त्याच्याही मनांत त्या उभयतांविषयीं साहजिक प्रेम उत्पन्न झालें, तें अविचारी, व विषयी जनांच्या प्रेमाप्रमाणें असद्धेतुक नव्हतें. तो त्यास इतका मोहून गेला होता कीं त्यांचें तोंड पाहिल्यावांचून त्यास चैनच पडेनासें झालें होतें.

आपला मोठेपणा कायम रहावा असें वाटत असेल तर हे थोरलोकहो, अशा सुंदर व मोहक मापुकांकडे आपलें मन लागूं देऊं नका. तुमच्या मनांत कांहीं पाप-बुद्धि नसली तरीदेखील यांपासून दूर रहा, कारण यापासून तुमच्या सर्दारीच्या महत्त्वास नुकसान पोहोंचेल.

त्याच्या हातून घडलेला हा थोडासा दोष त्या जुन्या वजीराच्या नजरेस पडतांच त्यानें तो मत्सरबुद्धीनें बाद-शहा पुढें आणण्याच्या हेतूनें म्हटलें, "हा वजीर कोण आहे व याचें नांव काय तें मला माहीत नाहीं; परंतु हा या राज्यांत सुखानें राहूं इच्छित नाहींसें वाटतें. कारण आपल्या गुलामांशीं सोबत करण्याचा याचा इरादा असून तो कामी व कुमार्गप्रिय असल्याचें ऐकण्यांत आहे,—परकी सेवक एखाद्या राज्यांत जन्मलेले व पोसलेले नसलेतर त्यांना त्या राज्याचा अभिमान कमी असतो व ते बेपर्वाईनें वागतात,—अशा कुमार्गी व लांछन आणणाऱ्याला जवळ ठेवणें योग्य नाहीं, कारण त्यापा-सून राजवाड्यांत फजीती होते. अशी लांछनास्पद

स्थिती पाहून स्वस्थ राहिलों तर मी या बादशाही दौलतीला विसरलों असें होईल. नुसत्या संशयावर एकाएकीं कोणतीही गोष्ट मांगून टाकणें योग्य नव्हे म्हणून पक्की खात्री होईपर्यंत मी आपल्याला कांहीं कळविलें नाहीं. त्यापैकीं एकाला तो आलिंगन देत असतांना माझ्या एका सेवकानें पाहिलें. मी ही गोष्ट जाचून नंतर आपल्याला सांगितली. आपणही शहाणे आहां, तेव्हां आपणही स्वतः जाचून घ्या." फार वेडें वांकडें तोंड करून तो शेवटीं म्हणाला, "दुर्जनाचा केव्हांही शेवट गोड होत नाहीं."

छिद्रान्वेषी शत्रूस थोडासाही दोष सांपडला कीं तो थोगांचीं काळिजें जणूं जाळून टाकतो. प्रथम एका ठिणगीनें आग चेतवितां येते; पण पुढें त्यापासून मोठमोठे वृक्षदेखिल सहज जाळले जातात.

यागोष्टीनें बादशहा फार संतापला व विकयानें घास कापतात तसें त्याचें शिर कापावें असें त्यास वाटलें. त्याचा हात क्रोधानें त्या गरीब वजीराच्या रक्तांत जणूं बुडूं इच्छीत होता, परंतु सदसद्विचाररूपमित्रानें आपल्या हातांनीं त्यास थोडेसें आंवरलें व तो आपल्या मनांत म्हणूं लागला कीं, स्वतः पोसलेल्याचा घात करणें पुरुषार्थ नव्हे, तसेंच व्यर्थ अन्यायानें कोणावर जुलूम करणें अश्लाघ्य होय. स्वतःच पोसलेल्यास दुःखवूं नको व आपल्या धनुर्बाणवाहकासच बाणानें मारूं नको. ज्याला मारावयाचें असेल त्याला स्वसंपत्तीनें पाळणें योग्य नव्हे. त्याच्या गुणांविषयीं माझी खात्री झाली नव्हती तोंवर त्याला राजवाड्यांत माझें सान्निध्य ही नव्हतें. तेव्हां आतां त्याच्या पापाविषयीं पक्की खात्री होईपर्यंत केवळ शत्रूच्या

सांगण्यावरूनच त्याच्या नाशाची इच्छा करणें योग्य नव्हे.

यांतील खरें वर्म बादशहाच्या मनांत पक्कें बागत होतें कारण त्यानें पुढील विद्वद्वचन ऐकलें होतें कीं, "हे शहाण्या मनुष्या, मन हें रहस्यांचें कारागृह आहे. त्यांतून एखादें रहस्य बाहेर पडलें तर, त्यास पुनः परत आणून बांधून ठेवतां येत नाहीं." पुढें त्यानें गुप्तपणें त्या नव्या वजीराविषयीं बारकाईनें चौकशी केली तेव्हां त्यास त्या चतुराच्या बुद्धींत असा भेद दिसून आला कीं, तो जेव्हां जेव्हां त्या अप्सरेप्रमाणें सुंदर गुलामांच्या मुखांकडे पाही तेव्हां तेव्हां त्याला मंदस्मित येई.

दोघांमध्यें प्रेम जडलें असलें म्हणजे ते त्यांस ओंठ हलवून न देतां बोलवितें. जलोदरी मनुष्यास पाण्याचा झरा प्राप्त होऊनही जशी तृप्ति होत नाहीं, त्या प्रमाणें प्रियपात्राकडे वर-चेवर चोरून चोरून पाहणाराची स्थिति होते हें खूप जाण.

त्याच्या वाईट आचरणाविषयीं बादशहाची पूर्ण खात्री झाली व त्याचा त्यास अत्यंत राग आला, तरी तो छिपवून मोठ्या विचारानें, शहाणपणानें, व शांतपणानें तो त्यास ह्मणाला, "हे भल्या व कीर्तिमान् गृहस्था, मी तुला योग्य व शहाणा समजून राज्यांतील जमाबंदीच्या वगैरे सर्व खात्यांवर भरंवशाचा मुखत्यार केला. तू हुषार व विचारी आहेस, असें मी मानीत होतों; पण तू निर्लज्ज व कुमार्गी आहेस हें मला माहीत नव्हतें. तूं मुळीं अशा मोठ्या योग्यतेस पोहोंचण्या योग्य नव्हतास. तुजसारख्या कुलकलंकाचें पोषण करून मी आपल्या हातानें घरांत कुमार्ग सुरू केला यांत माझाच दोष आहे, तुझा नाहीं."

हें ऐकून त्या कुशल वजीरानें त्या मुज्ञ बादशहास म्हटलें, "मी निरपराधी असलों तर शत्रूनीं माझी कितीही निंदा केली तरी मला भय नाहीं. कुमार्गाचरणाविषयीं मला अगदीं शंका नाहीं व शत्रूनें सांगितलेली गोष्ट मजकडून घडल्याचें मला स्मरत नाहीं."

हें भाषण ऐकून बादशहा त्या वजीराला संतापून म्हणाला, "तूं व्यर्थ बहाणे धुंडूं नकोस व व्यर्थ वाद घेऊं नकोस." त्यावर आश्चर्ययुक्त मुद्रेनें तोंडावर हात ठेऊन वजीर म्हणाला, "पूर्वीच्या वजीरानें आपल्यास जें कांहीं कळविलें आहे त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मी त्याच्या जागीं झाल्यानें मला तो शत्रूप्रमाणें लेखतो तेव्हां त्याच्या तोंडांत माझ्या निंदेशिवाय काय असणार? आपण त्याला माझ्या हाताखालीं नेमल्या घटकेपासूनच तो माझा शत्रू झाल्याचें व आपण मला त्यापेक्षां श्रेष्ठ केल्यापासून तो वैरी होऊन माझ्या मागें लागल्याचें मी जाणत नव्हतों, असें नाहीं. माझा उत्कर्ष हाच ज्याचा अपकर्ष, तो मनुष्य कल्पांतींहीं माझा मित्र होणार नाहीं. पूर्ववत् विश्वासानें माझें बोलणें ऐकाल तर मी याविषयीं आपल्यास एक चांगली गोष्ट सांगतों ती ऐका:—

कोणीएकानें एकदां स्वप्नांत सैतानाला पाहिलें, तों त्याचा बांधा सुरूपप्रमाणें व रूप सुर्याप्रमाणें होतें. तेव्हां तो म्हणाला, "हे सूर्यमुखा, तुझ्या सौंदर्याचें पृथ्वीवरील लोकांस ज्ञान नाहीं, ते तुला रौद्ररूपी समजतात व स्नान-गृहांत तुझें चित्र फार कुरूप काढतात."

हें ऐकून सैतान हंसून म्हणाला, "माझें रूप खरोखर तसें आहे असें नाहीं, परंतु माझे शत्रु माझे चित्रकार

आहेत. मी मनुष्यांस स्वर्गांतून समूळ उखडून टाकलें त्याहेपानें ते माझें कुरूप चित्र काढतात."

हे बादशहा, मीही निर्दोषी आहें; पण शत्रूत्वामुळें व अदावतीनें माझा वैरी मला चांगलें ह्मणत नाहीं. माझ्या उन्नतीनें ज्याची अब्रू घालविली आहे, त्याच्या लबाडीपुढें मला कोसों गणती पळालें पाहिजे, परंतु आपल्या नाराजीस मी भीत नाहीं, कारण निरपराधी मनुष्य भाषणांत डगमगत नाहीं. मी खरें असेल तेंच बोलेन तर मला शत्रूचें काय भय? बिनचूक कामकरणारा कामगार वरिष्ठापुढें हिशेब देण्यांत भीत नाहीं. ज्याचे बाट वजनांत कमी असतील त्याला कोतवालाच्या फेरीची भीति वाटेल."

हें ऐकून बादशहा रागानें त्यास झिटकारून ह्मणाला, "स्वतः दोषी असून ढोंगानें वाचाळपणा केल्यानें ह्मणजे दोषमुक्ति होते असें नाहीं. मी केवळ तुझ्या शत्रूवरच भरंवसा ठेवला व या दरबारांतील सर्व समाजांतून, तुझी दृष्टि या दोघांगुलामांशिवाय दुसरीकडे असत नाहीं हें मीं स्वतः डोळ्यानें पाहिलें नाहीं असें नाहीं."

तो वावदूक वजीर हंसून ह्मणाला, "आपलें ह्मणणें अगदीं खरें आहे व सत्य गोष्ट छपविणें योग्य नाहीं, परंतु यांत एक खुबी आहे ती माझें बोलणें ऐकाल तर आपल्या लक्षांत येईल. आपला अधिकार नेहमीं चालो व संपत्ति कायम राहो. दरिद्रीमनुष्य श्रीमंतांकडे पाहून कष्टी होत असतो, हें आपण पाहिलें नाहीं कां? माझा यौवनमद नाहींसा झाला व माझें आयुष्य खेळण्या संवरण्यांत गेलें. तरी त्यांनां

पाहून माझी तृप्ति होत नाहीं कारण, त्यांच्यांत सौंदर्य व चांगुलपणारूपसंपत्ती आहे.

त्यांच्याप्रमाणेंच माझाही चेहरा पुष्पाप्रमाणें प्रफुल्लित होता व शरीर लावण्यानें आरशासारखें चमकत होतें; पण आतां माझी कफन कातली पाहिजे. कारण माझे केंस कापसाप्रमाणें शुभ्र व शरीर दाभणाप्रमाणें बारीक झालें आहे. माझाही केशकलाप त्यांच्या प्रमाणेंच काळा भोर होता व माझ्या नाजूकपणाला शोभणारीं व तंग वस्त्रें माझ्या अंगांत असत. माझे दांत दोन मोत्यांच्या लड्याप्रमाणें किंवा चांदीच्या विटांच्या दोन बळकट व सुंदर भिंतीप्रमाणें होते; पण ते पर्व एखाद्या जीर्ण पुलाप्रमाणें पडून गेलेले मी बोलतांना दिसतात. मी त्यांच्याकडे मोठ्या खेदानें पाहतों तेव्हां मला माझ्या व्यर्थ गेलेल्या आयुष्याचें स्मरण येतें. ते माझे तारुण्याचे मजेचे दिवस कधींच गेले, व त्यांच्या मागून हे वार्धक्याचेही दिवस निघून जात आहेत."

त्या हुषार वजीरानें अशीं वचनरूप मुक्ताफळें ओंवलीं, तेव्हां बादशहानें राजसभेंतील सर्व लोकांकडे पाहून म्हटलें, "याहून सुंदर व अर्थप्रचुर भाषण करणें, अशक्य होय, त्याची इतरत्र इच्छाच करूं नका. अशा खुबीदारीनें जबाब देतां येणाऱ्यासच दुसऱ्याच्या पियपात्राकडे पाहणें शोभतें. मी त्यावेळीं, शहाणपणानें शांती धरली नसती तर, त्या शत्रूच्या सांगण्यावर याला व्यर्थ शिक्षा दिली असती."

उतावळीनें शस्त्रावर हात घालणाऱ्यास पुढें पश्चात्तापानें मनगटें चावावीं लागतात. हेवेखोर व स्वार्थ-

साधु मनुष्याचें ह्मणणें कधीं ऐकूं नकोस, कारण त्याप्रमाणें वर्तन करशील तर तुला शर्मिंदें व्हावें लागेल.

बादशहानें त्या यशस्वी वजीराम पदवी, वस्त्रें, व धन देऊन त्या निंदक अशा जुन्यावजीराची कानउघाडणी केली. त्या शहाण्या वजीराच्या चांगल्या बंदोबस्तामुळें त्याचें नांव सर्व देशांत सुप्रसिद्ध झालें. न्यायानें व परोपकारबुद्धीनें त्यानें वर्षोंगणति कारभार केला व मरणोत्तरही त्याचें सुयश कायम राहिलें. असे सद्धर्मी राजे अमलांत तेच धर्मरूप हातांनीं संपदारूप गेंद नेतात.

हल्लीं असा कोणीही राजा मला आढळत नाहीं, कदाचित् असला तर **अबूबकर साद** हाच एक आहे. तो बादशहा शाहणा व कुलीन आहे. त्याच्या इच्छारूप शाखा सफल होतात. हे राजा, एक वर्षभर मार्गक्रमण केलें तरी त्या प्रदेशावर तुझी कल्पवृक्षछायारूप सत्ता आहे, इतकें तुझें राज्य विस्तीर्ण आहे.

मी भाग्यशाली व्हावें ह्मणून **हुमा*** पक्ष्याची छाया मजवर पडावी असें मी इच्छीत होतों इतक्यांत माझ्या बुद्धीनें मला जागृत करून ह्मटलें कीं. संपत्ती कांहीं **हुमा** पक्ष्याची छाया पडल्यानेंच मिळते असें नाहीं; खरें वैभव पाहिजे असेल तर या (बादशहाच्या) छायेंत जा.

हे **ईश्वरा**, ही छाया त्वां याजगावर पसरली आहेस, ही तुझी मोठीच कृपा आहे. या संपत्तीच्या उगमस्थानाचा

* **हुमा**नांवाचा स्वर्गलोकीं वास करणारा असा एक अति सुंदर व शुभ शकुनाचा कौराणिक पक्षी आहे. त्याची छाया ज्याच्या मस्तकावर पडेल तो मोठा संपन्न व भाग्यवान् होतो असें म्हणतात.

मी एक अभीष्टचिंतक सेवक आहें. हे ईश्वरा, तूं या छायेस कायम राख.

कोणाही अपराध्यास देहांतशासन करण्यापूर्वी प्रथम कैद करणें चांगलें. कारण एकदां तुटलेलें शिर. पुनः जुडूं शकत नाहीं. सत्ता, बुद्धि व मान यांनीं युक्त असे लोक, लोकांच्या ओरडण्यानें घाबरत नाहींत. ज्याचें मस्तक गर्वानें भरलेलें पण सहनशीलतेनें रिकामें आहे अशास राजमुकुट शोभत नाहीं.

मी तुला सदोदित सर्वांशीं भांडण्यास सांगतों असें नाहीं; पण क्रोध आला तरी विचार जागृत ठेव. विचारी मनुष्य सहनशील असतो. जो क्रोधाधीन होतो तो शहाणा नव्हे. क्रोधरूप सैन्य गुप्त जाग्यांतून अचानक छापा घालतें तेव्हां न्याय, सारासार विचार व धर्म यांतून एकही रहात नाहीं. या जगतीतलावर ज्याच्या पुढें प्रत्यक्ष देवही पळतात, असें, या क्रोधाप्रमाणें दुसरें एकही दुष्ट पिशाच नाहीं.

क्रोधवचन.

शास्त्रास न अनुसरतां पाणी सुद्धां पिणें अधर्म नव्हे असें नाहीं; पण शास्त्राज्ञेनुसार रक्तपात केला तरी अधर्म होत नाहीं. कोणाचा वध करण्याविषयीं धर्माची आज्ञा असून तसें करण्यांत भिशील तर खबरदार. ज्याला मारशील त्याचें मागें कुटुंब असल्याचें कळलें, तर त्याच्यावर कृपा करून त्याला सुख दे. कारण कांहीं अपराध असला तर त्या दुष्ट पुरुषाचा, बिचाऱ्या बायकामुलांचा काय दोष?

तुझें शरीर सुदृढ व सैन्य जबरदस्त असलें तरी आपल्या शत्रूच्या राज्यांत विनाकारण दंड करूं नको, कारण तो शत्रू दुर्गम व मजबूद किल्ल्यावर पळून जाईल व बिचाऱ्या निरपराधी प्रजेला दुःख पोंहोंचेल. कैदीलोकांच्या स्थितीवर ही लक्ष दे, कारण, त्यांच्यांत कोणी कदाचित् निरपराधी असेल. तुझ्या राज्यांत कोणी व्यापारी मेला, तर त्याच्या मालमत्तेचा तुझ्या हातून अपहार होणें अन्याय आहे, कारण त्याचे आप्तइष्ट व कुटुंबाचे लोक रडून ओरडून अपसांत म्हणतील कीं, तो बिचारा अमक्या देशांत प्रवासांत मेला, व त्याचें धन त्यां दुष्ट राजानें लुटलें. त्याच्या पोरक्या बालकांचें व त्यांच्या दुःखी अंतःकरणापासून निघणाऱ्या दुःखोद्गारांचेंही भय बाळग. कारण पन्नास वर्षं सारखें मिळविलेलें यश एका वाईट गोष्टीनें ही अगदीं नष्ट होतें.

सदां सुकर्मीं रत व सुप्रसिद्ध असे लोक जबरदस्तीनें परधनाचा अपहार करीत नाहींत. सर्व राज्य स्वाधीन असूनही इतर धनिकांच्या धनाचा अपंहार करील तर तो राजा खरोखर दरिद्रीच होय. थोर व निरीच्छलोक उपाशी मरतील, पण गरीबलोकांचें वित्त हरण करून पोट भरणार नाहींत.

गोष्ट पांचवी.

प्रजेवर कृपा करणें.

एक न्यायी राजा दोन्हीं बाजूस अस्तर असलेला अंगरखा घालीत असे. एकानें त्यास म्हटलें, "हे दैवशाली

राजा, तूं रेशमी व मर्जरी अंगरखा तयार करीव." तेव्हां तो म्हणाला, "एवढ्यानें माझ्या शरीराला आवरण व आराम आहे. याहून अधिक असणें अलंकार व शृंगार होय. मी रयतेकडून कर घेतों तो सिंहासन व मुकुट शोभिवंत करण्याकरितां नव्हे. मी स्त्रियांप्रमाणें पोषाख करून नटेन तर माझ्या हातून पराक्रम घडून, शत्रूचा पाडाव कसा होईल? मलाही शौकडों होशी व गमती कराव्या असें वाटतें. परंतु, खजीना माझा एकट्याचा नाहीं. सैनेसाठीं खजीना भरलेला पाहिजे, शृंगार, अलंकार व रत्नें यांकरितां नव्हे."

असंतुष्ट शिपायी राज्यसीमेची चांगली देखरेख ठेवीत नाहीं. गांवढ्यांचीं ढोरें व गाढवें शत्रू नेईल तर मग राजानें कर व सारा कां घ्यावा? शत्रू ढोरें नेतो व राजा कर घेतो अशा राज्यश्रीचें केवढें भाग्य! अनाथावर जुलुम करणें पुरुषार्थ नव्हे; एखाद्या पक्ष्यानें मुंगीपुढून दाणा ओढावा, तसाच हा प्रकार होय.

प्रजा वृक्षाप्रमाणें आहे; तिला नीट पोसलें तरच ती एखाद्या सन्मित्राप्रमाणें वाटेल तसें फळ देईल. हा वृक्ष रागानें समूळशाख उपटून टाकूं नको. मूर्खावांचून आपल्याच पायावर धोंडा कोण मारून घेईल? दीनावर जुलूम न करणाऱ्या लोकांसच आपलें यौवन, शौर्य व सुंदर यांपासून फल प्राप्त होतें. तूं कोणा अनाथ मनुष्यास संकटांत टाकलें असलेंस, तर तो ईश्वराची करुणा भाकून रडेल, याचें भय बाळग. नरमीनें राज्य मिळेल तोंवर व्यर्थ लढून कोणाच्या केंसासही दुखवूं नको. एकही

जिवघेऊन एवढासाही प्रदेश तूं मिळविशील तर, ईश्वर-साक्ष तो अगदीं अयोग्य होय.

गोष्ट सहावी.

न्यायी व सुमार्गी जमशेद* बादशहानें एका झऱ्यावरील शिळेवर पुढील लेख लिहून ठेवला होता.

"या झऱ्यावर मजप्रमाणें पुष्कळांनीं विसावा घेतला व ते एका क्षणांत निवर्तले. या जगास आम्हीं आपल्या बाहुबलानें जबरदस्तीनें हातीं आणलें खरें, परंतु तें आम्हीं बरोबर कबरेंत नेऊं शकत नाहीं."

शत्रू तुझ्या पादाक्रांत झाल्यावर त्याला तूं अधिक दुःखवूं नको कारण, तेंच दुःख त्यास पुरें आहे. शत्रुघातरूपी पाप माथीं राहण्यापेक्षां तो दीन होऊन तुझ्या भोंवतीं फिरलेला बरा.

गोष्ट सातवी.

प्रथितकुलोत्पन्न दारा† बादशहा एकदां शिकार खेळत आपल्या सैन्यापासून फार दूर गेला असतांनां

---

*जमशेद नांवाचा बादशहा इराण देशांत २७०० वर्षांपूर्वी होऊन गेला. तो वैद्यशास्त्रांत निष्णात होतो व यक्ष यक्षिणी त्यास वश होत्या. त्याला जुहाकनांवाच्या सरदारानें कपटानें मारून त्याचें राज्य हरण केलें होतें. फरीदून हा याचाच पुत्र होय.

†दारा किंवा दराटास् नांवाचा बादशहा डरायसदेशांत ई०स० पूर्वी सुमारें ३०० वर्षें होऊन गेला. शिकंदरबादशहानें यास जिंकून पदच्युत केलें. पुढें त्याच्या सेवकांनीं त्याला ठार मारलें.

एक अश्वपाळ धांवत आलेला पाहून, त्यानें भात्यांतून बाण काढला. रानांत सहजीच शत्रूचें भय विशेष वाटतें, व घरांत आणलेल्या फुलांना कांटे दिसत नाहींत.—तेव्हां "मी शत्रू नाहीं, मला मारण्याचा यत्न करूं नको" असें तो दीनवाणी ओरडून ह्मणाला, "मी सरकारी अश्वपाल असून या हिरव्या गार जंगलांत घोडे चारण्यास आणले आहेत."

हें ऐकून बादशहाचा जीव स्वस्थ झाला व तो त्यास हंसून ह्मणाला, "मूर्खा, तुझ्या सुदैवानेंच मदत केली, नाहीं तर मी धनुष्याची दोरी आकर्ण ओढली होती." अश्वपाल हंसून ह्मणाला, "खरी उपदेशाची गोष्ट मित्रापासून छिपविणें योग्य नव्हे. शत्रू व मित्र न ओळखणारा राजा बुद्धिवान् किंवा दूरदृष्टीही नव्हे. मोठेपणा मिळविणाऱ्यानें प्रत्येक लहानसहान मनुष्यास ओळखलेंच पाहिजे. मी पुष्कळदां आपल्यापुढें आलों आहें व आपणही मला अश्व व अश्वचारण्याच्या जागा यांविषयीं विचारलें आहे. हल्लीं मी स्वामिभक्तीनें पुढें आलों; पण मला आपण शत्रू समजलों. हे विख्यात बादशहा, मी शंभरहजार घोड्यांतून एक घोडा ओळखूं शकतों. हें अश्वपालाचें काम माझी हुषारी व शहाणपण यांमुळेंच मला मिळालें आहे. आपणही आपल्या प्रजारूप कळपाचें शहाणपणानें रक्षण करा."

राजाला गुराख्यापेक्षांही शहाणपण कमी असतें त्या राज्यांत लौकरच नुकसान व संकटें उद्भवतात.

बोधवचन.

तूं आपलें सुखशायनमंदिर शनीच्या मंडळा इतकें उंच केलेंस तर अर्जदाराचें ओरडणें तुला कसें ऐकूं येणार? कोणी अर्जदार ओरडला तर तेव्हांच ऐकूं येईल असा तूं निजत जा, कारण, तुझ्या जुलुमी कामगारांच्या जुलुमामुळें कोणी ओरडेल तर तो जुलूम त्याचा नसून तुझाच आहे. कोणा वाण्याचें वस्त्र एखादा कुत्रा फाडील तर त्यांत कुत्र्याचा दोष नसून, ज्या मूर्खानें तो कुत्रा पाळला असेल त्याचा आहे.

हे सादी, तूं बोलण्यांत अतिशय धीट आहेसच, तेव्हां तुझ्या हातांतील बोधवचनरूप तरवारीनें खूप जय मिळीव. एकतर योग्य वाटेल तें बोल. कारण, खरें बोलणें उत्तम आहे. तूं लालची किंवा थापा देणारा नाहींस, किंवा चुप रहा व आपल्या विद्वत्तेचें पाताडें धुवून टाक. लालूच सोडून दे व वाटेल तें बोल.

गोष्ट आठवी.

इराक* देशांतील एका जुलमी सरदारानें, एक गरीब मनुष्य दारापुढें उभाराहून, असें म्हणतांना ऐकिलें कीं, "हे सरदारा, तूंही ईश्वराच्या दारीं उमेदवार आहेस, तेव्हां तुझ्या दारीं आलेल्यांच्या इच्छा पूर्ण कर. तसेंच दुःखी

* इराक हें नांव दोन प्रदेशांचे आहे. एकांत, खुरासान व इरचहान हे प्रांत येतात व दुसऱ्यांत बगदाद शहराभोंवतालचा प्रांत सामिल आहे. तेथें सापाच्या विषावर उतारा पाडणारे मणी मिळत असत अशी दंतकथा आहे.

जवि बंदमुक्त कर, ह्मणजे तुझ्या मनाला कधीं दुःख होणार नाहीं."

फिर्यादीच्या मनाचें दुःखच राजांला राज्यावरून दूर करतें. अनाथलोक खुशाल उन्हांत तळमळतात. व तू थंडगार महालांत दोन प्रहरपर्यंत निजतोस आणि राजा, त्याची दाद देखील घेत नाहींस. पण त्यांला ईश्वराजवळून न्याय मिळतो.

गोष्ट नववी.

एका विद्वानानें **अबदुल अजीज*** बादशहाच्या पुत्राविषयीं लिहिलें आहे कीं, त्याच्या आंगठींत एक अमोलिक रत्न होतें त्याची किंमत करण्यांत रत्नपारखी थकले होते. तें रात्रीं सर्व जग प्रकाशित करणारें व दिवसा सूर्याप्रमाणें तेजस्वि असें होतें.

दुर्दैवानें एकावर्षीं मोठा दुष्काळ पडल्यानें पूर्णचंद्राप्रमाणें प्रफुल्लितमुख असेही लोक द्वितीयेच्या चंद्राप्रमाणें क्षीण झाले. तेव्हां प्रजेला सुख व शक्ति राहिली नसतांना स्वतः सुखांत राहणें योग्य नाहीं असें बादशहास वाटलें. सर्व लोकांच्या तोंडांत विष पडलेलें पाहून कोणाच्या घशाखालीं गोड पाणी उतरेल?

त्यानें तें रत्न विकून द्रव्य आणण्यास सांगितलें. कारण, गरीब लोक व पोरकीं पोरें यांची त्याला दया आली. आलेलें द्रव्य त्यानें सात दिवस अनाथ भिकाऱ्यांकडून लुटविलें

---

* हा एक खलीफ होऊन गेला. याच्या पुत्राचें नांव **अमरू** होते. **अमरू** हा फार न्यायी व दयाळू असल्याबद्दल इतिहासांत प्रसिद्धि आहे.

तेव्हां निंदकांनीं रागानें त्यास झटलें, "असें दुसरें रत्न तुह्माला पुनः कोठून मिळणार?"

हें ऐकून बादशहाच्या म्लान मुखकमलावर दुःखामुळें नेत्रांतून अश्रुबिंदू पाघळूं लागले व तो झणाला, "प्रजेचीं मनें दुःखी असतांना बादशहानें अलंकार घालणें वाईट आहे. माझ्या आंगठींत रत्न नसलेलें पतकरेल; परंतु सर्व लोकाचीं मनें कष्टी असलेलीं मला मान्य नाहींत. ज्याला सर्व स्त्रीपुरुषाचें सुख स्वतःच्या सुखापेक्षां अधिक मान्य आहे तोच खरा सुखी*."

थोर मनाचे व चतुर लोक दुसऱ्यांस दुःख होऊन स्वतःस सुख व्हावें अशी इच्छा करीत नाहींत. बादशहा चैनीनें गादीवर निजतो; तेव्हां गरीब लोकांस सुखानें निद्रा मिळते असें मला वाटत नाहीं. राजा रात्रीं जागरण करील तरच लोक चैनीनें व सुखानें निजतील.

अशी संवय व असें सद्वर्तन **अताबुक अबूबकर** बिन-**साद** यांच्यांत मात्र आहे, ही ईश्वराची धन्यता आहे. या **पारस** देशांत शशिमुखी विलासिनींच्या शरीरांतल्या लचके शिवाय इतरत्र लचक किंवा कलह दिसत नाहीं.

पुढील अर्थाचीं पांच पद्यें कोणी एका बैठकींत गात असलेलीं माझ्या कानीं आलीं. तीं—"मला काल रात्रीं जन्मल्याचें खरें सौख्य वाटलें. कारण, एक शशिमुखी प्रिया माझ्या बगलेंत होती तिला झोंपेनें घेरलेलें पाहून मी म्हटलें, हे सुतनु, तुझ्या शरीरापुढें सुरू तुच्छ आहे.

---

* "स्वसुखनिरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः" कालिदास.

एकवेळ नार्गिसच्या* फुलास लाजविण्याऱ्या डोळ्यांवरून गोड झोंप धुवून टाक व उमलणाऱ्या पुष्पकलिकेप्रमाणें हंसून बुलबुलाप्रमाणें भाषण कर. निजतेस काय? हे कलहोत्पादिनि, चल, ये व कालच्याप्रमाणें वाङ्मयमद्यानें मला मस्त कर. त्यावर ईषत्त्रस्त व क्रुद्ध मुद्रेनें मजकडे पाहून तिनें म्हटलें:—चल जा, मला तूं कलहोत्पादिनी कसें म्हटलेंस? आतां माझा व्यर्थ निद्राभंग करूं नको—"

या कुलावतंस राजाच्या कारकिर्दींत अशा प्रणयकलहाशिवाय इतर कलह कोणीही कधींच पाहिला नाहीं.

गोष्ट दहावी.

मागील राजच्या इतिहासांत लिहिलें आहे कीं, तुझ्या† बादशहा आपला भाऊ **साद जंगी** याच्या मागून गादीवर बसला, तेव्हां त्याच्या कारकिर्दींत कोणासही कोणापासून त्रास झाला नाहीं. त्याच्यासारखा योग्य तोच होता. त्यानें आपल्या मागच्या बादशहांस लाजविलें.

त्यानें एका चतुरास म्हटलें "माझें सर्व आयुष्य व्यर्थ गेलें. राज्य, वैभव व गादी हीं सर्व एथेंच राहतात व येथून फकीराशिवाय कोणी कांहीं संपत्ती बरोबर नेत नाहीं. याकरितां बाकी राहिलेले आयुष्याचे पांच दिवस एकांतात राहून भजन करावें, असें मी इच्छितों."

---

* **नार्गिस**मसनावाचे एक झाड आहे. त्याच्या फुलांची स्त्रियांच्या नेत्रांस उपमा देतात.

† ग्रंथकाराच्या प्रस्तावनेतील पृष्ठ १८।१९ यांवरील मागें दिलेली टीप पहा.

हें ऐकून त्या शाहण्या चतुर व हुषार गृहस्थानें नाराज होऊन ह्मटलें, "हे राजा, स्वस्थहो. ईश्वरभजन हें प्रजापालनाहून निराळें नाहीं. तें करण्याला स्मरणी, प्रार्थनामंदीर व गोदडीच हवी असें नाहीं. तूं आपल्या सिंहासनावर खुशाल बैस; पण मनोभावानें शुद्ध वर्तन ठेवून दरवेशा प्रमाणें वाग. सत्य व शुचितेविषयीं कंबर बांधून कुकर्में व कुवाद यांपासून विमुख रहा. ईश्वरभक्ति केवळ वाचिक कामाची नसून तदनुरूप वर्तन पाहिजे. खरे भक्त तदनुरूप वर्तनाव्यतिरिक्त उपदेशाचा एकही शब्द उच्चारीत नाहींत. शुद्धसत्व महात्मे आपल्या बाह्यवर्तनाच्या आंत अशी शुचितारूप गोदडी पांघरलेले असतात.

गोष्ट अकरावी.

एक रूमचा बादशहा एका विद्वानाजवळ रडत होता कीं, "शत्रूपुढें माझें सामर्थ्य राहिलें नाहीं व हा किल्ला व हें शहर याशिवाय माझ्या हातीं कांहीं राहिलें नाहीं. माझ्या मागें माझा मुलगा या राज्याचा धनी व्हावा ह्मणून मी पुष्कळ यत्न केला. हल्लीं त्या नीच शत्रूचा जोर चालला आहे व माझें सर्व सामर्थ्य, शौर्य व उपाय हरले तेव्हां आतां मी काय करूं? व कोणची युक्ति योजूं? माझे प्राण व शरीर काळजीनें झिजताहेत."

हें ऐकून त्यानें त्रासानें ह्मटलें, "राजा, याविषयींच काय पण तुझें शहाणपण व धैर्य यांच्याविषयीं-ही रडलें पाहिजे. राज्य काय माल आहे? तू आपल्या स्वतःविषयीं दुःख कर. तें राज्य कां तुझ्या आयु-

प्यापेक्षां अधिक व चांगलें आहे? तुझ्या जन्माला एवढें राज्य पुरें आहे. तुझ्या मागें तें दुसऱ्याचें होणारच तुझा मुलगा शहाणा किंवा वेडा असो त्याविषयीं दुःख करूं नको. कारण त्यामुळें त्याचें त्यालाच दुःख होईल.

राज्य मोठ्या कष्टानें तरवारीनें मिळवूनही मेल्यावर मागें सोडावें लागतें*. तेव्हां त्याच्या रक्षणार्थ उपद्व्याप करणें कसें योग्य होईल. स्वतःविषयीं काळजी कर. कारण, तुझ्या मागच्यांसही स्वतःविषयीं दुःख करावें लागेलच. या औटघटकेच्या आयुष्यांत व्यर्थ घमंड न करितां येथून यशानें व भलेपणानें जाण्यास पाय काढण्याचे योग्य उपाय योज. **अरबस्थान**च्या प्रजापीडक बादशहांतून ज्याचें राज्य व वैभव घटलें नाहीं असा कोणी तूं जाणतोस काय?

ईश्वराशिवाय कोणाचेंही राज्य चिरंतन नाहीं. कोणालाही चिरंजीव होण्याची आशा नाहीं. कारण, हें जगसुद्धां शाश्वत राहणारें नाहीं. मालकाच्या मागें राहिलेली—सोनें, रुपें वगैरे संपत्ती व मालमत्ता लौकरच नष्ट होते; परंतु ज्याचें मागें चांगलें नांव कायम राहिलें त्याच्यावर हमेषा ईश्वरी कृपा होते. ज्या थोर पुरुषाची मागें कीर्ती राहिली तोच कृती व चिरंजीव होय.

कृपा व उपकाररूप वृक्ष दक्षतेनें पोस ह्मणजे तुला वांछित फल हटकून मिळेल. परोपकार कर ह्मणजे उद्यां न्यायाच्या दिवशीं तुझा सन्मान होऊन तुजवर ईश्वरी कृपा होईल. ज्याचें पाऊल सन्मार्गप्रवृत्तींत पुढें असेल त्यालाच ईश्वरासंनिध ही सन्मान अधीक मिळेल; व याकामीं मागें राहून सत्कृत्यें न करणाऱ्यास लज्जित होऊन

* "राज्यं श्रमाय च न सुखाय"

व चोरासारखें खालीं पहावें लागेल. असा चांगला तवा तापलेला असून पोळी भाजून न घेणाऱ्याचें नांव सोड, तो पुढें सहजच पस्तावून मनगटें चाळील. वेळेवर बीज न पेरणें मूर्खपणा व सुस्ती आहे, असें खळ्यावरून धान्य आणण्याच्यावेळीं तुझ्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं.

गोष्ट बारावी.

रूम शहराजवळ एक भक्त संसार सोडून एका गुहेंत एकांतवास करीत होता. बाह्यसृष्टीचा त्याग व एकांतवास यांचें अवलंबन करून जसें त्यानें अंधेऱ्या गुहेंत पाय ठेवले होते तसेंच मानसिक शांति धरून पाड्रिपूंचाही त्यानें त्याग केला होता. मोठमोठे लोक त्याच्या दाराशीं मस्तक नम्र करीत, कारण त्याचें मस्तक कधीं कोणाच्या दारापुढें गेलें नव्हतें.

हे परमेश्वरा तू मला दारोदार फिरण्यास लावूं नको. अशी तो शुद्धाचरणी भक्त परमेश्वराजवळ नेहमीं प्रार्थना करीत असे त्याच्या मनास लालसा होई तेव्हां तेव्हां त्यास रिझविण्याकरितां तो त्याला गांवोगांव फिरवून आपल्यास हवी ती वस्तु कोठेंही नाहीं असें दाखवी.

हा वृद्ध तपस्वी रहात होता त्याच प्रदेशांत एक मोठा जुलमी सरदार रहात असे. तो हातीं सापडलेल्या गरीब लोकांवर जुलूम करून त्यांस फार दुःख देई. तो जगत्तापद, निर्दय व अनाथघातक असा होता. त्याच्या जुलुमामुळें व त्रासामुळें सर्व प्रजा त्रस्त होऊन

पुष्कळांनीं देशत्याग केला, व त्याचा दुर्लौकिक देशोदेशीं नेला, व जे मागें राहिले ते दीन व कष्टी होत्साते त्याच्या पश्चात् त्याला फार शिव्या देत होते—जुलुमाचा हात पुढें सरसाविल तेथें लोक हंसतमुख कोठून दिसणार?--तो सरदार केव्हां केव्हां त्याच्या दर्शनास येई, परंतु, तो ईश्वराचा मित्र त्याच्याकडे पहातच नसे.

एकदां तो ह्मणाला, "हे पुण्यपुरुषा, मजवर नाराज होऊन तोंड फिरवूं नको. मी तुजशीं स्नेह करूं इच्छितों हें तूं जाणत असून मजशीं नाराज कां? मी मोठा बादशहा हें खरें तरी माझा मानमरातब दरवेशापेक्षां कमी नाहीं. मला सर्वापेक्षां श्रेष्ठ समज असें मी ह्मणत नाहीं, तर जसें सर्वांशीं वागतोस तसेंच मजशीं वाग ह्मणजे पुरे."

त्या ज्ञानी तापसानें हें ऐकून त्रासून ह्मटलें. "हे राजा, तुजपासून सर्व प्रजेला पीडा होते व मूर्तिमंत प्रजापीडिला मी मित्र मानीत नाहीं. माझ्या मित्रांचा तूं शत्रू आहेस तेव्हां तुला मी माझा मित्र कसा मानूं? कदाचित् माझा तुझा स्नेह झाला तरी काय फल? कारण, ईश्वरच तुझा शत्रू आहे. भक्तजनाच्या चिंध्या उडविणाऱ्या शत्रूच्या मित्राशीं स्नेह कोण करील?"

ज्या एका कठिणहृदयास सुख होण्यांत सर्व शहर त्रासांत झोपीजातें अशा पाषाणहृदयी नराधमाचें मला मोठें आश्चर्य वाटतें. तुजमध्यें विद्या, बुद्धि व विचार असेल तर कृपा व परोपकार करण्यांत खबरदार राहून कंबरबांधून प्रयत्न कर.

बोधवचन.

गरीबांचीमनें न दुखविण्याविषयीं.

थोर लोकहो, गरीबांवर जुलूम करूं नका. कारण, हें जग सर्वदां सारखेंच रहात नाहीं. दुर्बलांचे हात तोडूं नको कारण, त्याचा डाव साधला तर तो तेव्हांच तुजवर वार करील. कोणालाही पाय ओढून खालीं पाडूं नको, नाहीं तर तूं पडशील तेव्हां दीन होशील.

मित्रांचें मन जोडलेलें चांगलें किंवा खजीना जोडलेला चांगला? तसेंच खजीना रिकामा झालेला बरा किंवा सर्व लोक त्रासलेले बरे? याचा विचार कर. कोणाचेंही काम पायाआड घालूं नको कारण, कदाचित् तुला पुष्कळदां त्याच्या पायांपडावें लागेल. शिरजोराची उपेक्षा कर म्हणजे, हे दीन मनुष्या, तूही एकादे दिवशीं, त्याच्याहून शिरजोर होशील. धैर्यानें व युक्तीनें प्रतिपक्षास जिंक. कारण, धैर्य व युक्ती निव्वळ सशक्त हस्तापेक्षां श्रेष्ट होत. जुलूम झालेल्याचें तोंड सुकलेलें पाहून हंसूं नको, नाहीं तर जुलूम करणारा तुझें दांत पाडील.

सकाळच्या प्रहरीं वाजणाऱ्या चौघड्याच्या आवाजानें जागा होणाऱ्या सरदाराला बिचाऱ्या चौकिदारांनीं, रात्र कशी काढली तें काय ठाउक? व्यापाऱ्याला आपल्या मालाची काळजी, गाढवाची जखमी पाठ पाहून त्याचें मन थोडेंच जळतें. तूं स्वतः पडलेला नाहींस हें खरें, मग कोणी पडलेला पाहून तू स्वस्थ कां उभा राहतोस? यावर तुला एक घडलेली गोष्ट सांगतों ती ऐक. अशा गोष्टी वेळेवर न सांगण्यांत नुकसान होतें.

गोष्ट तेरावी.

स्वतः समर्थ असूनही अनाथावर दया करण्यासंबंधे.

एकदां दमिष्क* शहरांत मोठा दुष्काळ पडला. तेव्हां प्रियकर देखील आपलें प्रेम विसरले व आकाश पृथ्वीवर इतकें कोपलें होतें कीं जमीन किंवा झाडें यांस पाण्याचा एक बुंदही मिळाला नाहीं. जुनेजुने झरे सुकून गेले व अनाथ पोरांच्या नेत्रांतून वाहणाऱ्या अश्रुजलाशिवाय कोठें पाणी राहिलें नाहीं. एखाद्या झरूक्यांतून केव्हां केव्हां धूर निघे तो स्वयंपाकाचा नसून अनाथ अबलांच्या दुःखोद्गाराचा होता. झाडें दरवेशाप्रमाणें विपर्ण दिसत होतीं व बलवान् लोक शून्य व कष्टी दिसत होते. पर्वतांवर हिरवळ किंवा बागेंतील वृक्षांला फांदी—नव्हती. टोळांनीं बगीचे व माणसांनीं टोळ खाल्ले.

अशा स्थितींत मजकडे माझा एक जुना मित्र आला. त्याच्या अस्थिवर चर्म मात्र राहिलें होतें. त्याला पाहून मला फार आश्चर्य वाटलें कारण तो पूर्वी चांगला संपन्न व प्रतिष्ठित होता.

मी त्याला पाहून सखेदाश्चर्यानें म्हटलें, "हे सुशील मित्रा, तुजवर काय संकट पडलें आहे तें सांग." तेव्हां तो मजवर रागावून म्हणाला, "तूं सर्व जाणून पुनः विचारतोस, हें गैर आहे. हल्लींच्या यातना

---

* **दमास्कस** यालाच **दामिष्क** असें म्हणत. हें एशियामायनरमध्यें एक प्राचीन व नामांकित शहर आहे

किती दुःसह झाल्या आहेत व लोकांस कसे कष्ट पडतात तें पहात नाहींस? आकाशांतून पर्जन्य खालीं येत नाहीं, व करुणा भाकणाऱ्यांचा दुःखोद्गाररूप धूर वर जात नाहीं." मीं ह्मटलें, "बरें पण तुला कसचें भय, तिर्याक किंवा विषमोहरा नसेल तेथेंच सर्पविषाची बाधा होईल. जवळ कांहीं नसल्यानें इतर कोणी मरेल तर मरो; पण तूं मालदार आहेस. बदकाला तुफानापासून काय भय?"

हें माझें भाषण ऐकतांच, त्या बुद्धिमानानें, विद्वान् मूर्खाकडे तुच्छपणानें दृष्टी करतो तसें, मजकडे त्रासानें पाहून ह्मटलें, "मित्रा, स्वतः किनाऱ्यावर सुखरूप असूनही आपल्या मित्रांपैकीं कोणी बुडत असला तर कोणास सुख होईल? मजपाशीं माल नाहीं ह्मणून मी क्षीण झालों असें नव्हे तर गरीबांच्या काळजीनें माझा जीव तुटतो. शहाण्यानें आपल्याप्रमाणें दुसऱ्याच्या शरीरावरचे व्रण पाहूंनयेत असें नाहीं.*

मी जखमी नाहीं ही ईश्वराची कृपा व थोरवी आहे पण जखमी मनुष्य पाहिला कीं माझे अंग कांपतें. सशक्त मनुष्या जवळ अजारी मनुष्य निजला असेल तर त्याच्याही आरामाचा विरस होतो. कंगाल उपाशी पाहून माझ्या वशांत अंनाचा घास, विष किंवा गाळ या प्रमाणें भासतो. एखाद्याच्या मित्रास कैदेत टाकलें तर तो स्वतः बगीच्यांत असूनही त्याला काय सुख होणार?

---

* "आत्मवत्सर्वभुतेषु यः पश्यति सपश्यति, भगवद्गीता"

गोष्ट चवदावी.

असें सांगतात कीं एका रात्रीं प्रजेचा हाहाकाररूप धूर प्रज्वलित होऊन त्या आगीच्या योगानें अर्धें बगदाद शहर जळालें. एकानें तशा प्रलयाच्या वेळीं ईश्वराचे उपकार मानून म्हटलें, "माझें दुकान वांचलें हें फार चांगलें झालें."

हें ऐकून एक दुनियादार मनुष्य त्यास म्हणाला, "शाबास, तुला फक्त स्वतःचें नुकसान नहोण्याची काळजी; तुझें घर वांचून सर्व शहर जळालेलें तुला पतकरलेंना?"

अन्नान्नगत होऊन लोकांनीं पोटावर दगड बांधून घेतलेले पाहून पाषाणहृदयावांचून कोण आपलें पोट जाळील? भुकेनें व्याकुळ होऊन गरीबांचें रक्त आटलेलें पाहून खरा संपन्न मनुष्य सुग्रास कसा खाईल? अजारी मनुष्य जवळ असल्यानें अजाऱ्याप्रमाणें तडफडणाऱ्यास निरोगी समजूं नको. सुमनस लोक स्वतः सुखरूप मुक्कामावर पोंहोंचले, पण त्यांच्या लवाजमा मागें राहिलातर त्यांना कधीं स्वस्थ झोंप येणार नाहीं. लादलेलें गाढव गाळांत फसलेंले पाहून केव्हां केव्हां राजेलोकांच्या मनासही वाईट वाटतें.

लोकांच्या सद्वर्तनरूप मंदिरांत वासकरणाऱ्याला सादीच्या उपदेशांतून एक अक्षर पुरे आहे. लक्ष देऊन ऐकशील तर एव्हढाच उपदेश पुरे आहे कीं, कांटे पेरून फुलें कधीं तोडण्यास सांपडणार नाहींत.

बोधवचन.

न्यायीवर्तन व त्याचें फल.

अरबस्थानच्या जुहाक* वगैरे ज्या बादशहांनीं गरीबांवर जुलूम केला त्यांची हकीकत तुला माहित आहे? त्यांचा तो थाट, तें राज्य व तो प्रजेवरचा जुलूम यांतून काय मागें राहिलें? त्यांचें पाप मात्र त्या दुष्टांच्या माथीं राहिलें. ते व ज्यांवर त्यांनीं जुलूम केला तेही गेले; पण हें जग तसेंच आहें.

न्यायाचें वर्तन करणाऱ्या लोकांचीं शरीरें न्यायाच्या दिवशीं ईश्वरसामीप्यतेमुळें सुखांत राहतील. ज्या प्रजेचें सद्वर्तन ईश्वरास पसंत पडतें तिलाच तो न्यायी व सुबुद्धि असा राजा देतो व एखाद्या देशाची धुळधाणी करणें असल्यास तो तेथें जुलूमी राजा उत्पन्न करतो. म्हणूनच थोर लोक अन्यायी राजा होणें ईश्वरी क्षोभ समजून भयग्रस्त होतात. अन्यायी राजाचें अति निंद्य वैभव घटतें ही त्या ईश्वराचीच थोरवी होय. याबद्दल त्याचा स्तुती करा.

नहींमा त्या थोर परमेश्वराचे उपकार स्मरल्यानें आपलें वैभव वाढतें असें त्या पवित्र ग्रंथांत (कुराणांत) तूं वाचलें नाहींस का? या राज्यवैभवाबद्दल उपकार स्मरशील तर दोहोंची ही तुला उणीव पडणार नाहीं. नृपावस्थेंत कोणावर जुलूम करशील तर पुढें दरिद्री होशील. अनाथ लोकांस शिरजोर लोक जुलुमानें भारवाह करीत असतानां राजानें स्वस्थ झोंप घेणें महत्पाप आहे.

---

* ग्रंथकाराची प्रस्तावना यांतील पृष्ठ २० यावरील टीप पहा.

आपल्या राज्यांतील प्रजेला तिळभरदेखील दुःखवूं नको. कारण, राजा गोपाल व प्रजा गोवृंद, आहे; तोच अन्याय व जुलूम करील तर तो गोपाल कसचा, बकासुरच होय. त्याच्याबद्दल ईश्वरापाशीं गाऱ्हाणें पोंहोंचतें. अनाथावर जुलूम करण्यांत पाप व अविचार घडून वाईट परिणाम होतो. तुझी तुझ्यामागें निंदा न व्हावी अशी इच्छा असेल तर सद्धर्तन ठेव.

गोष्ट पंधरावी.

जुलमी व न्यायी अशा दोघां भावांविषयीं.

असें ऐकण्यांत आहे कीं, प्राच्य देशांत एका बापाच्या पोटचे दोन राजपुत्र होते. त्यांच्यापाशीं पुष्कळ सैन्य असून ते महामानी, हत्तीप्रमाणें बलवान्, प्रियदर्शनी, प्रबुद्ध व शूर असे होते.

बापानें, दोघेही कलहप्रिय, युद्धेच्छू व भीतिप्रद आहेत असें जाणून अपसांत, तंटा होऊन तरवार न चालावी म्हणून राज्याचे दोन विभाग करून दोघांस त्यांच्या दैवानुसार वाटून दिल्यावर लौकरच जगत्स्रष्ट्याच्या पदीं प्राण अर्पण केले व काळानें त्याचे आशा तंतू तोडले, व काम करण्याचे हात बांधले.

तेव्हां तें राज्य, ती अपार संपत्ती व सेना हें त्या उभयतांच्या वांट्यास आलें. उभयतांनींही स्वस्वबुद्ध्यनुसार राज्यवृद्धीचा यत्न चालविला.—एकानें यश मिळावें म्हणून न्यायवर्तन धरलें. दुसरा संपत्ती वाढावी म्हणून जुलूम करूं लागला. एक परोपकारी

होऊन गरिबांस धन देऊन त्यांचा दुःखभागी झाला व सर्वांस अन्नदान व सेनेवर कृपा करूं लागला. त्यानें दरवेशांस रात्रीं राहण्याकरितां धर्मशाळा बनविल्या, व खजीना रिकामा व सैन्य पूर्णकाम केलें यामुळें सर्व प्रजेला ते दिवस आनंदमहोत्सवाचे वाटले व **अबूबकर** बिन **सादया**च्या वेळीं **शिराज** येथें जसा आनंद व जयघोष होत असे तसा प्रचंड मेघगर्जनेप्रमाणें चोंहीकडून जयघोष होत होता. **अबूबकर** बादशहा मोठा बुद्धिवान् व पुण्यजन्मा होता, त्याच्या मनोरथशाखा सुफल होवोत.

तो मुलगा नांव मिळविणारा व सर्वमान्य पुण्यमार्गावलंबन करणारा, लहानथोरांशीं प्रेमानें वागणारा व सकाळसंध्याकाळ ईश्वरभजन करणारा होता. त्याच्या राज्यांत प्रत्यक्ष कारूनही खुष होता. कारण तेथील राजा न्यायी असून प्रजा तृप्त होती. त्याच्या राज्यांत जणूं वृक्षांस कंटक रहित फलें व पर्ण येत असत. तेथें कोणतेंही सुमन कंटकित नव्हतें. तो राज्यवैभवांत सर्वापेक्षां श्रेष्ठ होता व त्याच्या दारीं सर्व राजे लीन होते.

दुसऱ्या भावानें राज्य व संपत्ति वाढविण्याकरितां शेतकऱ्यांवर सारा वाढविला व त्या सर्वांचें धन अपहार करण्याची इच्छा केल्यानें त्या बिचाऱ्यांवर संकट ओढवलें. तो अनाथशत्रु होता असें मी कशास ह्मणूं? कारण खरोखर त्यांचाच काय पण तो स्वतःचाही वैरी होता.

संचयेच्छेमुळें तो कोणास कांहीं देत नसे व स्वतःही खात नसे. यामुळें, हा हें चांगलें करीत

नाहीं, असें सज्जन समजत होते. त्यानें लबाडीनें धन जमविलें तों, तों, सैन्य त्रासून देशोधडीस लागलें. व्यापाऱ्यांनीं त्या मूर्खाच्या राज्यांत जुलूम असल्याचें ऐकून तेथून व्यापार उठविला व शेती बुडाल्यानें प्रजेची राखरांगोळी झालीं.

त्याचें सुदैव विमुख होतांच अनायासानें, एका दुर्बल व यःकाश्चित् शत्रूनें त्याचा पाडाव केला. ईश्वरी क्षोभानें त्याचा समूळ उच्छेद केला व शत्रूच्या अश्व-खुरांनीं त्याचें राज्य उध्वस्त केलें. वचनभंग केल्यावर कोण मदत करणार? व शेतकरी पळाल्यावर सारा कोणा-जवळ मागणार? लोकांचे अभिश्राप मागें लागलेल्या पातक्यास सुफलेच्छा कशी राहणार? नैसर्गिक हतभागी, मनुष्य सद्गृहस्थाच्या उपदेशानुरूप कोठून वागणार? सज्ज-नांचा उपदेश आहे कीं, हे भल्या गृहस्था, सुफलभाक् हो कारण दुष्टांस केव्हांही सुफल मिळत नाहीं. त्याचे विचार मुळींच अयोग्य व उपाय मूर्खपणाचे होते, कारण तो जी गोष्ट कुमार्गानें धुंडीत होता ती खरोखर सन्मार्गात होती.

गोष्ट सोळावी.

एक मनुष्य एका झाडाच्या फांदीवर बसून तिचा बुडखा तोडीत होता हें बागेच्या धन्यानें पाहून ह्मटलें, "हा एक दुष्कर्म करतो आहे पण तें मजशीं नसून स्वतःशींच करीत आहे."

तूं ऐकशील तर माझा तुला हा एक अत्यंत फायदेशीर उपदेश आहे कीं, तू आपल्या प्रबल हस्तांनीं निर्बलांस

पाडूं नको. कारण जो आज तुझ्या दृष्टीनें यःकाश्चित् आहे तोच कदाचित् उद्यां ईशकृपेनें श्रेष्ठ होईल.

थोर होऊं इच्छिशील तर गोरगरीबांशीं वैर करूं नको कारण अधिकार नष्ट होतांच तेच तुला अदावतीनें पदर धरून अडवितील. दुर्बलांबरोबर कुस्ती करूं नको कारण कदाचित् पडलास तर तुला शर्मिंदें व्हावें लागेल. थोरांच्या मतें पतितांच्या हातून पडणें फार वाईट आहे. थोर निष्प्रांजळ व सुदैवी लोक स्वबुद्धिवैभवानें राज्यपद मिळवितात, सन्मार्गगाम्यांमागून कुमार्गी होऊं नको व सत्य पाहिजे असेल तर सादीपासून ऐक.

दरवेशी लोकांचें आत्मसंयमन व शांति यांची प्रशंसा.

राज्यपदाहून थोर व पूज्य पद दुसरें नाहीं असें म्हणूं नको, कारण दरवेशपदांपेक्षां अधिक निर्धोर असें पदच नाहीं. 'ईषत् वजन जलद गमन,' ही म्हण खरी व सज्जनसंमत आहे. भिकाऱ्यास भाकरीची व राजास साऱ्याची काळजी असते. दरवेशी रात्रीं रोटी मिळाली कीं रूमशामच्या बादशाहाप्रमाणें सुखानें निजतो. सुख व दुःख दोन्हींचा नाश होतो व मरतांना दोन्हीं मनांतून बाहेर जातात.

मूर्धाभिषिक्त राजे मोठ्या ऐश्वर्यांत महालांत राहिले व ज्यांच्या निढळच्या घामानें सारा वसूल होतो ते लोक दीनपणें कारागृहांत पडले असले, तरी मृत्यू उभा ठाकल्यावर ते परस्पर ओळखूं येणें सुद्धां अशक्य होतें.

गोष्ट सतरावी.

एकदां एका समुद्र किनाऱ्यावर एका नृकपालानें एका भक्तास म्हटलें, " माझाही थाट बादशाही होता व पुष्कळ किल्ले माझ्या स्वाधीन होत; ईश्वराची व विजय देवतेची मला मदत होती व मी आपल्या बाहुबलानें **इराक*** देशचें राज्य जिंकलें व **किरमान** देश जिंकून घेण्याची लालसा करीत होतों, इतक्यांत कृमिकीटकांनीं माझेंच मस्तक खाल्लें."

लोकांचा उपदेश तुझ्या कानीं पडावा म्हणून कानांतील तृष्णा व असत्यवादरूप कापसाचे दट्टे काढ.

सुकर्म, कुकर्म व त्यांचे परिणाम.

सुकर्मी मनुष्याचें वाईट होत नाहीं. चांगलें व्हावें म्हणून कोणी वाईट करूं नये. कुकर्मी मनुष्याचा शेवट ही वाईटच होतो. विंचू आपल्या घरांत क्वचितच पोंहोंचतो.

स्वतः तुझ्या अंगीं कोणाचें हित करण्याची बुद्धी नसली तर तुजसारखें रत्न व कठिणतर पाषाण दोन्ही एकच होय—छेः भलतेंच—असें नव्हे, कारण त्या दगडापासून ही फायदा होतो. ज्याच्या पेक्षां दगडही श्रेष्ठ, असा निर्लज्ज मनुष्य मेलेला बरा. प्रत्येक मनुष्य पशूपेक्षां श्रेष्ठ असतो, असें नाहीं. कारण, दुष्ट मनुष्यापेक्षां पशू बरा. सुबुद्धि मनुष्य मात्र पशूपेक्षां श्रेष्ठ होय. जो जनांत

---

* एशियामायनर.

हिंस्र पशुप्रमाणें वागतो तो नव्हे. आहार व निद्रा यां-शिवाय मनुष्यास ज्ञान नसल्यास तो पशूहून कशांत श्रेष्ठ होणार *?—

दुर्दैवी व आडमार्गानें जाणाऱ्या स्वारापेक्षां पादचारी त्वरित पोंहोंचतो. ज्यानें सद्वर्तनरूप बीज पेरलें नाहीं त्याला मनोरथपूर्तिरूप फलसंचय कधीं मिळणार नाहीं. दुराचाराचा शेवट बरा झाला असें मी आपल्या साऱ्या जन्मांत ऐकिलें नाहीं.

गोष्ट अठरावी.

एका दुष्ट पहिलवानाची.

ज्याच्या दहशतीनें नरव्याघ्र अबलेप्रमाणें होईल असा एक दुष्ट मल्ल एका कूपांत पडला होता. दुष्टास दुर्वर्तनांवाचून कांहीं दिसत नाहीं. तो पडतो तेव्हां त्याच्या पेक्षां दीन प्राणी क्वचितच आढळतो. तो रात्रभर रडत ओरडत होता.

हें पाहून एकानें त्याच्या डोक्यावर एक दगड टाकून म्हटलें, "तू कधीं कोणाच्या दीन हाके-सरशीं साहाय्य केलेंस, म्हणून आतां तुझी दीनवाणी कोणी ऐकेल? तू कधीं तरी सद्वर्तनरूप बीज पेरलें होतेंस का? आतां आपल्या दुर्वर्तनाचीं योग्य फळें भोग. तुझ्या

* " आहार-निद्रा-भय-मैथुनानि
सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् ।
ज्ञानं हि तेषामधिकं विशेषो:
ज्ञानेन हीना: पशुभि: समाना: " ॥

व्यथित मनाला कोण मलम लावील? तूं केलेल्या व्रणामुळें असंख्य जीव अद्याप रडताहेत. आह्मी पडावें म्हणून मार्गांत हा कुवा तूंच खोदलास व त्यांत तूंच पडलास हें फार योग्य झालें."

सज्जन व दुर्जन अशा दोघांनीं सर्वलोकांकरितां मार्गावर दोन कुवे खोदले होते. एकानें तृषितांनीं आपला कंठ आर्द्र करावा ह्मणून व दुसऱ्यानें सर्वांचीं त्यांत पडून मान मोडावी ह्मणून. कुकर्म करून सुफलेच्छा धरूं नको. लव्हाळ्याला द्राक्षें कधीं येणार नाहींत. तुला जव पेरून कापणीच्या वेळीं गहूं कांपण्यास मिळतील असें मी कधीं कबूल करणार नाहीं. जिवापाड श्रम करून निवडुंग पाळला ह्मणून कांहीं फळ प्राप्त होईल, असें कधींही ममजूं नको. कण्हेरीवर खारका येणार नाहींत. जसें बीज पेरशील तसेंच फळ मिळण्याची आशा ठेव.

गोष्ट एकुणीसावी.

एका भगवद्भक्तानें **हिज्जाजयूसफ्*** या जुलमी बादशाहास सलाम केला नाहीं, ह्मणून त्यानें जामदारकडे रागानें पाहून त्याचें चामडें सोलून त्याला रेतींत टाकण्यास सांगितलें. जुलमी मनुष्य बोलण्यांत हटला ह्मणजे त्रासानें व रागानें तोंड फिरवितो. शेषं कोपेन पूरयेत्.

---

*हिज्जाज बिनयूसफ या नांवाचा एक अत्यंत जुलमी बादशहा होऊन गेला. त्यानें एकदां रागाच्या सपाट्यांत ७०००० माणसांचीं डोकीं कापून आपल्यापुढें ढीग करविला होता!

बादशहाचें हें जुलुमाचें व मूर्खपणाचें बोलणें ऐकून, तो ईश्वरभक्त हंसला व रडला. हें पाहून त्या पाषाणहृदय मूर्खाला आश्चर्य वाटून त्यानें त्यास या हंस-ण्याचा व पुनः रडण्याचा अर्थ काय म्हणून विचारलें.

तो म्हणाला, "कालगतीमुळें रडलों, कारण मला चार अनाथ पोरें आहेत व जुलूम केलेला मरतो आहे जुलूम करून नव्हे, ही थोर ईशकृपा पाहून हंसलो."

यावर त्याच्या जवळच्या एका सरदारानें म्हटलें, "हे यशस्वी राजा, या म्हाताऱ्या भगवद्भक्तावर जुलूम करूं नको. कारण एका मोठ्या जनसमूहाचा त्याच्या-वर विश्वास व भरंवसा आहे तेव्हां अशा समूहासच जणूं एकदम ठार मारणें योग्य नव्हे. थोरपणा, क्षमा व उपकार करण्याची वृत्ती धर व याच्या लहान मुलां-विषयींही विचार कर. कारण दुसऱ्याच्या कुटुंबाचें वाईट इच्छिशील तर स्वकुटुंबाचा वैरी होशिल. तुझ्या त्रासाग्नीनें होरपळलेले इतके जीव असतांना न्यायाच्या दिवशीं तुझा शेवट गोड कसा होईल? तूं ज्याच्यावर जुलूम करशील तो निद्रिस्त नाहीं. त्याच्या अंतःकरणाच्या दुःखोद्गाराचें व प्रतिदिनीं निघणाऱ्या मानसिक धुराचें भय बाळग. विशुद्धपण संतप्त असा जीव दग्ध झालेल्या मनामुळें एका रात्रींत ईश्वरास प्रसन्न करून घेईल, याची तुला भीती नाहीं का?"

त्यानें असें त्रासानें व झिडकाऱ्यानें भाषण केलें कीं त्यामुळें हिज्जाजला पुढें बोलतांच येईना. सैतान दुर्वर्त-नामुळेंच सुफलभाक् झाला नाहीं नव्हेका? वाईट बीजा-पासून चांगलें फळ येत नाहीं. भांडताना कोणाचाही

रहस्यस्फोट करूं नको; न जाणों त्यांत कांहीं तुलाही खालीं पहावें लागण्याजोगें असेल. पोरांची मूठ खोल-ण्याची शक्ती अंगीं नसतां नरव्याघ्रास व्यर्थ वाग्बाण मारूं नको.

राजानें हा उपदेश न ऐकतां त्याचा प्राण घेतला. बलिष्ठापुढें कोण पळून जाऊं शकतो व अधिकाऱ्याच्या हुकुमांतून कोण सुटूं शकतो? त्या थोर सरदारास या विवंचनेमुळें झोंप आली नाहीं तेव्हां तो महात्मा त्याच्या स्वप्नांत येऊन म्हणाला, "त्याचा जुलूम मजवर एक क्षणमात्र राहिला; पण हें पांप त्याच्या माथीं अक्षय्य कायम राहिलें."

गोष्ट विसावी.

एक मनुष्य आपल्या मुलास उपदेश करीत होता कीं "विद्वानांचा उपदेश लक्ष्यांत ठेव. लहानांवर जुलूम करूं नको. कारण एखादेवेळीं तुजहूनही जबर-दस्त कोणी तुला भेटेल. वेड्या, तुलाही एखादे दिवशीं एखादा नरव्याघ्र फाडील याची भीती नाहींकां वाटत?"

लहानपणीं मी शक्तीमुळें उन्मत्त होतों व गरीब लोकांचीं मनें माझ्या हातून कष्टी होत असत. पण एकदां एका बलिष्ठाच्या हातून थप्पड खाल्ली, तेव्हांपासून पुनः मी कोणा दुर्बलावर जुलूम केला नाहीं.

बोधवचन.

खबरदार सुस्त निजूं नको. एखाद्या कुलपतीच्या डोळ्यावर झोंप असणें महत्पाप आहे. सर्व अनाथांवर

क्षमा कर व कालचक्राच्या जबरदस्तीला भी. अस्वार्थ-प्रेरित उपदेश कडू औषधाप्रमाणें खरा, परंतु, तो हटकून संकटरूप रोग दूर करणारा असतो.

याच अर्थाची गोष्ट, एकविसावी.

असें सांगतात कीं, एक **अरबस्थान**चा राजा नारू झाल्यामुळें सुईप्रमाणें क्षीण झाला होता. बुद्धिबळांतील राजा स्वस्थानीं श्रेष्ठ व प्रबल असला तरी, शह लागतो तेव्हां तो प्याद्यापेक्षांही हीनबल होतो, तशी त्याची स्थिती झाली होती.

हें पाहून त्याच्या सरदारांपैकीं एक सरदार राजास अभिवंदन करून ह्मणाला, "महाराजांची आयुष्याभिवृद्धि होवो— येथें एक महात्मा आहे—असा मनुष्य खऱ्या भक्तांतही दुर्मिळच—त्याच्याकडे कोणी गाऱ्हाणें नेऊन, त्याचे मनोरथ तत्काळ सिद्ध झाले नाहींत, असें आजवर कधीं झालें नाहीं. त्याला आपण बोलवा, ह्मणजे तो हा रोग ईश्वराची प्रार्थना करून बरा करील. या भूतलावर स्वर्गाहूनच कृपा होत असते."

तेव्हां राजाज्ञेनें सेवकाध्यक्षानें त्या शोभनपदास बोलावून आणलें. राजा त्यास ह्मणाला, "मजवर अनुग्रह कर, नारूमुळें माझी स्थिती सुईदोऱ्याप्रमाणें झाली आहे."

हें ऐकून त्या वयोभारानें नम्र झालेल्या, थोर तापसानें, सकोपमुद्रेनें ओरडून ह्मटलें, "ईश्वर, न्यायी राजावर कृपा करतो. तूं प्रजेवर दया कर ह्मणजे ईश्वर तुजवर कृपाळु होईल. तूं गांजलेले लोक, कुंड्यांत बंदीत टाकले आहेस, तोंवर, माझा आशीर्वाद तुला

कसा फलप्रद होईल ? तूं जगांत कोणावरही उपकार केला नाहींस, तेव्हां, संपत्तीपासून तुला तरी सौख्य कसें मिळेल ? प्रथम आपल्या पापाची क्षमा माग व नंतर सद्वृत्त महात्म्यांच्या आशीर्वादाची इच्छा कर. तूं गांजलेल्यांचे शाप तुजमागें लागले असतांना ते महात्म्यांचे आशीर्वाद कसे तुझे साहाय्यकारी होतील ?"

हें ऐकून तो रोगग्रस्त राजा, रागानें व लज्जेनें लाल व त्रस्त झाला. परंतु पुनः नीट विचार केल्यावर त्यास वाईट वाटून तो मनांत म्हणाला, "व्यर्थ दुःख व राग कां करावा ? हा म्हणतो तें खरें आहे."

नंतर त्यानें हुकूम देऊन सर्व कैदी एकदम सोडून दिले. त्या व्यवहारज्ञ महात्म्यानें दोन वेळ निमाज पढून हात उचलून प्रार्थना केली कीं, "हे जगत्प्रकाशका, तूं याला आज्ञाभंगाबद्दल शासन केलेंस, तसेंच आतां सद्वर्तनाबद्दल याची सुटका कर."

त्याची प्रार्थना ऐकून ईश्वरानें असा कांहीं चमत्कार केला कीं, तो राजा रोगग्रस्त पडला होता तो, उडी मारून उभा राहिला. पायांतील दोरी सुटलेल्या क्रीडा-मयूराप्रमाणें, तो जणूं उडूं पहात होता. त्याच्या आज्ञेनें सुवर्णमौक्तिकांची त्या तपस्व्याच्या सर्वांगावर वृष्टी झाली. —असत्यानें सत्य लोपविणें योग्य नव्हे.—त्या तपस्व्यानें तें सर्व झिटकारून म्हटलें, "तूं पुनः जुलूम करण्याच्या नादीं पडूं नको, नाहीं तर पुनः नारू डोकें वर करील."

एकवेळ पडला आहेस, तर पुनः पाय घसरूं नये म्हणून पायांखालीं पहा, कारण नेहमीं पडणारा सांवरतोच असें नाहीं, हें तथ्य **सादी**पासून ऐकून घे."

बोधवचन.

संसाराची चंचलता व या जगतांतील अशाश्वती.

मुला, हें जग सुस्थिर नाहीं व येथें निभाव होण्याची आशा नाहीं. **सुलेमान पैगंबर**–देव त्यांचें भलें करो–यांचें, सकाळीं अंतरिक्षांत इच्छागामी संचार करून सायंकाळीं परत येणारें विमान, किंवा सिंहासन देखील शेवटीं नाश पावलें, हें तुला ठाऊक नाहीं काय? शहाणपणानें व न्यायवृत्तीनें ज्यानें आयुष्य घालविलें तोच सुखी होय. परहितविवंचना करणाराच खरोखर सर्व लोकांमधून संपदारूप गेंद घेऊन जातो. ज्यांनीं केवळ द्रव्यसंचय करून शेवटीं सोडून न जातां त्याचा सद्व्यय केला, त्यांनींच त्याचा खरा उपभोग घेतला म्हणावयाचें.

गोष्ट बाविसावी.

कालचक्राचें भ्रमण व संपदेची चंचलता.

मिसरदेशांतील एक मोठा राजा आसन्नमरण झाला, तेव्हां त्याचें सुंदर मुख कलाहीन झालें व तें अस्तमानच्या अस्तास जाणाऱ्या सूर्याप्रमाणें फिकें पडलें. मोठमोठ्या वैद्यांनीं निरुपायानें हात टेंकून मनगटें चावून म्हटलें कीं, "वैद्यकांत मृत्यूपुढें औषध नाहीं. परमेश्वराची अक्षय्य राज्यलक्ष्मी व राज्य या शिवाय सर्व राज्य व वैभव घटतें."

त्याच्या आयुष्यरूप दिवसाचा सायंकाळ जवळ आला असतां, तो पुटपुटत होता कीं, "मिसर देशांत मजप्रमाणें कोणीही श्रेष्ठ नव्हता, परंतु मला 'कांहीं नाहीं' हेंच

शेवटीं प्राप्त झालें. मी हें राज्य जोडलें, पण त्याचें फळ खाल्लें नाहीं, व आतां त्यांतून मी एखाद्या दरिद्र्या-प्रमाणें प्रयाण करीत आहें.''

जो इतरांस देतो व स्वतः उपभोग घेतो, तोच सर्वमान्य व बुद्धिवान् होय. त्यानेंच मागें जग जोडलें. ह्मणून याविषयीं यत्न कर, ह्मणजे तें तुजजवळ, चिरकाळ राहील. जें तुला मागें सोडून जावें लागणार, तें तुला तापद व त्रासद होणार आहे.

त्या मृत्युशयनावर तो सरदार मरतांना आळेपिळे देऊन हात लांब अखूड करीत होता. तेव्हां जणूं काय, भयामुळें वाचा बंद झाल्यानें ''उपकार व कृपा करण्यांत हात लांब कर, ह्मणून एका हातानें, व, परपीडा व तृष्णा यांपासून हात आंखूड कर'' ह्मणून दुसऱ्या हातानें दाखवीत होता.

हल्लीं तुझा हात चालतो आहे तोंवर, सत्कर्में चालूं कर, कारण पुढें कबरेंतून हात थोडाच बाहेर काढूं शकतोस. हे चंद्र, सूर्य व तारे असेच प्रज्वलित राहतील, पण कबरेंतील दगडी उशीवरून तुला डोकें पुनः उचलतां येणार नाहीं.

गोष्ट तेविसावी.

कजल्यू अर्सला बादशहा व एक विद्वान ग्रहस्थ.

कजल अर्सला* बादशहाच्या ताब्यांत एक, फार

---

* मागें पान २६ वरील टीप पहा. या शब्दाचा मूळ अर्थ रक्तकेशी असा आहे.

मजबूत, व उंच अशा अल्वंद* पहाडाशीं टक्कर मारणारा, असा किल्ला होता. त्याला कशाचेंही भय किंवा जरूर नव्हती, व त्याचें वर्तन विलासिनींच्या कुटिल कुंतला प्रमाणें लहरीदार होतें. त्या किल्ल्यावर एक फार रमणीय बाग होता, व त्यांत पाचेच्या तबकांत सुंदर अंडे ठेवल्याप्रमाणें एक प्रासाद होता.

एकदां एक बहुप्रवासी, सुवृत्त, सत्य परीक्षक, कुशल, कलावान व लांबून आलेला, असा गृहस्थ, त्या बादशहाजवळ येऊन हंसून ह्मणाला "हा किल्ला फार चांगला आहे खरा, पण असावा तसा मजबूत वाटत नाहीं. कारण, प्राचीन मानी बादशहा ही यावर सत्ताकरून थोड्याच दिवसांत त्याला सोडून नाहीं का गेले? तसेंच पुढें ही तो इतर बादशाहांच्या हातीं जाईल तेव्हां या तुझ्या उपवनांतील कल्पवृक्षासारख्या वृक्षांचीं फळें ते नाहीं कां खाणार? यास्तव बापाच्या वेळचें व त्याच्या राज्याचें स्मरण कर व आपलें मन, काळजीरूप बंदांतून मुक्त कर. तुझ्या पित्याला काळानें असें कोपऱ्यांत बसविलें आहे कीं, त्याची आतां एका कवडीवरही सत्ता नाहीं."

सर्व वस्तु व मनुष्यमात्र यांपासून निराशा झाली ह्मणजे प्रत्येक मनुष्याला ईश्वर कृपेचा मात्र आधार राहतो.

गोष्ट चोविसावी.

कसा बादशहा व एक उन्मत्त साधू.

अजम देशांत एक दिसण्यांत उन्मत्त असा साधू

* अल्वंद नांवाचा एक पहाड, हमदान नांवाच्या देशांत मध्य एशियांत आहे. त्याची उंची आठ कोस असून त्याच्यापासून १२००० नद्या निघाल्या आहेत, अशी दंतकथा आहे.

जमशेद*चा मुलगा **कस्रा**, उर्फ **नोशेखान**, या बादशहास म्हणाला हे **जमशेद** बादशहाच्या वारसा, " हें राज्य व गादी **जमशेद**लाच कायम राहती, तर तुला तीं कोठून मिळती? "

प्रत्यक्ष **कारून**ची †(कुबेराची) संपत्ति मिळविलीस तरी ती राहणार नाहीं. कोणाम कांहीं देशील तेंच तुझ्या बरोबर येईल.

गोष्ट पंचविसावी.

अल्पारसला बादशहाच्या मरणाविषयीं एका दिसण्यांत वेड्या महात्म्याचे उद्गार.

अल्पारसलान्‡ बादशहानें आपला प्राण प्राणदात्यास अर्पण केला, तेव्हां त्याच्या मुलानें राजमुकुट शिरावर घातला, व त्याचें प्रेत तक्तावरून उचलून कबरींत ठेवलें. तेथें नीट बसण्या जोगी देखील—उंच व हवाशीर जागा नव्हती.

मुलास राज्यारूढ पाहून, एका दिसण्यांत वेड्या अशा महात्म्यानें म्हटलें, " वाः, एका बादशहानें कबरेंत डोकें ठेवलें न ठेवलें, तोंच त्याचा मुलगा राज्यरूप अश्वावर स्वार होतो."

कालचक्राचें भ्रमण असेंच आहे. तें फार तुच्छ, अविश्वसनीय व चंचल आहे. एक वृद्ध, मस्तक खालीं ठेवतो

---

* **जमशेद** हा इराणच्या **पिश्दादियन**, कुळांतील चौथा बादशहा याला **गुहाक**नें पदच्युत केलें होतें.

† (८ व्या पानावरील टीप पहा.)

‡ **अल्पारसलान्** याचा शब्दार्थ, भरलेल्या पोटाचा, घालेला असा आहे. या नांवाचा एक बादशहा होता, तो **कजल्ल् अर्सला**चा बाप.

तोंच दुसरा तरुण, संपत्तिरूप झुल्यावर झोंके खाऊं लागतो. आपलें मन, या अपरिचित पडावरूप जगावर गुंतवूं नको. त्याचीं स्थिती, नित्य नव्या दाराशीं गाणाऱ्या गवयाप्रमाणें आहे. नित्य नव्या जाराकडे पाहणाऱ्या विलासिनीवर खरें प्रेम कसें राहील? या वर्षीं गांव तुजकडे मक्त्यानें आहे, तोंवर भलेपणा घे. कारण या ईश्वरी ग्रामाचा धनी, पुढच्या वर्षीं, कोणी दुसराच होईल.

गोष्ट सव्विसावी.

गोरचा एक बादशहा व शेतकरी.

गोर* देशांतील एका जुलूमी राजानें एका शेतकऱ्याचें गाढव जबरीनें धरलें. तें फार ओझ्यामुळें व चाऱ्याविना दोन दिवसांत निशक्त होऊन मरण पावलें.

दैव, मूर्खाला वैभव देतें तेव्हां तें अनाथ व त्रस्त प्रजेच्या शिरावर फार भार घालतें.—त्या स्वयंमन्याचा महाल उंच असल्यास, तो तेथून खालच्या घरावर लघवी करतां व कचरा टाकतो.

तो अन्यायी राजा एकदां शिकारीस गेला व एका सावजाच्या मागें पळतां पळतां, त्याचें सैन्य दूर मागें राहून त्याची चुकामूक पडली, व त्यास रात्रीनें घेरलें. एकटा असल्यानें त्यास दिशा दिसेना व रस्ता सांपडेना, तेव्हां त्यानें निरुपायानें जवळच्या खेड्यांतच रात्र काढण्याचें ठरविलें.

---

* गोर या नांवाचा एक कंदाहार जवळ अफगाणिस्थानांत प्रदेश आहे.

इतक्यांत एक गाढव चांगलें सुदृढ, चपल, व लादलेलें येत होतें, त्यास एकानें काठीनें अशा जोरानें मारलें कीं, त्याचें हाडच तुटलें. तें पाहून राजानें रागावून झटलें "अरे ए मनुष्या, या मुक्या-जनावरावर तुझ्या जुलूमाची कमाल झाली. तूं बलिष्ठपणाचा गर्व करून गरिबांवर आपल्या शक्तीचा उपयोग करूं नको."

त्या नीचास हें बोलणें न रुचतां तो राजावर एकदम रागानें खेंकसून बोलला, "मीं हें काम अविचारानं केलें असें नाहीं. जा, तुलाच स्वकर्म समजत नाहीं. तुला मूर्खपणाचीं वाटणारीं पुष्कळ लोकांचीं कर्में नीट समजून घेशील तर, तीं वाईट नाहींत असें दिसून येईल."

राजाला त्याचें हें उत्तर अयोग्य वाटून तो म्हणाला, "या तुझ्या कृतींत काय चांगुपणा आहे तो मला सांग. शहाणपणाशीं तुझा अगदीं परिचय नाहींसें दिसतें. तूं केवळ उन्मत्तच नसून खरोखर वेडा आहेस."

तो हंसून म्हणाला, "हे मूर्ख तुर्का तोंड आटप. **खिजर*** पैगंबराची गोष्ट तूं ऐकिली नाहींस वाटतें. त्यानें

---

* **खिजर ख्वाजा खिजर** पैगंबर हें, हिंदूदंतकथेंतील **मार्कंडेया** प्रमाणें, महाप्रलयापर्यंत सदेह जिवंत राहणारे व भूतवर्तमान व भविष्यकाळच्या सर्व गोष्टी जाणणारे असे आहेत. ते नेहमीं समुद्रावर वास करितात. व संकटांत सांपडलेल्या लोकांस सहाय्य करितात. ते प्रत्येक मशीदींत गुरुवारीं निमाज पडण्यास गुप्तपणें येतात. **मूसा** पैगंबर उत्पन्न झाले तेव्हां, परमेश्वरानें त्यांना **खिजर** पैगंबराजवळ अद्भुतविद्या शिकण्या करितां जाण्यास आज्ञा केली. ते त्यांच्याजवळ गेले तेव्हां, **मूसाला** त्यांनीं, आपण जें जें काम करूं तें निमूटपणें

एका अनाथाची नाव फोडली, म्हणून त्याला कोणी वेडा म्हणत नाहींत."

राजा म्हणाला, "हे दुष्टा त्या पैगंबरानें तसें कां केलें. तें काय मला ठाऊक नाहीं ? त्या देशांत एक दुर्वृत्त राजा होता. त्याच्यामुळें प्रजेचीं मनें दुःखसागरांत मग्न झालीं होतीं. सर्व लोक त्याच्या कृतीमुळें ओरडत होते व सर्व देश त्याच्या जुलुमामुळें खवळलेल्या समुद्राप्रमाणें झाला होता. त्या दुष्टाच्या हातीं ती नाव न लागावी या हेतूनें त्यानें ती फोडली. एखादी चांगली वस्तू असून शत्रूच्या हातीं पडण्यापेक्षां ती मोडून तुजजवळ असलेली बरी."

तो कुशाग्र बुद्धी गांवढेकरी हंसून म्हणाला, "तर मग हे राजा सत्य सत्पक्षाकडेच आहे, कारण अन्यायी राजाचा जुलूम टाळण्याकरितांच मी याचा पाय मोडला, मूर्खपणानें नव्हे, कारण तो राजापुढें चांगला भारवाह दिसण्यापेक्षां, येथेंच लंगडा व कष्टी असलेला बरा. दुष्टाच्या

पाहावे त्याच्या विषयीं चर्चा करूं नये म्हणून सांगितलें होतें. एकदां त्यांनीं एका नदीवर एका म्हातारीची नाव चालत होती ती तोडली. व अणखी कांहीं वेडेपणाचीं कृत्यें केलीं. हें पाहून **मूसाला** फार आश्चर्य वाटून असें करण्याचें कारण विचारलें. तेव्हां त्यांनीं रागावून स्वस्थ बसून चमत्कार पाहण्यास सांगितलें. इतक्यांत त्या नदीवर एका शत्रूचें सैन्य येऊन पोंचलें. तेव्हां सर्व सशक्त नाववाल्यांनीं आपापल्या नावा लांबविल्या व त्या म्हातारीची एक तुटकी नाव मात्र तेथें राहिली. तिच्यांतून त्या शत्रूला पैलतीराला जाऊन नुकसान करितां आलें नाहीं. तेव्हां **मूसा**ची खात्री झाली कीं, यांनीं सगजूनच नाव तोडली होती. अशी मुसलमानी ग्रंथांत दंतकथा आहे.

हातीं न पडावी म्हणून ज्यानें नाव फोडली त्याला तूं कांहीं दोष देत नाहींसच.

"ज्याची आप्रलय दुष्कीर्तीच राहील अशा राजाला व त्याच्या त्या संपत्तीला धिक्कार असो. दुर्वृत्त मनुष्य खरोखर स्वतःवरच जुल्मूम करितो, गरीबांवर नव्हे, कारण, उद्यां त्या पापपुण्यानुरूप लज्जा व यश मिळणाऱ्या ईश-सभेंत, ते लोक त्याचा गळा व दाढी धरून त्याच्या मानेवर पापरूप भार ठेवतील व त्याला लज्जेनें तोंड वर करितां येणार नाहीं. अशा दुष्टाचा भार हल्लीं खगास वाहावा लागतो आहे खरा, पण त्या दिवशीं त्या खराचा भार तो कसा वाहील?

"ज्याच्या सुखामुळें दुसऱ्यांस दुःख होतें, अशाचा न्याय खरोखर त्या दिवशींच होईल. प्रजापीडनांतच ज्यास सुख, त्याची ती संपदा तेवढे पांच दिवसच राहते. ज्याच्यामुळें प्रजा दुःखांत निद्रा घेते, ती प्रजा त्या मुडदा-राबरोबरच न्यायाच्या दिवशीं खचित उठणार नाहीं."

राजा हें सर्व ऐकून स्वस्थ राहिला, व घोडा बांधून गाशावर डोकें ठेऊन निजला. रात्रभर नक्षत्रें मोजीत होता, कारण रागानें व काळजीनें त्याला झोंप आली नाहीं व पहाटे पक्ष्यांचे सुस्वर ऐकतांच तो पूर्व रात्रीचा सर्व त्रास विसरला.

त्याच्या स्वारांनीं रात्रभर भटकून, पहाटे राजाच्या घोड्याचे खूर ओळखून मैदानांत घोडे दवडले. तसेंच राजाच्या शोधास पायदळही दवडत होतें. सर्व लोकांनीं त्याला पाहतांच प्रणिपात केला, व फौजेमुळें जमीन खवळ-लेल्या समुद्राप्रमाणें दिसूं लागली.

सरदार लोक भोजनाची तयारी होतांच, भोजन उरकून राजसभा शोभिवंत करते झाले. सुस्वर गायन सुरू झालें. राजानें गाण्याचा स्वर ऐकिला तोंच त्याला रात्रीच्या त्या गांवढेकराचें स्मरण झालें, तेव्हां राजाज्ञेनें लोकांनीं त्याला शोधून आणून, घट्ट बांधून, निर्दयपणानें सिंहासनापुढें टाकलें व मांगानें त्याला मारण्याकरितां तीक्ष्ण तरवार खेंचली.

त्याला पळून जाण्याला कांहींच सवड दिसेना, तेव्हां तो अंतकाळ जाणून मनास येईल ते बोलूं लागला, व राजास म्हणाला, " मानेवर सुरी ठेवली म्हणजे लेखणी व जिव्हा अधिक तीव्र होतात, हें तूं जाणतोसच."

शत्रूपुढून पळण्यास अगदीं सवड नाहींसें जाणूनच जिवाचा धडा करून मनुष्य अखेरचा बाण भात्यांतून काढतो, तद्वत् तो निराशेनें शिर उचलून म्हणाला, "आज या कालरूप रात्रीं कोणालाही गांवांत झोंप येणें मुष्किल आहे. तुझ्या कारकिर्दीतील अवकृपेमुळें व तुझ्या जुलुमामुळें सर्व प्रजा कष्टी आहे. तुझ्या हातच्या जुलुमाविषयींमीच एकटा ओरडाओरड किंवा गाऱ्हाणें करितों असें नाहीं, तर सर्व देश तुझ्या नांवानें रडतो आहे. त्यां सर्वांतून मला एकट्यालाच वाटेल तर मार, पण मजपासूनच तुला विशेष वाईट वाटलें, याचें आश्चर्य आहे. तुझ्यांत शक्ती असेल तर, या जगांतील सर्व प्रजाच कां मारून टाकीत नाहींस?

माझ्या दुरुत्तराचा तुला राग आला असला तर न्यायरूपशास्त्रानें त्याचीं मुळें खोद. याला खरा उपाय, जुलूम सोडून देणें हाच होय, मजसारख्या दीन निरपराध्याला

मारणें हा नव्हे. तू अन्यायानें वागतो आहेस, त्या अर्थीं, देशोदेशीं, तुझें सुयश होईल अशी आशा ठेऊं नको. गांजलेले लोक निजले असतां, तुझ्या डोळ्यांस झोंप तरी कशी येते? ज्या राजाची केवळ समक्ष राजसभेंत स्तुती होते व ज्याची पाठीमागें सर्व स्त्रीपुरुष निंदा करितात, त्याची ती केवळ राजसभेंतील स्तुती, काय कामाची?"

हें बोलणें ऐकतांच, त्या जुलमी राजाचा अज्ञानमद नाहींसा होऊन, तो शुद्धीवर आला, व ज्या गावांत, ईश्वरानें त्याला असा सन्मार्ग दाखविला, तोच गांव त्यानें त्या गांवढेकऱ्यास इनाम दिला.

थोर लोकांपासून सुविचार व सद्वर्तन शीक, छिद्रान्वेषी व जुलुमी लोकांपासून नव्हे. शत्रूपासून आपल्या स्वभावाविषयीं वर्णन ऐक,* कारण, तुझीं सर्व कृत्यें तुझ्या मित्रांच्या दृष्टीनें चांगलींच असतात. निंदकच तुझे खरे मित्र होत, स्तुतिपाठक नव्हेत. कडू तोंड करणाऱ्यांकडूनच खरा उपदेश होतो, कारण, मित्र खुषमिजाजी व मिळ्या स्वभावाचे असतात. अशांपेक्षां तुला कोणी उपदेश न केलेलाच बरा. तूं शहाणा असशील तर तुला नुसता इषारा पुष्कळ आहे.

---

*"निंदकाचें घर असावें शेजारीं." तुकाराम.

गोष्ट सत्ताविसावी.

खलीफा मामू व एक दासी.

मामू* बादशहा गादीवर आला, तेव्हां त्यानें एक चंद्रमुखी दासी विकत घेतली. तिचें मुख सूर्याप्रमाणें व शरीर कुसुमाप्रमाणें असून, शहाणपणांत ती मोठ्या विद्वानांशीं डावपेंच करण्याजोगी होती. ती, विषयी-जनांचे पंचप्राण व्याकुळ करणारी होती. तिचीं नखें उंनाबी किंवा लाल रंगाचीं असून, तिच्या भिवयांचा रंग जणूं, सूर्यावर इंद्रधनुष्य लागल्याप्रमाणें व तापसांनांही मोहून टाकणारा असा होता.

त्या अप्सरेप्रमाणें सुंदर व मोहक कामिनीस तो रात्रीं गाढ आलिंगन देऊं लागला, परंतु, तिनें आपलें शरीर त्याच्या मिठींत जाऊं दिलें नाहीं; तेव्हां त्याला भयंकर क्रोधाग्नीनें घेरलें व **मिथुन**† राशीप्रमाणें तिचें मस्तक द्विभंग करण्याची त्यानें इच्छा केली.

ती ह्मणाली "हें माझें शिर तीक्ष्ण तरवारीनें तोड परंतु मला तुझा संग नको."

"तो ह्मणाला तुझ्या मनाला इतका त्रास कशामुळें आला? तुला माझ्यांत कोणची वाईट गोष्ट दिसली?"

---

*खलीफा **मामू** हा **हारून अल् रशीद** बादशहाचा पुत्र, **अब्बासी** घराण्यांतील साहवा खलीफा, सुमारें हिजरी सं० २०० त झाला होता.

†**मिथुन**राशीचें चित्र, मुसलमानी ग्रंथांत, एकास एक संलग्न अशा दोन मुलांचें काढलेलें आहे. तीं दोनमुलें जशीं निरनिराळीं दिसतात तसेंच तिचें मस्तक फोडून त्याचे दोन तुकडे एकासएक लागला असें करण्याचा बादशहानें विचार केला.

तिनें ह्मटलें, "तूं माझें डोकें फोडलेंस किंवा प्राण घेतलास तरी कबूल, पण तुझ्या तोंडाच्या दुर्गंधीमुळें माझें मन विटलें आहे. युद्धांत तीर, तशीच तीक्ष्ण तरवार तत्काळ प्राण घेतात, पण तुझ्या तोंडाची दुर्गंधी, प्रतिक्षणीं माझा प्राण घेईल."

हें ऐकून त्या सुशील बादशहास राग आला खरा, पण त्यानें अंतर्मुख होऊन विचार केला तेव्हां त्याला वाईट वाटलें, व त्यानें औषधोपचारानें आपलें मुख पुष्पकलिकेप्रमाणें सुगंधयुक्त करून घेतलें, व त्या अप्सरेला आपली मित्र व सहचर करून, "इनें माझा दोष मला कळविला तेव्हां हीच माझा खरा मित्र होय." असें म्हटलें.

तुझ्या रस्त्यांत अमुक कांटा आहे, असें सांगेल, तोच माझ्या मतें, तुझा खरा हितेच्छू आहे. वाट चुकलेल्याला, सुमार्गानें जात आहेस ह्मणणें, हा जुलुमाचा कळस झाला. तुझे दोष तुला कोणी सांगत नाहीं तोंवर, मूर्खपणानें तूं त्यांस गुणच मानतोस. ढाळक देणें योग्य असेल त्याला मध व साखर हितावह आहे, असें सांगू नको.

औषधविक्यानें एकाला काय चांगली गोष्ट सांगितली कीं, "तुला गुण हवा असेल तर तीक्ष्ण व कडू औषध घे." हुषारी व विद्वत्तारूप चाळणींत चाळलेला व भक्तिरूप मधांत घोळलेला, असाच उपदेश चांगला.

गोष्ट अठ्ठाविसावी.

सत्यवक्ता फकीर व राजा.

एका मोठ्या राजाचें मन एका सज्जन फकीराशीं

विटलें, परंतु, तो सत्यच बोलला असल्यामुळें, रागानें, त्यास उग्र दंड करण्यांत तो निरुपाय झाला होता. तरी त्यानें त्याला मशीदींतून कारागृहांत पाठविलें.—राजाशीं बरोबरीनें सामना कोण करूं शकतो?

फकीराच्या एका मित्रानें त्यास हळूच झटलें, "तूं असें बोललास हें नीट केलें नाहींस." त्यावर तो झणाला, "ईश्वरी आज्ञा पाळणें हेंच भजन होय, व तशांत मला कारागृहाची मुळींच भीती नाहीं, कारण हा संसार क्षणिक आहे."

हें बोलणें पुनः राजाच्या कानीं गेलें, तेव्हां तो हंसून झणाला, "तो मूर्ख व्यर्थ घमेंडी आहे. त्याला त्या कारागृहांतच मरावें लागेल, हें तो जाणत नाहीं."

हा निरोप एका सेवकानें फकीराकडे नेला. तेव्हां तो झणाला, "सेवका, तू राजास सांगकीं, हें मुळीं जगच एका क्षणमात्राहून अधिक नाहीं व फकीराला सुखदुःख कांहीं नाहीं. तूं सहाय्य केल्याचें मला सुख नाहीं व ढोकें मारल्याचा विषाद नाहीं. तुजजवळ सैन्य, सत्ता, संपत्ती, व मला, मुलेंबाळें, दारिद्र्य, व कष्ट असलें, तरी आपण मृत्यूच्या द्वारीं जाऊं, तेव्हां सातांदिवसांच्या आंत दोघेही बरोबर होऊं. या पांच दिवस राहणाऱ्या संपत्तींत मन गुंतवून शरीरास व्यर्थ लालस्वरूप अग्नीनें भाजूं नको.

"पूर्वीच्या राजेलोकांनीं तुजहून अधिक संपत्ती मिळवून ही अन्यायानें पृथ्वीपीडन केलें नाहीं. तुझें नांव निघतांच लोक प्रशंसा करतील, व मेल्यावर तुझ्या कचेरेवर, छीः थूः करणार नाहींत, असा वांच. कुमार्गानें

व अन्यायानें वागूं नको, नाहींतर, 'या नीचाचा सत्य-नाश होवो,' असें सर्व लोक ह्मणतील. कोणा उन्मत्तानें प्रजेस त्रास दिला तरी तो शेवटीं कबरेंतील मातीआड होत नाहीं कां?"

हें ऐकून तो राजा रागानें लाल व दुर्मुखलेला होऊन त्यानें त्याची जीभ कापण्याबद्दल आज्ञा केली. तेव्हां तो सदसज्ज्ञ फकीर ह्मणाला, "या तुझ्या आज्ञेची ही मला भीती नाहीं. जिव्हाछेदनाचें मला दुःख नाहीं. कारण तो अकथितज्ञ परमेश्वर अव्यक्त गोष्टी ही जाणतो, हें मला ठाऊक आहे. मी फार दारिद्र्य व जुलूम भोगतों आहें तरी माझा शेवट गोड होणार आहे. तेव्हां मला दुःख कशाचें? माझ्या आयुष्याचा अंत चांगला होणार, तेव्हां मला मारल्यानें तुला तरी लग्नाप्रमाणें आनंद कां न होवो?"

गोष्ट एकुणतिसावी.

गरीब मच्छ.

एक दरिद्री व दुर्दैवी असा मच्छ होता, त्याला सकाळीं किंवा संध्याकाळीं पोटभर खाण्यास मिळत नव्हतें. पोटाच्या आगीमुळें तो पाठीवर मातीचा भार वहात होता. कारण, केवळ शक्तीनेंच खाण्यास थोडेंच मिळूं शकतें. सर्वदां विपरीत काळामुळें त्याचें मन व शरीर जळत होतें.

तो कधीं त्रासद अशा संसारीं लोकांशीं भांडे, व कधीं पराङ्मुख दैवामुळें दुर्मुखलेला असे. कधीं, सुखी लोकांचे मनोहर विलास पाहून, त्याच्या घशांतून पाणी उतरतांना कडू होई, व कधीं, कष्टकारक श्रमामुळें व

कामामुळें, त्रासून, 'यापेक्षां कठिणतर निर्वाहाचा, कोणास तरी प्रसंग पडतो कां?' असें ह्मणून रडे. 'लोक मधुपान करून कोमडीं, व बकरीं, खातात व इकडे माझ्या भाकरीस भाजीचें तोंड दृष्टीस पडत नाहीं. मी उघडा नागडा व मांजरालादेखील मऊ केंसदार चामडें असावें, हा न्याय नव्हे.' असें ह्मणत असे.

इश्वरी नेमानेमाविषयीं दुःख करून तो ह्मणे कीं, 'माझ्या हातीं जर एखादा खजीना आला तर, कांहीं काळ तरी मी आपले मनोरथ चालवीन व स्वतः वरून ही श्रमधूळ झाडून टाकीन.'

एक दिवस जमीन खोदतांना त्याला एक जुनें हनुवटीचें हाडुक सांपडलें. त्याच्यांत, लढींतून मोत्याचे दाणेच जणों, असे सर्व दांत विखरून मातींत मिळाले होते. त्या मूकमुखानें, त्यास उपदेश करून, एक गुह्य सांगितलें कीं, "हे सद्गृहस्था, जगांतील ऐहिक गोष्टी न प्राप्त झाल्याचा व्यर्थ खेद न करितां संतोषच मान, कारण, नेहमीं साखर खाल्लेल्या व काळजांतील रक्त प्यालेल्या अशा या मुखाची, ही अशी स्थिती झाली नाहींका? कालचक्रभ्रमणानें कष्टी होऊं नको, कारण, तें बहुशः उलटें फिरतें."

हें ऐकतांच त्याच्या हलक्या मनानें उलट खाल्ली व त्यानें दारिद्र्याविषयीं विषाद दूर केला. व ह्मटलें, "हे हीनबुद्धी, तुच्छ उपायाच्या, व मूर्ख गृहस्था, चिंताभार टाकून दे व स्वतः करितांच श्रम करूं नको. सेवक शिरावर भार वाहतो व सरदार अहंपणानें आकाशाहून ही उंच शिर करतो, तथापि कालगतीनें दोघेही मरणोन्मुख

होतात तेव्हां या गोष्टीचा विचार दोघांच्याही मनांतून जातो."

सुखदुःख स्थिर नाहीं व सत्क्रिया आणि सुयश यांशिवाय कांहीं मागें रहात नाहीं. एक दान मात्र कायम राहतें, मुकुट किंवा सिंहासन नव्हे, ह्मणून हे सुदैवी गृहस्था, दान कर, तेंच मागें राहील. राज्य, थोरवी व संपत्ती, यांवर भरंवसा करूं नको, कारण तीं पूर्वी होतीं व तुझ्या मागें ही राहणारच आहेत. तूं मरणार आहेस, करितां द्रव्याचा पाऊस पाड.

सादी जवळ द्रव्य नाहीं या करितां तो बोधवचन रूप मोत्याचांच पाऊस पाडीत आहे.

गोष्ट तिसावी.

मूर्खापुढें शहाण्यांनीं मौन धरण्याचे फायदे.

असें सांगतात कीं, एका जुलमी राजाची एका, देशावर सत्ता होती. त्याच्या कारकीर्दींत प्रजेस दिवस, रात्रीप्रमाणें भासत व रात्रीं, त्याच्या भीतीनें त्यांस झोंप घेणें दुःखद होत असे. दिवसभर, त्याच्या पासून सुजनांस संकटें प्राप्त होत, व रात्रीं, सुशील लोकांचे हात त्याच्या नाशाविषयीं प्रार्थना करण्यांत ईश्वराकडे वळलेले असत.

त्यांपैकीं कांहीं लोकांनीं एका तत्कालीन महात्म्याकडे जाऊन, राजाच्या जुलुमाविषयीं गाऱ्हाणें करून म्हटलें, "हे शहाण्या, चतुर व वृद्ध महात्म्या, या दुष्टाला ईश्वरास भिण्यास सांग." तो म्हणाला "मला, ईश्वरसाक्ष

फार वाईट वाटतें कारण, प्रत्येक मनुष्य कांहीं ईश्वरी आज्ञेच्या योग्य नाहीं. सत्यपराङ्मुखापुढें सत्य भाषण करणें अगदीं योग्य नाहीं."

हे सुबुद्धी (अबुबकर) बादशहा, खरोखर, सत्य, फक्त ईश्वरपरायण मनुष्याजवळच, बोलणें योग्य आहे. मी मूर्खापुढें पांडित्य करीत नाहीं, कारण तसें करणें, ऊषर नमीनींत बीज बुडविल्या प्रमाणें होईल. माझा उपदेश त्याच्यांत न ठसल्यास, तो माझा वैरी होऊन मला, जिवापाड त्रास देईल व स्वतः ही त्रासेल.

हे बादशहा, तुला सत्यमार्गाची संवयच आहे व यामुळेंच सत्यवाद्यांचें मन स्वस्थ आहे. हे सुदैवी राजा, नक्षी, स्वभावतःच मेणांत चांगली उठते, कठीण दगडांत नव्हे. जुलमी मनुष्यास मजपासून व त्याच्या पासून मला, त्रास झाला तर नवल नाहीं, कारण मी सत्यवादी व तो माझ्या विरुद्ध आहे.

तूंही न्याय व इन्साफांत प्रजेचा संरक्षक आहेस. ईश्वरी प्रसाद तुझें रक्षण करणारा होवो. मी तुझी स्तुती केवळ अंदाजानें करतों असें नाहीं, तर खरोखरच ईश्वरानें तुला असा योग्य, व मला तुझा स्तुतिपाठक निर्माण केलें आहे. तुला ईश्वरानें सुकर्मी उत्पन्न करून आपल्या सेवेस लावलें आहे. इतरांप्रमाणें सेवनपराङ्-मुख ठेविलें नाहीं.

सर्व लोक प्रयत्नरूप मैदानांत घोडे दवडीत आहेत, परंतु कृपेचा चेंडू प्रत्येकास प्राप्त होतो असें नाहीं. तूं प्रयत्नानें स्वर्ग मिळविलास असें नाहीं, तर इश्वरानेंच तुझ्यांत स्वर्गींचे गुण भरून ठेवले आहेत. तुझें मन

सुप्रसन्न, काळ सुखाचा, वैभव स्थिर, योग्यता उन्नत, आयुष्य सुखाचें, मरण सुकालिक, प्रार्थना मान्य व आशीर्वाद फलप्रद, असे होवोत.

बोधवचन.

युक्तीनें काम होईल तोंवर युद्ध न करण्याविषयीं.

सर्व उपायांची सिद्धता झाल्याशिवाय, शत्रूशीं लढण्यापेक्षां, त्याची खबरदारी ठेवणें बरें. शत्रूस स्वसामर्थ्यानें जिंकतां येणार नाहीं तोंवर, युद्धाचें कारण, द्रव्य वगैरेनीं दूर करणें बरें.

शत्रूपासून नुकसान होण्याची भीती असेल तर, उपकाररूप मण्यानें त्याचें मुख बांध. शत्रूच्या कंटकित भागावर द्रव्य पसर, कारण, सामदामानें तीक्ष्ण दंत सहज कुंद करतां येतात.

या जगाचा युक्तीनें व खुषामतीनें उपभोग घेतला पाहिजे. शत्रूच्या हातांस न चावतां येईल, तेव्हां त्यांचें चुंबन केलें पाहिजे. **अस्पंदयारा*** सारख्यालाही ज्याच्या तावडींतून सुटतां आलें नाहीं, असा **रुस्तुम** युक्तीनेंच कैद झाला.

प्रथम शत्रूला स्वस्थपणें गांठून त्याचें चामडें सोल, व पुढें त्याच्यावर कृपाकरून त्याला आपलामित्रकर. आप

---

* **अस्पंदयार** नांवाचा एक शूर मल्लविद्यानिपुण राजपुत्र होता. त्याच्या बापाचें नांव शहा **गुष्तास्प** व आजाचें नांव **लेहरास्प** असें होतें. त्याचें शरीर कांशाचें होतें. **रुस्तुम**चें व ह्याचें घोर युद्ध झालें. शेवटीं त्याच्यावर **रुस्तुम**चा कांहीं डाव चालेना तेव्हां **रुस्तुम**नें युक्तीनें तीरानें त्याचे डाळे फोडले व नंतर त्याचा पाडाव केला, असें **शाहानाम्या**त लिहिलें आहे.

ल्याहून कनिष्ठांशीं लढण्यांत बेसावध राहूंनको, कारण 'थेंबी थेंबी तळें सांचे,' ही म्हण अनुभवसिद्ध आहे.

होईल तेथवर प्रबळ शत्रूचा तिरस्कार करूं नको कारण, तो तुझा मित्र असलेला बरा. ज्याचे, मित्रापेक्षां शत्रू अधिक असतील त्याचे शत्रू, प्रफुल्लित व मित्र कष्टी होतात. स्वतःहून श्रेष्ठ, अशा शिपायांशीं लढूं-नको, कारण, नस्तरावर अंगुली मारणें योग्य नव्हे. तूं बलिष्ठ असलास तरी दुर्बलावर जुलूम करणें, पुरुषार्थ नव्हे.

तूं हत्तीप्रमाणें बलाढ्य किंवा वाघाप्रमाणें शूर असलास तरी माझ्यामतें युद्धापेक्षां साम बरा. सर्व उपाय हर-ल्यावर शस्त्रास हात घालणें न्याय होय. शत्रू साम इच्छील तर आपलें शिर, व युद्ध इच्छील तर आपल्या घोड्याचा लगाम, मागें फिरवूं नको कारण, तो युद्धास सिद्ध झालातर तुला हजार तऱ्हेची भीति राहील.

तोच युद्धार्थ रिकाबींत प्रथम पाय ठेवील तर त्याब-द्दल, न्यायाच्या दिवशीं, ईश्वर तुजजवळ हिशोब माग-णार नाहीं. तंटा सुरू झाल्यावर तूंही युद्धास तयार रहा. कारण, मग शत्रूवर कृपा करणें पाप, होय त्याच्याशीं वेडेपणानें सामोपचाराचें भाषण केलें तर त्याचा गर्व व ढोंग जास्ती वाढतील. शत्रू तुझ्या द्वारीं शरण आल्यास, मनांतून राग व द्वेष सोडून दे. तो आश्रय इच्छील तर त्यावर कृपा कर, पण त्याच्या लबाडीविषयीं सावध रहा.

पुरातन वृद्धलोकांच्या युक्तींचा अव्हेर करूं नको, कारण वयातीत मनुष्य कामें केलेला असतो. शत्रूच्या धातु-

मय तटाचा पाया, तरुण व वृद्ध, शस्त्र व बुद्धी बलानें खोदतात. युद्धांत विचार कर, घाई करूं नको, कारण दोघांतून कोण विजयी होईल, तें तुला काय ठाऊक? दोन्हीं सैन्यें आपसांत मिळून गेलीं तर एकटाच व्यर्थ, प्रिय असे प्राण देऊं नको. एकीकडे तटस्थ असलास तर निघून जाण्याचा यत्न कर व युद्धाच्या गर्दींत असलास तर शत्रूचा वेष घे.

तुजजवळ हजार व शत्रूचे दोनच शिपाई असले तरी रात्र झाल्यावर शत्रूच्या हद्दीत राहू नका. रात्रीच्या वेळीं, दबाधरून बसलेले पन्नास स्वार पांचशें स्वारांस भारी असतात.

रात्रीं मार्ग चालूं इच्छिशील तर प्रथम छापा पडण्याजोग्या जागेचा बंदोबस्त कर. दिवसभर चाललेल्या सैन्यास दुसऱ्यावर हल्ला करण्याची शक्ती रहात नाहीं. तूं स्वतः विश्रांती घेऊन, शत्रूच्या थकलेल्या सैन्यावर हल्ला कर, कारण, मूर्ख असेल तोच आपल्या पायावर धोंडा मारून घेतो. शत्रूस जिंकतांच स्वस्थ होऊन निशाणें रोवूं नको. कारण, कदाचित् त्याचें सैन्य पुनः जमा होईल.

लुटीकरितां शत्रूच्या मागें फार दूर जाऊं नको, नाहींतर आपल्या पक्षापासून दूर पडशील, व मेघाची, हवा सुटून गती होते, तशी तुझी रणांगणांत स्थिती होऊन, शत्रू भाले व तरवारी घेऊन तुला घेरतील. लुटीकरितां सैन्य फार लांब जाऊं देऊं नये नाहींतर मागें बादशहाजवळ मदतीला कोणी राहणार नाहीं. सैन्य

युद्धाच्या गर्दीत काम देत असण्यापेक्षां राजाच्या रक्षणा-करितां असलेलें बरें.

बोधवचन.

शूर शिपायाची शांततेच्या वेळीं बडेजाव करणें.

ज्या शूरानें एकदां शौर्य दाखविलें त्याची योग्यता वाढविली पाहिजे, तर तो पुनः नोकरींत मरण्याविषयीं मनापासून झटेल व प्रत्यक्ष **याजूजांशीं** किंवा राक्ष-सांशीं लढण्यासही तो भिणार नाहीं.

शांततेच्या वेळीं शिपायास संतुष्ट राख ह्मणजे तो कठीण प्रसंगी कामीं येईल. शांततेच्या वेळीं शूर योद्ध्यांची बडेजाव कर, शत्रू चढाई करून रणदुंदुभी वाजवील तेव्हां नव्हे.

ज्या शिपायाचें, सामानाच्या अभावामुळें संसारकृत्य होत नाहीं, तो युद्धांत प्राण देण्याचें कां मनांत आणील? शत्रूपासून, राज्यसीमेचें सैन्यद्वारें, व सैन्याचें द्रव्यद्वारें, रक्षण कर. सैन्य संतुष्ट व तृप्त असेल तरच शत्रूवर राजाचा डाव चालतो. शिपाई आपल्या शिराचा ऐवज खातो, तेव्हां त्याला कष्ट पडणें न्याय्य नव्हे. शिपायास द्रव्य देण्यांत कसर पडली कीं त्यालाही तरवारीवर हात नेण्यास संकोच वाटतो. शिपायास उपासमारानें रडावें लागत असलें तर तो रणांगणीं काय शौर्य दाखवील?

बोधवचन.

कार्यदर्शी व अनुभविक लोकांच्या सल्लेनें काम करण्याविषयीं.

शत्रूशीं लढण्याकरितां शूराची व व्याघ्राशीं लढण्याकरितां नरव्याघ्राची बडेजाव केली पाहिजे. अनुभविक मनुष्याच्या विचारानें काम कर. कारण, वृद्ध वृक पुरा शिकारी असतो. मोठ्या शूर बहादर तरुणास वृद्ध शृगालाचें कपट कळत नाहीं. अनुभविक मनुष्य हुपार असतो. कारण, त्यानें बहुत शीतोष्ण सोसलेलें असतें.

सुशिक्षित व दैववान् तरुण लोक वृद्धोपदेशाचा अव्हेर करीत नाहींत. राज्य समृद्ध हवें असेल तर, नवशिक्याला मोठें काम सांगूं नको. अनेक युद्धें पाहिलेल्या शिपायांवांचून इतरांस बिनीवर ठेवूं नको, कारण शिकारी कुत्रा वाघालाही भीत नाहीं, परंतु युद्ध न पाहिलेला वाघ कोल्ह्यापुढूनही पळतो.

मुलगा शिकारींत प्रवीण असला तर, तो युद्धास भीत नाहीं. कुस्ती, शिकार, निशाण मारणें व गेंद खेळणें इत्यादिकांनीं योद्धापुरुष शूर व योग्य होतो. ऐषआराम व लाड यांत पोसलेला मनुष्य युद्धप्रसंग येतांच घाबरतो. खोगरावर बसविण्यास दोन माणसें पाहिजेत, अशा मनुष्याला एखादें पोरही खालीं पाडील. लढाईंत पाठ दाखविणारा, शत्रूच्या हातून न मेला तर तूं त्यास मार, कारण लढाईंत स्त्रियांप्रमाणें तोंड फिरविणाऱ्या तरवारबाहादुरापेक्षां, पंढ बरा.

गोष्ट एकतिसावी.

गुर्गीन मल्लाचा मुलास उपदेश.

तीरकमान व भाता बांधते वेळीं गुर्गीन* मल्ल आपल्या मुलास काय चांगलें बोलला कीं, "तूं स्त्रियांप्रमाणें उडी मारून पळून जाणार असलास तर व्यर्थ रणांत जाऊन खऱ्या शूरांची अब्रू घालवूं नको."

लढाईंत पाठ दाखविणारा स्वार स्वतःचेंच नव्हे तर मोठमोठ्या नामी लोकांचेंही नांव बुडवितो. युद्धांत परस्पर चढाओढीनें, व शौर्यानें लढणारे दोन मित्र असल्याशिवाय, खरें शौर्य दृष्टीस पडत नाहीं. सजातीय, एकजागीं जेवणारे व बोलणारे लोक असतात तेच रणांत जीवापाड श्रम करितात, कारण, त्यांच्यांतून एखादा शत्रूच्या हातीं सांपडल्यास, दुसऱ्याला बाणवृष्टींतून पळून जाण्यांत फार शरम वाटते. मित्रांनींचं मैत्री सोडली तर मागें पाय घेणेंच शहाणपणा समज.

बोधवचन.

कलावानांचा प्रतिपाळ.

हे दीनस्तुत राजा, शक्तिवान व युक्तिवान यां दोघांचेंही पाळण कर. हुषार व शूर लोक पदरीं बाळगणारा राजा, प्रसिद्ध व थोर थोर राजापेक्षां प्रथित-यश होतो व संपदेचा गेंद घेऊन जातो.

लेखणी व तरवार या दोहोंचीही योग्यता न जाणणारा मेला, तरी त्याच्याबद्दल खेद करूं नको. लेखणी व तरवार

---

* **गुर्गीन** नांवाचा इराण देशांत एक विख्यात मल्ल होऊन गेला.

चालविणाऱ्याचें पोषण कर, गवयाचें नव्हे, कारण स्त्रियांच्या हातून शौर्य होत नाहीं.

शत्रू युद्धसामुग्री सिद्ध करण्यांत व तूं मद्य पिऊन मोरचंगाचा सूर ऐकण्यांत गुंग राहणें, पुरुषार्थ नव्हे. पुष्कळ संपत्तिमान् लोक खेळण्यास बसले असतां, डावाबरोबरच सर्वस्व हरले आहेत.

बोधवचन.

शत्रूच्या सामाच्या भाषणांविषयींसुद्धां जपून असणें, याविषयीं.

शत्रूशीं युद्ध करण्यांत भी, असें मी म्हणत नाहीं, परंतु, या पेक्षां, त्याच्या सामाच्या भाषणाला अधिक भी. पुष्कळांनीं दिवसा सामपर वचनें सांगून सायंकाळ होतांच सुप्तांवर सैन्य सोडिलें आहे.

शूर योद्धे सशस्त्रकवच निजतात कारण, अंथरुणें स्त्रियां करितांच योग्य होत. घरांत जशा बायका नागव्या उघड्या निजतात, तसे शूर योद्धे तंबूंत निजत नाहींत.

युद्धांची तयारी गुप्तपणें केली पाहिजे कारण, शत्रूहा प्रथम गुप्तपणेंच चढाई करून येतो. प्रसंग समजून सिद्धता करून राहणारे लोकच सिद्ध होत. राजधानीचा खरा धातुमय कोट सैन्यच होय.

बोधवचन.

राजेलोकांनीं शत्रूंविषयीं निर्धोर न राहण्याविषयीं.

दोन दुर्बल शत्रूंमध्यें, निर्धोर राहणें शहाणपणाचें नव्हे,

कारण ते दोघेही मिळाले तर आपण निर्बल व ते बलाढ्य होतील. याकरितां एकाला कसें तरी सुस्त करून गुंतवून, दुसऱ्याचें मस्तक फोडून पार कर.

बलाढ्य शत्रू चढाई करून येईल तर, युक्तिरूप तरवारीनें त्याचा रक्तपात कर. त्याच्या शत्रूंशीं स्नेह कर, म्हणजे त्याच्या कपाळीं कारागृहरूप वस्त्रच बांधलें जाईल. शत्रुसैन्यांत फूट होऊं लागली कीं, तू तरवार खुशाल म्यानांत घाल, कारण, लांडगे अपसांत भांडून नुकसान करून घेऊं लागले म्हणजे, मेंढरें निर्भय राहतात. शत्रू शत्रूंशीं झुंजतील तेव्हां स्वमित्रांसह स्वस्थचित्तानें रहा.

बोधवचन.

परिणामावर लक्ष देऊन शत्रूंशीं गोड राहणें.

युद्धाकरितां शस्त्रास्त्रें सज्ज करशील तेव्हां सामोपाय ही गुप्तपणें पाहून ठेव. कारण सैन्यतापद व कवचभेदक, शूर व बलाढ्य योद्धे देखील, बाह्यतः युद्धोद्युक्त असून गुप्तपणें सामोपाय धुंडीत असतात.

शत्रुपक्षीय लोकांच्या मनांचा गुप्तपणें तपास कर, म्हणजे त्यांतील कोणी कदाचित् कंदुकवत् त्वत्पदीं लीन होईल. शत्रूचा कोणी सरदार हातीं आला तर त्याला मारण्यांत अवकाश करावा, कारण, कदाचित् आपलाही कोणी सरदार शत्रूनें धरला असेल. तूं त्या हतभाग्यास मारलेंस, तर तुजकडील कैद झालेला कोणीही तुझ्या पुनः दृष्टीस पडणार नाहीं.

बंदीवानांवर जुलूम करणाऱ्यास, कालचक्र, स्वतःसही

कदाचित् बंदीवान् करील ही भीती नसते. स्वतः एकवार कैदेंत पडलेला मनुष्य इतर बंदीवानांस सहाय करतो. शत्रूकडील कोणी सरदार तुला शरण येईल, व त्याच्याशीं तू नीट वागशील, तर तो इतरांसही तुजकडे आणील.

गुप्तपणें दहांस वश करून घेणें, शंभरांस रात्रीं छापा घालून मारण्यापेक्षां चांगलें आहे.

बोधवचन.

शरण आलेल्या शत्रूंशीं सुद्धां जपून वागण्याविषयीं.

शत्रू स्वेच्छेनें, मित्रत्वानें शरण आला तरी त्याच्या कपटाविषयीं कधीं निर्धोर होऊं नको कारण, त्याला पूर्व योग्यतेचें व कुळाचें स्मरण झालें म्हणजे, तुझ्या मत्सरानें त्याचें मन कष्टी होईल. शत्रूच्या मिष्टभाषणास जप, कारण, त्याच्याठायीं "मधुतिष्ठति जिव्हाग्रे हृदि हालाहलं विषं." असा प्रकार असावयाचाच. स्वत्या मित्रास शत्रू समजणारा मूर्ख मनुष्यच, शत्रूपासून होणाऱ्या नुकसानाविषयीं निर्धोर असतो.

सर्वांस खिसेकात्रू समजणारा लबाड मनुष्य, आपल्या खिशांतील मोत्यांस फार जपतो. एका धन्याशीं बेइमान झालेल्या शिपायाला, सहसा चाकरीस ठेऊं नको, कारण, जो पहिल्या धन्याचे आभार मानण्यास चुकला, तो तुला काय समजणार? त्याच्या भाषणांविषयीं सावध रहा. व त्याच्या शपथा व करार कायम समजूं नको. त्याच्यावर एक तपासनीस ठेव. नवशिख्याचें सूत्र ढिलें सोड. तें एकदम तोडूं नको, म्हणजे तो पुनः खेळतांना आढळणार नाहीं.

युद्धकरून शत्रूचें राज्य व किल्ले घेशील ते, त्यानें कैद केलेल्यांच्याच स्वाधीन कर, कारण, त्यांनीं अत्यंत कष्ट अनुभविलेले असल्यानें, ते, अन्यायी अधिकाऱ्यांच्या नरडीचा घोट घेऊं इच्छित असतात. शत्रूचें राज्य घेशील, तेव्हां, प्रजेस पूर्वापेक्षां अधिक समृद्ध कर, कारण, पुनः युद्धद्वार खुललें तर, सर्व प्रजाजनच त्याचें डोकें फोडून टाकण्यास तत्पर राहतील. नागरिकांस दुःख देशील तर मग शत्रूकरितां नगरद्वारें बंद करण्याची काय जरूर? तसेंच, तीक्ष्ण शस्त्रधारी शत्रू, दारावर आहे असें म्हणूं नकोस, कारण, शत्रूचे सहाय्यकारी नगरांतच आहेत. शत्रूशीं युद्धाच्या सिद्धतेचा यत्न करून, ते यत्न त्याच्यापासून गुप्त ठेव.

प्रत्येकास आपलें गुह्य सांगूं नको, कारण, एकत्र भोजन करणाऱ्यांतही पुष्कळ चहाडखोर निघतात. शिकंदर* बादशहा प्राच्य शत्रूच्या बरोबर लढत असतांना डेऱ्याचें दार पश्चिमेकडे ठेवीत असे. तसेंच वेहमन† बादशहा जावुल्सितान‡ देशावर स्वारी करितांना डावीकडे झोंक दाखवून उजवीकडे छापा घालीत असे.

तुझे काय यत्न व विचार चालले आहेत हें दुसरा कोणी जाणील, तर, त्या तुझ्या शहाणपणाच्या व बुद्धीच्या नांवानें रडलें पाहिजे. लोकांवर उपकार कर व तंटा

---

* पान २१ वरील टीप पहा.

† **वेहमन** यासच **आर्दशेर** म्हणतात. हा **ईराण**च्या **अस्पंदयार** बादशहाचा मुलगा.

‡ **जावुल्सितान**, किंवा **सीस्तान**, हा देश मध्यएशियेंत आहे. हाच देश **रुस्तुम**ची जन्मभूमि होय.

करूं नको, नाहीं तर सर्वांशीं वैर पडेल. उपकारामुळें सर्व जग करतलगत होईल. मिष्ट भाषणानें व सुखानें काम होईल तर दांडगाई व जुलमानें तें करविण्याची काय जरूर! तुझें मन कष्टी न व्हावें, असें इच्छिशील तर कष्टी लोकांचीं मनें बंदमुक्त कर.

तू बलाढ्य व सैन्यवान् असलास तरीही, दुर्बळांस सहाय्य करण्याची इच्छा ठेव. अनाथ व गरजवंत अशांचे आशीर्वाद, शूरांच्या सहाय्यापेक्षां अधिक कामास येतात. ज्याला फकीरांचें सहाय्य मिळाल तो प्रत्यक्ष **फरीदून*** बादशहाशीं लढला तरी यशस्वी होईल.

---

* पान २० वरील टीप पहा.

पहिला भाग समाप्त.

भाग दुसरा.

उपकार.

—:०:—

बोधवचन.

राजानें प्रजेवर दया करण्याविषयीं.

शहाणा व तत्वार्थेच्छू असशील तर, तू लक्षांत ठेव, कीं, चेहऱ्यावरून कोणाचाही स्वभाव समजून येतो. ज्याच्या चेहऱ्यावरून शहाणपण, कृपा व सन्मार्गेच्छा दिसत नाहींत, त्याच्या अंतःकरणांतही वास्तविक कांहींच तथ्य नसतें.

• ज्याच्या राज्यांत प्रजा स्वस्थ मनानें निद्रा घेते, तो मेल्यावर मातींतही सुखानें निजतो. तू जिवंतपणींच स्वतः विषयीं कष्टी हो, कारण तू मेल्यावर, तुझे आप्तइष्ट कष्टी होतील ते, तू मेल्याबद्दल नव्हे, तर आपल्या विभागाबद्दल.

धनदौलत आतां तुझी आहे तोंवर दे, कारण तुझ्यामागें ती तुझ्या सत्तेबाहेर जाईल. स्वतः कष्टी न व्हावें असें इच्छिशील तर कष्टी लोकांस आपल्या अंतःकरणांतून दूर करूं नको. आज द्रव्यभांडार त्वरित लुटीव, कारण उद्यां त्याची किल्ली तुझ्या हातीं राहणार नाहीं. स्वतः करितां, स्वतःच पाथेय बरोबर घे, कारण पुढें बायका मुलांकडून थोडीच मदत मिळणार आहे. स्वकृत पुण्यरूप पाथेयाचा विभाग बरोबर नेईल, त्यानेंच या जगांतून संपदारूप गेंद जिंकला म्हणावयाचें.

स्वतः विषयीं स्वतःच पश्चाताप केला पाहिजे. या जगांत माझी पाठ माझ्याच नखाशिवाय, कोण नीट

खानवील? आज तुजजवळ असेल तें लोकांच्या तळहातावर ठेवल्याशिवाय राहूं नको, नाहींतर उद्यां तुला पश्चात्तापानें मनगटें चावावीं लागतील. दरवेशांच्या अंगावर पांघरूण घालण्याचा यत्न कर म्हणजे ईश्वर स्वतःच तुजवर आच्छादक पांघरूणाप्रमाणें होईल.

गरीबास दारापुढून रिकामा घालवूं नको, नाहींतर तुलाच गरीब होऊन दारोदार फिरावें लागेल. थोर व संपन्न लोक गरीबास कांहींतरी पोंचवितात, कारण आपण भिकारी होऊं अशी त्यांस भीती असते. कष्टी मनुष्याच्या स्थितीवर लक्ष दे, नाहींतर कधीं तूच कष्टी होशील. खिन्न मनाचें शांतवन कर, नाहींतर शेवटच्या दिवशीं तुलाच खिन्न व्हावें लागेल हें लक्षांत ठेव. तू दारोदार भीक मागत फिरत नाहींस याबद्दल, ईश्वराचे आभार मानून, भिक्षेकऱ्यास दारापुढून हाकूं नको.

बोधवचन.

पोरक्या मुलांचें कृपादृष्टीनें संगोपन करणें.

पोरक्या मुलाच्या मस्तकावर छाया कर, त्याची दुःखरूप धूळ झाड, व त्याची दुर्दशा करूं नको. त्याच्यावर कसा कहर गुजरला आहे तो जाणत नाहींसका? मूळाशिवाय वृक्ष ताजे कसे राहतील. पोरकें पोर दीनवदन पुढें असतांना, स्वतःच्या मुलाचें चुंबन घेऊं नको. पोरकें पोर रडलें तर त्याचे लाड कोण करील? व रागावलें तर राग कोण सहन करील? त्याला रडूं देऊं नको, खबरदार, कारण, पोरक्या पोराचें रडणें ऐकून

ईश्वराचें सिंहासन देखील कांपूं लागतें. त्याच्यावर दया करून त्याचे अश्रू पूस व कृपाकरून त्याच्या मुखावरून धूळ झाड. त्याच्या मस्तकावरून त्याचें छत्र नाहींसें झालें, तरी तू त्याला आपल्या छायेनें वाढीव.

मी पित्याच्या मांडीवर मस्तक ठेऊन लोळत असतांना एखाद्या राजाप्रमाणें डौलांत होतो. तेव्हां माझ्या अंगावर एक माशी बसली कीं अनेकांचीं मनें उद्विग्न होत. पण आतां मला कोणी कैद करून तुरुंगांत नेलें तरी माझ्या मित्रांपैकीं सुद्धां कोणी मदत करणार नाहींत. मला पोरपणचें दुःख ठाऊक आहे कारण, पोरपणांतच "माझ्या मस्तकावरून माझें पितृरूप छत्र नाहींसें झालें.

गोष्ट पहिली.

सत्कर्माचें फल.

खुजंदचा* एक सरदार एका पोरक्या पोराच्या पायांतून कांटा काढीत असतांना एकानें स्वप्नांत पाहिलें. तो सरदार ह्मणत होता कीं, "मी या सुंदर स्वर्गींच्या उपवनांत आहें तो त्या कांटा काढण्यामुळेंच, व त्यामुळेंच ही मजवर कशी सुंदर पुष्प वृष्टी होत आहे!"

कृपा करण्यांत सहसा त्रासूं नको. कृपा करशील तर तुजवरही श्रेष्ठ लोकांची कृपा होईल. कोणावर कांहीं उपकार केल्याबद्दल स्वयंमन्य होऊन, मी मोठा भाग्यवान् व दुसरे दीन व दरिद्री आहेत, असें ह्मणूं नको कारण,

---

* **खुजंद** हें **मावरा उन्नहर** यामध्य **एशियेंतील** प्रदेशांतलें एक नामांकित शहर होतें. तेथे पुष्कळ मोठ मोठे लोक उत्पन झाले.

खडतर कालचक्राची तीक्ष्ण तरवार कांहीं इतक्यांत आंवरली गेली आहे, असें नाहीं.

तुझ्या संपत्तीमुळें हजारों लोक तुला आशीर्वाद देणारे होतील, व बहुत लोक तुजपासून कांहीं प्राप्त होण्याची आशा ठेवतील, पण तू कोणापासून कांहीं आशा ठेवीत नाहींस, या करितां ईश्वराचे आभार मान.

उपकार हा थोरांचा गुण आहे असें म्हटलें ती चूक आहे. तो खरोखर पैगंबराचें प्रेमसर्वस्व आहे.

गोष्ट दुसरी.

पैगंबराचें परमेश्वराच्या ठिकाणीं प्रेम.

पैगंबर इब्राहीम खलीलुल्ला* यांच्या घरीं सात दिवस पर्यंत कोणी वाटसरू आला नाहीं. घरीं कोणी उपाशी वाटसरू अतिथी आल्यावांचून कांहीं खावयाचें नाहीं असा त्यांचा फार चांगला नेम असे.

ते बाहेर गेले व इकडे तिकडे जंगलांत फिरून नीटपणें तपास करूं लागले तों, त्यांस एक, एकाकी व अतिशय जरेमुळें मस्तक व केश शुभ्र झालेला, असा मनुष्य आढळला. तेव्हां थोर लोकांच्या चालीप्रमाणें त्याला आनंदानें स्वागत बोलून ते म्हणाले, "हे मन्नेत्रचकोरा, एकदां माझ्या घरीं मीठभाकर खाण्याची कृपा कर."

तो म्हातारा बरें म्हणून, लगबगीनें पाय जलद उचलून चालूं लागला, कारण, त्याला त्या पैगंबराचा नेम माहित होता.

---

* मागें तिसऱ्या पानावरील टीप पहा.

घरीं येतांच त्याच्या सेवकांनीं त्या परधर्मी वृद्धास मोठ्या सन्मानानें वसवून त्याच्या आज्ञेनुसार भोजनाची तयारी केली. सर्व लोक भोजनास बसले, तेव्हां सर्वांनीं बिस्मिल्ला* म्हणण्यास सुरुवात केली, पण त्या म्हाताऱ्याच्या तोंडून कांहीं शब्द निघालेला ऐकूं आला नाहीं.

तेव्हां पैगंबर म्हणाला, "हे वयातीत म्हाताऱ्या, वृद्धलोकांस उचित सद्धर्मनिष्ठा व पश्चात्तापवृत्ती तुझ्यांत कां दिसत नाहीं? रोजचें अन्न खातांना अन्नदात्याचें नांव घेत नाहींस हें योग्य नाहीं."

त्यावर तो म्हणाला. "मी अग्निउपासक वृद्धप्रणीत धर्माशिवाय दुसऱ्या कोणाचा धर्ममार्ग स्वीकारीत नाहीं."

यावरून त्या पुण्यश्लोक पैगंबरास कळलें कीं, हा एक अति दरिद्री व वृद्ध अग्निपूजक पारसी आहे. तेव्हां त्याला त्यानें झिडकारून, भ्रष्ट समजून हांकून दिलें, कारण पतित प्राणी, धर्मनिष्ठांच्या दृष्टी पडणें, पाप होय.

हें पाहून त्या सर्वोत्तम परमेश्वराकडून एक देवदूत रागानें प्रकट होऊन त्या पैगंबरास दोष देऊन म्हणाला. "हे खलीला, ईश्वरानें याला शंभर वर्षेपर्यंत अन्न व प्राण दिले असतां त्याचा एक क्षणांत तुला कां वीट आला? तो अग्नीपुढें हात जोडतो म्हणून तूं कां आपला पाहुणचाराचा हात त्याच्या पुढून मागें घेतलास?

तो आतां जाऊन परमेश्वराच्या नांवानें रडतो आर-

---

* "बिस्मिल्ला हिर्रहिमानुर्रहीम," कोणतेंही काम करणें झालें तर, मुसलमान लोक, वरील वाक्य प्रथम म्हणतात. याचा अर्थ, 'कृपा करणारा व दयाळू अशा परमेश्वराच्या नांवानें मी प्रारंभ करतों' असा आहे.

डतो आहे, व सर्वांगावर व डोकींत राख घालून घेत आहे, याकरितां तू जाऊन त्या वृद्धाला परत बोलावून आण, व परमेश्वराच्या तर्फेनें त्याचें स्वागत कर."

हें ऐकून, तो त्या काळचा **पैगंबर** त्याच्याकडे गेला व त्यानें त्याला त्या जंगलांतून परत घरीं बोलावलें, व जवळ आला तेव्हां त्याला ह्मणाला, "तुझ्या शिरावर व शरीरावर शेंकडो, वेळ धन्यवाद असो. परमेश्वरानें तुझी प्रार्थना मान्य केली आहे, व परमेश्वरानेंच मला तुजकडे पाठविलें आहे."

त्या वयोवृद्धानें ही गोष्ट ऐकतांच शहादतचा* कल्मा ह्मणून, मुसलमानी धर्माचा स्वीकार केला.

परमेश्वर मोठा धन्य होय कीं, त्याच्या कृपेनें तो वृद्ध, मुसलमान झाला, व त्यायोगानें तो पूर्वी जरी दरिद्री होता, तरी आतां धर्म संबंधानें बादशहांच्या बरोबरीचा झाला.

---

* शहादतचा कल्मा:—"अश्हदो अन् लाइलाहा, इल्ल ल्लाहो व अश्हदो, अंना, मुहंमदन् अब्दहू व रसूलहू."

याचा अर्थ—एका **परमेश्वरा**शिवाय, कोणीही पूजनार्ह नाहीं, तसेंच **महंमद** हे त्याचे दास आहेत व त्यानेंच पाठविलेले दूत आहेत. यादोन्ही गोष्टींची मी साक्ष देतों.—

कोणीही मनुष्य मुसलमान होतो तेव्हां त्याला प्रथमच हें धर्मवाक्य शिकविलें जातें. मुसलमानी धर्म स्वीकार केल्याची ही प्रतिज्ञा आहे.

बोधवचन.

सज्जन व दुर्जन यांच्यावर उपकार.

अमुक मनुष्य लुच्चा व तमुक ढोंगी व लबाड, असें म्हणून तू उपकाररूप थैलीच्या तोंडास गांठ मारूं नको. विद्या व थोरवी, अन्नाकरितां विकणारा विद्वान मनुष्य स्वतःचेंच नुकसान करून घेतो.

शहाण्यानें ऐहिक गोष्टींच्या ऐवजीं कुराणवचनें देणें हें कोठील शहाणपण? पण तू अशापासून धर्म विकत घे. कारण, शहाणा स्वस्त भावानें विकणाऱ्या पासून उत्सुकतेनें माल घेतो.

गोष्ट तिसरी.

सद्धक्त व ढोंगी.

एका कवीनें एका सद्धक्त गृहस्थास म्हटलें, "मी फारच दुस्तर गाळांत फसलों आहे, कारण, एका लुच्याचे मला दहा **दिरम*** देणें आहे, त्यांतील एकेक **दांगाचा**† माझ्या मनावर दहामणाचा भार आहे. सर्वरात्र त्यामुळें माझी स्थिती कष्टी राहते व तो छायेप्रमाणें प्रत्यही माझ्यामागें असतो.

"त्याच्या हृदयविदारक भाषणानें माझें अंतःकरण एखाद्या जीर्ण घराप्रमाणें छिन्नभिन्न झालें आहे. मला वाटतें ईश्वरानें त्याला गर्भांतून निघाल्या पासून या दहा दिरमां-शिवाय कांहीं दिलें नाहीं. **कुराणाचें** त्यास एक अक्षर

---

* **दिरम** चार आणे किंमतीचें एक चांदीचें नाणें.

† **दांग**, एक आणा किंमतीचें चांदीचें नाणें.

येत नाहीं व खर्च न करणें या शिवाय त्यानें कशाचेंही अध्ययन केलें नाहीं. सूर्य उदयाचलीं येतांच त्या दुष्टानें माझ्या दाराची कडी वाजविली नाहीं, असा एक दिवस जात नाहीं. मी या पाषाण हृदयाची मूठ द्रव्यानें दाबणारा कोण परोपकारी भेटेल, या विवंचनेंत आहे."

त्या कुलीन व वृद्ध गृहस्थानें हें ऐकून, दोन मोहरा त्याच्या हातीं घातल्या. त्या पडतांच तो बडबड्या मनुष्य सूर्याप्रमाणें प्रसन्नमुख होत्साता बाहेर पडला. तेव्हां एक जण ह्मणाला, "हे थोर गृहस्था, हा कोण आहे तुला ठाऊक नाहीं. तो मेला तरी कोणी रडणार नाहीं. हा भिकारी, प्रत्यक्ष नरव्याघ्रावर खोगीर घालील, व खास अबूजैद* याच्यावर ही घोडमात करील, असा आहे."

तो भक्त रागानें ह्मणाला, "चुप रहा, तुझी उपदेश करण्याची योग्यता नव्हे. तू श्रोता आहेस. माझें मत खरें असले तर याची मी जनांत लाज राखल्यासारखें होईल. त्यानें लबाडी व ढोंग केले असलें तरी, मीं वेडेपणा केला असें मानूं नको, कारण, मीं अशा एका ठकाच्या व लबाडाच्याहातून आपली अब्रू वाचविली असें समजेन.

बरे व वाईट, यां सर्वांस द्रव्य दान कर, कारण, पहिलें दान, योग्य व सत्पात्रीं व दुसरें वाईटाचा परिहार करणारें आहे. सत्संगती धरणारा व संयमनी लोकांचे गुण व प्रेम घेणारा, मनुष्य सुखी होय. तुझ्यांत ज्ञान, युक्ती, हुषारी व दाक्षिण्य असेल तर पूज्यतायुक्त मनोभावानें

---

* **अबूजैद** नांवाचा **ईराण** देशांत एक मोठा पटाईत बुद्धिबळ खेळणारा होऊन गेला. त्याच्या तोडीचा चलाख व लबाड मनुष्य आजवर कोणी झाला नाहीं, अशी दंतकथा आहे.

सादीचा उपदेश ऐक, कारण, तो विलासिनीचे कुटिल कुंतल व कर्ण व नेत्रकमलें यांचें वर्णन करण्यांत मग्न न राहतां, नेहमीं याच विषयांची चर्चाकरीत असतो.

गोष्ट चौथी.

कृपण पिता व उदार पुत्र.

एक गृहस्थ मेला व त्याचें जगांत कृपणपणाबद्दल नांव राहिलें. त्याला एक विद्वान व उदार अंतःकरणाचा मुलगा होता. तो कृपण लोकांप्रमाणें द्रव्याविषयीं घट्ट हाताचा नसून, मुक्तजना प्रमाणें, त्याच्या विषयीं अगदीं बेपर्वा होता. दरवेशांच्या गर्दीमुळें त्याच्या घरांत, व पांथस्थांमुळें त्यानें बांधलेल्या धर्मशाळेंत, रीघ मिळत नसे. स्वपरजनांची संतुष्ट मनें, तो गोळा करीत असे. पित्याप्रमाणें द्रव्य जमाकरून तें पुरून ठेवीत नसे.

त्याला एका हितचिंतक उपदेशकानें म्हटलें, "हे उधळ्या गृहस्था, आहे नाहीं तें सर्व एकदम नाहींसें करूं नको. खळें जमा होण्यास एक वर्ष लागतें. तें एकदम जाळून टाकणें कांहीं पुरुषार्थ नव्हे. गरीबीच्या वेळीं जर तू समाधान वृत्ती धरणार नाहींस, तर शेवटच्या न्यायाच्या दिवसाची तुला वाट पहावी लागेल.

याविषयीं दूरदृष्टीचें उदाहरण सांगतो तें ऐक.

"एक गांवंढेकरीण आपल्या मुलीस काय उत्तम बोलली कीं, 'सुबत्तेंत गरीबीकरितां सामानाची सिद्धता करून ठेव. नेहमीं पखाल व घागर भरून ठेव. कारण, गांवांत नदीचें पाणी सर्वदां वहात राहील असें नाहीं.'

या जगांत द्रव्यानें सिद्धी मिळवितां व प्रत्यक्ष देवतांचेही हात बांधतां येतात. रिक्तहस्तांची आशा सफळ होत नाहीं. द्रव्यानें **सफेददेव*** याचे डोळे फोडितां येतात. दारिद्र्यावस्थेंत मित्रापुढें जाऊं नको. द्रव्यवान् असशील तर जाणें येणें ठेव. दरिद्री असशील तर सुंदर स्त्रीसमाजांत जाऊं नको कारण, अकिंचन मनुष्याची त्यांच्यापुढें कांहींच योग्यता नसते. जवळचें सर्व धन दुसऱ्याच्या हातावर ठेवशील तर गरजेच्यावेळीं रिकामा राहशील. तुझ्या प्रयत्नानें सर्व दरिद्री कधींही श्रीमान होणार नाहींत पण तू मात्र निःसत्व होण्याची भीती आहे.

उदार पुत्राची गोष्ट पुढें चालू.

त्या निषेधकानें ही गोष्ट सांगितली. तेव्हां त्या उदाराचें मन त्रासानें संतप्त झालें, व तो विमनस्क होऊन रागानें म्हणाला, "हे मिथ्याजल्पका, ही लक्ष्मी मला वश होण्या पूर्वी, माझा बाप, 'आजोबाच्या संपत्तीचा मी वारस आहे, असें म्हणत होता. त्या दोघांनीही मोठ्या काळजीनें तिचें रक्षण करून मरतांना हळहळून तिला येथेंच सोडिलें नाहीं कां? ती पित्याची दौलत माझ्या हातीं पडली व माझ्या मागें ती माझ्या मुलांच्या हातीं जाणार. त्या अर्थी सज्जनांनीं तिचा आज उपभोग घ्यावा हें बरें कारण, उद्यां माझ्या मागें ती कोणी लुटून नेतील नव्हे कां!"

---

* **सफेद देव** या नांवाचा एक **माझेंदरान** देशांत विख्यात मल्ल होऊन गेला. त्याचें **रुस्तुमा**बरोबर युद्ध झालें व **रुस्तुमा**नें त्याचे डोळे फोडून त्याला ठार मारलें. त्याच्या दांडगेपणावरून त्याला दैत्य म्हणत असत.

खा, पी, दे, वस्त्र प्रावरणें पांघर व उपकार कर. व्यर्थ दुसऱ्या करितां रक्षक कां होतोस? खरे विद्वान लोक जगांतून अशा कृतीनेंच द्रव्य बरोबर नेतात व मूढ हलकट लोक दग्धहृदय होऊन जागच्या जागींच राहतात.

सुवर्ण व संपदा तुझी आहे तोंवर दे. कारण तुझ्या मार्गे ती तुझ्या सत्तेबाहेर जाईल. या जगांतून शेवट गोड करण्याची इच्छा असेल तर, हे मत्प्राणा, तो द्रव्यानें विकत घे, नाहीं तर पश्चात्ताप व जळफळ तुझ्या कपाळीं येईल.

गोष्ट पांचवी.

शेजाऱ्यावर उपकार.

एक स्त्री नवऱ्याला रडून म्हणाली "या गल्लींतल्या वाण्या पासून पुनः धान्य विकत घेऊं नको. मोठ्या बाजारांतिल दाणेवाल्याकडून आण, कारण, हा गहू दाखवून जव देणारा आहे, व माशांच्या गर्दीमुळें गिऱ्हाइकांस आठाठ दिवसांत त्याचें तोंड दिसत नाहीं."

तो चैनी मनुष्य प्रेमानें म्हणाला, "हे गृह दीपिके शांत हो. तो आमच्या आश्रेवर येथें राहिला, तेव्हां त्याला नफा नहोऊं देणें भलेपणा नव्हे. सन्मार्गी व निरिच्छ अशा लोकांचा मार्ग धर, व स्वतः उभी आहेस तोंवर पतितांस हात दे, व त्यांच्यावर उपकार कर."

ईश्वरपरायण व सत्यवादी लोक गरीबाच्या दुकानांतच देवघेव करणारे असतात. परोपकारी मनुष्यच खरा थोर, शूर, सर्व लोकांत श्रेष्ठ व पूज्य होय.

गोष्ट सहावी.

कर्मठ व गर्विष्ठभक्त.

एक मनुष्य हिजाजच्या रस्यानें प्रत्येक पावलास दोनदां निमाज पढत जात होता. तो त्या पुण्यमार्गांत इतका दृढनिश्चयानें चालला होता कीं, रस्त्यांत बाभळीचे कांटे लागत ते देखील तो पायांतून काढीत नसे.

शेवटीं त्याच्या मनांतील अहंपणाच्या दुर्गतिप्रद विचारामुळें त्यास स्वतःचें हें कृत्य फार पसंत आलें, व सैतानाच्या फुसलावणीमुळें तो खड्ड्यांत पडला, व त्यास आपल्याहून अधीक कष्टतर अशा पुण्य मार्गाचें आजवर कोणी सेवन केलें नाहीं, असें वाटूं लागलें.

ईश्वर कृपा करून, हें जाणून, त्याला सावध नकरितां तर, गर्वामुळें त्याचें मन सन्मार्ग विमुख होऊन जातें. एका देव दूतानें त्याला आकाशवाणी दिली कीं, "हे सुदैवी व कुलीन गृहस्था तूं अशी उपासना केलीस म्हणून ईश्वराच्या घरचा हकदार झालों असें समजूं नको. कारण, परोपकारानें एकही प्राणी संतुष्ट करणें, पदोपदीं सहस्रशः निमाज पढण्यापेक्षां अधिक श्रेयस्कर आहे."

गोष्ट सातवी.

राजसेवक.

एका राजसेवकास त्याच्या बायकोनें म्हटलें "हे भल्या गृहस्था, ऊठ व पोटाच्या धंद्यास लाग. राजाकडे जा म्हणजे त्याच्या पात्रांतून तुलाही थोडासा विभाग मिळेल. तुझीं मुलें अगदीं उपाशीं मरताहेत."

तो म्हणाला, "आज राजाची पाकशाळा थंड आहे कारण, तो आज नक्त करणार आहे."

बायकोनें निराशेनें व उदासीनपणानें दीन होऊन, डोकें खालीं घालून, आपणाशीं म्हटलें, "त्याच्या पारण्याच्या दिवशीं माझ्या मुलांची ईद होणार. अशा नक्त करण्या पासून राजास काय फळ मिळणार कोण जाणें!"

ज्याच्या हातून लोकाचे बरें होईल, असा रोज जेवणारा रोज नक्तें करणाऱ्या संसारी ढोंग्यापेक्षां बरा. गरीबास रात्रीं अंन देईल, त्यानेंच रोजे करणें योग्य; नाहींतर व्यर्थ कष्ट भोगण्याची काय जरूर आहे? स्वतःचाच वांटा राखून ठेवावा व तो स्वतःच रात्रीं खावा यांत काय पुण्य?

मूर्ख व धर्मवेड्या मनुष्याचे विचार शेवटीं वेडेपणानें धर्म व अधर्म मिसळून टाकतात. पाणी व कांच दोहोंतही स्वच्छपणा आहे पण यांतील तारतम्य जाणण्याला स्वच्छता व बुद्धी पाहिजे.

गोष्ट आठवी.

द्रव्यहीन उदार व कैदी.

एकाच्या अंगीं औदार्य फार होतें पण तदनुरूप दान करण्याचें सामर्थ्य नव्हतें. त्याच्या दातृत्वानुरूप त्यास उत्पन्न नव्हतें.

मूर्ख संपन्न व उदार धनहीन नसावा. ज्याची उमेद मोठी असते त्याला त्याच्या उमेदीप्रमाणें द्रव्यसाधन असत नाहीं. त्याची स्थिती उंच पहाडी प्रदेशांतील, पाण्याप्रमाणें असते; तें सारखें उंच प्रदेशीं कधीं राहत नाहीं.

योग्यतेप्रमाणें उपकार न केल्यामुळें, तो गृहस्थ अर्थांतच द्रव्यहीन झाला होता. त्याला एका गरीबानें दोन अक्षरें लिहून पाठविली कीं, 'हे भाग्यशाली व उदार गृहस्था, एकदां थोड्याशा द्रव्यानें माझें सहाय कर थोड्या कर्जाकरितां मी कैदेंत पडलो आहे.'

त्याला कोणच्याही वस्तूची किंमत वाटत नसे, परंतु जवळ मात्र एक कवडी नव्हती. त्यानें कारागृहाच्या अधिकाऱ्यांस झटलें कीं, 'हे यशस्वी व उदार गृहस्थहो त्याचा पदर सोडून त्याला थोडे दिवस मुक्त करा. तो पळून जाईल तर मी जामीन आहे,' तेथून तो थेट आंत जाऊन त्याला झणाला, 'ऊठ व पायाला पर लावून या शहरांतून पळून जा.'

पिंजऱ्याचें दार उघडें सांपडलेल्या चिमणीप्रमाणें त्याला एक क्षणभरही धीर धरवला नाहीं. व चपळ अश्वाप्रमाणें तो तेथून अशा वेगानें पळाला कीं प्रत्यक्ष वायधुळीलाही त्याचा पाठलाग करतां आला नसता.

पुढें अधिकाऱ्यांनीं त्या उदाराला पकडलें व द्रव्य किंवा कैदी हजर करण्यास सांगितलें. तेव्हां, पिंजऱ्यांतून सुटलेला पक्षी पुनः हातीं येणें मुष्कील समजून, तो दीनपणें कैदेंत गेला. तो कित्येक दिवस कैदेंत राहिला. त्यानें कोणास पत्र लिहलें नाहीं किंवा कोणाजवळ फिर्याद केली नाहीं. दिवसभर उपाशी व रात्रीं जागा राही.

एका भक्तानें जाऊन त्यास झटलें "तू चोर असशील असें मी समजत नाहीं. तेव्हां तू कशामुळें कैदेंत पडलास!" तो झणाला "हे कुलीना खरेंच मी कोणाचा

अपहार केला नाहीं. परंतु एक गरीब मनुष्य, दुःखी व कैदेंत होता, त्याची सुटका, स्वतः कैदेंत गेल्याशिवाय होण्याजोगी नव्हती. तो कैदी व मी सुखी असणें मी योग्य समजलो नाहीं.''

तो शेवटीं सुयशभागीच मेला. किती थोर त्याचें जिवित्व कांकीं त्याचें यश कांहीं मेलें नाहीं ! उदार व जिवतअंतःकरणवाल्याचा देह मातींत मिळणें, अंतःकरण मृत व देह जिवत असण्यापेक्षां बरें. ज्याचें मन सजीव आहे तो मरत नाहीं. तेव्हां अशाचा देह मृत झाला तरी काय भय?

गोष्ट नववी.

भूतदया.

एका जंगलांत एक कुत्रा तान्हेनें व्याकूळ झाल्यानें थोडी दुगदुगी असलेला एकानें पाहिला. त्या धर्मप्रियानें आपल्या टोपीचा डोल करून तिला पागोटें दोरीप्रमाणें बांधलें, व त्याच्या सेवेंत कमर बांधून, अस्तन्या वर सारून, त्या दीन कुत्र्याला त्यानें एक क्षणांत पाणी पाजिलें. या पुण्यकर्माची पैगंबरानें ईश्वरास बातमी देतांच, त्यानें त्याला लागलीच पाप मुक्त केलें.

दुष्टपणा करशील तर खबरदार. ईश्वराचें भय बाळग, उपकारी होव लोकांवर कृपा कर. जो कुःत्यावरचे उपकार विसरला नाहीं, तो सत्पुरुषावरील उपकार कसे विसरेल? होईल तोंवर सर्वांवर उपकार कर. जगदीश्वरानें कृपाकपाट कोणावरही बंद केलें नाहीं. वनांत कुवा न खोदवला, तर तू निदान लोकांच्या

वाटेवर दिवा लावून ठेव. मोठ्या द्रव्यागारांतून थैलीच्या थैल्या द्रव्य दान करण्यापेक्षां मजूरानें दिलेला एक दीनार अधिक श्रेयस्कर आहे. प्रत्येक मनुष्य स्वशक्त्यनुसार भार उचलतो.

मुंगीला टोळाचा पायही भारी. (मुंगीला मुताचा पूर) हे भाग्यवंता सर्वांशीं सद्वर्तन ठेव, नाहींतर, उद्यां तुजवर ईश्वर कांहीं संकट न आणो. पडलेल्यांनां हात देणारा मनुष्य स्वतः पडला तरी फार वेळ पडला रहात नाहीं. सेवकावरही सक्ती करूं नको. कारण कदाचित तोही सत्ताधीश होईल. तुझें वैभव व दैव सदां बलवत्तर राहिलें तरी, अनाथांवर जुलूम करूं नको. न जाणो प्यादेंही वेळेवर वजीर होतें. तसा तो तुजहून श्रेष्ठ होईल.

दूरदृष्टीमनुष्य नीच लोकांच्या मनांत वैपम्याचें बीज पेरीत नाहीं. खळ्याच्या आसपास पडलेल्या कणसांतून दाणें वेंचणाऱ्या भिकाऱ्यास झिटकारणारा खळ्याचा धनी, स्वतःचेंच नुकसान करून घेतो. कारण ईश्वर उद्यां त्या गरीबाला संपदा देईल, व त्याच्या मनावरील संकटरूपभार स्वशिरावर देईल ही त्याला भीती नसते. अनेक थोर व बलाढ्य लोक नाश पावले आहेत. व पुष्कळ दीन लोकांस सुदैवानें मदत केली आहे. अनाथाचें दीन मन दुखवूं नको, नाहींतर स्वतःच दीन होशील.

गोष्ट दहावी.

गर्विष्ट धनिकांची.

एक गरीब मनुष्य एका गर्विष्ट धनिकाच्या दाराशीं रडत भीक मागत होता. त्याला त्या पाषाणहृदयानें

दीनार किंवा दांग कांहीं न देतां, तो त्याच्या अंगावर एकदम त्रासानें खेंकसला. त्या याचकास या दांडगेपणामुळें विषाद वाटला व तो वर पाहून म्हणाला, 'हे मूढा, संपन्न मनुष्य त्रासानें केव्हां केव्हां दांडगाई करितो, पण स्वतःसही कदाचित मागण्याचा प्रसंग येईल यार्चे त्याला भय, वाटत नसतें.'

त्या धनिकाच्या हुकूमानें त्याच्या गुलामानें त्याभिकाऱ्यास झिटकारून घालवून दिलें तेव्हां तो रडत चालता झाला. त्या धनिकानें जगत्पालकाचे आभार न मानल्यानें त्याचें दैव फिरलें, त्याचें वैभव नष्ट झालें, व चित्रगुप्तानें त्याच्या नाशा विषयीं लेख लिहीण्यास लेखणी घेतली. दुर्दैवानें त्यास लसणेप्रमाणें नीरस किंवा अन्वर्थक रसोन, याप्रमाणें केलें. व त्याच्याजवळ कांहीं माल व हमालही राहिले नाहींत. त्याला दुर्दैवानें अन्नांनगत करून धुळीस मिळविलें, व त्याची स्थिती डोंबाऱ्याप्रमाणें केली. केवळ थैली व हात मात्र त्याजवळ रिकामे राहिले. नखशिखांत त्याची स्थिती बदलून गेली.

या गोष्टीला बहुत दिवस लोटले. त्याचा तो गुलाम एका थोर धन्याच्या हातीं पडला. तो धनी हातांचा सढळ, मनाचा उदार व जात्या प्रबुद्ध असा होता. संपत्ती प्राप्त झालेल्या गरीब लोकाप्रमाणें, गरीब लोकांची दुःसह स्थिती पाहून तिचें निरसन करण्यांत तो फार खुषदिल होत असे.

एका रात्रीं एक भिकारी व दारिद्र्यभारसहनामुळें पाय थकलेला, असा मनुष्य दाराशीं आलेला पाहून तो कृपाळू गृहस्थ सेवकास म्हणाला, "या दीन मनुष्याचा समाचार

घे." तो सेवक आज्ञेप्रमाणें त्याच्याकडे अंन घेऊन गेला, व त्याला पाहतांच मोठ्यानें ओरडला, व धन्याजवळ परत आला. तेव्हां त्याच्या अश्रूंनींच त्याच्या मनांतील गुह्य गोष्टीची प्रस्तावना केली.

हें पाहून तो सुशील सर्दार ह्मणाला, 'तुझ्या डोळ्यांत अश्रू कां आले.' तो ह्मणाला 'या वृद्ध भिकाऱ्यास पाहून माझें मन फारच कष्टी झालें कारण, मी त्याचा जुना नोकर होतों, व तो पूर्वी मोठा संपन व धनाढ्य होता. त्याचा हात अतिथिसत्कारांत कोता झाल्यानें आतां तो दारोदार हात पसरत फिरतों आहे.'

तो सर्दार हंसून ह्मणाला, 'मुला यांत कांहीं नवल नाहीं. कोणावरही कालचक्र फिरण्यास उशीर लागत नाहीं. गर्वानें आकाश दोन बोटें उरलेला, व्यापारी तेव्हांच खालावतो नव्हे कां! त्या दिवशीं त्यानें दारापुढुन ज्याला हांकून लावलें होतें, तोच मी आहे. माझा दिवस आला तेव्हां कालचक्रानें त्याला खालीं बसविलें आहे. देवांनीं कृपादृष्टीनें माझ्या मुखावरून कष्टरूप धूळ झाडली.'

ईश्वरानें आपल्या अपार बुद्धीनें एक द्वार बंद केलें तरी, तो कृपाळूपणानें दुसरें द्वार खोलतोच. त्याच्या कृपेनें अगणित दरिद्री तृप्त झाले आहेत, व त्याच्या क्षोभानें असंख्य बलाढ्य व श्रीमान लोक धुळीस मिळाले आहेत.

गोष्ट अकरावी.

सज्जन भक्त.

तू सन्मार्गगामी व सज्जन होऊं इच्छीत असशील तर

त्रैमणांत आजवर दुसरा कोणी झाला नाहीं. अबूबकर सादह हा फार उदार हाताचा आहे, तो आपल्या दातृत्वानें याचकाचें याचना करण्याचें तोंडच बंद करतो. हे प्रजापालका, तुझें मन संतुष्ट राहून तुझ्या प्रयत्नानें मुसलमानी धर्म वृद्धिंगत होवो. हा भाग्यशाली देश तुझ्या न्यायाच्या योगानें रूम व यूनान देशांपेक्षांही श्रेष्ठतर झालेला आहे. हातिम उत्पन्न झाला नसता तर, तुझ्याहून या जगांत कोणीही अधिक श्रेष्ठ व उदार झाला नसता. त्या थोराची ग्रंथांतरीं कीर्ती शेष राहिली. तशीच तुझीही कीर्ती व चांगुलपणा कायम राहतील. हातिमानें आपली कीर्ती व्हावी या हेतूनें औदार्य पतकरलें, पण तुझा हा यत्न व औदार्य केवळ ईश्वर परायण आहे.

दरवेशास ढोंगाचें कांहीं काम नसतें. हरप्रयत्नानें परोपकार केलास तर, तुझी मागें सत्क्रिया व सादीचें बोधवचन, हीं कायम राहतील. या एका गोष्टीहून कोणचाही उपदेश अधिक महत्त्वाचा नाहीं.

गोष्ट एकुणिसावी.

राजेलोकांचें गांभिर्य.

एक म्हातारा मनुष्य आपलें गाढव गाळांत फसल्यानें त्रासानें व रागानें लाल झाला होता, कारण त्यामुळें त्याला जंगलांत निबिड अंधःकारांत वारा, पाऊस व थंडी खात राहावें लागलें होतें. तो सारीरात्र संतापानें मनास वाटले त्याम शिव्या व दुरुत्तरें देत होता. त्याच्या त्या शिव्यांच्या

तडाक्यांतून आत, परकी किंवा प्रत्यक्ष त्या देशचा राजाही सुटला नाहीं.

दुर्दैवामुळें त्या देशाचा यशस्वी राजा, त्याच वनांत मृगयेस्तव, गेंद बोथाटी घेऊन फिरत होता. त्याच्या कानीं तीं अभद्र भाषणें व त्या शिव्या पडल्या. तेव्हां त्याला स्वस्थ राहवेना व प्रत्युत्तरें ही देववेनात. त्या गाढव-वाल्यानेंही टेकडीवरून राजा सर्व ऐकत असल्याचें पाहिलें. राजा जवळच्या सरदारांस म्हणाला, 'याचा हा मजवर राग कां?' एकानें म्हटलें, 'हे राजा यास ठार मारावें कारण त्यानें कोणाच्याही बायका, मुली उद्धरल्या-विना सोडल्या नाहींत.'

गाढववाला संकटांत फसलेला व त्याचें गाढव गाळांत गढलेलें पाहून, राजास त्या बिचाऱ्याची दया आली व त्यावर क्षमा करून तो त्या शिव्यांचा सर्व राग पिऊन गेला, व त्यानें त्याला वस्त्रप्रावर्ण व घोडे वगैरे दिलें. राग आला असतांही क्षमा करणें किती उत्तम असतें!

एकानें त्या म्हाताऱ्याला म्हटलें, हे मूर्ख व अविचारी गृहस्था, 'तू काळाच्या दाढेंतून मोठ्याच सुदैवानें सुटलास.' तो म्हणाला, 'चुप, मी माझ्या दुःखानें रडत होतों, तरी राजानें आपल्या योग्यतेप्रमाणें मला बक्षिस दिलें. अप-काऱ्यावर अपकार करणें सहज आहे, पण अपकाऱ्यावर उपकार करणें हा पुरुषार्थ होय.'

गोष्ट विसावी.

मूर्ख श्रीमान व महात्मा दरवेशी.

एका गर्विष्ट व मदोन्मत्त श्रीमानानें एका याचकास

आपल्या घरापुढून विन्मुख घालविलें. तो दरवेशी स्वस्थ एका कोन्यांत बसला. त्याचें काळीज जळून गेलें व त्याच्या सर्द उरांतून गरम उच्छ्वास निघत होते. ते एका हीनचक्षूनें ऐकून त्यास झटलें, 'तूं असा त्रस्त व संतप्त कां?' त्यानें दीनपणें अश्रू गाळून त्याला, त्या गृहस्थाकडून पोंचलेल्या दुःखाची हकीकत कळविली. ती ऐकून तो झणाला, 'तू सर्व दुःख सोडून देऊन आज रात्रीं माझ्या घरीं जेव' असें झणून, त्यानें प्रेमानें व आग्रहानें त्याच्या गळां पडून, त्याचा पदर धरून त्याला घरीं आणून भोजन घातलें. त्या महात्म्या दरवेशानें तृप्त होऊन त्याला 'ईश्वर तुला डोळे देवो' झणून आशीर्वाद दिला.

पुढें रात्रीं त्याच्या डोळ्यांतून कांहीं अश्रुबिंदू गळाले व पहांटे डोळे उघडतांच त्यास सर्व सृष्टी दिसूं लागली. सर्व शहरांत बातमी पसरली कीं, रात्रीं एकानें एका अंधास नेत्र दिले. ज्या पाषाणहृदयी श्रीमान् गृहस्थापासून तो दरवेशी कष्टी होऊन विन्मुख गेला होता, त्यानें ही गोष्ट ऐकून झटलें, 'हे भाग्यवंता, हा जगत्प्रकाशक दीप तुला कोणीं दाखविला व ही अघटित घटना तुला कशी साध्य झाली, तें सांग.' तो झणाला, 'हे कठोर हृदयी व संसारमग्न गृहस्था, तूं अदूरदृष्टी व जड बुद्धी होऊन हुमा पक्ष्याला किंवा हंसाला सोडून, घुबडाला पतकरिलेंस. ज्याला तूं आपल्या घरून विन्मुख जाऊं दिलेंस व ज्याच्यावर आपलें द्वार बंद केलेंस, त्यानेंच हें मन्मुखद्वारभूत नेत्र उघडले.'

ईश्वरपरायण महात्म्यांच्या चरण धुळीचें पूजन करशील तर, ईश्वरसाक्ष तुलाही कधीं तरी साक्षात्कार

होईल. ज्ञानचक्षुहीन लोक खरोखर या अंजनाविषयीं अज्ञान असतात.

त्या गर्विष्ठ श्रीमानानें हें वर्तमान ऐकून विरस होऊन मनगटें चावून झटलें, 'माझ्या अंशाचा ससाणा तुझ्या जाळ्यांत आला, व माझ्या हिशाची संपदा तुझ्या नशीबांत आली.

'सर्वार्थसिद्धीसाधनरूप ससाणा, हातीं आलेला दवडून, उंदराप्रमाणें क्षुल्लक वस्तूवर तोंड टाकावें, तसा हा प्रकार मीं केला.'

बोधवचन.

जगन्मित्रता पतकरिल्यानें वेळेवर, एखाद्या महात्म्याची गांठ पडते, याविषयीं.

कोणी महात्मा भेटावा अशी इच्छा असेल तर, सर्व लोकांच्या सेवेंत, एक क्षणभरही विसंबशील तर खबरदार. तीतर, चकोर व कबूतरें, यां सर्वांस दाणा घालीत जा, म्हणजे एखादे दिवशीं तूं टाकलेल्या जाळ्यांत हुमापक्षीही सांपडेल. चोहींकडे निशाणावर बाण मारीत राहशील तर, एखादे दिवशीं तरी शिकारीवर नेम लागेल असा भरवंसा ठेव. अनेक शिंपांतून एखादींतच मोती सांपडतें व शेंकडों बाण मारावे तेव्हां एखादा निशाणावर लागतो.

याच विषयावर गोष्ट, एकविसावी.

एकाचा मुलगा पडावावरून हरवल्यानें तो रात्रभर सर्व काफल्यांत फिरत होता, व प्रत्येक डेऱ्यांत विचा-

रीत व चोहोंकडे शुंडीत होता. तेव्हां शेवटीं त्या अंधेऱ्या रात्रीं तो नयनानंददायी दीप त्यास सांपडला. तो आपल्या मेळ्यांतील लोकांकडे येऊन एका सारवा-नास म्हणाला, 'त्या मुलाचा शोध मीं कसा लावला, तें जाणतोस ? जो कोणी समोर येई, त्यास मी तोच समजत होतो.'

भक्तिमान् व थोर लोक एखादे वेळीं तरी माहात्म्यांची गांठ पडेल, या आशेवर मनोभावानें हरएकाचा शोध करितात. एका जीवाकरितां बहुतांचा भार सहन करतात व एका फुलाकरितां अनेक कंटकांची पीडा सोसतात.

याच विषयावर दुसरी गोष्ट, बाविसावी.

एका खडकाळ पडावावर एका राजपुत्राच्या टोपींतून एक रत्न रात्रीं तुटून पडलें. बापानें त्यास म्हटलें, 'या अंधेऱ्या रात्रीं, रत्न कोणचें व गार कोणची हें कसें समजणार, तेव्हां सर्व गारगोट्यांचा नीट तपास कर कारण रत्न कांहीं त्यांच्या बाहेर नाहीं.'

वेडगळ वेश व दरिद्री स्थिती यांतच महात्मे असतात. रत्न व गारगोट्या एकाच निस्तेज भूमींत सांपडतात. पूज्यबुद्धीनें हरएक भक्ताचा भार सोस, म्हणजे एखाद्या वेळीं महात्म्याची गांठ पडेल. मित्रावर प्रसन्न असलेला मनुष्य कधीं कधीं त्याच्याकरितां आपल्या शत्रूचाही त्रास सोसतो, हें पहात नाहींस का? प्रिय पात्राचें प्रेम मनांत जडलें असलें म्हणजे, हृदयास व्रण पाडणाऱ्या शत्रूचा त्रासही त्याच्याकरितां सोसावा लागतो. प्रफुल्लित

कांचनार पुष्पाच्या लोभानें वस्त्रविदारक कांटेही सोसावे लागतात, तसाच हा प्रकार होय.

एकाच्या लालचीनें सर्वांचा त्रास सोस, व एकटचा करितां शंभरांचें आदरातिथ्य कर. दिसण्यांत दीन, पतित, माथेफिराऊ, दुबळे व भिकारी, परंतु अंतर्दृष्टी अमे लोक, तुझ्यामतें पोक्त व थोर महात्मे नसले तरी, तन्मान्य गोष्टी ईश्वरास मान्य नाहींत कीं काय? तुझ्यामतें वाईट असलेला मनुष्य स्वक्षेत्राचा व स्वमनोवृत्तीचा पूर्ण-पणें स्वामी असेल, हें तुला कसें कळणार? संसारी लोकांच्या घरांचीं दारें ज्यांनां खुलीं नसतात, त्यांनां ईश्वरप्राप्तीचें द्वार कांहीं बंद असतें, असें नाहीं.

स्वतःवर संकटें घेणारे व असह्य कष्ट सोसून ईश्वर समीपता मिळविणारे पुष्कळ लोक दरिद्री वेषानें रहात असतात. तुझ्यांत बुद्धी व विचार असेल तर, युवराजा कारागृहांत असला तरी, त्याचा हात चुंबून त्याचें सहाय्य कर, कारण कदाचित् तो तेथून सुटून स्वपद पावेल तेव्हां तुलाही वैभवास पोहोंचवील. झाड पर्णहीन झालें म्हणून जाळूं नको. कारण तें, पुनः पालवी फुटलें म्हणजे, तुला अत्यंत सुख देईल व सुंदर दिसेल.

गोष्ट तेविसावी.

कृपण पिता व उधळ्या पुत्र.

एकाला खर्च करण्याचें मन होत नव्हतें. त्याच्यापाशीं द्रव्य होतें पण त्याचा उपभोग घेण्याची बुद्धी नव्हती. तो धनोपभोगानें मन तृप्त करून घेत नसे, व मरणोत्तर तें कामास यावें म्हणून त्याचें दानही करीत नसे. सुवर्ण

वं रुपें हीं दोन्हीं त्या कृपणाच्या घरीं जणों, हेमपां कारागृहांत असत.

त्याच्या मुलानें गुप्तपणें एके दिवशीं, त्या कृपणाची द्रव्य गाडून ठेवण्याची जागा पाहून घेतली, व तेथून द्रव्य काढून, उधळून, त्याच्या जागीं एक दगड पुरून ठेवला. त्या उधळ्या जवळ द्रव्य एका हातानें आलें व दुसऱ्या हातानें गेलें, टिकलें नाहीं, कारण तो अत्यंत खर्चिक व व्यसनी होता. त्याची टोपी व कुडतें सुद्धां बाजारांत गहाण होतीं.

इकडे बाप द्रव्यनाशाच्या दुःखामुळें स्वतःचा गळा दाबून घेत होता, व तिकडे मुलगा चंग व बासरी वाजविण्यांत दंग होता. दुःखाक्रोशामुळें बापास रात्रभर झोंप येत नसे. तेव्हां सकाळीं मुलानें त्यास हंसून म्हटलें, 'बाबा, द्रव्य उपभोगाकरितांच पाहिजे, सांठवून, गाडून ठेवण्यास द्रव्य काय व दगड काय एकच.'

लोक कठिण दगडांतून सोनें, दान, उपभोग व व्यवहार यांच्या करितां काढतात. संसारभक्त कृपणाच्या हातीं असलेलें सुवर्ण, दगडांतच आहे म्हणावयाचें. जिवंतपणीं स्वपुत्रांशीं वाईट वागशील तर, ते तुझें मरण इच्छितील याबद्दल तूं रडूं नकोस. तुझी स्थिती शेतांतल्या बागुलबावा प्रमाणें आहे. तो खालीं पडला कीं, लगेच पक्षी शेत खातात. तसेंच तूं पडलास कीं, तुझीं पोरें तुझें द्रव्य उडवितील.

द्रव्यसंपन्न कृपण मनुष्य, एखाद्या मोठ्या खजिन्यावर स्थापिलेल्या पिशाचाप्रमाणें आहे. ती संपत्ती तें पिशाच उभें असतें तोंवरच टिकते. त्या बागुलबोवाला

मृत्युरूप दांगडानें पाडलें कीं, लगेंच मागें, मुलें स्वस्थपणें संपत्ती वांटून टाकतात. या करितां मुंगीप्रमाणें खजिना सांठविण्यापेक्षां, कबरेंत तुलाच मुंग्या खाऊं लागण्यापुर्वीं, त्याचा उपभोग घे.

सादीचें बोलणें दाखल्याचें व उपदेशाचें आहे, तदनुरूप वर्तन करशील तर तें तुझ्या कामीं येईल, व त्याच्यापासून विमुख झालास तर दुःख पावशील, कारण अशा वर्तनाच्या योगानेंच संपत्ती मिळवितां येते.

गोष्ट चोविसावी.

अल्पोपकाराच्या बहुफलाविषयीं.

एकदां एका गृहस्थानें एक दांग दान करून एका वृद्धाची गरज भागविली होती. पुढें एकाएकीं त्याच्यावर आकाश कोसळून तो अपराधांत सांपडला व राजानें त्याला वधस्थानीं पाठविलें. स्वार इकडे तिकडे पळत होते व त्या ह्याताऱ्याचा आक्रोश व त्या तरुणास पुष्कळ शिपाई धरून नेत असलेले पाहण्यास गच्छोगच्छीं दारें खिडक्या व सज्जे यांच्यावर प्रेक्षकांची गर्दी, जमली होती.

त्या हतभाग्य तरुणास पाहून त्या ह्याताऱ्याचें अंतःकरण तुटूं लागलें, कारण त्यानें याचें मन एकदां आपलेंसें केलें होतें. तो ह्यातारा आक्रोश करून हात चोळीत ह्मणूं लागला कीं, 'राजा मेला, त्यानें जग मागें सोडलें, पण सर्वमान्य असें सद्गुर्तन बरोबर नेलें.' हें ऐकून ते शस्त्रपाणी स्वारही आपले ऊर, तोंड व हात

बडवून आक्रोश करूं लागले व राजवाड्यांत धांवत गेले. तेथें पाहतात तों राजा सिंहासनारूढ होता.

इतक्यांत इकडे तो तरुण मनुष्य तेथून सुटून पळून गेला. तेव्हां लोकांनीं त्या म्हाताऱ्याची मानगोटी धरून त्यास राजापुढें नेलें. त्यानें त्यास रागानें दरडावून म्हटलें, 'मी न्यायी व सद्वर्तनी असतां, तूं माझें मरण चिंतून, सर्व प्रजेचें अहित कां ईच्छिलेंस?' त्या वृद्धानें मधुर भाषण करून म्हटलें, 'हे राजा, सर्व पृथ्वी तुला वश होवो—राजा मरण पावला—या असत्य भाषणानें तूं कांहीं मेला नाहींस, पण त्या बिचाऱ्याचा प्राण वांचला.' या भाषणांनीं राजानें प्रसन्न होऊन त्याला कांहीं जास्त न बोलतां, थोडेंसें बक्षिस दिलें.

इकडे तो बिचारा तरुण गृहस्थ धडपडत चोहींकडे पळत होता. त्याला प्रेक्षकांपैकीं एका गृहस्थानें म्हटलें, 'तुझी मुक्तता होण्याजोगें तूं काय केलें होतेंस?' तो त्याच्या कानांत हळूच म्हणाला. 'मी केवळ एका दांगाच्या दानानेंच जिवानिशीं सुटलों.'

संकट समयीं फलप्रद व्हावें, म्हणूनच लोक एकेक बीज जमीनींत पेरीत असतात. वेळेवर एक जवही मोठें संकट सांवरूं सकतो. मूसापैगंबराच्या लहानशा काठीनें जालो बिनउतक् या महाराक्षसाचा नाश केला,—असें धर्मग्रंथांत लिहलें आहे,—तें, तूं जाणत नाहींस का?

अबूबकर साद येथील राजा आहे तोंवर, या राज्यांत शत्रूचा पाय कधीं दृष्टीस पडणार नाहीं. हे राजा, हें राज्य तुला शोभा देवो व तूं याचें पाळण करून यास शोभा दे. तुझ्या कारकीर्दीत कोणासही कोणापासून

त्रास सोसावा लागत नाहीं, व या राज्यरूप बागांतील एकहीं प्रजारूप पुष्प कंटकयुक्त नाहीं. या भूतलावर ईशकृपा-रूप छत्र तूच आहेस. किंबहुना, तू जगदुपकारक पैगंबराच्या योग्यतेचा आहेस. कोणी तुझी योग्यता जाणत नसेल तर काय चिंता आहे.—रमजानची २७ वी अति पुण्यप्रद अशी शबेकदर* ही रात्र सर्व लोकांस नीटपणें ओळीच कळते.

गोष्ट पंचविसावी.

सद्वर्तनाचें फल.

एकानें स्वप्नांत मेहपरच्या* जंगलांतील जमीन तप्त ताम्रवर्ण झालेली व लोक आकाशाकडे पाहून ओरडत असलेले पाहिले. त्या सर्वांत एक मनुष्य स्वर्गींचीं वस्त्रें पांघरून छायेंत उभा होता, त्याला त्यानें पुसलें, 'हे कुलदीपका, अशा समाजांत तुला कोण सहाय्य झाला?' तो म्हणाला, 'माझ्या दाराशीं एक द्राक्षवेल होती, तिच्या छायेंत एकदां एका सत्पुरुषानें विश्रांती घेतली होती. त्यानेंच, या निराशेच्या वेळीं, या दासाच्या पापाची क्षमा करून त्यावर कृपा कर, कारण त्याच्यापासून एक वेळ मला सुख मिळालें आहे.—अशी सर्वेश्वराजवळ प्रार्थना केली.'

---

* **शबेकदर्**, ही रात्र, मुसलमानी धर्माचे लोक, मोठी पवित्र व श्रेष्ठ मानतात. त्या रात्रीं स्तुती, व भजन केलेलीं, हजारपट फलप्रद होतात. अशी दंतकथा आहे. हिंदूलोकांतील **कपिलाषष्ठी** वगैरे महापर्वणीप्रमाणेंच ती एक आहे.

* **मेहपर**—स्वर्ग

शीराजच्या राजाजवळ, मीं ही आनंददायक व बीज-रूप गोष्ट बोललों तेव्हां, त्या धैर्यरूप छत्रानें व पृथ्वीचें पालन करणाऱ्यानें किती उत्तम उत्तर दिलें कीं, 'उपकारी मनुष्य हा फलवान् वृक्षाप्रमाणें आहे, पहाडांतील शुष्क काष्टावर कोणीही कुऱ्हाड मारील, पण सफल वृक्षावर कोण घाव घालील, हे राजा, तूं छाया देणाऱ्या वृक्षा-प्रमाणें आहेस व तुझे गुणरूप वृक्ष फार सुदृढ आहेत.

बोधवचन.

राजाचा धाक व प्रजाशासन.

येथवर उपकाराविषयीं बहुत विवेचन केलें, परंतु तो सर्वांवर सारखा करणें योग्य नव्हे. दुष्टांचे प्राण व वित्त हरण कर, कारण क्रूरपक्ष्याचे पंख व बाहू तोडलेले बरे. आपल्या वैऱ्याच्या हातीं दंड व दगड कां देतोस. कांटेरीं झाडें उपटून टाकून, फल देणारा वृक्ष पाळ. दीन अनाथावर जुलूम न करणाऱ्याचा बहुमान कर व जुलमी मनुष्यावर उपकार करूं नको. कारण त्यांत सर्व जगावर अपकार होईल. जगांस त्रास देणाऱ्याचा दीप मालवलेला बरा. सर्व लोक आगींत पडण्यापेक्षां, एक मनुष्य जळालेला बरा. चोरावर दया करण्यांत, स्वतःच व्यापारीलोकांचा घात केल्याप्रमाणें होणार आहे. जुलुमी मनुष्याचें डोकें ठेंच, कारण अशावर जुलूम करणें, हेंच न्याय्य होय.

गोष्ट सव्विसावी.

कुपात्रीं उपकार.

एका गृहस्थाच्या घरांतील छतावर मधमाशांचें पोळें लागलें होतें. त्याचा त्याला त्रास आला होता पण त्याच्या बायकोनें झटलें, 'यांनां काढून काय मिळणार? गरीब बिचाऱ्यांस व्यर्थ त्रास होईल.' तेव्हां तो आपल्या कामास गेला. पुढें एके दिवशीं त्या माशा त्याच्या बायकोला चावल्या. नवरा दुकानांतून घरीं आल्यावर त्या मूर्ख स्त्रीनें त्याच्यावर बराच गहजप केला. ती वेड्यासारखी गल्लोगल्लीं व दारोदार ओरडत फिरत होती. व नवरा तिला झणत होता, 'आतां दुसऱ्यास दोष देऊन आपलें मुख खिन्न करूं नको, कारण तूंच, त्या बिचाऱ्या मधमाशांनां काढूं नका, झणाली होतीस.'

दुष्टावर कृपाकरणारा मनुष्य, त्यांचा अहंपणा वाढविण्याला कारण होतो. सर्व जगाला त्रास देण्याचा एखाद्याचा हेतू दिसेल तेव्हां, तीक्ष्ण शस्त्रानें त्याचें डोकें कांप. कुत्र्यापुढें आदरानें कोण पान वाढून ठेवतो? एखाद्या सेवकास आज्ञा केली कीं तो त्याच्या पुढें हाडें टाकील.

एका गांवढळ वृद्धानें काय उत्तम गोष्ट सांगितली कीं, 'कुचर बैलावर पुष्कळ ओझें लादणें चांगलें. कोतवालच भलमनसात दाखवील तर, चोरामुळें रात्रीं कोणासही झोंप येणार नाहीं.'

समरांगणांत उसापेक्षां बांसाचा भाला लाखोंपट अधिक मौल्यवान् आहे. प्रत्येक मनुष्य उपकाराच्या लायख असतो असें नाहीं. कोणी कर्णभूषणें देण्यालायख व कोणी कर्णपीडणा लायख असतात. मांजराचा गौरव

केल्यानें तें कबूतरांस मारतें, व लांडग्यास पोसलें तर तो **यूसफ** सारख्यालाही फाडतो. पाया मजबूत न करितां, घर उंच केलें तर, कधीं तरी त्याच्यापासून धोका होणारच.

गोष्ट सत्ताविसावी.

दूरदृष्टी.

मोठा शिकारी व वनांत हमेषा फिरणाऱ्या अशा **बहिराम*** बादशहास एकदां त्याच्या अनावर घोड्यानें खालीं पाडलें. त्यावेळीं तो काय उत्तम गोष्ट बोलला कीं, 'मला आतां अश्वशाळेंतून दुसरा मस्ती न करणारा, व मस्ती केल्यास आवरतां येईल असा, घोडा घेतला पाहिजे.'

झरा लहान असतानां एका सळईनें रोंकतां येतो तोच वाढल्यावर हत्तीला रुकत नाहीं. मुला, नाला कोरडा असतानां अडीव, कारण पूर आल्यावर तो अडविणें सहज नाहीं. लांडगा जाळ्यांत फसला कीं मारावा, नाहीं-तर बकऱ्यांची आशा सोडावी. **सैतान** परमेश्वरास कधीं नमस्कार करणार नाहीं, तसेच हीनकुलोत्पन्न लोक कधीं भले असणार नाहींत. शत्रूला थोरवी किंवा अवकाश देऊं नको. शत्रू कूपांत व पिशाच कुपींत कैद केलेला बरा. साप सांपडल्यावर, त्यास मारण्या करितां काठी धुंडीत बसूं नको. तुझ्या हातांतील दगडा खालीं त्याचें डोकें आलें कीं, ठेंच. गरीब रयतेशीं लबाडी करणाऱ्या

---

* **बहिराम** गोर नांवाचा एक मोठा शिकारी बादशहा होऊन गेला.

कारकुनाचा हात तर्वारीनें तोडलेला बरा. कारण कुमार्ग-वर्ती कामगार तुला सुद्धां पापरूप अग्नींत नेऊन जाळतो. अशा लोकांच्या हातून राज्य कारभार योग्य चालेल असें समजूं नको. तो कामगार कशाचा? खरोखर एक दुर्दैवी पापमूर्ती आहे.

सज्जन लोकच सादीच्या उपदेशाची खरी योग्यता जाणतात, कारण त्यांचें बोलणें, राज्यवृद्धीचे उपाय, अर्थवाद व बुद्धिवाद यांणीं भरलेलें असतें.

दुसरा भाग समाप्त.

भाग तिसरा.

विषय व प्रेम.

ईश्वरपरायण लोक ईश्वरीक्षोभाचा खेद न मानतां आनंदच मानतात, व त्यांच्या पासून कांहीं पीडा झाली, किंवा मानसिक व्रणावर मलम लागलें, तरी ते एकसारखेच समाधान वृत्ती असतात. ते स्वतः निर्धन असूनही त्यांस राज्यवैभवाचा तिरस्कार असतो. ईश्वरप्राप्तीच्या आशेवर ते दारिद्र्यांतच समाधान मानून राहतात. ते प्रतिक्षणीं शांतिरूप मद्य सेवन करीत असतात. ईश्वरी क्षोभ दिसला तर गम खातात. मद्यपानाच्या सौख्यांत उन्माद हें एक संकट आहें, व पुष्प शाखेलाही त्रासदायक असा कांटा असतो. त्याचप्रमाणें ईश्वरनाम स्मरणांतहि गम खावा लागतो पण तो दुःखद वाटत नाहीं. कारण खऱ्या मित्राच्या हातून मिळालेला कडू पदार्थ ही साखरे प्रमाणें मिष्ट लागतो.

ईश्वराच्या बंदांतून भक्तरूप कैदी सुटूं चहात नाहीं, व त्याच्या जाळ्यांत फसलेली शिकार सुटूं इच्छित नाहीं. भगवद्भक्त लोक एकांतवास करणारे व ईश्वरापुढें हात पसरणारे, दिसण्यांत दरिद्री, पण ईश्वरप्राप्तीच्या योगानें खरोखर श्रीमान् असे असतात. ते सन्मित्रानें केलेली खरी निंदा स्वस्थपणें ऐकतात. माजलेला उंठ पुष्कळसें ओझें सहज वाहतो. अंधारांत ठेवलेलें अमृत हातीं लागणें जसें कठीण आहे, तद्वत् संसारी लोकांनां त्यांची स्थिती समजणें कठीण आहे. बैतुलमुकदस किंवा मक्केतील

इज्जाची जागा, तेजमय असूनही सभोंवती भित असल्यानें सर्वांस दिसत नाहीं, तशीच त्यांची स्थिती आहे.

ते लोक पतंगाप्रमाणें ज्योतीवर स्वतः उड्या घालतात, रेशमी किड्या प्रमाणें स्वयंमन्य होऊन, स्वतः वरच्च ताणे ओढीत नाहींत. मनास आनंद देणारें प्रियपात्र बगलेंत असूनही, ते लोक त्यास धुंडीत असतात. प्रत्यक्ष नदीतीरावर उभे असून, त्यांचे ओंठ तान्हेनें सुकून गेलेले असतात. जलपान करण्याचें त्यांस सामर्थ्य नाहीं असें नाहीं, तर नीलनदीच्या तीरावर असूनही, जलोदरी मनुष्याप्रमाणें त्यांची तृषा तृप्त होत नाहीं.

बोधवचन.

संसारी व विषयी लोकांच्या स्थितीवरून पारलौकिकविषयी लोकांच्या स्थितीचा निर्णय.

तुजप्रमाणेंच पृथ्वी व जल,यांच्या पासून उत्पन्न झालेल्या रूपावर, तुझें प्रेम जडल्यामुळें जो तूं समाधान व संतोष मानतोस तो मिथ्या आहे. प्रियकराच्या अंगावरील तीळ व त्याचे गाल याच्यावर मोहित होऊन, त्याच्या विरहामुळें मोठें दुःख मानतोस, व स्वप्नांतही त्याच्याच विचारांत गुंग असतोस, व तत्पदीं तूं इतका लीन होऊन जातोस कीं, त्याच्या पुढें हें सर्व जग तुला नाहींसें भासतें. तुझी संपत्ती तुझ्या प्रियकरास पसंत न पडली तर माती व संपत्ती तुला एकसारखी वाटते.

तुझ्या प्रियतम मित्राविषयीं तुझें मन विटलेंसें तुला वाटलें, तरी, तें विटणें केवळ तुझ्या दृष्टी पुरतेंच आहे. तूं आपले डोळे मिटलेस कीं, तो तुझ्या मनांत

उभा राहणारच. अशा मनुष्यामुळें आपण बदनाम होऊं, ही तुला भीती नसते. तसेंच त्याचा एकदम संबंध तोडण्याचें सामर्थ्य तुझ्या अंगीं नाहीं. त्यानें तुझा प्राण मागितला तरी, तूं तो तळहातावर घेऊन देण्यास तयार असतोस; व शिरच्छेद करण्यास त्यानें तरवार उपसली तर तूं शिर नमवितोस. वायूप्रमाणें चंचळ व अस्थिर अशा प्रेमाच्या नादीं तूं लागला असल्यानें असे अनर्थ होतात, तरी तूं त्याचा दास होऊन राहतोस.

तत्त्वज्ञानरूप समुद्रांत गर्क अशा सन्मार्गी महात्म्यांच्या वर्तनांशीं तुझ्या या वर्तनाचें कसें चमत्कारिक साम्य आहे पहा. प्रियपात्राच्या नादांत तुला देह भान नसतें, व ते लोक, ईश्वर भजनांत गुंग असल्यानें, त्यांनां या जगाचें भान रहात नाहीं. ते लोक ईश्वर भजनीं रत व जगांतून परागंदा झालेले असतात, व ते असे मस्त असतात कीं त्यांच्या तोंडून जणों मद्याचा वर्षाव होत असतो. या त्यांच्या रोगाची चिकित्सा कोणास नसल्यानें त्यांनां औषधोपचार होऊं शकत नाहीं. जन्मादारभ्य त्यांच्या कानांत 'अलस्त' चा नाद असा घुमून गेला आहे कीं, त्यामुळें ते एकसारखे 'तूच आहेस,' या वाक्याचा घोष करीत असतात.

समीपता मुक्तीस पोंचलेले पैगंबर, वलीअल्ला, वगैरे महात्मे लोक, बाह्यतः दरिद्री व राखेंत दबलेल्या अग्नी प्रमाणें, परंतु आंतून प्रज्वलित असे असतात. ते एका आवाजा सरशी पर्वतांचें उन्मूलन किंवा, राज्याचें राज्य उद्ध्वस्त करूं शकतात. ते हवे प्रमाणें अदृष्ट व तीव्रगति व कस्तुरीप्रमाणें झांकलेले व नामस्मरणांत दंग असतात.

ते दररोज सकाळीं इतके रडतात कीं अश्रुजलानें त्यांच्या नेत्रांतील निद्रारूप सुर्मा धुतला जातो. त्यांचा वाणिरूप अश्व रात्रभर दवडल्या मुळेंच जणूं थकलेला असतो तरी पहांटे तो पुनः चालत नाहीं, ह्मणून ते रडतात.

नेहमीं शोकसागरांत निमग्न व खिन्न असल्यानें, त्यांस रात्र किंवा दिवस समजत नाहीं. प्रत्यक्ष सौंदर्य देणाऱ्या परमेश्वराच्या सौंदर्यावरच ते इतके लुब्ध आहेत कीं, इतर सुंदर माणसांशीं ते अगदीं संबंध ठेवीत नाहींत. महात्मे व मनस्वी लोक केवळ बाह्यतः सुंदर चर्मावर भुलत नाहींत. कोणी मूर्ख मनुष्य अशांवर लुब्ध होईल तर त्यांस शून्यमेंदु ह्मटलें पाहिजे.* ज्यानें इहपर दोन्ही लोकांचा व मुक्तीचाही त्याग केला, त्यानेंच एकेश्वर ज्ञानरूप मद्याचें खरें प्राशन केलें.

गोष्ट पहिली.

राजपुत्र व फकीरपुत्र.

एक फकीरपुत्र एका राजपुत्रावर मोहित झाला व या असाध्य वस्तुलाभाची प्रत्यहीं व्यर्थ इच्छा करून तो नेहमीं याच विचारांत असे. ही इच्छा सफल होईल अशी त्यास आशा होती. तो राजवाड्यापुढील मैदानांतून मैलाच्या दगडाप्रमाणें कधीं दूर न होतां, सर्वदां राजपुत्राच्या घोड्याजवळ बुद्धिबळांतील हत्तीप्रमाणें उभा असे. प्रेमदग्ध मन झाल्यानें तो तत्प्राप्तीची आशाधरून होता. व रडण्यामुळें त्याचे पाय जणूं गाळांत फसले होते.

त्याची दुःखद स्थिती राजपुत्राच्या सेवकांस कळतांच,

---

* "अगर जिस अहमकनें दिया तो गोया वो नादान है."

त्यांनीं त्याला पुनः तेथें न फिरण्याबद्दल ताकीद दिली. तेव्हां थोडावेळ एकीकडे जाऊन पुनः प्रियकराच्या मुखाचें स्मरण होतांच त्यानें त्याच्या वटेवर डेरा दिला. हें पाहून एका राजसेवकानें, त्याला सर्वांगावर पुष्कळ मारून झटलें, 'तुला पुनः येथें न येण्या विषयीं ताकीद दिली असतां कां आलास?' तरी ही प्रियकराचे दर्शनाची उत्कंठा फार असल्यानें व त्याच्यानें धैर्य न धरवल्यानें तो पुनः तेथें गेला. साखरेवर बसलेल्या माशीप्रमाणें वरचेवर हांकलें तरी तो पुनः तेथें जाई.

त्याला कोणी झटलें, 'या मूर्खाला काठ्या व दगडाचा मार चांगला सोसवतो.' तेव्हां त्यानें उत्तर दिलें, 'ही माझी दुर्दशा त्या प्रियकराकरितां होत आहे. मित्राकरितां आपली दुर्दशा झाली झणून रडणें योग्य नाहीं. मी तरी याप्रमाणें स्नेह ठेवतों मग तो स्नेह ठेवो किंवा वैर करो. तत्समागमाविना मी धीर धरण्याची उमेद करूं नये व तो सन्निध असला तरी माझें मन स्थिर राहणें कठीण. मला धीरही धरवत नाहीं, व त्याच्याशीं कलहही करवंत नाहीं. मला येथें राहवत नाहीं, व पळूनही जाववत नाहीं. त्याच्या देवडीवर डोकें देऊन राहूं नको असें मला सांगून काय उपयोग? त्यानें तंबूच्या मेखेप्रमाणें माझें डोकें तणावे देऊन ओढलें तरी पतकरलें. पतंग स्नेहा करितां, दिव्यावर प्राण देऊन तो अंधारांत एकीकडे जिवंत राहण्यापेक्षां असें मरण आलेलें बरें, असें समजत नाहीं का?"

यावर त्या गृहस्थानें झटलें. 'त्यानें तुला काठीनें

टोला मारला तर कसें?' तो ह्मणाला, 'त्यानें टोला मारला तर मी त्याच्या पायांशीं चेंडू प्रमाणें पुनःजाऊन पडेन.' तीक्ष्ण तर्वारीनें त्यानें तुझें डोकें तोडलें तर.' तो ह्मणाला, 'त्यानें डोकें मारलें तरी मला वाईट वाटणार नाहीं.'

आपल्या खऱ्या प्रियपात्राच्या हातून कांहीं यःकश्चित वावगें झालें ह्मणून त्या करितां, अपसांत त्रास किंवा क्रोध करणें योग्य नव्हे. माझ्या मस्तकावर मुकुट आहे, किंवा घातक परशु आहे, यांचें मला भान नाहीं. मी अधीर आहें, ह्मणून रागावूं नको, कारण खऱ्या प्रेमांत विचार व धैर्य कायम रहात नाहींत. याकुबाप्रमाणें माझे डोळे गेले तरी नेत्रांपासून यूसफाला पुनः एकवार पाहण्याची माझी आशा नाहींशी होणार नाहीं.

एके दिवशीं राजपुत्राच्या घोड्याच्या रिकाबीस स्पर्श करून त्यानें तिचें चुंबन केलेलें पाहून, तो राजपुत्र संतापून त्यानें आपल्या घोड्याची लगाम फेरली. हें पाहून तो गृहस्थ हंसून ह्मणाला, 'अशी लगाम फेरूं नको. राजलोक कधींही लगाम फेरीत नाहींत. तूं खुशाल आहेस, एवढ्यांत मी स्वतःचें भान विसरलों, व तुझ्या स्मरणानें माझ्यांत अहंभाव अगदीं अवशेष राहिला नाहीं. माझा दोष दिसला तरी तूं तो प्रगट करूं नको कारण माझ्या मनांत तुजवांचून इतर कोणाचीच मूर्ती ठसलेली नाहीं. मी तर स्वतःविषयीं बेपर्वा होऊनच बुद्धया तुझ्या रिकाबींत हात घातला व तत्क्षणींच आपल्या नांवावर रेघ ओढून आपल्या सुदैवाच्या

मस्तकावर पाय ठेविला. तुझा प्रमत्त नेत्र कटाक्षच माझे प्राण हरण करण्यास समर्थ असतानां तर्वारीवर हात घालण्याची काय जरूर? मद्देहरूप काष्टांत तुजमुळेंच अग्नी उत्पन्न होणार आहे, कारण तूं नसशील अशा अरण्यतुल्य जागेंत तें धड न सुकलेलें न ओलें असेंच राहील.'

गोष्ट दुसरी.

खऱ्या प्रेमांत निमग्न होणें.

एका गवायाचें गाणें ऐकून एक सुंदर माषूक फार प्रसन्न होऊन देहभान विसरून प्रेमभरानें नाचूं लागलें, इतक्यांत त्याच्या पदरास आग लागल्यानें तें अगदीं घाबरून जाऊन त्याची गाळण झाली. एका स्नेह्यानें त्यास ह्मटलें, 'भितोस कां? अग्नीनें तुझीं केवळ वस्त्रेंच जाळलीं पण माझें तर सर्वस्वी देहभान जाळून टाकलें.'

खरा प्रेमळ मित्र असशिल तर स्वतःच्याच दुःखाविषयीं अगदीं उच्चार करूं नकोस, कारण मित्र व स्वतः दोन्हीं केवळ एकजीव आहेत.

गोष्ट तिसरी.

निःसीम प्रेमळ लोकांची कृती.

एका शहाण्या वृद्ध गृहस्थाच्या तोंडून असें ऐकल्याचें स्मरतें कीं, एक वेडा मुलगा वनवासास चालला हें पाहून बापानें त्याच्या विरहामुळें आहारविहार सोडला. लोकांनीं त्या मुलास निषेध केला. तेव्हां तो ह्मणाला, 'मला

ईश्वरानें आपला ह्मटल्या पासून माझें दुसऱ्या कोणावरही प्रेम राहिलें नाहीं. ईश्वर साक्ष सांगतो कीं, ईश्वरी सौंदर्य मला दिसल्यापासून दुसऱ्या कोणच्याही दृश्य गोष्टींचें मला भानच नाहीं.'

संसार पराङ्मुख मनुष्य परागंदा किंवा नष्ट झाला, असें नसून, वास्तविकपणें जो प्रथम स्वपराङ्मुख होतो, त्यासच खरें आत्मज्ञान झालें ह्मणावयाचें. अशा लोकांचें या जगांत वेडयाप्रमाणें वर्तन दिसतें. त्यांनां पशूही ह्मणतां येईल व महात्मेही ह्मणतां येईल. त्यांच्या ईश्वरस्मरणांत देवदूताच्या ईश्वरस्मरणा प्रमाणें कधीं अंतर पडत नाहीं. त्यांस कधीं तृप्ती नाहीं. ते तोकड्या-हातांचे परंतु मुष्टढ बाहूंचे असे आहेत. केव्हां केव्हां एकांतवासांत कंथा शिवीत बसले असून ही तृप्त, कधीं कधीं समाजांत असून त्रासलेले व कपडे जाळणारे असतात. त्यांनां स्वतःचा विचार किंवा कोणाची परवा नसते. व एकेश्वर विचाररूप समाधींत त्यांच्या मनांत दुसऱ्या कशाला थारा नसतो. उपदेशानें त्यांचे कान परिपूर्ण आहेत तरी, त्यांची बुद्धि व देहभान स्थिर नसतें. बदकास समुद्रांत बुडण्याचें किंवा अग्निकीटकास आगींत जळण्याचें भय नसतें, तशी त्यांची स्थिती असते.

ते रिक्तहस्त परंतु पूर्णमनोरथ व संभाराविना वनसंचार करणारे असतात. संसारिकांनीं बरें ह्मणण्याची ते इच्छा ठेवीत नाहींत. ईश्वरास मान्य अशा गोष्टीच त्यांनां पुरे असतात. ते महात्मे संसारिकांच्या दृष्टीस सुद्धां पडत नाहींत. त्यांस जानवें घालण्याची किंवा कंथा पांघ-

रण्याची जरूरी नसते. ते द्राक्षवल्लीप्रमाणें सफलछाय असतात, आह्मां कृष्णकर्मी लोकांप्रमाणें पातकी अमत नाहींत. शिंपीप्रमाणें सतेज अंतःकरण असतात, समुद्राप्रमाणें फेंसाळलेले नव्हेत.

सर्व मनुष्यमात्र एकसारखे हाडामांसाचे बनलेले असतात तरी त्यासर्वांतच खरा जीव व तत्त्वार्थ ज्ञान असतें असें नाहीं. राजा प्रत्येक सेवकाचें मन सारखें वश करूं शकतो असें नाहीं, तसेंच प्रत्येक कंथेच्या आड जीवन्मुक्त महात्मा आढळेल असें नाहीं. प्रत्येक पावसाच्या बिंदूपासून मोतीं होईल तर बाजार कवड्याप्रमाणें मोत्यांनींच भरून जाईल. नटाप्रमाणें ते आपल्या पायांस लांकडें बांधून घेत नाहींत कारण लांकडी पाय जमीनीवरून उठाविण्यास मुष्कील पडते. ते महात्मे ईश्वराचे सहवासी झालेले असतात व तत्कृपेच्या एकच घोटानें आप्रळय मस्त होऊन गेलेले असतात. ते आपल्या मनोरथांपासून कोणी तर्वार मारली तरी हात मागें घेत नाहींत. कारण खरी उत्सुकता व प्रेम आणि सारासार विचार झटला झणजे दगड व कांच यांच्या परस्पर आघाताप्रमाणें आहे. त्यांत एकाचा पार नाश होणार.

गोष्ट चौथी.

प्रेमातिशयांत निमग्न होणें.

समरकंद शहरांत एका गृहस्थाचें एक प्रियपात्र होतें. त्याचें भाषण जणों साखरेनें भरलेलें, व सौंदर्य

चंद्रापासून हरण केलेलें असें होतें. त्याच्या हावभावा पुढें भक्तजनही लटपटून जात. तो असा सुंदर होता कीं जणों त्याला घडण्यांत ईश्वराच्या लावण्य रचनेची सीमा झाली होती. त्याला चालतानां पाहून त्याच्याकडे लागलेले प्रेक्षकांचे नेत्ररूप रज्जू त्यांच्या मनास आकर्षून घेऊन त्यांस तल्लीन करून सोडीत.

या त्याच्या मित्रानें एकदां चोरून त्याच्याकडे पाहिलें, तेव्हां त्या प्रिय पात्रानें त्रासून वक्र दृष्टीनें पाहून झटलें, 'हे माथेफिरू मुर्खा, माझ्या मागें कितीही फिरलास तरी मी तुझ्या जाळ्यांत फसणारें पाखरूं नाहीं, हें तूं जाणत नाहींस का? पुनः मजसमोर आलास तर शत्रूप्रमाणें बेशक तुझें तर्वारीनें डोकें मारीन.'

यावरून कोणी त्या मित्रास झटलें 'आतां मात्र तूं स्वतःविषयीं जप, विचार कर व याहून सुलभ प्रियपात्राच्या प्राप्तीचा यत्न कर कारण, हे तुझे मनोरथ सफल होतीलसें दिसत नाहीं. या नादांत व्यर्थ प्राण गमविले असें न होवो.'

हा व्याजोपदेश त्या खऱ्या प्रेमपाशबद्धानें ऐकून अंतःकरणांतील व्यथेमुळें सडकून आक्रोश करून तो झणाला, 'बाबा चुप रहा ही उपदेशाची वेळ नाहीं. त्याच्या शस्त्र घातानें रक्तबंबाळ झालेलें माझें शरीर मातींत लोळलेलें पत्करलें. कारण शत्रू व मित्र पुढें निदान एवढें झणतील कीं हा त्याच्या हातून व त्याच्या शस्त्रानें मारला गेला आहे. मी त्याच्या मार्गातून एकीकडे पळूंच शकत नाहीं त्या अर्थीं दाद लागण्यांत माझी अशी अब्रू गेलेली पतकरली. हे स्वयंमन्या,

तूं मला याचा नाद सोडण्यास सांगतोस, यापेक्षां असें मला सांगण्याचा नाद तूंच सोडणें बरें, याकरितां कृपा करून स्वस्थहो. तो जें करील—मग त्यांत माझा खून करील तरी—तें चागलेंच होईल. त्याची आग मला प्रतिरात्रीं जाळीत असते, व पहांटे जणों त्याच्याच सुवासरूप मंद शीतळ वायूनें मी पुनः जिवंत होतों. त्या मित्राच्या वाटेंत आज जरी मी मारला गेलों तरी, अखेर दिवसापर्यंत मला त्याचा सारखा सहवास घडेल.'

अशा झगड्यांत होईल तोंवर पाठ देऊं नको, कारण सादी प्रेमदग्ध झाल्यानेंच जीवन्मुक्त झाला आहे.

गोष्ट पांचवी.

प्रेमांत निमग्न होणें व त्याच्या पायीं मरण आलें तरी संतोष मानणें.

एक गृहस्थ आसन्नमरण व तृषाक्रांत होऊन म्हणत होता कीं, 'थंड पाण्यांत बुडून मरणारा मनुष्य मोठा दैववान् होय.' त्याला एका मुलानें म्हटलें, 'हे मूर्खा, तूं मरतो आहेस तेव्हां पाण्यांत बुडलेला काय व तान्हेनें ओंठ सुकलेला काय?' त्यावर तो म्हणाला, 'मी शेवटपर्यंत ओंठ ओले करणार नाहीं, म्हणजे माझा प्रिय जीव शेवटीं त्याच्याच सुखांत निमग्न राहील. तान्हेला मनुष्य गच्चविरून हौदांत पडून मेला तरी बेहत्तर असें म्हणून वेळेवर पाण्यांत जीव देण्यासही तयार असतो.'

तूं खरा आषक असलास तर, आपल्या खऱ्या माषुकाचा पदर धर व तो तुला प्राण मागेल तरी दे. स्वतःचा अत्यंतभावरूप नरकावरून पार जाशील, तेव्हांच

तुला खरें स्वर्गसुख मिळेल. बीज पेरणाऱ्यास प्रथम मोठा त्रास पडतो, पण खळें तयार झालें ह्मणजे त्यास सुखानें झोंप येते. ज्याला मरण प्रसंगीं ही गोड प्रेमामृताचा प्याला मिळाला, तोच मनुष्य या प्रेमसागरांत सफलमनोरथ होतो.

गोष्ट सहावी.

ईश्वरनिष्ठ फकीर लोकांचें समाधान व योग्यता.

ईश्वरनिष्ठ व बाह्यतः भिकारी व दीन, पण, संपन्न व राजाप्रमाणें, अशा लोकांविषयीं एक कथा ऐकण्यांत आहे कीं, एक वृद्ध फकीर सकाळीं भिक्षा मागण्यास निघाला व एका मशीदीचें दार पाहून त्यानें तेथें सव्वाल केला. त्यावर एकानें त्यास ह्मटलें, 'हें दार संसाऱ्याचें नाहीं, ह्मणून येथें तुला कोणी कांहीं देईल या आशेवर तूं उभा राहूं नको.' त्यानें विचारलें, 'ज्याला कोणाची ही स्थिती पाहून दया येत नाहीं, अशा कोण निर्दयाचें हें घर आहे?' तो गृहस्थ ह्मणाला, 'चूप हे काय पाप शब्द उच्चारतोस. आपणां सर्वांचा स्वामी, तोच या घराचा मालक आहे.'

हें ऐकून त्यानें नीट लक्ष पूर्वक पाहिलें, तों त्यास कंदील व मेहराब दिसलीं. तीं पाहून दग्धांतःकरण होऊन, त्यानें दीर्घ उश्वास सोडून, ओरडून ह्मटलें, 'या घराच्या दारापुढून दुसरीकडे व विन्मुख जाणें मूर्खपणा होय. मी आजवर कोणाच्याच गल्लींतून विन्मुख परतलों नाहीं, तेव्हां या मंदिराच्या दारापुढून ओशाळा कशास्तव जाऊं? याच

जांगीं भिक्षेकरितां हात पसरीन, कारण येथून रिकाम्या हातानें परतावें लागणार नाहीं, हें मी पक्कें जाणतों.'

असें सांगतात कीं तो तेथें सारखा वर्षभर ईश्वरापुढें हात पसरून बसला. पुढें एका रात्रीं त्याचा आयुष्य-रूप पाय मृत्युरूप गाळांत फसून अत्यंत दुर्बलतेमुळें त्याचे प्राण व्याकूळ होऊन तडफडूं लागले. पहांटे एकानें त्याच्या डोक्याशीं दिवा नेऊन पाहिलें तों, त्याची प्राणज्योती प्रातःकाळच्या दीपाप्रमाणें लुप्त-तेज होऊन गेली होती, व तो आनंदभरानें पुट पुटत होता कीं, 'ज्यानें सिद्ध पुरुषाचें द्वार प्रेमानें ठोठावलें त्याच्याकरितां तें द्वार तेव्हांच उघडलें जातें, याचकाला मात्र धीर व दृढनिश्चय पाहिजे.'

किम्प्रयागर कधीं नाउमेद होत नाहीं. एखादे दिवशीं तरी तांब्याचें सोनें होईल या आशेनें तो अगणित सोनें कसें सारखें मातींत मिळवीत असतो! वास्तविकपणें एखादी चांगली वस्तू विकत घेण्याकरितांच संपत्ती आहे. तेव्हां ती देऊन मित्रप्रेम घेण्यापेक्षां आणखी काय चांगलें आहे?

कोणा मित्राकडून तुला कांहीं त्रास झाला तरी एकदम खिन्न होऊं नको, कारण, तुझी घस सोसणारा असा दुसरा मित्र तुझ्या हातीं सहसा लागणार नाहीं. त्याच्या कडवेपणामुळें, तूं आपल्या मनोविकारांस कडू होऊं न देतां, प्रेमजलानें त्याचा ताप विझवि. त्याच्या तोडीचा दुसरा मित्र तुला मिळण्यासारखा नसेल तर थोड्याशा त्रासाकरितां त्याला सोडूं नको. ज्याच्यावांचून

तुझें चालेल अशी खात्री असेल त्याच मनुष्याशीं वैर करणें योग्य आहे.

गोष्ट सातवी.

दृढनिश्चयी याचकावर कोप केला तरी तो खिन्न होत नाहीं याविषयीं.

एका भक्तानें रात्रभर जागरण करून प्रातःकाळीं वर मागण्याकरितां हात जोडले. तेव्हां त्या वृद्ध भक्ताच्या कानांत आकाशवाणी झाली कीं, 'तूं विन्मुख परत जाऊन आत्मविचार कर, या द्वारावर तुझी प्रार्थना मान्य होणार नाहीं, याकरितां विन्मुख परत जा, किंवा रडत उभा रहा.' दुसऱ्या रात्रींही ईश्वराचें ध्यान व भजन करण्याचें त्यानें सोडलें नाहीं, किंवा तो निजला नाहीं.

एका भक्तानें त्याची ती स्थिती पाहून त्यास म्हटलें, 'हें द्वार तुला खुलें नाहीं व तें कोणी तुजकरितां उघडीत नाहीं, त्या अर्थीं व्यर्थ इतके परिश्रम करूं नको.'

तेव्हां आपल्या लाल गालावर अश्रू गाळून दीनपणें रडून तो म्हणाला, 'अरे, त्यानें लगाम खेंचला म्हणून मी जेरबंदापासून हात सोडीन असें समजूं नको. याशिवाय दुसरा मार्ग मला मिळता तर, मी येथून विन्मुख होऊन त्या मार्गाकडे वळतों. दुसरें द्वार सांपडण्याजोगें असल्यावर याचक एका द्वारापुढून विन्मुख गेल्यास काय चिंता आहे? पण असें ऐकतों कीं, या गल्लीतून दुसरा रस्ताच नाहीं, व मलाही यावांचून दुसरा स्ता ठाऊक नाहीं.' असें म्हणून तो दृढनिश्चयानें तेथेंच आपलें शिर अर्पण

करण्यास सिद्ध होऊन बसला. तेव्हां त्याच्या मानसिक कर्णांत आकाशवाणी झाली कीं, 'ज्याअर्थीं याला स्वःतची योग्यता व आढ्यता किंवा दुसऱ्या कोणाचा आधार नाहीं, त्याअर्थीं याची प्रार्थना आह्मांस मान्य आहे.'

गोष्ट आठवी.

रात्रीच्या निमाजावद्दल.

नैषापूर* शहरांत एक मुलगा निजते वेळचा निमाज न पढतां निजलेला पाहून एका गृहस्थानें ह्मटलें, 'मुला श्रम केल्यावांचून मुक्कामावर पोहोंचशील अशी उमेद धरूं नको. गव्हाचें कापलेलें शेत पुनः हिरवेंगार झालें तरी, दिसण्यांत मात्र हिरवें पण त्यापासून कांहीं फल नाहीं, सबब तें असून नसून सारखेंच. स्वहिताची इच्छा ठेव व नुकसानाला भी. व्यर्थ आयुष्य गमविणाऱ्याचा जन्म निष्फल होय.'

गोष्ट नववी.

अक्षम्यअपकाराचीही क्षमाकरणें.

एक नवोढा तरुणी आपल्या वृद्ध पित्याजवळ गाऱ्हाणें गात होती कीं, 'तुझ्या जांवयाचें मजवर प्रेम नाहीं. तो मजवर रुष्ट आहे, व ह्मणतो कीं, या अवदसेच्या संगतीनें माझें आयुष्य फार दुःखानें व कष्टानें वाया जात आहे.—माझ्या बरोबरीच्या दुसऱ्या

* इराण देशांतील एक प्रसिद्ध शहर.

मुली मजप्रमाणें कष्टी असल्याचें मला आढळत नाहीं. त्या स्त्रीपुरुषांचें परस्पर असें प्रेम आहे कीं, तीं जणूं एका सालींतील दोन वियांप्रमाणें दिसतात. मला पाहून हस्तमुख झालेला, असा मीं आपल्या नवऱ्याला आजवर कधीं पाहिला नाहीं, ही गोष्ट त्या सात्विक वृद्धानें ऐकून—वयोवृद्ध मनुष्य वर्तमानज्ञ ज्ञानवान् असतो—काय उत्तम उत्तर दिलें, 'तो एक सुंदर असेल तर त्याचा सर्व भार तूं मुकाट्यानें सोस.'

ज्याच्यासारखा दुसरा मिळणें दुर्लभ अशा मनुष्याशीं दुर्मुख होणें दुःखद होय. तुझ्या जीवित्वरूप अक्षरावर लेखणी फिरवून, तुझा क्षणांत नाश करूं शकणाऱ्या मनुष्याशीं स्पर्धा व गर्वाचें वर्तन कां करतोस? ईश्वराच्या सर्व आज्ञा दीन दासाप्रमाणें प्रसन्न मनानें पाळ. कारण त्याच्यासारखा सर्वेश्वर व सर्वपालक तुला दुसरा कोणी मिळणार नाहीं.

गोष्ट दहावी.

दास व धनी.

एके दिवशीं एका दासाला त्याचा धनी विकीत असतानां पाहून माझें अंतःकरण जळून गेलें. 'तो आपल्या धन्याला म्हणत होता, 'तुला मजपेक्षां चांगले दास पुष्कळ मिळतील पण मला तुजसारखा धनी पुनः मिळणार नाहीं.'

गोष्ट अकरावी.

केव्हां केव्हां उपचारापेक्षां रोगच प्रियतर असतो, याविषयीं.

मर्व्ह* शहरांत एक सुस्वरूप वैद्य होता. त्याचें उंच शरीर मानसोपवनांत सुरूच्या झाडाप्रमाणें होतें. त्याचें मन कधींच दुःखी झालेलें नव्हतें. त्याला पाहतांच व्याधिताची व्यथा दूर होत असे व तो दृष्टीसमोर असल्यानें रोग्यासही देहभान रहात नसे.

असें सांगतात कीं, एक गरीब दुखणाईत नेहमीं म्हणत असें कीं, 'हा वैद्य माझ्या दृष्टीसमोर आहे तोंवर माझें मन प्रसन्न राहून मला आराम वाटतो. मी माझें दुखणें बरें व्हावें असें इच्छीत नाहीं, कारण पुढें तो वैद्य माझ्या दृष्टीस पडणार नाहीं.'

थोर, बुद्धिवान् व बलाढ्य, अशा लोकांसही ईश्वर प्रेमविचारानें हतवीर्य करून सोडलें आहे. तत्प्रेमविचारानें प्रत्यक्ष ज्ञानाचे कान उपटून त्यास दंग करून सोडल्यावर, देहभान कशाचें पुनः आपलें मस्तक वर उचलतें?

गोष्ट बारावी.

बुद्धीहून प्रेमाचें प्राबल्य.

एक मनुष्य अत्यंत बलवान् होता. तो लोखंडाचा पंजा वांकविण्याची व वाघाशीं युद्ध करण्याची इच्छा

---

* **मर्व्ह** नांवाचें एक प्राचीन व नामांकित शहर **मध्यएशियेंत** आहे. तेथील मुसलमानी राज्य खालसा करून थोड्याच वर्षांपूर्वी **रशियाच्या** बादशहानें तें आपल्या राज्यांत सामिल केलें आहे.

करीत होता, पण एकदां स्वतः वाघानेंच त्याला पंजानें ओढलें. तेव्हां आपल्या पंजात जोर नाहीं असें त्या गृहस्थास दिसून आलें. शेवटीं एकानें त्याला झटलें, 'तूं वायकोसारखा निजतोस काय? याला आपल्या लोहमय पंजानें मार.' त्यावर त्या बिचाऱ्यानें झटलें, 'या पंजानें आतां मला वाघाशीं लढतां येणार नाहीं.'

बुद्धीहून प्रेमाचें वर्चस्व होतें, तेव्हां तीच बुद्धी व तेंच प्रेम लोहमय पंजा व वाघाप्रमाणें होऊन जातें. तूं स्वतः नरव्याघ्राच्या तावडींत फसलेला असल्यावर तुझा लोहमय पंजा तुला काय फल देणार? बुद्धीवर प्रेमाचा वर्चष्मा झाला झणजे त्याला दुसरी उपमाच नाहीं. त्याची स्थिती हातीं गेंद व खेळण्याचा दांडू आल्याप्रमाणेंच होते. त्याला वाटेल तिकडे फेंकून मारावा.

गोष्ट तेरावी.

मित्राच्या दृष्टीनें मित्राचा मोठेपणा.

दोन मोठ्या कुलांतील व सूर्याप्रमाणें तेंजःपुंज अशा मुलत भावंडांचें लग्न झालें होतें. लग्न झाल्यानें एक फार आनंदी व दुसरा खिन्न व त्रस्त झाला होता. एक अप्सरेप्रमाणें सुंदर व मोहक होती. व दुसरा तिलापाहून आपलें मुख मिंतीकडे फिरविणारा होता. एक स्वतःचे शरीरास शृंगारवीत असे. दुसरा ईश्वराजवळ मरण मागत असे.

त्या नवऱ्याला गांवांतील वृद्ध लोकांनीं बोलावून बसवून झटलें, 'तुझें तिच्यावर प्रेम नसलें तर तिचें

स्त्रीधन तिला परत दे.' तो ह्मणाला, 'शंभर बकरीं घेऊन हा त्रास माझ्या मागचा सुटला तरी घ्रें.' हें ऐकून त्या अप्सरोमुखीनें नखानें जमीन उकरीत ह्मटलें, 'मी आपलें प्रेम कसें तोडूं शकेन? त्यानें सर्व स्त्रीधन परत देऊन मजवरचें प्रेम सोडून माझें नांव सोडलें, ह्मणून मला त्याचें काय? तो मान्य करो किंवा नकरो, मी तर असेंच त्यावर प्रेम करीन. त्याचा त्रास सोसूनही मी त्याच्यावर प्रेमच करीन. त्या प्रियकराचें प्रियदर्शन सुटून मला शंभर किंवहुना, तीन लक्षही बकरीं नकोत.'

प्रियकराचा विसर न पाडणारी वस्तूच, खरोखर तुला खरा आनंद देणारी होय, एकानें एका मुक्तास एक प्रश्न लिहून धाडला कीं, 'तुला स्वर्ग व नर्क यांतून काय पसंत आहे? तो ह्मणाला, 'मला हें विचारूं नको. तो जें मजकरितां पसंत करील, तेंच मला पसंत आहे.

गोष्ट चौदावी.

मजनूचें* लैलीवरील* खरें प्रेम.

मजनूला एकानें ह्मटलें 'हे सन्मार्गी गृहस्था, तूं पुनः हैकडे येत नाहींस, ही किती आश्चर्याची गोष्ट आहे. कदाचित् तुझ्यामनांत लैलीविषयीं आतां प्रेम राहिलें

---

* **मजनू व लैली**—**मजनू** अर्वस्थानचा राहणारा एक सद्गृहस्थ होता, तो **लैली** नांवाच्या एका स्त्रीवर अतिशय आसक्त व मोहित झाला होता. या उभयतांचा संभोग व विप्रलंभशृंगार व परस्परांवरील अद्वितीय प्रेम यांचें **निजामी** नांवाच्या कवीनें उत्तम वर्णन केलें आहे.

नाहीं, किंवा दुसऱ्या कोणावर तुझें प्रेम जडल्यानें कदाचित् तुला तिची इच्छा राहिली नाहीं.'

हें ऐकतांच तो बिचारा रडूं ओरडूं लागला, व ह्मणाला, 'हे भल्या गृहस्था, माझा नाद सोड व उठून चालता हो, माझें मन आधींच दुःखी व कष्टी आहे. तू आणखी माझ्या क्षतावर क्षार टाकूं नको. मला तिचा वीट आल्यामुळें, मी दूर राहतों असें नाहीं. फार दिवस दूर राहणें निरुपायामुळेंच होत असतें."

त्यागृहस्थानें ह्मटलें, 'हे प्रसिद्ध व सुशील गृहस्था, लैलीकडे कांहीं निरोप पोचविणें असेल तर सांग.' तो ह्मणाला, 'हाच निरोप आहे कीं, माझ्या प्रियतमेसमक्ष माझें नांव घेऊं नको. कारण ती असेल तेथें माझें नांव काढतांच मोठा कहर गुजरेल.'

गोष्ट पंधरावी.

सुलतान महमूदचें* अयाज गुलामावरील खरें प्रेम व अयाज याचा स्वभाव.

'सुगंध व सुरंगहीन पुष्प बुलबुल पक्ष्यास अगदीं निर्माल्य व अप्रिय असतें. असें असून, **अयाज** हा सुंदर नमून ही त्याच्यावर बादशाहाचें इतकें प्रेम आहे, हें मोठें आश्चर्य आहे.' असा एका गृहस्थानें **गजनी**च्या बादशहास दोष दिला. कोणी ही गोष्ट **मयमूद**ला सांगितली,

---

* **महमूद**—गझनीचा एक प्रसिद्ध बादशहा. ज्यानें हिंदुस्थानावर वारा स्वाऱ्या केल्या तो. सुमारें इ० स० १००० वे वर्षी राज्य करीत होता.

तेव्हां त्यानें रागानें तोंड वाकडें करून ह्मटलें, 'हे भल्या गृहस्था, माझें प्रेम त्याच्या चांगल्या गुणावर आहे, त्याच्या सुंदर, उंच व भव्य शरीरावर किंवा रूपावर नव्हे.'

असें सांगतात कीं, एकदां एका निरुंद गल्लींत बादशहाच्या स्वारींतील एक उंट पडला, व त्याच्यावरील मोत्यांची पेटी पडून फुटली. तें पाहून, बादशहानें त्या मोत्यांची लूट करण्यास हातानें खुण करून हुकूम देऊन, तो तेथून जलदीनें घोडा दवडून निघून गेला. त्याच्या बरोबरचे स्वार, मोतीं व पोंवळीं वेंचीत राहिले व लुटीच्या नादांत बादशहाला विसरले, व मोठमोठ्या मी, मी, ह्मणणाऱ्या सेवकांपैकीं **अयाजा**शिवाय कोणीही बादशहाच्या मागोमाग राहिला नाहीं. बादशहानें त्यास ह्मटलें, 'हे लटकदार व मोहक सेवका, लुटींतून तूं काय काय आणलेंस?' तो ह्मणाला, 'कांहीं नाहीं, आपल्या मागोमाग दवडत आलों, लुटीकरितां सेवंत अंतर केलें नाहीं.'

राजदरबारांत राजापर्यंत तुझा प्रवेश असला तरी, वस्त्रें व भूषणें, यांच्या नादांत बादशाहास विसरूं नको. अवलिया लोकांची उलटी चाल असते. ते ईश्वराजवळ ही, त्याच्याशिवाय कांहीं मागत नाहींत. मित्रानें तुजवर उपकार करावा, अशी तुझी इच्छा असेल तर, मग तुला मित्रापेक्षां स्वतःचीच काळजी विशेष आहे. लालचीनें मुख पसरलेलें असेल तोंवर तुझ्या मनोमय कानांत आकाशवाणी कधींही येणार नाहीं.

ईश्वरपरिज्ञान, हें एक उत्तम शृंगारलेलें भवन आहे. त्यांतून लालसा व उद्वेगरूप धूळ झटकली गेली आहे.

धूळ उडलेल्या जागीं, चांगल्या डोळस मनुष्याचीही दृष्टी, कांहीं काम देत नाहीं, हें तूं पहात नाहींस का?

गोष्ट सोळावी.

सन्मार्गवर्ती लोक.

एकवेळ दैवयोगानें मी व दुसरा एक वृद्ध गृहस्थ फारयाब* शहराहून पश्चिमसमुद्राच्या तीरावर पोंचलों. मजजवळ एक पैसा असल्यानें नावाड्यांनीं मला नावेंत बसविलें, व त्या वृद्ध फकीराला सोडून देऊन, अकिंचन अशा धूम्रवेगानें नाव हांकिली. कारण तो नावाड्यांचा नायक ईश्वराचें भय न बाळगणारा असा होता. सोबत सुटल्यानें मला रडूं आलेलें पाहून, तो फकीर खदखदां हंसून म्हणाला, 'हे भल्या गृहस्था, मजकरितां खेद करूं नको, जो नावेसही पार नेतो तोच मला पार नेईल.' असें म्हणून, त्यानें आपलें निमाज पढण्याचें फडकें पाण्यावर पसरलें व त्यावरून पार निघून गेला. हें पाहून मी जागा आहें किंवा स्वप्नांत आहें, याचें मला भान राहिलें नाहीं. व मन उद्विग्न झाल्यामुळें माझा त्या रात्रीं डोळा लागला नाहीं.

त्यानें पहांटे माझी ती स्थिती पाहून म्हटलें, 'हे विद्वान् गृहस्था, तुला नावेनें पार आणलें, व मला ईश्वरानें पार उतरविलें, याचें तुला कां आश्चर्य वाटलें? सर्वोत्तम परमेश्वराच्याकृपेनें माझ्यांत 'अब्दाल' लोकांप्रमाणें

---

* बल्खच्या जवळचे **खुरासान** नांवाच्या प्रदेशांतील एक शहर.

सर्वगामीपणाचें सामर्थ्य आहे, असें संसारी लोक जाणत नाहींत. मुलाला अग्नीचें ज्ञान कोठें असतें, तरी प्रेमळ माता, त्याचें त्यापासून ही रक्षण करीत नाहीं कां? त्याच-प्रमाणें जे लोक केवळ ईश्वर पदीं लीन झाले, व ज्यांनां ईश्वरी साक्षात्कार झाला त्यांच्या सर्व गोष्टी ईश्वरास मान्य कराव्या लागतात असें समज. त्यानें अग्नीपासून खलीलाचें* रक्षण केलें, व पेटींत बंद केलेल्या मूसाचें,* नील नदीच्या पाण्यांत बुडण्यापासून रक्षण केलें. तसेंच तो सर्व खऱ्या भक्तांचें रक्षण करतो. तीरावयास शिक-विणाराच्या हातीं दोरी असतांना. मोठ्या जलाशयांत जाण्यास मुलगा भीत नाहीं, तसे ते लोक कोठेंही जाण्यास भीत नाहींत. तू प्रत्यक्ष कोरड्या जमीनीवर असूनही, संसार-मग्न लोकांप्रमाणें, तुझीं वस्त्रें लालसाजलानें भिजलेलीं आहेत, तेव्हां तुला मजसारखे पाण्यावर कसे पाय मारतां येतील.'

गोष्ट सतरावी.

सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या ध्यानांत सर्व दृश्य जगताचा लोप होण्यासंबंधें.

ज्ञानमार्ग अगदीं वेडावांकडा व पेंचदार असा आहे, व महात्म्यांच्या दृष्टीनें या जगांत ईश्वराशिवाय कांहीं नाहीं, ही गोष्ट सत्यासत्य जाणणाऱ्यासच सांगतां येईल. परंतु हें सांगणेंही, संसारी लोक दोषास्पद व खोटें मानून म्हणतात कीं, 'तुमचें म्हणणें खरें धरलें, तर मग पृथ्वी-

---

* मागें ग्रंथकाराच्या प्रस्तावनेंतील टीप पहा.

व हें अंतरिक्ष, तसेंच हे मनुष्यप्राणी, पशुपक्षादिक, हे काय आहेत.'

हे विचारी गृहस्था, ही गोष्ट तूं फार उत्तम विचारलीस. तू ऐकशील तर, याचें उत्तर मी तुला सांगतों. 'हें वन, सागर, पर्वत, व आकाश, तसेंच या अप्सरा, मनुष्य, भूत, पिशाचजाति व गंधर्व इत्यादि सर्वत्रांस ज्याच्या मुळें अस्तित्व आलें आहे, त्याच्यापेक्षां हे सर्व पदार्थ कमी योग्यतेचे आहेत.

तुला लाटांमुळें समुद्र मोठा वाटतो, व आकाशही फार उंच असल्यानें तुला थोर वाटतें, परंतु भगवद्भक्तां व्यतिरिक्त संसारी लोकांस, हें ज्ञान कोठें आहे कीं, जेथें हा एवढा सूर्य एका अणुरेणूवरोवर, व असे सात समुद्र एका बिंदूवरोबर नाहींत, व जेथील स्वामी आपला सार्वभौमत्वाचा युद्धाचा झेंडा उभारून आपलें उग्ररूप थोडेंसें प्रगट करील तर, हें सर्व जगत आपलें मस्तक विलयरूप पडद्यांत छपवील, अशा जागीं या विचाऱ्या वस्तुमात्रांचा काय पाड लागणार आहे?

गोष्ट अठरावी.

राजसेनेंत आलेला गांवढेकरी.

एकदां एक गांवढेकरी आपल्या मुलासह एका राजसेनेच्या तळावर येऊन पोंहोचला. तेथें त्यानें चोपदार, तर्वारी व परशू बाळगणारे, व रेशमी अंगरखे व भरजरी कमरबंद बांधलेले लोक, तसेंच मल्ल, तीरकमान घेऊन शिकारीस तयार झालेले व धनुष्यबाण ओढणारे व

मारणारे सेवक, असे नानाविध लोक पाहिले. कोणाच्या अंगात रेशमी अंगरखे होते, व कोणाच्या डोक्यावर बादशाही थाटाची टोपी होती. हे सर्व डामडौल व वैभव पाहून बाप गांगरून गेलेला, व त्याच्या तोंडचें पाणी पळून जाऊन तोंड फिक्कें पडलेलें. व घाबरून एका कोपऱ्यांत जाऊन बसलेला असा मुलानें पाहून, त्यास म्हटलें, 'तू कसें झालें तरी गावड्यांत मोठाच आहेस, व तुझीही सर्दारांतच्च गणना आहे. असें असून तू अशा धैर्यरूप तंतू आपल्या जिवापासून पार तोडून टाकलास, तेव्हां तुला झालें तरी काय? व राजवैभवापुढें, वाऱ्यानें कांपणाऱ्या वेताप्रमाणें, कांपतोस काय म्हणून?' तो म्हणाला, 'हो, मीही सत्ताधीश व सर्दार आहें खरा, पण आपल्या गावांत आहें तोंवरच्च माझी प्रतिष्ठा, पण येथें मी अगदीं दीन आहें.'

महात्मे लोक सर्वेश्वराच्या दरबारांत पोंचले असल्यामुळेंच अत्यंत लीन असतात. हे ज्ञानहीन मूर्खो, याच्च प्रमाणें आपल्या गावड्यांत तू स्वतःचा फार मोठेपणा मानीत असतोस.

कवी लोकांनीं असें एक अक्षरही तोंडावाटे काढलें नाहीं कीं, त्यावर सादीनें एखादी उपदेशपर गोष्ट सांगितली नाहीं.

गोष्ट एकोणिसावी.

काजवा.

रात्रीच्या वेळीं वनोपवनभूमींत दीपाप्रमाणें एक क्षीटक चमकत असलेला तूं बहुधा पाहिला असशील.

त्याला एकदां एकानें झटलें, 'हे रात्रिदीपका प्राण्या, तू दिवसा कां बाहेर येत नाहींस ?'

त्या मातीपासून उत्पन्न झालेल्या, अग्निकीटकानें काय शहाणपणानें उत्तर दिलें, तें पहा. तो झणाला, 'मी तर दिवसा व रात्रीं, नेहमीं वनांतच संचार करीत असतों, परंतु सूर्यापुढें मी जणूं उत्पन्नच झालों नाहीं, असा होऊन जातों.'

गोष्ट विसावी.

एक विद्वान् गृहस्थ व अताबुक विन सादजंगी बादशहा-ईश्वर त्याच्यावर कृपा करो.

एका विद्वान् गृहस्थानें **सादजंगी** बादशहाची स्तुति केली.—ईश्वराची त्याच्या कबरीवर पुष्कळ कृपा असो तेव्हां बादशहानें त्याला द्रव्य दिलें व त्याची, बहुमान-पूर्वक प्रशंसा केली, व त्याचा यथायोग्य सत्कार केला.

त्या विद्वानाला वस्त्रें मिळालीं, त्यांतील एकावर 'अल्ला-होबस' 'एक एवाद्वितीयः' असें जरानें लिहिलें होतें, तें पाहतांच, त्यानें एकदम ओरडून अंगावरून वस्त्रें काढून फेंकलीं, व पळ मारून वनाचा रस्ता धरला.

एका वनचरानें त्याला झटलें, 'तुझी स्थिति अशी बदलून जाण्या जागें तूं काय पाहिलेंस? तू तर प्रथम तीन तीन ठिकाणीं, स्वार्थाकरितां, साष्टांग नमस्कार करीत होतास, अशा त्या स्वार्थास या प्रमाणें लाथ मारणें, तुला योग्य नव्हतें.'

तो हंसून झणाला, 'प्रथम भय व स्वार्थप्राप्तीची

उमेद यांच्या योगानें माझें शरीर वेताप्रमाणें लवत होतें. पण शेवटीं 'अल्लाहोवस' या महावाक्याच्या प्रभावानें, कोणतीही वस्तु, किंवा कोणीही प्राणी माझ्या नजरेंत भरेनासा झाला.'

गोष्ट एकविसावी.

ईश्वरभक्त.

रूमशामकडील एका शहरांत गर्दी झाली, तींत एका महात्म्या वृद्धाला बंडवाल्यांनीं धरून त्याच्या हातापायांत बेड्या घातल्या, तेव्हां त्यानें जे शब्द उच्चारले, ते अद्याप माझ्या कानांत घुमताहेत. तो म्हणाला, 'बादशाहाच्या आज्ञेशिवाय, लूट किंवा दांडगाई करण्याची कोणाची छाती होईल? मित्रानें आपल्याकडे प्रत्यक्ष आपल्या शत्रूस धाडलें तरी त्याला मित्रच समजलें पाहिजे. माझा कोणी बहुमान व सत्कार केला किंवा मला झिटकारा करून कैदेंत टाकलें, तरी या सर्व गोष्टी त्या सर्वेश्वराच्या आज्ञेनें झाल्या, फलाण्यानें केल्या, असें मी कधीं समजणार नाहीं.'

हे शहाण्या मनुष्या, संकट प्राप्त झालें असतां भिऊं नको. वैद्यानें कडू औषध पाठविलें तरी त्याच्या हातून येईल तसें घेत जा कारण, वैद्यापेक्षां रोगी जास्त शहाणा नसतो.

गोष्ट बाविसावी.

सुदृष्टीभक्त.

मजप्रमाणेंच, एकाचें मन दुसऱ्या एकावर अत्यंत गुंत-

लहें अमल्यानें तो फार कष्टी होता. आढ्यतेच्या व शहाणपणाच्या घमंडीनें लोकांनीं त्याच्या वेडेपणाचा डंका वाजविणें सुरू केलें होतें. त्याचे मित्रही त्याला वरचेवर टोले मारीत, तें सोसण्याकरितां तो आपलें डोकें मेंढ्याच्या माथ्याप्रमाणें पुढें करित होता. त्या मापुकाच्या विचारानें, त्याचें मस्तक अमें भणभणावून दिलें होतें कीं, जगों, त्याच्या मेंदुरूप उमरख्याचा, दार ठोठावल्यानें, चुरा होऊन गेला होता. आपल्या प्रिय मित्राकरितां तो शत्रूचा त्रास सोशीत होता. कारण मित्राच्या हातचे, जालिम विषही तिर्याक—विषमोहरा—प्रमाणें लागतें. पाण्यांत बुडालेल्याला, पर्जन्यवृष्टीचें ज्ञान असत नाहीं, तमें त्याला मित्र टोणपे मारीत त्याचें भान नव्हतें.

ज्याचा मनोमय पाय संसाररूप पथरांत फसून, पथर मय होऊन गेला, त्याला लाजलज्जा रूप कांचाची भीति रहात नाहीं.

एका रात्रीं, एक पिशाच त्याच्या प्रियकरीचें रूप घेऊन त्याच्या बगलेंत निजलें. त्याच्याशीं तो रत झाला, व रात्रीं त्यास स्वप्नावस्था झाली, त्यामुळें त्याला पहांटे निमाज पढण्याची शक्ती राहिली नाहीं. हीं गुप्त गोष्ट त्याच्या मित्रांपैकी कोणाला, माहीत नव्हती.

तो पाणी घेण्याकरितां गच्चीवर गेला. तेथें अतिशय थंडीमुळें पाणी गोठून गेलें होतें. त्यास पाहून एका उपदेशकानें त्याच्यावर ताणा मारणें सुरू केलें व म्हटलें 'तू या थंडपाण्यांत प्राण देणार कीं काय?' हें ऐकून, तो न्यायी, हुपार, व तरूण, गृहस्थ ओरडून म्हणाला, 'चुप रहा, अमें भाषण मुखावाटे कधींही काढूं

नको, या एका पांच दिवसांच्या सोबतीच्या पोरानें माझें मन मोहून टाकलें आहे, व त्याच्या मोहांत मी इतका फसून गेलों आहें कीं, मला अगदीं धीर धरण्याची शक्ती नाहीं. त्याच्या नादांत निमग्न असतां, मला दुनियेची, किंवा दुनियेला माझी, पर्वा नव्हती, त्याचा भार मीं कसा जिवापाड सोसला? ज्यानें मातीपासून हा माझा मनुष्य देह उत्पन्न करून, त्याच्यांत स्वसामर्थ्यानें, शुद्ध जीव घातला, व ज्याच्या कृपाशक्तींत मी सर्वदां निमग्न आहें, त्या परमेश्वराच्या आज्ञा पाळण्याचा भार मी उठवीत असलेला पाहून तुला आश्चर्य कां वाटलें?'

गोष्ट तेविसावी.

सिद्धपुरुषाचें अभिश्रवण व सत्यासत्यनिरूपण.

खराप्रेमपाशबद्ध असशील तर स्वतःविषयीं निरपेक्ष हो, नाहींतर सुखाचा मार्ग धर. प्रेम तुला धुळीस मिळवील तरी भिऊं नको. कारण त्यापाईं तू मेलास तरी चिरंजीव होशील. प्रथम धुळींत मिळाल्यावांचून चांगल्या बीजापासून उत्तम हिरवेंगार झाड उत्पन्न होत नाहीं. तुला तें प्रेम ईश्वराच्या ठाईं इतकें रममाण करून सोडील कीं तू स्वतःच्या हातून सुटशील, तू केवळ स्वतःच्या विचारांत निमग्न असशील तोंवर तुला आत्मज्ञानाचा लाभ होणार नाहीं. खऱ्या आपक मनुष्याम या गुह्यावांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं. खरा आपक अमशील तर गवय्याच कशाला पाहिजे, वैलाच्या पायांच्या आवाजानें देखील तू मस्त व नादावून जाशील.

भ्रमिष्ट मनुष्याच्या तोंडापुढें माशीनें पंख हलविण्याचा अवकाश, तोच स्वतः माशीप्रमाणें आपले हात तोंडापुढें फटकारूं लागतो. नादावलेला मनुष्य नगारा किंवा ढोलकी कांहींएक जाणत नाहीं. खरा फकीर एखाद्या पाखराचा आवाज ऐकूनही ओरडूं लागतो. गवयी स्वतः स्वस्थ नसतो परंतु ऐकणाराचे कान नेहमीं खुले असतात असें नाहीं.

उन्मत्त किंवा विरक्त लोक भगवत्प्रेमपरू मद्याचें सेवन करितात. तेव्हां राहाटाच्या आवाजानेंही ते मस्त होऊन रंगांत येतात. व राहाटाप्रमाणें नाचण्याच्या भरांत येऊन स्वतःशीं आक्रोश करीत व अश्रूं गाळीत असतात. ईश्वरभजनांत गुंग असले ह्मणजे तोंडावरून घुंगट घेऊन बसतात. व भक्तिप्रेमाचा आवेश सहन करण्याची शक्ती न राहिली ह्मणजे वस्त्रें फाडून टाकूं लागतात.

अभिश्रवण ह्मणजे काय तें मी सांगेन, पण प्रथम तें ऐकण्यास पात्र कोण आहे, तें समजलें पाहिजे. तत्वज्ञानरूप बुरुजावरून ज्ञानी उड्डाण करील तर, त्याच्यापुढें प्रत्यक्ष गंधर्व मार्गें पडतील. खेळणें, कुदणें, गांतच मग्न असलेल्या मनुष्याच्या डोक्यांत, खेळ कूदच्च दृढतर होतो. विषयलंपट मनुष्य तत्ववाद ऐकण्यास कसा योग्य होईल?

मधुर ध्वनीनें निजलेला मनुष्य जागा होईल. नशेंत गुंगून पडलेला नव्हे. प्रातःकाळच्या मंद वायूनें कोमल पुष्प विव्हळ होतें. कुऱ्हाडीनें कापण्यासारखें शुष्क काष्ट नव्हे. हें जग रागरंग इत्यादि मादक व विव्हळ

करणाऱ्या वस्तूंनीं भरलें असल्यामुळें जन्मांधापुढें आरसा असूनही त्यांत त्याला कांहीं दिसत नाहीं, तशी संसाऱ्यांची स्थिति आहे.

दरवेशी, विव्हळ, व उन्मत्त, या लोकानां दोष देऊं नकोस. ते प्रेमसागरांत बुडाले असल्यानें हातपाय आपटीत असतात. मर्केतील आवारांत यःकश्चित् उंट देखील आवाज ऐकतांच उन्मत्त होऊन, नाचूं वागडूं लागतो, अशा स्थितींत मनुष्यावर त्याचा परिणाम न झाला तर तो गाढवच समजला पाहिजे.

गोष्ट चोविसावी.

सुस्वर मुरलीवादक.

एक सुस्वर तरुण मुलगा, मुरली वाजविण्यास शिकला होता. त्या योगानें तो लोकांचीं मनें जणों शुष्क काष्ठाप्रमाणें जाळीत असे. त्याचा बाप त्याच्यावर वरचेवर रागावून खेंकसत व ओरडत असे व त्याची मुरली आगींत फेंकीत असे.

एका रात्रीं, मुलाचा आवाज त्या बापाच्या कानीं पडला. त्याच्या योगानें तो प्रसन्न व विव्हलांतःकरण झाला. त्याच्या तोंडावर घर्मबिंदु आले व "यावेळीं या मुरलीच्या स्वरानें माझ्यांत खरा अग्नि चेतविला" असें तो ह्मणाला.

उन्मत्त व दीन स्थितीचे लोक रंगांत येऊन नाचूं लागतात तेव्हां पाय कां झाडतात तें जाणतोस? तत्वार्थज्ञानरूप द्वार त्यांच्या अंतर्नेत्रास उघडलें गेल्यानें, या दृश्य सृष्टीवर ते जणूं आपले हात झाडून संबंध तोडतात.

कीं ज्याच्या प्रत्येक अस्तनींत किंवा रोमारोमांत एकेक प्राण भरलेला आहे किंवा ज्याला इतका आनंद होतो कीं त्याचे रोमरोम नाचूं लागतात, त्या अशा मनुष्यालाच आपल्यामित्राकरितां नाचणें योग्य आहे,तीरण्याच्या कामांत; तू हुषार आहेस हें मी पत्करलें, पण वस्त्रपाशारहित असशील तरच तुला चांगले हातपाय मारतां येतील.

लज्जा, आब्रुता, व ढोंगरूप गोधडी काढून टाक, कारण वस्त्रासहित बुडालेला मनुष्य दीन व निरुपाय होऊन जातो. तुझ्या नेत्रांवर लज्जा व संसाररूप पटल असेल तोंवर तुझा जन्म व्यर्थ समज हीं बंधनें तोडशींल कीं तू मुक्तच आहेस.

गोष्ट पंचविसावी.

पतंग व त्याचें दीपावरील प्रेम.

एकानें पतंगास म्हटलें 'हे दुर्बला, मूर्खा, जा व आपल्या बरोबरीच्यांशीं स्नेह कर. तुझा स्नेह सफल होण्याची उमेद असेल अशा मार्गानें जा, कारण कोठें यःकश्चित् तू व कोठें प्रज्वलित दीप दोघांचा स्नेह कसा होणार. तू अग्निकीटक नाहींस, त्याअर्थीं अग्नीजवळ जाऊं नको.'

आपल्यांत बल असेल तरच युद्ध करणें योग्य होय. वज्रबाहूशीं मारामारी करणें मूर्खपणा समजूनच चुचुंदरी मूर्याप्रुढें कधीं न येतां लपून बसते. कोणी मनुष्य आपला शत्रू आहे असे समजल्यावर त्याच्याशीं स्नेह ठेवणें शहाणपण नव्हे. तू नेहमीं दीपावर प्राण देतोस

हें तूं चांगलें करतोस, असें कोणी ह्मणत नाहीं. राजकन्येचा अभिलाष करणाऱ्या दरिद्री मनुष्यानें, वेडगळ विचार मनांत आणला असें होतें.—

'त्या दीपाचें मुख अप्सरेसारखें, व तो राजे लोकांत प्रियकर होऊन राहणारा, तो, तुजसारख्या मित्राची कमची गणना करतो. अशा थाटदार सभेंत तो तुजसारख्या दरिद्री मनुष्याचा आदर करील, असें कधीं मानूं नको. तो सर्व जगताशीं मृदुपणानें वागून सुख देतो. तरी तू दीन व गरीब ह्मणूनच तुजवर त्याचा क्षोभ आहे.'

तो जळून जाणारा पतंग काय ह्मणाला पहा,—'मला जळण्याचें काय भय? माझ्या मनांत खलीलाप्रमाणें प्रेम रूप आग जळत असल्यानें हा बाह्य आगीचा लोळ मी पुष्पाप्रमाणें मानतों. माझें मन हरण करणारा स्वतः माझा मानसिक पदर धरून मला ओढतो असें नाहीं. तर माझ्या मनांतील तद्विषयक प्रेमच मत्प्राणरूप पदर ओढीत आहे मी स्वतःच अग्नींत उडी घालीत नसून माझ्या गळ्यांत तत्प्रेमपाश पडला आहे तो मला ओढतो. मी त्याच्यापासून दूर असतानांच तद्विरहाग्नीनें मला जाळून टाकलेंआहे. या प्रत्यक्ष आगीनें मजवर हल्ला केला तेव्हां नव्हे.

'ज्याच्यावर आपण रागावूं शकतों असा मित्र आपल्यावर खरें प्रेम ठेऊं शकत नाहीं. जो माझे दोष न गणूनही मजशीं स्नेह ठेवील, तोच माझा खरा स्नेही होय, व त्या स्नेह्याच्या पायीं मला मरण आलेलें पत्करलें. मला जळून जाण्याची इच्छा कां आहे समजलास? तो सुखी असून मी नाश पावलों तरी बेहत्तर आहे, असें मला वाटतें. ह्मणून तो माझा प्रियतम मित्र

आहे, व त्याला आपल्या मित्राचें जळून मरणें पसंत व्हावें, ह्मणूनच मी जळून जातों. मला तू पुष्कळ सांगतोस कीं, आपल्या बरोबरीचा व तुजविषयीं सकरुण असा मित्र पहा. पण हा तुझा उपदेश, विंचू डसलेल्याला, रडूं नको, ह्मणण्यासारखाच वेडेपणाचा आहे. ज्याच्या मनावर तुझा उपदेश ठसण्याजोगा नसेल त्याला, हे वेड्या गृहस्था, उपदेश करूं नको. हातांतून लगाम सुटलेल्याला कोणीही, 'गुलामा घोडा हळू चालीव,' असें ह्मणत नाहींत.

मुला, सिंदवाद* नामक ग्रंथात एक गोष्ट किती उत्तम लिहिली आहे कीं, 'विषय किंवा प्रेम आगीप्रमाणें व त्याविषयीं उपदेश हा वाऱ्याप्रमाणें आहे. वाऱ्यानें आग जास्त जोरावते व घायाळ वाघ जास्त चेकाळतो.'

तो गृहस्थ ह्मणाला, 'तू स्वतः चांगला असून वाईट काम करतो आहेस, हें पाहून, तू असें आपलें मुख काळें करूं नको, असें मी तुला ह्मटलें.

आपल्याहून श्रेष्ठ होण्याचा यत्न कर, व हें आयुष्य फार महत्त्वाचें समज, कारण तुजसारख्याशींच तू स्नेह जोडून राहिलास तर, त्यांत तू आपलें आयुष्य वृथा गमवितोस असें होईल. आपल्या बरोबरीच्या लोकांशीं स्नेह ठेऊन, सरळ मार्गानें संसारी लोकच आयुष्य घालवितात. भयंकर गह्वींतून संचार करण्याचें काम उन्मत्त महात्म्यांचें आहे, संसाऱ्याचें नव्हे. मी प्रथम या कामांत

---

* सिंदवाद नांवाचा एक उपदेशपर फारसी ग्रंथ हकीम अर्जकी यांनीं रचलला आहे.

मन घातलें, तेव्हांच, आपल्या प्राणाविषयीं विचार मनांतून पार दूर केले.

प्रेमाच्या पायीं आपलें डोकें देण्यास तयार असेल, तोच मनुष्य खरा प्रेमळ होय. वेहिंमत किंवा भित्रा मनुष्य केवळ स्वतःचीच काळजी करणारा असतो. मृत्यू केव्हां तरी माझा अचानक घात करीलच, त्या अर्थी त्या प्रियकराच्या हातूनच मृत्यू आलेला उत्तम. आपल्या कपाळीं मरण तर पक्कें लिहिलेलेंच आहे, तेव्हां तें आपल्या मनास आनंद देणाऱ्याच्या हातून आलेलें, जास्त श्रेयस्कर होय. तुला कधीं तरी दीनपणानें प्राण द्यावे लागणारच, तेव्हां ते आपल्या मापुकाच्या पायीं देणें, हेंच बेहतर आहे.

गोष्ट सत्तिसावी.

दीप व पतंग यांचा संवाद.

मला आठवतें कीं, एके दिवशीं माझ्या डोळ्यांस चांगली झोंप आली नव्हती, अशा स्थितींत पतंगानें दीपाशीं भाषण केलेलें मी ऐकिलें, कीं, 'मी तुजवर आपक झालों आहें त्या अर्थीं, मी मेलों तरी मला मान्य आहे. पण तूं स्वतः कां जळतोस व अश्रू गाळतोस?'

दीपानें ह्मटलें, 'हे माझ्या गरीब मित्रा, पतंगा, माझा तूं मद्यापमाणें गोड असा मित्र नाहींसा झालास, माझी

गोडी माझ्यांतून वाहेर गेली त्याबरोबर शीरीनच्या विरहानें फरहादा* प्रमाणें माझी आग व्यर्थ जात आहे†.'

आपल्या पिंवळ्या गालावर प्रतिक्षणीं दुःखाश्रू गाळून, तो दीप ह्मणत होता कीं, 'हे दाविदाऱ्या, प्रेम करणें, तुझें काम नाहीं, कारण तुला धीर धरवत नाहीं, व स्वस्थपणें वाट पाहत राहण्याची ही शक्ती नाहीं. तू असा कच्चा आहेस कीं, एका आगीच्या लोळापुढें पार नाहींसा होतोस, पण मी पहा, अगदीं निःशेष जळून जाई तोंवर उभा आहें. प्रेमाग्नीनें तुझे नुसते पंख जाळले, पण माझें पहा तो डोक्यापासून पायांपर्यंत सर्वांग भस्म करीत आहे.'

याप्रमाणें, बोलत असतां कांहीं प्रहर रात्र गेली नाहीं तों, एकाएकीं एका चंद्राननेनें त्या दीपाला मालविलें. त्याच्यांतून पुष्कळसा धूर वर चालला असून, तो ह्मणत होता कीं, 'हे मुला, आतां प्रेमाची सीमा होऊन गेली. प्रेम शिकूं चहातअसशील तर जळून मरण्यांत ही तुला सुख वाटेल.

---

* **शीरीन** व **फरहाद**, **शीरीन** नांवाची एक **चीन**च्या सादशहाची कन्या होती, तिच्यावर **फरहाद** नांवाचा एक पाथरवट अत्यंत आषक झाला होता. **चिना**पासून **इराण**पर्यंतच्या पहाडास बोगदा केलास तर तुला ती राजकन्या मिळेल असें त्याला कोणी सांगतां त्याने तें मान्य करून, तें काम बहुतेक शेवटास नेलें. इतक्यांत त्याला कोणी येऊन खोटेंच कळविलें कीं, **शीरीन** मेली. हें ऐकतांच त्यानें दगडावर मारण्याकरितां उचलेला हातोडा आपल्या डोक्यांत मारून घेऊन प्राण दिला, अशी दंतकथा आहे. याच संबंधें पुढील दोहरा आहे.

कोहकंननें क्या हुवा फोडा अगर पथ्थरसें सिर ॥
शर्त ये है, कोह गफ्लत राई काई कीजिये ॥

† चुनत चकोर अंगारकू भसम करनको अंग, कबहुं भबकर भालमे होय रहेंगे संग ।

मित्राच्या हातून मरण पावलेल्या मित्राच्या कबरेवर रडतें न बसतां, त्याचें मरण त्या मित्राला मान्य झालें, यावद्बल आनंद मान."

खरा प्रेमबद्ध असशील तर परिश्रमापासून मस्तक न फिरवितां, सादीप्रमाणें या संसारांतील हरएक गरजेपासून अलिप्त राहण्यास तयार हो. खरा प्रेममग्न मनुष्य, आपला इष्ट हेतु साध्य होणाच्या पायीं, कोणी त्याच्या मस्तकावर बाणाची किंवा दगडाची वृष्टी केली तरी, पर्वा न करितां, सहन करून त्यापासून आपला हात मागें घेत नाहीं तुला सांगतों, एक तर तू कधीं समुद्रांत आऊं नको व जाशील तर आपलें शरीर तुफानास अर्पण कर.

भाग तिसरा समाप्त.

भाग चौथा.

आदरातिथ्य व लीनता.

शुद्धसत्व परमेश्वरानें तुला मातीपासून उत्पन्न केलें आहे, त्या अर्थीं माती प्रमाणें लीनता धर. लालची, जगतास जाळणारा, व उन्मत्त होऊं नको. मृत्तिकेपासून तुझी उत्पत्ती आहे, सबब अग्निसत्व होऊं नको. तापट असा अग्नी, गर्वानें उन्नतशिर झालेला पाहून मृत्तिका दीनपणानें लीन झाली. त्यानें उन्मत्तपणा व तिनें लीनपणा दाखविला ह्मणून ईश्वरानें त्याच्यापासून भूत पिशाच व तिच्या पासून मानव उत्पन्न केले.

याच अर्थाची गोष्ट पहिली.

एक पावसाचा थेंब ढगांतून पडतांना समुद्राचा विस्तार पाहून मनांत फार लज्जित होऊन ह्मणाला, 'भरलेल्या सागरा पुढें माझी काय योग्यता? ईश्वर साक्ष, तो असेल तेथें मी नाहींसाच आहे.'

त्यानें स्वतःविषयीं इतका झिटकारा दाखविलेला पाहून, त्याला एका शिंपीनें आपल्या ओटींत घेऊन त्याचे जिवापाड रक्षण केलें व ईशकृपेनें त्यास अशा योग्यतेस पोचविलें कीं, तो एक प्रख्यात व राजे लोकांजवळ राहण्यायोग्य, असें मोतीं बनला. तो स्वतः लीन झाल्यानें त्याला मोठेपणा मिळाला. अहंभावनाशरूप दाराशीं ठोंठावल्यामुळें त्याला खरें अस्तित्व व योग्यता आली.

गोष्ट दुसरी.

ईश्वरपरायण लोकांची स्वतःविषयीं तुच्छ बुद्धि.

एक कुलीन, विद्वान व तरुण मनुष्य, जलमार्गानें बंदरूम शहरांत आला. तो चतुर विचारी व आदबशीर असल्याचें तेथील लोकांनीं पाहून त्याला एका चांगल्या मान्य जागीं, मशीदींत उतरविलें.

मशीदीचा मालक एक दिवस त्यास ह्मणाला, 'या मशीदींतील धूळ व कचरा झाडून टाक.' हें भाषण कानीं पडतांच तो तेथून निघून चालता झाला तो पुनः कोणाच्या दृष्टीस पडला नाहीं. त्यावरून त्याच्या मित्रांनीं व मशीदीच्या मालकानें ताडलें कीं, त्या विचाऱ्याला ईश्वराची सेवा करण्याची पर्वा नव्हती.

दुसरे दिवशीं मशीदींतील एका सेवकानें त्यास रस्त्यांत पाहून, उभा करून ह्मटलें, 'तूं भ्रष्टबुद्धी होऊन हें चांगलें काम केलें नाहींस. हे स्वयंमन्या, ईश्वराची सेवा चाकरी करून लोक मोठमोठ्या योग्यतेस चढतात हें तूं लक्षांत ठेवलें नाहींस.'

हें ऐकून, तो पश्चात्तापानें व सत्यप्रियतेनें रडूं लागून ह्मणाला, 'हे प्राणप्रिय व मनावरील अज्ञान पटलें काढणाऱ्या प्रियमित्रा, त्या जागीं मला एवढा सुद्धां कचरा किंवा धूळ दिसली नाहीं. व त्या स्वच्छ व पवित्र जागीं मला, घामट व पापमय असा मीच दिसलों व ह्मणूनच मी तेथून आपला पाय काढला. कारण असा मजसारखा पापमय व अमंगळ मनुष्य मशीदींत नसणें मला पसंत वाटलें.'

दरवेशानें स्वतःस नेहमीं पतित समजणें, या शिवाय त्यास दुसरा खरा मार्गच नाहीं. तुला थोरवी

रूप गच्चीवर जाणें असेल तर, लीनता पत्करा, कारण तेथें जाण्याला याशिवाय दुसरा जिनाच नाहीं.

गोष्ट तिसरी.

भक्तराज वायजीद बुस्तामी*–ईश्वर त्याची चित्तवृत्ती नेहमी पवित्र ठेवो–याची लीनता.

असें सांगतात कीं, एकदां ईदच्या दिवशीं पहाटें भक्तराज **वायजीद** स्नानकरून स्नानगृहांतून बाहेर पडला तों, एकानें चुकून, एक कचऱ्याचें टोंपलें, त्याच्या अंगावर पायापासून डोक्यापावेतों टाकलें, त्यामुळें त्याचें पागोटें व केश खराब झालेले असतांना, तो ईश्वराचे आभार मानून हात जोडून म्हणत होता, 'मी स्वतः आगीच्या लायक असतांना, कचऱ्यापासून मी आपलें तोंड मागें कसें फिरवूं?'

थोर लोक स्वतःवर अगदीं दृष्टी देत नाहींत. स्वतः वर दृष्टी ठेवणाऱ्याच्या हातून ईश्वरावर दृष्टी राहण्याची इच्छाच करूं नको. मोठेपणा, आढ्यता व प्रलाप, यांच्यांत नाहीं, व सर्वांत अग्रणीपणा नुसता त्याविषयीं दावा ठेवल्यानें, किंवा केवळ ज्ञानानें, प्राप्त होत नाहीं. शेवटच्या दिवशीं आढ्यता सोडून तत्वार्थ ग्रहण करणारा मनुष्यच स्वर्गांत पोंचल्याचें तू पाहशील. लीनता तुला उन्नतीस पोंचवील, व गर्व तुला धुळीस मिळवील. आढ्यतेनें डोकें वर करून चालणारा उन्मत्त मनुष्य उलटा डोक्यावरच पडतो. तुला उन्नती पाहिजे असेल तर,

---

* **वायजीद बुस्तामी** हा एक **बुस्ताम** शहरांत मोठा महात्मा व विद्वान गृहस्थ होऊन गेला.

तिच्या शोधास लागूं नको, ती आपोआप मिळेल. धुंडण्यानें मिळणार नाहीं.

उपदेश.

गर्व व त्याचा दुष्परिणाम, गर्वनाश व त्याचें फल.

गर्विष्ट व संसारी मनुष्याच्या अंगीं धर्माची उमेद ठेऊं नको, व स्वहितैकदृष्टी मनुष्याची ईश्वरावर दृष्टी राहणें इच्छूं नको. तुला थोरवी पाहिजे असेल तर हलकट लोकांप्रमाणें, इतर लोकांकडे तुच्छ बुद्धीनें पाहूं नको. मानीपणाने वागणें यांतच मोठेपणा आहे, असें कोण खरा विद्वान मानील, याचा विचार कर. सर्व जगानें, तू सुस्वभाव आहेस असें म्हणावें, यावांचून दुसरी कांहीं मान्यताच नाहीं, असें समज. तुझ्या बरोबरीच्यानें तुझ्याशीं गर्विष्टपणाचेंच वर्तन केलेलें तुला बरें वाटत नाहीं नव्हे कां? त्याचप्रमाणें, तूही कोणाशीं गर्वाचें वर्तन केलेंस तर, त्याच्या दृष्टीनें तूही वाईट मानला जाशील. तू शहाणा असशील तर, उन्नतीच्या वेळीं पतितांस पाहून हसूं नको. पुष्कळ उन्नतीस चढलेले लोक खालीं आले आहेत, व पूर्वी खालीं पडलेले लोक त्यांच्या वैभवास पावले आहेत.* तू स्वतः निर्दोष आहेस हें मी मानलें, तरी पण मज सारख्या गरीब दोषपूर्णाचा झिटकारा करूं नको.

एक मक्केचा वारकरी व दुसरा दारूच्या पिंप्यांत दारू पिऊन गुंगून पडलेला यांतून तो (**परमेश्वर**) आपल्याजवळ मद्यप्याला बोलावील तर, त्याला कोण

---

* ॥ नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण ॥

आंत येऊं देणार नाहीं? व त्या यात्रा करणाऱ्याला हांकून देईल तर, त्याला कोण जवळ बोलवूं शकेल? वारकऱ्याला म्हणजे त्याच्या पुण्य कर्माचा हटकून भरंवसाच आहे असें नाहीं, व मद्यप्याला म्हणजे पश्चात्तापाचें द्वार बंद झालें आहे असेंही नाहीं.

गोष्ट चौथी.

ईसा*-त्यांनां आमचा नमस्कार असो-व गर्विष्ठ भक्त.

'मला कवीश्वरांच्या ग्रंथांत वाचल्याचें स्मरतें कीं, पैगंबर **ईसा**-त्यांना आमचा नमस्कार असो-यांच्यावेळीं, एका गृहस्थानें आपलें आयुष्य मूर्खपणानें व्यर्थ घालविलें होतें. तो ईश्वरी मार्गास विसरून मनसोक्त वागत होता. तो कोणाचेंही भय न बाळगणारा, कृष्णकर्मी, व पाषाणहृदयी असा होता, व त्याच्या पापाचरणापुढें प्रत्यक्ष **सैतान**ही लाजून गेला होता. तो आपला काळ केवळ व्यर्थ घालवित होता. व त्याच्यापासून एकही प्राण्याम कधीं सुख झालें नव्हतें.

त्याचें मस्तक बुद्धीनें रितें, पण गर्वानें भरलेलें, असें होतें. व हरामाचें अन्न खाल्यानें त्याचें दोंद वाढलें होतें. अनीतीनें त्याचा पदर अगदीं भरलेला व त्याच्या अंतःकरणरूप मंदिरांत, पातकरूप धूर अगदीं कोंडून मावेनासा झाला होता. डोळस मनुष्याच्या प्रमाणें त्याचे पाय कधीं सरळ मार्गानें जात नव्हते, व उपदेश ऐकणाऱ्याच्या

---

* **ईसा** पैगंबर **ख्रिस्ती** लोकांचे धर्म संस्थापक व आदिगुरु ज्यांस **येशूख्रिस्त** म्हणतात ते.

प्रमाणें, त्याचे कान उघडे नव्हते. दुष्काळा प्रमाणें त्यास पाहून सर्व जग त्यापासून दूर पळत होतें. व नवीन (गणेशचतुर्थीच्या) चंद्राप्रमाणें लोक त्याच्याकडे बोटें दाखवीत असत.

लालसा व मत्सर यांणीं त्याचें खळें जाळून टाकल्यानें भलेपणाचा एक दाणाही त्याच्या हातीं लागला नव्हता. त्या पाप्यानें संपत्तीचा असा दुरुपयोग चालविला होता कीं चित्रगुप्ताच्या वहींत त्याचीं पापें लिहिण्यास जागा राहिली नव्हती. तो पापी, घमंडी व संसारपूजक रात्रंदिवस भ्रमामुळें व मद्यप्राशनामुळें दंग व मस्त असा होता.

असें सांगतात कीं, एकदां ईसा वनांतून परत आले, ते एका भक्ताच्या कोठडीजवळ पोचले, तेव्हां तो भक्त ध्यानविसर्जन करून खालीं आला व भूमीवर मस्तक ठेऊन त्याच्या पायां पडला. इकडे तो पापी व उलट्या ग्रहदशेंत फसलेला गृहस्थ, दूरूनच त्याचें तेज पाहून पंतगाप्रमाणें चपापून गेला होता, व शरामिंदा होऊन धनवानाचें द्रव्य पाहून दरिद्री लालचतो, तसा लालचून गेला होता.

तो रात्रीच्या रात्री उजाडविणारा चैनी गृहस्थ भ्रमिष्टाप्रमाणें अगदीं चुप राहिला होता. त्याच्या नेत्रजलदापासून दुःखाश्रूंची वृष्टी चालली होती व तो म्हणत होता, 'माझें वय व्यर्थ गेलें याबद्दल मला फार पश्चात्ताप वाटतो व मीं हें रोकडें वय हातचें गमवून, भलेपणा कांहीं एक पदरीं बांधला नाहीं. मजसारखा कधींही जिवंत न राहो, तो दीर्घायू होण्यापेक्षां मेलेला बरा. बाल्यावस्थेंत मेला

तोच सुटला म्हणावयाचा, कारण त्याला लज्जास्पद वृद्धावस्थेची स्थिती प्राप्त होत नाहीं. हें जगदुत्पादका, माझ्या अंगांत दृढ खिळलेल्या माझ्या सर्व अपराधांची क्षमाकर.' तो पुराणापातकी असा शोक करीत व, 'हे हात देणाऱ्या, माझी प्रार्थना सफल कर.' असें म्हणत स्वस्थ बसला होता. लज्जेमुळें तो अधोमुख झाला होता, व पश्चात्तापानें त्याच्या गालावरून अश्रुपूर वहात होता.

तिकडून तो भक्त, गर्वानें माथें फिरेलला, वक्र दृष्टीनें त्याच्या कडे दृरून पाहून म्हणत होता कीं, "हा पापी, नीच, मूर्ख, आमच्या मार्गें कां लागला आहे? या हतभाग्याची व आमची कां बरोबरी आहे? तो आकंठ संसाररूप अग्नींत पडेलला व लालसारूप हवेंत आयुष्य उडविलेला, असा आहे. या संसारमग्नापासून आम्हांस काय फळ मिळावयाचें, म्हणून याला माझा व ईसाचा अलभ्य सहवास घडावा! तो पूर्वीच पश्चात्ताप करिता तर, दुष्कर्मामुळें नरकांत जाण्याची त्यास कां पाळी येती? याच्या दुर्दर्शनानेंच मला खेद होत आहे. याची पातकरूप आग मला न शिवो म्हणजे झालें. हे परमेश्वरा, शेवटच्या दिवशीं सर्व लोक तुजपुढें न्यायाकरितां येतील, तेव्हां मला या पाप्याचा सोबती करूं नको.'

तो या विचारांत होता, इतक्यांत ईश्वराचा ईसाकडे निरोप आला कीं,—ईसावर ईशकृपा हमेशां कायम राहो—'जरी हा थोर व विद्वान्, व तो मूर्ख व पापी आहे, तरी मला दोघांची ही प्रार्थना मान्य आहे. कारण त्या पाप्यानें आपलें आयुष्य व्यर्थ गमविलें, व दिवसही रात्रीप्रमाणें व्यर्थ घालविले तरी तो शेवटीं मजकरिता

पश्चात्तापानें रडला. मजकडे दीन होऊन शरण येणाऱ्याला मी आपल्या कृपाद्वारापुढून घालवीत नाहीं. त्याच्या सर्व पापांची क्षमा करून, कृपाळूपणानें, मी त्यास स्वर्गांत घेतलें आहे.

'आपल्या भक्तीचीच केवळ आढ्यता वाळगणाऱ्या या भक्तास स्वर्गांत याच्या सहवासाची लाज वाटत असली तर, ही लाज शेवटपर्यंत वाळगण्याचें कांहीं कारण नाहीं असें त्याला सांग. कारण यमदूत याला स्वर्गांत नेतील व त्याला अग्नींत, नरकांत टाकतील, कारण, या पाप्याचें अंतःकरण दुःखानें व पश्चात्तापानें जळून लाल झालें, व त्या अहंमंन्याला केवळ आपल्या भक्तीचीच घमेंड राहिली आहे.'

सर्वसंपन्न परमेश्वराच्या दरबारांत, गर्व, घमंड व स्वयंमन्यपणा यापेक्षां, दीनपणा चांगला मानला जातो, हें त्यानें जाणलें नाहीं. ज्याचा पोषाक स्वच्छ पण आचरण अमंगळ असतें त्याला नरकद्वार खोलण्याला किल्ली नको. स्वर्गद्वाराशीं गरीबी व दीनता, या भक्ती व अहपणा, यांहून श्रेयस्कर आहेत. स्वतःस सज्जनापेक्षां श्रेष्ठ समजशील तर तू खरोखर वाईट आहेस. कारण ईश्वराच्या घरीं कोणाचाही अहंभाव खपत नाहीं. तू खरोखर श्रेष्ठ असलास तरी, आपला श्रेष्ठपणा दुसऱ्या पुढें सांगत बसूं नको. प्रत्येक चांगला स्वार ह्मणजे गेंद बोथाटी खेळण्यांत गेंद घेऊन जाईलच असें नाहीं.

ज्यांच्यांत आपण पिस्त्याप्रमाणें मगज भरलेला आहे असें समजतों, त्या अकुशल व मूर्ख मनुष्याच्या अंगीं शेवटीं कांद्याप्रमाणें केवळ सालीच निघतात. त्याचप्रमाणें

केवळ कर्मठपणाच कामास पडत नाहीं. याकरितां दीनपणें आपल्या पापाची क्षमा मागणें, हीच खरी भक्ती कर. ईश्वराशीं चांगला, पण सर्व जगताशीं वाईटपणानें वागणाऱ्या दुर्बुद्धी मनुष्यास केवळ भक्तीमार्गानेंच सुफल मिळेल असें नाहीं.

विद्वान लोकांचीं बोधवचनेंच केवळ त्यांचीं मागें स्मारकें राहतात. सबब सादीच्या तोंडचें हें एक बोधवचन ध्यानांत ठेव कीं, 'पापी, पण परमेश्वरास भिणारा मनुष्य, आपल्या भक्तीचीच प्रौढी मिरविणाऱ्या भक्तापेक्षां श्रेष्ठ होय.'

गोष्ट पांचवी.

शहाणा फकीर व गर्विष्ठ काजी.

एक विद्वान पण मलिन व जीर्ण वस्त्रें धारण केलेला व दरिद्री, असा गृहस्थ एका काजीच्या घरीं सभेंत उच्चस्थानीं जाऊन बसला, म्हणून काजीनें त्याच्याकडे रागारागानें पाहिलें; त्यावरून चोपदारानें त्या गृस्थास हात धरून उठवून म्हटलें, 'उच्चस्थानीं बसण्याची तुझी योग्यता नाहीं, हें तू जाणत नाहींस कां? खालीं जाऊन बैस, किंवा एथून चालता हो, किंवा उभा रहा. थोरांच्या सभेंत अमर्यादा करूं नका. तुझ्या पंज्यांत शक्ती नसतां वाचाप्रमाणें वर्तन करूं नको. हरएक मनुष्य गादीवर बसण्यास योग्य नसतो. मोठेपणा स्थानविशिष्ट असतो, व योग्यता गुणावर अवलंबून असते. पुनः तुला याविषयीं कोणी उपदेश करण्याची काय जरूर आहे—

सर्वांमधून तुला हात धरून उठविलें—हाच अपमान तुला पुष्कळ दंड आहे. स्वतःच मर्यादेनें खालीं बसणाऱ्याला वाईटपणा घेऊन उच्चपदावरून खालीं यावें लागत नाहीं.'—'बसूं जाणे त्याला उठ कोण म्हणे.'

तो गृहस्थ रागानें लाल होऊन, आपल्या वेशास योग्य अशा जागेपेक्षांही खालीं जाऊन बसला. तेथें जमलेले विद्वान लोक धर्मसंबंधी चर्चा व शास्त्रार्थ करूं लागले. 'हें तुम्ही म्हणता हें कसें? आम्ही कधीं बरोबर मानणार नाहीं.' वगैरे एकमेकांस बोलूं लागले. त्यांनीं अपसांत वितंडवादाचें व भांडणाचें द्वार खुलें केलें. व ते 'हो' 'नाहीं' म्हणत, चोंचीनें व नखानें एकमेकांशीं लढून घायाळ करण्यास उद्युक्त झालेल्या दोन प्रमत्त कोंबड्यांप्रमाणें, आपल्या माना व डोकीं उंच व लांब करीत होते. कोणी रागानें मद्यप्याप्रमाणें मस्त व भ्रमिष्ट झाले होते, व कोणी जमीनीवर दोन्हीं हात आपटीत होते. इकडून तिकडून वेड्या वांकड्या रीतीनें, समोर आलेलीं शास्त्रार्थरूप कोडें सोडविण्याची खटपट करीत होते. परंतु तीं सोडविण्याचा मार्ग एकासही दिसेना.

तो मलिन वस्त्रें पांघरलेला गृहस्थ, अगदीं खाली एकीकडे हा सर्व प्रकार पहात बसला होता तो वाघाप्रमाणें गर्जना करीत पुढें सरसावून म्हणाला, 'वादास शब्दार्थज्ञान व विद्वत्ता चांगली पाहिजे. नुसत्या मानेच्या शिरा मोठ्या व बळकट असल्यानें काम होत नाहीं. मलाही थोडा बहुत शब्दपांडित्यरूप खेळ खेळतां येतो.'

त्यावर ते म्हणाले, 'तुझी मती चालत असेल तर बोल,'—हें ऐकून त्यानें आपल्या उत्तम वक्तृत्वरूप

कलमानें त्या लोकांच्या मनावर जणूं सुंदर चित्र कोरिलें. व त्यांचे विचार व मन केवळ शब्दरूप विचारावरून शब्दाच्या तत्त्वार्थाकडे ओढलीं व सर्व वाद खोडून काढला. हें पाहून त्याची सर्व लोकांनीं चोंहोंकडून वाहवा केली, व याच्या विद्वत्तेची व वाकचातुर्याची करावी तितकी वाखाणणी थोडीच आहे, असें ते ह्मणूं लागले.

पंकनिमग्न खराप्रमाणें स्वस्थ व चुप बसलेल्या काजी-पावेतों त्याचा वक्तृत्वरूप अश्व दवडला तेव्हां, काजीनें आपल्या अंगावरील झुब्बा व फेटा उतरून तो मोठ्या आदरानें त्याच्याकडे पाठविला. व सांगून पाठविलें कीं 'तुझी योग्यता मी जाणली नाहीं, व पूर्वीच तुझें नीटपणें आनंदानें आगतस्वागत केलें नाहीं, याबद्दल मला मोठा खेद वाटतो. तू असा विद्वान् असून अशा दरिद्रावस्थेंत आहेस, याचें मला वाईट वांटतें.'

चोपदार मनधरणी करून काजीचें पागोटें आपल्या डोक्यावर ठेवण्याकरितां लाघवानें येत असलेला पाहून, त्यानें त्याला शब्दानें व हाताच्या खुणांनीं मना करून ह्मणटलें, कीं, 'माझ्या शिरावर हा गर्वपाश घालूं नको. मज दरिद्रचाच्या शिरावर ही भारी पगडी पाहून मला कपाळावर हात बडवून घ्यावा लागेल. मला लोक वाखाणूं लागतील व मी मोठा झाल्यानें गर्वानें माझें मस्तक फिरून सर्व लोक माझ्या दृष्टीनें तुच्छ दिसूं लागतील. शुद्ध व मधुर उदक उत्तम सुवर्ण पात्रांत ठेविलें किंवा मडक्यांत ठेविलें. ह्मणून त्याच्या गोडींत कांहीं फरक होतो असें नाहीं.*'

*'सुवर्णपात्रीं सुरसास गोडी जी तीहुनी पूर्ण पुटी थोडी. नवनीत.'

मॅनुष्याच्या मस्तकांत ज्ञान व मगज पाहिजे. मला तुजप्रमाणें उत्तम पागोटें नको. केवळ मोठेपणाचा डौल आणल्यानें किंवा मस्तक मोठें असल्यानें ह्मणजे कोणी मोठा व थोर समजला जातो असें नाहीं. दूधभोपळ्याचें डोकें असतें तरी तो बेमगज पोंकळ असतो. पागोटें व दाढी मोठी आहे, ह्मणून गर्वानें मान उंच करूं नको कारण पागोटें कापसाचें व दाढीमिशा गवताप्रमाणें आहेत. केवळ मनुष्यरूपानें संचार करणारांनीं चित्राप्रमाणें स्वस्थ बसावें हेंच योग्य अंगीं असलेल्या गुणांच्या योगानेंच मनुष्यानें योग्यतेस व उच्च पदास पोंचलें पाहिजे. शनीचा तारा अति उंच स्थानीं आहे पण फार अशुभ आहे, तसें असणें योग्य नाहीं. घायपात—पुष्कळ उंच व मोठा असतो, ह्मणून काय त्याच्या अंगी उसाची योग्यता येईल?* तुझ्यामागून शेंकडों दास दवडल्यावरूनच तूं मोठा बुद्धिमान व धैर्यवान आहेस, असें मी ह्मणणार नाहीं.

'एका लालची व मूर्ख मनुष्यानें गाळांत पडलेली एक कवडी उचलली, तेव्हां तिनें त्याला काय सुंदर उत्तर दिलें कीं 'मला कोणी एवढ्याशालाही विकत घेणार नाहीं. तेव्हां मूर्खाप्रमाणें मला तू व्यर्थ पदरांत बांधूं नको.'

'केवळ संपत्तीमुळेंच मनुष्यास श्रेष्ठपणा येतो असें नाहीं. गाढवावर रेशमी झूल घातली तरी शेवटीं गाढव तो गाढवच'—याप्रमाणें त्या चतुर वक्त्यानें आपल्या तिक्ष्ण भाषणरूप उदकानें मनांतील संतापरूप मळ धुवून टाकला.

---

* 'उंच वाढला येरंड तरि कां होइल इक्षुदंड'

ज्याचें मन दुखविलें गेलें आहे, त्याचें बोलणें तीक्ष्ण असतें. शत्रू समोर आल्यावर आळस करूं नको. तुझा हात पोंचेल तोंवर शत्रूचा मगज फोडून बाहेर काढ. कारण अवकाशामुळें मनांतील संताप व त्वेष कमी होतो.

त्याचा तो बोलण्याचा त्वेष पाहून काजी अगदीं सुन्न होऊन गेला. व आजचा हा मोठाच दुर्दिन उजाडला असें ह्मणून त्यानें सखेदाश्चर्यानें दोन्ही हात चावले. व उत्तरेकडील, दोन नक्षत्रें सारखीं ध्रुवाकडे पहात असतात, तसे त्याचे डोळे त्या फकीराकडे सारखे लागले होते.

. तेथून तो गृहस्थ बाहेर पडला व पुनः तेथें त्याचें कोणास निशाण सुद्धां सांपडलें नाहीं. तेथें जमलेल्या सभासदांच्या मुखांतून एकच उद्गार निघाला कीं, 'असा हा उद्भट मनुष्य कोठील व कोण असावा बरें?'

त्याच्या मागून चोहींकडे दूत धावले, व अशा तऱ्हेचा व रूपाचा मनुष्य कोणी पाहिला कां, ह्मणून विचारीत सुटले, तेव्हां एकानें ह्मटलें 'असा सुस्वभावाचा व सज्जन मनुष्य या शहरांत एक **सादी** मात्र आहे.'

असें ह्मणणाऱ्याची सहस्रशः शाबास आहे. सत्यवचन कटु आहे खरें तरी पण त्यानें किती बरें गोड भाषण केलें हें!!

गोष्ट सहावी.

*गंजच्या राजपुत्राचा पश्चात्ताप.

गंज येथील एक राजपुत्र दुर्गुणी, दुर्वृत्त, पापी व

---

* गंज नांवाचें शहर तबरीजल्यानांत मध्य एशियेंत आहे.

जुलमी असा होता. तो एकदां दारू पिऊन मस्त होऊन गात दारूचा नशा डोक्यांत शिरलेला व दारूचा प्याला हातीं घेतलेला, असा एका मशीदींत आला. तेथें एका कोठडींत एक मिष्टभाषणी व निर्मल अंतःकरणाचा भक्त रहात होता त्याच्याकडे पुष्कळसे लोक जमले होते, ते राजपुत्रास ह्मणाले, 'मोठ्या थोर वक्त्याप्रमाणें नाहीं तरी निदान ऐकणाऱ्यापेक्षांही वाईट वर्तन करणें तुला योग्य नाहीं.'

त्या दांडगेश्वराच्या या अमर्यादेमुळें चांगल्या चांगल्या लोकांचीं मनें दुःखित झालीं. प्रत्यक्ष राजाच कुमार्गी झाला तर त्याला कोण उपदेश करूं शकतो. पुष्प-परिमळ लसणेच्या घाणीपुढें व चंगाचा स्वर ढोलाच्या आवाजापुढें रद्द पडते.—नगाऱ्यापुढें टिमकीचा काय पाड—पापी मनुष्यास निषेध करणें तुला योग्य दिसलें नाहीं, तरी त्वां लंगड्यालुल्याप्रमाणें अगदीं स्वस्थ बसणें ठीक नाहीं.* हातांत सामर्थ्य नसलें तर निदान तोंडानें बोल. कारण बहुशः सदुपदेशानें वाईट खोडी जातात. हातांत व तोंडांत सामर्थ्य नसेल तर ईश्वराची प्रार्थना करून भक्तलोक उपकार करितात.

तेथील एक गृहस्थ त्या विद्वान व तपस्वी भक्तापुढें लीन होऊन दीनपणें ह्मणत होता कीं, 'कसेंही करून एकदां या मूर्ख व मस्त मनुष्यावर प्रसाद कर, कारण आमचे हात व तोंडें असून नसल्याप्रमाणें आहेत. साक्षात्कार झालेल्या मनुष्याचा एकेक उद्गारही परम दाहक, व तर्वार किंवा परशु यांच्यापेक्षां सत्तरपट तीक्ष्ण व समर्थ असतो.'

---

* हस्तपादादिसंपन्न यूयं किमवसीदथ.

हें ऐकून त्या अनुभविक व जगद्रष्ट्या भक्तानें हात वर करून प्रार्थना केली कीं, 'हे स्वर्ग व भूलोकगत पदार्थाधीशा परमेश्वरा, हा मुलगा सुखी असून याचें आयुष्य पुढेंही सुखांत जावा.' यावर कोणी त्याला झटलें, 'हे सन्मार्ग दीपा हा दुष्ट सुखी असावा असें तूं कां इछिलेंस? या दुर्वृत्त दुष्टाच्या सुखाची इच्छा करणें झणजे सर्व रयतेचें वाईट होण्याची इच्छा करणेंच होय.'

हें ऐकून तो तीव्रबुद्धि व ज्ञानी भक्त झणाला, 'या माझ्या भाषणाचें तत्त्व तुला कळलें नाहीं, सबब याबद्दल विषाद वाटूं देऊं नको. या सार्वजनिक उपदेशाच्या व पुराणाच्या जागीं त्या न्याय उत्पन्न करणाऱ्या परमेश्वराजवळ त्या बिचाऱ्याला क्षमा करण्याविषयीं मी या हेतूनें प्रार्थना केली कीं, हा आपलें दुर्वर्तन सोडील तेव्हां त्याच्या पुढील पुण्याचरणानें त्यास अक्षय्य स्वर्गप्राप्ती होईलच. हा मद्यसेवनाचा ऐषआराम काय केवळ पांच दिवसांचा आहे, तो एकदां सोडला कीं पुढें अक्षय्य सुखच आहे.'

त्या वक्त्या उपदेशकाच्या या भाषणापैकीं कांहीं भाषण एकानें जाऊन त्या राजपुत्रास सांगितलें. तें ऐकतांच मोहामुळें व पश्चात्तापानें त्याच्या नेत्रांतून मुखावर अश्रुवृष्टी झाली, पश्चात्तापाग्नीनें त्याचें अंतःकरण दग्ध झालें व लज्जातंतूनें त्याचे नेत्र जणूं पायांशीं शिवल्या प्रमाणें झाले. त्यानें त्या सुशील उपदेशकाकडे दूताबरोबर निरोप पाठविला कीं, 'मी पश्चात्तापद्वाराशीं ठोठावित आहें, तर आतां माझी प्रार्थना ईश्वरास मान्य होईल असें करा, आपण कृपाकरून एक वेळ दर्शन द्यावें झणजे

मी आपले पाय धरून मूर्खपणाचे व पापाचे विचार मनांतून दूर करीन.'

त्या भक्ताची मार्गप्रतीक्षा करीत त्या राजवाड्याच्या दारावर दुतर्फा शिपाई उभे राहिले. तो वक्ता भक्त त्या राजवाड्यांत आला तों जिकडे तिकडे साखर व उन्नाव फुलें, मद्य व समया, यांची रेलचेल असून सर्व गांव सुमृद्ध पण तेथील लोक दुर्वृत्त असल्याचें त्याच्या दृष्टीस पडलें. कोणी अगदीं बेशुद्ध, कोणी अर्धा शुद्धीवर, व कोणी गात होता व कोणाच्या हातीं सुरापूर्ण सुरई होती. एकीकडून गवयाचें गाणें. व दुसरीकडून मद्य पाजणाऱ्याचा मद्यसेवनाविषयीं प्रोत्साहक आवाज ऐकूं येत होता. सुवर्णसुरासवनानें सभोंवतालचे समवयस्क स्नेही सुस्त झाले होते. व एक चंग वादक गवयी निद्रावश होऊन चंग बगलेंत घेऊन पडला होता. तेथील अहंमन्य सहवासी मुसाहिबापैकीं नर्गिस वृक्ष पुष्परूप नेत्रांशिवाय कोणाचेही नेत्र उघडले नव्हते. डफ व चंग हीं वाद्यें परस्पर अशीं बदसुरांत वाजत होतीं कीं, जणों तीं दोन्हीं समदुःखामुळें रडत ओरडत आहेत, असें वाटे.

'हे सर्व जिनस एकमेकांवर आदळून त्याचे बारीक तुकडे करून टाका व या स्वच्छ उपदेशरूप पानपदार्थांचें सेवन या गाळाच्या ऐवजीं होवो,' म्हणून राजपुत्राचा एकदम हुकूम ऐकतांच, सेवकांनीं चंग मोडला व रोद बाजा तोडला, व सरोदाचा नाद सोडा असें म्हटलें. सुरागारांतील दगडाचे मद्य कलश फोडले, व विण्याचीं व सुरेच्या तुंब्यांचीं पोंकळ डोकीं फोडलीं. तेथें मद्याचा

पूर आला व चंग ओंधा पडला. त्यावरून मारलेल्या बदकाच्या मानेंतून रक्ताचा पूर चालला आहे असेंच कोणाला वाटलें असतें. मद्यपूर्ण कलश गर्भवती स्त्रीप्रमाणें, पूर्ण नवमासाच्या संकटसमयीं जणूं मद्यरूप कन्येस प्रसवले. मद्यानें भरलेल्या मसकेचें पोट बेंचीपर्यंत फाडून टाकलें होतें हें पाहून नेत्र चषक जणूं दुःखानें रक्ताश्रु पूर्ण झाले होते.

राजपुत्राच्या आज्ञेनें राजवाड्याच्या अंगणांतील फरसही उखडून नवीन तयार केला, कारण फुलांप्रमाणें रंगी बेरंगी व माणकांप्रमाणें चमकणारें मद्य, फतरावरून पार धूतां येगें कठीण असें त्यास वाटलें. अशा स्थितींत आतां आपल्यांतील मद्य कोण प्राशन करील ह्मणून मद्याचा हौद खराब व कष्टी झाला यांत नवल नाहीं. शिवाय वरचत बाजा हातीं घेणाऱ्याला जवळचे लोक डफाप्रमाणें थप्पड देत. कोणी लुच्या खांद्यावर चंग किंवा वीणा वाद्य घेतलेला दिसला तर, तंबूऱ्याच्या खुंट्यांप्रमाणें त्याचे कान पिळले जात होते. जो तरुण राजपुत्र आजवर गर्वानें व निर्भयपणानें मस्तक फिरलेला असा होता. तोच आतां एखाद्या वृद्ध तपस्व्याप्रमाणें भगवद्भजन करीत एकांतवास करूं लागला. बापानें त्याला अनेकवार भय दाखऊन, 'सद्वर्तन व हांसतमुख ठेऊन आपली वाणी नीट आटोक्यांत ठेव', ह्मणून सांगितलें होतें. त्या राजपुत्रानें बापाचा राग, मार, कैद, व त्रास सोसला होता पण त्याला या महात्म्याच्या उपदेशा इतका एकही फायदेशीर झाला नाहीं.

त्याला कोणी उपदेशकानें, डोक्यांतील तारुण्यमद व जुलमीपणा काढून टाक, असें सक्तीनें किंवा मृदु

वचंनानें सांगतांच, त्याचा गर्वी व तामसी स्वभाव या थराला जात असे कीं, तो विचारा उपदेशक जिवंत सुटला तर मोठें भाग्य ह्मणावयाचें.

गर्जना करणारा वाघ लढाईपासून मागें हटत नाहीं किंवा तीक्ष्ण तरवार किंवा भयप्रद अवाजाचे चंगवाद्य, याला ही भीत नाहीं. मार्दवानें शत्रू मित्र होतो, पण त्यानेंच मित्रही शत्रू होतो. ऐरणीप्रमाणें कठिणमुख केल्या वांचून आदवरूप घणाचे घाव सोसण्याची योग्यता येत नाहीं.—अंगीं टाकीचे घाव सोसल्या वांचून देव-कळा येत नाहीं.—मोठ्यांशीं उद्धट भाषण करूं नको.. तो करंडेपणा करितोसें दिसेल तर स्वस्थ रहा. गरीब व डोई नड या सर्वांशीं मेळ ठेव, कारण पहिला सहजच गरीबीनें मस्तक झुकवील व दुसरा मृदुभाषणानें नम्र होईल. मिष्ट भाषणानें विजयरूप गेंद हातीं येतो व सख्तीनें मनास खेद होतो. तू मिष्ट भाषण सादीपासून शीक व कटु-भाषण करणाऱ्याला मर ह्मणून सांग.

गोष्ट सातवी.

मधविकणारा फेरीवाला.

एक गोडबोल्या मध विकत असे.—जणों मधाच्या माधुर्यानें लोकांचीं मनें जाळीत असें तो सुंदर असून सांज्याप्रमाणें मिष्टपणाविषयीं कमर बांधलेला असें व त्याला माशापेक्षांही अधिक गिऱ्हाईक असें. तो आपल्या हातानें विष देतां तरी खरोखर लोक तें मध ह्मणून खातें.

त्याचा हा धंदा व चलचलाट पाहून एका हेवेखोराचें मन मत्सरानें जळून गेलें. दुसरे दिवशीं

तोही डोक्यावर मध व कपाळावर आंव्या घेऊन बाजारांत फेरी करण्यास निघाला, व मोठमोव्यानें ओरडत इकडे तिकडे पुष्कळसा फिरला पण त्याच्या मधावर नुसती एक माशी सुद्धां बसली नाहीं. संध्याकाळपर्यंत एक पैशाचीही विक्री झाली नाहीं तेव्हां, तो रुष्टमन व खिन्नवदन होऊन स्वस्थ कोपऱ्यांत जाऊन बसला. त्याचा चेहरा एखाद्या वायदा चुकलेल्या व ईदीच्या दिवशीं सण करितां येत नसल्यानें खिन्न झालेल्या कैद्याप्रमाणें खिन्न, व म्लान झाला होता. हें पाहून त्याच्या बायकोनें थट्टेनें त्यास झटलें 'बहुधा दुर्मुखलेल्या मनुष्याचा मधही कडू होत असेल.'

जो मनुष्य जेवतांना भ्रुकुटी वक्र करून कपाळाला आंव्या घालतो, त्याच्या घरचें अन्न कधीं पचत किंवा गोड लागत नाहीं. हे सद्गृहस्था, स्वतःवर फार रुष्ट होऊं नको. व सदां त्रासलेला असूं नको. कारण वाममार्गी मनुष्य दुर्वृत्त असतो. तुझ्या दृष्टीनें सोनेंचांदी कःपदार्थ असेल, पण सादीप्रमाणें मिष्टभाषीपणाही तुझ्या अंगीं असणें कठीणच.

गोष्ट आठवी.

सज्जनाचें आदरातिथ्य.

असें ऐकण्यांत आहे कीं एका विद्वान ईश्वर भक्ताचा एका उन्मत्त सोव्यानें रस्त्यांत पदर धरला. त्या निर्मल गृहस्थाला त्या मूर्खाच्याहातून थप्पड मिळाली, तरी तो क्षमाशील असल्यानें, त्यानें नुस्तें मस्तक देखील वर केलें नाहीं. तेव्हां एकानें त्यास झटलें 'तूही त्याच्या-

प्रमाणें पुरुष नाहींस का? या उन्मत्त मनुष्यास क्षमा करणें अगदीं गैर आहे.' हें ऐकून त्या सद्वृत्तानें झटलें, 'मज जवळ असें बोलूं नको. पिसाळलेल्या वाघाशीं लढाई करण्यास कोण सिद्ध होतो?'

शहाणा व बुद्धिवान् मनुष्य, एखाद्या उन्मत्त व मूर्ख मनुष्यानें पदर धरला झणून भीत नाहीं. कुशल मनुष्य अशा तऱ्हेनें आयुष्य घालवितो कीं, त्याच्यावर जुलूम झाला तरी तो दुसऱ्यावर कृपाच करतो.

गोष्ट नववी.

सज्जनाची नैसर्गिक योग्यता.

एक दांतांतून विष वहात असलेला एक कुत्रा एका तपस्वी भक्ताच्या पायास इतक्या त्वेषानें चावला कीं, त्या बिचाऱ्याला त्याच्या वेदनेनें रात्रभर झोंप आली नाहीं. एक लहान मुलगी घरांत होती ती बापावर रागावून व रुसून झणाली, 'काय तुलाही दांत नव्हते?'

हें ऐकून तो दुर्दैवी गृहस्थ रडें आंवरून हंसून झणाला, 'हे मनोल्हादिनी बाळे, मी त्याच्यापेक्षां अधिक बलवान होतों तरी मला आपले दांत व टाळू यांचा खेद वाटला. आपले दांत कुत्र्याच्या पायास चावून विटाविळविण्यापेक्षां तरवारीचा घाव खाल्लेला पतकरला, असें मला वाटलें.'

हलकटांशीं हलकटपणा करणें सहज आहे. तरी मनुष्याच्या हातून कुत्र्याप्रमाणें वर्तन सहसा होऊं शकत नाहीं.

गोष्ट दहावी.

सुशील व सन्मार्गी धनी व आज्ञाभंग करणारा सेवक

एक गृहस्थ विद्वान, थोर व प्रसिद्ध होता. त्याचा सेवक अत्यंत अवगुणी व निर्लज्ज असल्यानेंच जणों त्यानें आपल्या दाढीमिशा वाढविल्या होत्या. अवगुणरूप शिर्का जणूं त्याच्या तोंडावर सारवलेला होता. सांपाप्रमाणें त्याचे दांत विषारी होते, व तो सर्व नगरवासी दुर्वृत्त लोकांचा जणूं मुकुटमणी होता. नेहमीं त्याच्या डोळ्यांतून पाणी वहात असें व खाकेंतून कांद्याची दुर्गंधी सुटत असे. तो स्वयंपाक करतांना कपाळावर आंठ्या घाली, व स्वयंपाक झाल्यावर जेवण्यास यजमानाच्या मांडीशीं मांडी लावून बसें. तो स्वतः सर्वदां मनापासून जेवणास सिद्ध असे व प्राण गेला तरी दुसऱ्यास पाणी न पाजणारा असा होता.

त्याला शिव्या किंवा काठीचा मार यां दोहींपासून उपयोग होत नसे व त्याच्यामुळें तें घर रात्रंदिवस त्रस्त असें. तो कधीं केर कचरा व कांटे रस्त्यांत टाकी, व कधीं लोकांची कोमडीं उचलून कुंड्यांत टाकी. त्याचें तोंड पाहतांच कोणासही अत्यंत त्रास येत असे व तो कांहीं कामाला गेला म्हणजे पुनः येण्याचें नांवच नको.

कोणी त्या धन्याला म्हटलें, 'अशा या दुष्ट सेवकापासून तुला कां कसब, कां सौंदर्य, कशाची उमेद आहे? अशा या त्रासदायक मनुष्याची तुला काय इतकी किंमत वाटते म्हणून तूं याचा त्रास व भार सोसतोस? मी तुला

एक सुंदर व सद्गुणी दास आणून देतों याला बाजारांत विकण्यास पाठवून दे, याची तुला एक कवडी आली तरी नको म्हणून मस्तक फिरवूं नको. खरोखर हा कशालाही महागच आहे.'

त्या कुलीन गृहस्थानें ही गोष्ट ऐकून हांसून म्हटलें, 'हे सद्गुणी व आनंददायक मित्रा, या पोऱ्याचे गुण व वर्तन वाईट आहे खरें, पण त्याच्या त्या वाईट प्रकृतीपासून माझी प्रकृती व माझे गुण चांगले होतात. त्याची मी पुष्कळशी गय करतों तेव्हांच इतर सर्वत्रांचा त्रास सोसण्यास मी समर्थ होतों. त्याला विकणें मी योग्य समजत नाहीं. तसेंच दुसऱ्या जवळ त्याच्या अवगुणाचा उच्चार करणेंही मला योग्य वाटत नाहीं. याच्या दुर्गुणामुळें दुसऱ्यास त्रास होऊं देण्यापेक्षां स्वतः त्रास सोसलेला बरा.'

स्वतःच्या प्रमाणेंच सर्व लोकांस चहा. स्वतः संकटांत असशील तर दुसऱ्याला त्यांत फसवूं नको. क्षमा किंवा गय करणें, प्रथम विषाप्रमाणें कडू लागतें, पण एकदां तें प्रकृतींत दृढ झालें कीं मधाप्रमाणें मधुर होऊन जातें.

गोष्ट अकरावी.

मारूफ करखी* व एक रोगी वाटसरू.

मारूफ करखी या थोर गृहस्थाची योग्यता, ज्यानें स्वयंमन्यतेचा विचार प्रथमच पार सोडून न देणाऱ्या

---

* **मारूफ** नांवाचा एक मोठा विद्वान व महात्मा मनुष्य **करख** शहरांत होऊन गेला. तो इ. स. २०० त मरण पावला.

गृहस्थास कधीं प्राप्त होणार नाहीं. त्याच्याकडे एकदां एक पाव्हणा आला. तो रोगानें केवळ आसन्नमरण झाला होता. त्याचे डोक्यावरील केश व त्याचें तोंड पार झडून गेलें होतें, व त्याच्या कुडींत त्याचे प्राण जणूं एका केंसानें लटकले होते. रात्रीं **मारूफ**नें त्याला आपल्या घरीं ठेऊन घेऊन त्याला हांथरापांघरायाला दिलें पण तो दुःखानें सारखा विव्हळत ओरडत असल्यानें त्याला त्याच्यामुळें, किंवा घरांतील कोणालाही रात्रीं एक क्षणभरही झोंप आली नाहीं. तो रोगी अत्यंत त्रासलेला होता, व रोगाच्या पीडेमुळें त्याचा स्वभाव ही अत्यंत वाईट व त्रासिक झाला होता. तो स्वतः न मरतां लोकांस मात्र त्रास घेऊन मारीत होता. त्याचें रडणें ओरडणें, व निजणें उठणें यामुळें सर्व लोक त्रासून त्याच्यापासून दूर पळण्याचा रस्ता धरीत. घरधनी **मारूफ** याच्या शिवाय सर्व लोक तेथें त्याच्याजवळ राहण्यास अगदीं असमर्थ झाले होते. त्याच्या सेवेंत असतांना **मारूफ** रात्रीच्या रात्री निजला नाहीं. तो दासाप्रमाणें कंबर बांधून सांगेल तें काम करण्यास सज्ज असे.

एका रात्रीं तो झोंपेच्या आहारीं गेला—नेहमीं जागलेला मनुष्य कोठवर तसाच राहूं शकतो—त्याचा डोळा कोठें एक क्षणभर लागला नाहीं तोंच त्या पाव्हण्यानें वेड्यासारखें बरळणें सुरूं केलें. तो बकूं लागला कीं, 'या आजन्म पातक्यांनां धिःकार असो. हे मोठे प्रसिद्ध व प्रतिष्ठित दिसतात पण खरोखर केवळ ढोंगी असून अगदीं पोंकळ आहेत. यांचा लोकांस मोठा भरंवसा असतो, व यांचा वेश मोठा साधा व शुद्ध असतो,

पण हे घातकी व भक्तीचें ढोंग केवळ बाहेर दाखविणारे असे आहेत. मज गरीबाचे डोळे क्षणभर ही लागत नाहीत हें धापलेला व स्वस्थ झोप घेणारा मनुष्य काय जाणतो? '

एक क्षणभर ही त्यास विसरला नसून तो रोगी मारूफाला अशीं फारच दुःसह भाषणें बोलला तरी तीं उपदेशपर व निंदापर भाषणें त्यानें आपल्या क्षमाशीलपणास अनुसरून मुकाट्यानें सोसलीं.

' पण हीं भाषणें ऐकून त्याच्या अंतर्गृहांतील स्त्रियांपैकीं एक स्त्री हळूंच मारूफाला म्हणाली कीं, ' तो फकीर त्रासानें काय बडबडतो आहे तें ऐकूं नाहींका येत ? त्याला जाऊन म्हणावें, तुझ्या मनास वाटेल तसें कर. येथें या ताणा मारूं नको. दुसरीकडे जाऊन मर. कारण भलाई व कृपा स्थळविशेष पाहून केली पाहिजे. हे दोन्ही गुण चांगले आहेत, पण दुष्टाशीं भलेपणा करणें गैर आहे. दुष्टास उशाला उशी देण्यापेक्षां, अशा जनास संताप देणाऱ्याचें मस्तक, दगडावर आपटलेलें बरें. लोकांवर कृपा करूं नका असें मी म्हणत नाहीं. पण आपलें औदार्य दुष्टापुढें गमवूं नका. सर्वत्रांशींच व त्यांतही पाषाणहृदयांशीं नरमपणा करूं नका. पाळलेल्या मांजराप्रमाणें कुत्र्यास कोणी लाडानें गोंजारीत नाहीं. वास्तविकपणें योग्यायोग्य जाणणारा कुत्रा देखील कृतघ्न मनुष्यापेक्षां बरा. नीचावर थंडशी कृपावृष्टी करूं नका, कारण त्याचा बदला बर्फावर लिहिल्याप्रमाणें किंवा ताळवेंत लघवी केल्याप्रमाणें येईल. असा आंतल्या गांठीचा,

नीच व लुच्चा मनुष्य सहसा पाहण्यांत येत नाहीं. याकरितां त्याच्यावर अगदीं दया करूं नका.'

हें ऐकून तो हंसून म्हणाला, 'हे मम मनमोहिनी अर्धांगी, हा जें वेड्याप्रमाणें बकला त्याचा खेद मानूं नको. तो मजवर जरी रागावून त्रासानें ओरडला तरी त्याचा तो आक्रोश माझ्या कानाला मोठा सुखकर असा झाला. ज्यास दुखण्यामुळें झोंप येत नाहीं अशा मनुष्याचें त्रासाचें बोलणें स्वस्थ पणें ऐकून घेतलें पाहिजे.'

स्वतः स्वस्थचित्त व सुखी असशील तेव्हां कृतज्ञतापूर्वक अशक्त व दुर्बलांचा भार व त्रास सोशीत जा. तुझा देह एखाद्या शिलातलाप्रमाणें बळकट असला तरी तू मेल्यावर तुझ्या देहावरोवरच तुझें नांव ही नष्ट होईल. कृपारूप वृक्ष पोसशील तर सुयशरूप फल तुला हटकून खावयास मिळेल. या **कर्ब** शहरांत असंख्य कबरी आहेत, परंतु त्यांत **मारूफा**च्या कबरीप्रमाणें एकही सुप्रसिद्ध नाहीं हें तूं पहात नाहींस कां? येथें पुष्कळ संपत्तिमान व थोर लोक होऊन गेले, कारण त्यांनीं गर्वरूप टोपी टाकली होती. मोठेपणा मिळविण्यास झटणारा मनुष्य गर्वानें वागूं लागतो. पण खरा मोठेपणा गंभीरपणामध्येंच असतो हें त्याम ठाऊक नसतें.

गोष्ट बारावी.

नीचलोकांच्या नीचपणा व सज्जनांची क्षमा.

एक लुच्चा मनुष्य एका उदार गृहस्थाजवळ कांहीं मागूं लागला. तेव्हां त्याच्या जवळ देण्यास कांहीं नव्हतें. त्याचा कंबरबंद व हात रिकामा व निर्लेप

होता. त्या लुच्चाच्या तोंडावर मातीप्रमाणें द्रव्य फेंकण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य नव्हतें.

हें पाहून तो लुच्चा याचक तोंड वेडें वांकडें करीत बाहेर दवडून रस्त्यांत त्याला शिव्या देत ह्मणाला कीं, 'या मौनी पण नेहमीं विंचवाप्रमाणें दंश करणाऱ्या व बाह्यतः गोधडी पांघरणाऱ्या पण वाघाप्रामाणें हिंस्र अशा लोकांपासून ईश्वरच रक्षण करो. हे लोक मांजराप्रमाणें नखें पंजांत लपवून स्वस्थ बसले असतात, पण शिकार घुढें येतांच कुत्र्याप्रमाणें उडी घालतात. घरींच शिकार कमी सांपडते ह्मणून ते मशीदीजवळ ढोगांचें दुकान लावून बसतता. शूर चोर भर रस्त्यांत व्यापाऱ्यांस लुटतात. पण हे लोक चोरून लोकांचे कपडे छिनून घेतात. बाह्यतः काळेपांढरे कापडाचे तुकडे यांच्या गोधडीला शिवलेले असतात, पण आंतून कपटानें हे लोक द्रव्य सांठवून ठेवितात. वाः हे कसे चांगले गहूं दाखवून जव विकणारे आहेत! हे सर्व पृथ्वीभर फिरणारे व रात्रिंचर व ऐन खळें जवळ असून भीक मागणारे, असे आहेत. यांचें बाह्यतः भजन पूजन पाहून हे मोठे पुराणे महात्मे आहेत असें समजूं नये.

'ते नाच गाण्याच्या रंगांत तरुण व चलाख असतात. ते दिसण्यांत दुर्बल पण **मूसापैगंबराच्या*** सांप होणाऱ्या काठीप्रमाणें बहु भक्षी आहेत व ते पुनः तेव्हांच दुर्बलरूप धारण करतात. ते पापभीरू किंवा बुद्धिवान नाहींत. फार तर काय पण धर्माचें ढोंग करून ते जणूं

---

* **मुसा** पैगंबराजवळ एक ईश्वरदत्त काठी होती ती वाटेल तेव्हां सांप होत असे अशी आख्यायिका आहे.

हें सर्व जग खाऊन टाकितात. ते हजरत बिलालाना* हब्शी, यांच्याप्रमाणें जीर्ण वस्त्रें पांघरलेले असतात, पण हब्शी देशाचें सर्व उत्पन्न मिळालें तर त्याचे ते आपल्या बायकांच्या अंगावर दागिने करून घालतील, किंवा त्याकरितां बायकांचा वेश घेण्यास तयार होतील. धर्माचीं तत्वें यांच्या अंगीं बिलकूल बिंबलेलीं दृष्टीस पडणार नाहींत. तर हे दुपारीं झोंपा घेणारे व सकाळीं सर्वांच्या पूर्वी भोजन करणारे असे आढळतील. 'हे लोक—जेवायला आधीं निजायला मधीं व भजनाला कधींकधीं—असे आहेत. अन्नाच्या ग्रासानें त्यांचें पोट भिक्षेकऱ्याच्या सत्तर रंगाच्या झोळीप्रमाणें आकंठ भरलें असतें. या संबंधांत यापेक्षां जास्त मी कांहीं वर्णन करूं इच्छीत नाहीं, कारण स्वतःच्याच स्वभावाचें स्वतःच वर्णन करणें चांगलें नव्हे.'

याप्रमाणें अनेक अदृष्ट गोष्टी सांगून तो त्यांची निंदा करीत होता—छिद्रान्वेषी मनुष्य लोकांचे गुण पहात नाहीं. स्वतःच पुष्कळशीं वाईट कामें. करणाराला दुसऱ्याच्या अब्रूची काय पर्वा ? त्या सद्गृहस्थाला त्याच्या एका शिष्यानें ही गोष्ट सांगितली,—खरोखर त्यानें हें योग्य काम केलें नाहीं, कारण एखादा पाठीमागें माझी निंदा करून स्वस्थ बसणाऱ्यापेक्षां अमक्यानें अशी निंदा केली म्हणून मला सांगणारा अधिक वाईट होय. एकानें कोणाला उद्देशून तीर मारलेला न लागतां रस्त्यांत पडला तर त्यामुळें त्याला कांहीं पिडा होत नाहीं, पण तूं तो उचलून

---

* **हजरत बिलालाना** नांवाचा हब्स किंवा **अबिसीनिया** देशांत प्राचीन कालीं एक मोठा विद्वान व महात्मा होऊन गेला.

त्याच्या जवळ नेलास तर जणों तो तीर तूंच त्याला मारलास असें होतें.

त्याचें भाषण ऐकून तो कृपाळू व सद्गुणी गृहस्थ हंसून ह्मणाला, 'त्यानें केलेल्या निंदेहूनही माझी जास्ती व अगदीं यथार्थ निंदा सहज होऊं शकते. त्यानें जी निंदा केली ती माझ्या दुर्गुणांच्या मानानें थोडीच आहे. मी माझे दुर्गुण जाणतों त्या मानानें त्यानें काढलेले दुर्गुण एक शतांशा इतकेही नाहींत. माझ्या अंगीं जे दुर्गुण असल्याचें त्यानें केवळ अनुमानानें ताडलें आहे ते सर्व माझ्यांत आहेत, अशी माझी पक्की खात्री आहे. त्याची व माझी तर आतांच एकदां भेट झाली आहे, तेव्हां तो सत्तर वर्षांपासून माझ्या अंगीं भरलेले अवगुण कोठून जाणणार? या जगांत त्या एका अकथितज्ञ परमेश्वराशिवाय माझे दुर्गुण मजहून अधिक कोण जाणतो? माझे दुर्गुण अमुकच आहेत, जास्ती नाहींत, असें जाणणारा व सांगणारा कोणीच सद्गृहस्थ मला आढळला नाहीं. शेवटच्या दिवशीं तो जर माझ्या पापाविषयीं साक्षीदार होईल तर मग मला दुर्गतीचें भय नाहीं. कारण असें होईल तर माझें वर्तन चांगलेंच होतें ह्मणावयाचें. माझे दोष माझा शत्रू मला पुर्णपणें सागूं शकेल तर, त्याला ह्मणावें ये, व माझ्या पुढील माझी निंदा लिहिण्याचें माझें पुस्तक घेऊन जा'.

ईश्वरमार्गगामी महात्मे लोक नेहमीं दुर्दैवाच्या तीरास निशाणरूप होऊन गेले आहेत व त्यांच्यावर नानाविध संकटें आलेलीं आहेत. लोकांनीं चामडें सोली तोंपर्यंत देखील तू स्वस्थ रहा कारण महात्मे लोक नेहमीं मूर्ख व

लुच्चे लोकांचा त्रास सोसतात. मृत्तिकेपासून मनुष्य-रूप घट बनतात पण निंदक लोक दगडानें त्यांस फोडतात.

गोष्ट तेरावी.

दरवेशांचा उन्मत्तपणा व बादशाची क्षमा.

रूमशाम येथील बादशहांपैकीं **स्वाले** *बादशहा प्रातःकाळीं आपल्या एका दासासह **अरबस्थाना**च्या राजे लोकांच्या वहिवाटीप्रमाणें तोंडावरून अर्धें वस्त्र बांधून शहरांतील गल्लीकुचींत फिरत असे. तो कृपादृष्टी व दीनवत्सल होता व या दोन गोष्टी ज्याच्यांत असतील तो राजा खराच सालस होय, व त्या अर्थीं त्याचें नांवही अन्वर्थक होतें.

तो फिरत फिरत एका मशीदीजवळ आला. तेथें त्याला दोन फकीर निजलेले आढळले. ते खिन्नमन व त्रस्तप्राण झाले होते. रात्रीं अत्यंत थंडी पडल्यामुळें त्यांच्या डोळ्यांस झोंप आली नव्हती व ते सरड्याप्रमाणें सूर्याची उन्हाकरितां प्रार्थना करीत होते.

त्यांतून एक दुसऱ्यास म्हणत होता कीं, 'खरोखर शेवटचा न्यायाचा दिवस व ईश्वर असेल यांत शंका नाहीं. मोठमोठे मानी राजेलोक नेहमीं खेळ, ऐषआराम, विषयसुख व प्रेम यांत निमग्न असतात. तेही सद्भक्तां बरोबरच स्वर्गांत येतील तर थडग्यांतील उशाच्या विटेवरून मी मस्तक कधीं उचलणार नाहीं. **बेहष्तबरी** नांवाचा स्वर्ग आमच्या सारख्यांच्या योग्य आहे कारण

---

*स्वाले कान्स्टंटीनोपल येथील मुसलमानी बादशहांपैकी एक.

हल्लीं येथें आमच्या पायांत कष्टरूप शृंखळा पडलेल्या आहेत. अखेरच्या प्रसगींही आम्ही दुःख भोगावें अशी जन्मभर आम्हीं कोणचीं सुखें भोगिलीं आहेत? स्वाले बादशहा या बागेच्या कोटांतून येथें येईल तर जोड्यांनीं मार मारून मी त्याचें डोकें फोडून टाकीन.'

हें त्या गृहस्थाचें भाषण स्वाले बादशाहानें ऐकिलें तेव्हां आतां येथें राहणें योग्य नाहीं असें जाणून तो तेथून निघाला. इतक्यांत सूर्यबिंबही वर आलें व त्यानें सर्व प्राणीमात्रांच्या नेत्रांतून निद्रा रूपतम स्वच्छ धुवून टाकिलें. वाड्यांत जातांच त्यानें त्या दोघां दरवेशांस बोलावणें पाठविलें, व आपण मोठ्या डौलानें सिंहासनारूढ होऊन ते आल्यावर त्यांनां त्यांच्या योग्यतेप्रमाणें बसविलें व त्यांच्यावर बक्षिसांचा जणों वर्षाव करून मानसिक कष्टरूप धूळ त्यांच्या अंगावरून धुवून टाकिली. त्यांचा संकटरूप मळ या कृपावृष्टीनें धुतला गेल्यावर ते मोठ-मोठ्या लोकांत बसले. ते पूर्वी दरिद्री वस्त्रहीन व रात्रीचा दिवस करणारे असे होते, तेच आतां अंगास सुगंध तैलें लावून आपलीं वस्त्रें उद्वासित करूं लागले.

त्यांच्यांतील एकानें हळूंच बादशहास म्हटलें, 'हे सर्व समर्थ व सार्वभौमराजा, राजे लोकांस आवडणारे लोकच वैभवास पोंचतात. तर या आम्हां दासांची कोणची गोष्ट आपल्यास आवडली'? हें ऐकून तो सार्वभौमबाद-शहा आनंदानें फुलाप्रमाणें प्रफुल्लित होऊन हंसून त्या फकीराकडे पाहून म्हणाला, 'एखादा सेवक धन्याच्या जोरावर उन्मत्त होऊन गर्वानें गरीब लोकांचा धिःकार करून तोंड फिरवितो तशांतला मी नाहीं. तुम्हीही

आतां मजशीं स्वर्गांत दुष्टपणा करण्याचा विचार सोडून द्या. तुमच्या मनांत स्वर्गांत माझ्याशीं वैर करण्याचें होतें पण मी आज संधीचें द्वार खोललें आहे, त्याअर्थीं उद्यां तुम्ही मला (स्वर्गद्वार) बंद करूं नका.'

भाग्यशाली असशील तर हा मार्ग धर, व वैभव पाहिजे असेल तर दरवेशास हात दे, सुफलेच्छारूप बीज आतांपासूनच न पेरणाऱ्या मनुष्याला कल्पवृक्षशाखेपासून फळ मिळवितां येत नाहीं. सत्कर्मफल मिळविण्याची इच्छा नसेल तर भलेपणा धुंडण्याच्या नादीं लागूं नको. कारण भगवत्सेवारूप दांडूनेंच हा गेंद नेतां येतो. तूं स्वतः स्वयंमन्यतारूप जलानें पूर्ण अशा कंदिलाप्रमाणें आहेस तेव्हां तुला मार्गद्योतक दीप कोण होणार? समईप्रमाणें स्वतः शिरावर अग्नी धारण करणारें सद्गृहस्थाचें शरीरच या सर्व जगतास ज्ञानरूप प्रकाश देणारें होतें.

गोष्ट चौदावी.

स्वयंमन्य लोकांचें दुर्दैव.

एका गृहस्थाची ज्योतिष शास्त्रांत थोडीशी गती होती परंतु तेवढ्यानेंच त्याचें मस्तक गर्वानें भरून गेलें होतें. तो फार लांबून **कोषयार** नांवाच्या नामांकित जोतिषाकडे आला. त्याचें मन अध्ययनेच्छेनें व मस्तक गर्वानें भरलेलें होतें. त्या विद्वानानें यास पाहतांच जणों त्याविषयीं आपले नेत्र शिवून टाकले, त्याच्याकडे नुसतें पाहिलें देखील नाहीं, व त्याला एक अक्षर ही शिकविलें नाहीं. शेवटीं तो निराश होऊन परत जाऊं लागला तेव्हां

त्याला त्या विद्वान व थोर गृहस्थानें म्हटलें, 'तूं स्वतःस विद्वत्ता पूर्ण समजत होतास तेव्हां पूर्णघट पुनः कोण कसा भरूं शकतो ? आढ्यतेनें रिकामा असशील तर ज्ञानानें पूर्ण होशील. तूं स्वतःच पूर्ण असल्यानें रिकामा जात आहेस.'

या संसारांत **सादीप्रमाणें** अहंभाव सोडून रित्याप्रमाणें संचार करशील तर भक्तिज्ञानानें पूर्ण होऊन परत येशिल.

गोष्ट पंधरावी.

खरे भगवद्भक्त व त्यांचें यथार्थज्ञान.

एक दास एका बादशाहावर रागावून निघून गेला. त्यानें त्याला शोधून आणण्याविषयीं आज्ञा केली. पण तो कोणासही सांपडला नाहीं. त्याचा राग व रुसवा शांत झाल्यावर तो परत आला तेव्हां बादशहानें शस्त्र-धाऱ्यास त्याला मारण्याविषयीं आज्ञा केली. त्या निर्दय मांगानें, रक्तपानाविषयीं तान्हेली जीभ मुखांतून बाहेर पडते, तशी आपली तरवार म्यानांतून बाहेर काढली.

त्या दासानें दुःखी व कष्टी होऊन म्हटलें कीं 'हे परमेश्वरा, याला मी माझा खून माफ केला आहे. कारण मी याच्याच संपत्तीनें, लाडानें व प्रेमानें वाढलों असून याच्याच कृपेनें सुखावलों होतों. याकरितां उद्यां माझ्या खुनाकरितां याचे शत्रू याला दोष लावून सुख मानोत, असें न होवो.'

हें त्याचें बोलणें बादशहाच्या कानीं पडलें तेव्हां त्याच्या क्रोधरूप पात्राला पुनः दुसऱ्यानदां उमाळा आला नाहीं. त्यानें पुष्कळदां त्याचें मस्तक व नेत्र चुंबिले.

तो दास राजकृपेनें नेजा व चौघडा वगैरे मोठेपणाचीं चिन्हें पावला. त्याच्या मार्दवामुळें सुदैवानें तो अशा भयंकर प्रसंगांतून सुटून इतक्या उंच पदास पोंचला.

तात्पर्य मृदुभाषण हें क्रुद्ध मनुष्याच्या क्रोधाग्नीवर पाणी टाकल्याप्रमाणें आहे. बाण व तरवारींनीं युद्ध करतांना समरभूमीवर देखील लोक शंभरपदरीं नरम रेशमीं कपड्याचीं चिलखतें अंगांत घालीत असतात, हें तूं पहात नाहींस कां ? हे मित्रा, दुष्ट व मानी शत्रूंशीं मृदु वर्तन ठेव, कारण मृदुपणाच्या योगानें तीक्ष्ण तरवारही कुंद व बोथट होते.

गोष्ट सोळावी.

सज्जनाची गरीबी व नम्रता.

एका कंथा पांघरणाऱ्या फकीराच्या झोंपडींतून कुत्र्यासारखा आवाज आलेला एकानें ऐकून मनांत ह्मटलें, 'येथें कुत्रा कोठून असणार?' असें ह्मणून तो फकीराच्या झोंपडीजवळ गेला पण तेथें त्याला आसपास कोठेंच कुत्र्याचें निशाण सुद्धां दिसलें नाहीं, व तेथें त्या भक्ताशिवाय दुसरा कोणी मनुष्य दिसला नाहीं. तेव्हां तो लज्जित होऊन परत जाऊं लागला, कारण, त्याला तेथें आपल्या शंकेची चर्चा करण्याची शरम आली.

त्या भक्तानें पायांची चाहूल ऐकून आंतूनच ह्मटलें, 'अहो दाराशींच कां उभे, आंत या, हे माझ्या नयनद्योतका, इकडून कुत्र्याचा आवाज आला तो मीच केला, हें तुह्माला कळत नाहीं कां ? ईश्वराजवळ दीनपणानेंच इष्ट फल विकत घेतां येतें असें पाहून, मी आपली बुद्धी,

विद्वत्ता व डौल चटसारें सोडून देऊन त्याच्या दाराशीं कुत्र्याप्रमाणें पुष्कळ वेळ ओरडतो, कारण कुत्र्यापेक्षांही दीन प्राणी एकही माझ्या दृष्टीस पडला नाहीं.'

उच्चस्थळीं जाण्याची इच्छा धरशील तर ती नीच जमीनीवरून चढून गेल्यानेंच सफळ होईल. या ईश्वराच्या दरबारांत स्वतःस अत्यंत तुच्छ मानणारे लोकच उच्चपदास योग्य होतात. मोठ्या सोसाट्यानें व जोरानें वहात येणारा प्रवाह उंच स्थळावरून उलटा खालीं पडतो, पण दवबिंदूप्रमाणें दीनता व क्षुद्ररूप धरणाऱ्याला प्रत्यक्ष सूर्य उचलून घेऊन **अयूक***नामक उंच ताऱ्याजवळ किंवा ध्रुवपदास पोंचवितो.

गोष्ट सतरावी.

बहिरा हातिम† व त्याची आदरसत्काराची संवय.

ग्रंथकारांनीं हातिम हा बहिरा म्हणून प्रसिद्ध होता यावरून तो खरोखर तसा वेडा होता असें नाहीं, असें वर्णन केलें आहे. एके दिवशीं सकाळीं एका कोळ्याच्या जाळ्यांत एक माशी अडकली होती, तिची गुणगुण त्यानें ऐकिली. त्याचा सर्व बहिरेपणा व वेडसरपणा

---

* **अयूक** किंवा **अयूज** कोणत्याही ताऱ्याची अत्यंत उंच स्थिती यावरून अत्यत उंनता व मोठेपणा, असा अर्थहोतो. अतिउंच असा ध्रुवतारा यालाही **अयूक** म्हणतात.

† **हातमे** असम, किंवा बहिरा **हातिम**. हा एक मोठा विद्वान व महात्मा पुरुष इ. स. २३७. त **खुरासान** देशांत होऊन गेला. त्याचें नांव **हातिम् बिन् उन्वान्** असम, होतें. तो **अहमद सिज्जया** बादशाहाचा गुरु होता. त्यानें या संसारांतील निःसारता पाहून बहिरेपणा पतकारिला होता.

दाखविण्या पुरताच होता,—माशीस जाळें सांखरेप्रमाणें दिसलें, पण तेंच तिला फांसाप्रमाणें झालेलें हातिमानें पाहून उपदेशाच्या तोरावर झटलें, 'हे लालसापाशबद्ध प्राण्या, आतां कां ओरडतोस? स्वस्थ रहा, हरएक जागीं साखर, मध किंवा मिश्री मिळते असें नाहीं. जागोजाग, कोन्याकोपऱ्यांत जाळीं व फांस टाकलेलें असतात.'

हें त्याचें बोलणें ऐकून त्या समाजांतील एका चतुर गृहस्थानें झटलें, 'हे सन्मार्गी सद्भक्ता, अह्मांस मोठ्या कष्टानें ऐकूं येणारा माशीचा शब्द तुला ऐकूं आला याचें मला आश्चर्य वांटतें. माशीचें गुंगणें तुला ऐकूं येतें, त्या अर्थीं तुला बहिरा झणणें योग्य नाहीं.'

हें ऐकून त्यानें किंचित स्मित करून झटलें. 'हे शहाण्या व चतुर गृहस्था, पोकळ गोष्टी ऐकण्यापेक्षां बधिर होऊन बसणें बरें. माझा सहवास करणारे लोक माझे दोष झांकून माझे गुण प्रगट करणारे आहेत. बहिरेपणामुळें मला सर्व शब्दसृष्टी छिपली आहे, असें समजत असल्यानें, लोक मजसमक्ष माझ्या दोषांची चर्चा करितात, व मीही ती मला बुद्ध्या ऐकूं येत नाहींसें दाखवून दुःखापासून मुक्त होतों. जवळचे सर्व लोक मला वेडा समजतात, व मजसमक्ष माझें यथार्थ बरें वाईट वर्णन करितात. मला नांवें ठेवलेलीं आवडलीं नाहींत, तर त्या वाईट गोष्टी पुनः करण्यापासून मी आपला हात आंवरतों.'

लोकांनीं केलेल्या स्तुतिरूप रज्जूंवर भरंवसा ठेवून खोल कुऱ्यांत पडूं नको. यापेक्षां हातिमाप्रमाणें बहिरा होऊन आपले दोष ऐक.

ज्यानें **सादी**च्या उपदेशापासून मस्तक फिरविलें, त्यानें भलाई धुंडली नाहीं व त्यास शांतीही मिळाली नाहीं. याहून चांगला उपदेशक मिळाला तरी त्याच्या अशाला काय फायदा होणार नकळे.

गोष्ट अठरावी.

चोर व भगवद्भक्त.

तबरेज* शहरांत नेहमीं अहोरात्र सारखें भगवद्भजन करणारा एक भक्त होता. त्यानें एके रात्रीं एका चोरानें, दोरीचा फंदा लपेटून एका उंच मज्जावर फेंकलेला पाहून आसपासच्या लोकांस सावध केलें, तेव्हां गलबला झाला व चोहींकडून लोक हातांत कांठ्या घेऊन धांवले.

त्या चोरानें मनुष्याचा आवाज ऐकून अशा भयंकर जागीं राहणें योग्य नाहीं असें पाहिलें व जमलेल्या लोकांनीं 'धरा, पकडा,' ह्मणून ओरड सुरू केली तेव्हां त्यानें तेथून पोबारा केला.

तो रात्रिंचर चोर निराश झालेला पाहून त्या भक्ताचें मन दयेनें मेणाप्रमाणें मृदु झालें, व तो अंधेरांतून दुसऱ्या वाटेनें त्याच्या पुढें येऊन ह्मणाला, मित्रा पळूं नको मी तुझा सहाय्यकारी आहें, व शौर्याच्या कामांतही मी तुझा एक पदरज आहें. तुझ्याप्रमाणें शूर माझ्या पाहण्यांत आला नाहीं. शौर्य दोनप्रकारचें आहें, एक धैर्याने

---

* **तबरेज** नांवाचें एक प्रसिद्ध शहर **अरबस्थानांत** होतें. तें **हारूनरषीद** बादशहाची बायको **जुबैदा खातून** इनें वसविलें होतें.

शत्रूसमोर जाऊन सामना करणें, व दुसरें युद्धांतून युक्तीनें जीव वांचवून नेणें. या दोन्ही जातींचें शौर्य तुझ्या अंगीं आहे व यामुळेंच मी तुझा दास आहें, तुझें नांव काय? मी तुझ्या नांवाचाच शागिर्द आहें. तूं कृपाकरून येशील तर मला माहीत असलेल्या एका जागीं मीं तुला नेतो. तेथें एक लहानसें घर असून त्याचें दारही घट्ट लावलेलें आहे व घरधनी ही तेथें असेल असें नाहीं. आपण तेथें जाऊन एकावर एक दगड रचून एकमेकांच्या खांद्यावर पाय ठेऊन वर चढूं. अशा रीतीनें जें हातीं लागेल तेवढेंच घेऊन जा, रिकाम्या हातानें परत जाण्यापेक्षां हें बरें.'

याप्रमाणें लडिवाळपणाचीं, चातुर्याचीं व मोहाचीं भाषणें करून त्यानें त्याला आपल्याच घराकडे ओढून नेलें. त्या शूर चोरानें त्याला खांद्याचा आश्रय दिला व त्या भक्तानें वर चढून जाऊन आपल्या अंगांतलि कुडतें व डोक्यावरील फेटा यासुद्धां तेथें असलेला सर्व माल वरूनच त्याच्या पदरांत टाकला, व तेथूनच 'चोर आला चोर, मित्रहो अशा वेळीं मेहनत करून मदत करणें मोठें पुण्यकर्म आहे,' अशी आरडा ओरड करूं लागला. तेव्हां तो खरा चोर भीतीनें बाहेर उडी मारून त्या भक्ताचीं वस्त्रें बगलेंत घेऊन पळाला. हें पाहून त्या भगवद्भक्ताच्या मनाला त्या वेड्या चोराची इच्छा सफल झाली म्हणून संतोष झाला.

कधीं कोणावर दया न करणाऱ्या निर्दय मनुष्यास पाहूनही भल्या मनुष्याचें मन कृपावंत होतें. कृपाळूपणानें दुर्जनावर देखिल उपकार करण्याची थोर व विद्वान

लोकांस संवय आहे, यांत आश्चर्य नाहीं, कारण अशा सज्जनांच्या पुण्याईमुळेंच दुर्जन जिवंत आहेत, वाकी ते दुर्जन ह्मणजे अशा उपकारास पात्र आहेत, असें नाहीं.

गोष्ट एकोणिसावी.

शत्रूचाजुल्मम मित्राकरितां सोसणें.

एका **सादी**प्रमाणें साध्या मनाच्या गृहस्थाचें मन एका प्रियपात्रावर गुंतलें असल्यानें, तो शत्रूचीं कटु व तीक्ष्ण भाषणें मुकाट्यानें सोसून दुर्दैव व त्रासरूप दांडू-पुढें चेंडूप्रमाणें उडत होता. तो कधीं कोणावर त्रासून कपाळास आंठ्या घालीत नसे, व खेळण्यासंवरण्यांत तो कधीं दुर्मुखलेला नसे.

एकानें त्याला ह्मटलें, 'खरोखर तुला अगदीं लाज नाहीं, व या सर्व थप्पडा व हे सर्व दगड तुझ्या गावींही नाहींत. हलकट लोक स्वतःस थेट्टला पात्र करून घेतात, व दुर्बळ लोकच शत्रूच्या त्रासाची गय करितात. दुष्टांच्या अपराधाची क्षमा करणें योग्य नव्हे, कारण त्यामुळें ते तुला शौर्यहीन व शक्तिहीन समजतील.'

त्या मोहित गृहस्थानें किती उत्तम उत्तर दिलें—ते त्याचे बोल सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखे आहेत 'हे मूढा माझें अंतःकरणरूप घर प्रियतमेच्या प्रेमानें ओतप्रोत भरलें असल्यानें त्याच्यांत आतां कोणाचा त्रास किंवा वैर याला अवकाशच नाहीं.'

गोष्ट विसावी.

सुशील अशा बेहलोलाकडे* एक मांडखोर भक्त आला, तेव्हां त्यानें काय उत्तम भाषण केलें कीं, 'हा प्रतिपक्षी आपल्या खऱ्या मित्रास ओळखिता तर असा शत्रूशीं कधीं भांडत न बसतां त्याला ईश्वराच्या खऱ्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान झालें असतें तर सर्व जगत तो नष्ट मानता'.

गोष्ट एकविसावी.

लुक्मान्हकीम व एक बगदादी गृहस्थ.

असें सांगतात कीं **लुक्मान्** हा काळा होता. तो स्वशरीरपोषक किंवा नाजूक बांध्याचा नव्हता. एकानें त्याला एकदां आपला दास समजून **बगदाद** शहरांत घर बांधण्याचें मातीचें काम करण्यास लावलें. तें काम संपण्यास एक वर्ष लागलें, पण हा दास नसून कोणी सत्पुरुष आहे, असें कोणी ओळखिलें नाहीं.

पुढें पळून गेलेला खरा दास परत येतांच त्या गृहस्थाला **लुकमानाचें** मोठें भय वाटून तो त्याच्या पायां पडून त्याची क्षमा मागूं लागला, तेव्हां **लुक्मानानें** हंसून झटलें, 'आतां क्षमा मागण्याचा काय उपयोग? एक वर्षभर तुझ्या त्रासामुळें मीं आपल्या काळजाचें पाणी पाणी केलें व माझ्या काळजाला घरे पडले. ते मीं एका क्षणांत कसे बुजवूं शकतों? तरी हे सद्गृहस्था, मी तुला

---

* **बेहलोल**, याचा शब्दार्थ, हंसतमुख असा आहे. या नांवाचा एक महात्मा भक्त होता, तो समजून उमजून वेडा झाला होता. त्यानें या जगांतील विपरीत प्रकार पाहून वेड्याचें सोंग घेतलें होतें.

क्षमाच करतों, कारण तुझ्या फायद्यामुळें माझें कांहीं नुकसान झालें नाहीं. तूं आपलें घर बांधवून घेतलेंस त्यामुळें मला एक नवी विद्या व ईश्वरभजन यांची अधिक प्राप्ती झाली. हे भाग्यशाली गृहस्था, माझ्या घरींही एक दास आहे. त्याला मीही केव्हां केव्हां कठीण कामें सांगतो, पण आतां त्याला मी पुनः कठोरपणानें त्रास देणार नाहीं, कारण मला चिखलांत राबल्याचें नेहमीं स्मरण होईल.

थोरांचा जुलूम न सोसलेल्या गृहस्थाचें मन गरीब व दुर्बळ लोकांकरितां कष्टी होत नाहीं.

बहिराम* बादशाहानें आपल्या वजीरास ह्मटलें, 'अनाथ व दीन लोकांवर जुलूम करूं नको व वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं तुला कठिण भाषणें केलीं तरी तूं दीन व अनाथ लोकांशीं कठोरपणा करूं नको'.

गोष्ट बाविसावी.

भगवद्भक्त जुनेद बगदादी याचा सुशीलपणा.

असें सांगतात कीं **सन**आच्या जंगलांत **जुने**द याला एक कुत्रा आढळला. त्याचे शिकारीचे दांत वार्धक्यामुळें पडले होते. पूर्वीं त्याच्या अंगीं वाघास मारण्याचें सामर्थ्य होतें. पण आतां म्हातारा झाल्यानें एखाद्या वृद्ध कोल्ह्याप्रमाणें तो दीन झाला होता. व पूर्वीं हरणाची शिकार करण्या इतकी त्याच्या अंगीं चपळता

---

* **बेहराम** नांवाचा एक इराणचा बादशहा होता, तो नेहमीं गोरखर किंवा रोज, याची शिकार करण्यांत निमग्न असे या त्यावरून त्याला **बेहरामगोर** ह्मणत असत.

होती, ती जाऊन आतां त्यास हैं येथील मेंढ्यांच्या लाथा खाव्या लागत होत्या.

तो असा दीन, दुर्बळ व व्रणित झालेला पाहून त्या भक्तानें त्याला आपल्या न्याहारींतील अर्धा वांटा खाऊं घातला, व तो मोठ्या कळकळीनें रडून ह्मणत होता कीं, 'अह्मां दोघांतून अधिक श्रेष्ठ कोण आहे, हें कोण जाणूं शकतो. आज दिसण्यांत मी श्रेष्ठ आहें पण उद्यां मेल्यावर त्या शेवटच्या न्यायाच्या दिवशीं काय स्थिती होईल कोण जाणें. माझा पाय सदाचरणरूप जागेवरून न निसरला तर मला ईशकृपारूप मुकुट शिरावर घालतां येईल, पण ईश्वरज्ञानरूप वस्त्रें माझ्या अंगांत नसलीं तर मी याहून पुष्कळच हलका राहीन. कुत्रा जिवंत असतांनाच सर्व बदनामी भोगून चुकला असल्यानें मरणोत्तर सर्व बदनामींतून सुटेल व त्याला मेल्यावर नरक प्राप्त होणार नाहीं.'

याकरितांच हे **सादी**, अहंभाव सोडून ईश्वरीमार्गानें चालणारे महात्मे लोक आपल्या स्वतःविषयीं आढ्यतेची किंवा थोरवीची दृष्टी ठेवीत नाहींत. ते स्वतःला कुत्र्याहूनसुद्धां श्रेष्ठ समजत नाहींत, ह्मणून शेवटीं देवदूतांहून ही श्रेष्ठ होतात.

गोष्ट तेविसावी.

भक्त व बीनकार.

एका रात्रीं एका बीनकारानें बगलेंत बीन घेऊन दारूच्या नशांत गुंग असतांना तो बीन एका भक्ताच्या डोकीवर मारून फोडला. उजाडल्यावर तो कृपाळू

भक्त त्या पाषाण हृदयी मूर्खाकडे एक मूठभर रुपये घेऊन जाऊन म्हणाला, 'काल रात्रीं तू उन्मत्त व नशांत गुंग होतास, त्या वेळीं तुझें व माझें, वाद्य व मस्तक फुटलें. माझ्या मस्तकाची जखम बरी होऊन माझें भय गेलें, पण तुझी जखम रुपयांच्याशिवाय बरी होणें नाहीं.'

या अशा वर्तनामुळेंच भगवद्भक्त नेहमीं ईश्वरास प्रिय व श्रेष्ठ असतात, पण त्यांनां या जगांत पुष्कळसे टोणपे खावे लागतात.

गोष्ट चोविसावी.

दुष्टांच्या जुलमाची थोरांकडून क्षमा.

असें सांगतात कीं **वखष*** शहरांतील सर्दारांपैकीं एकानें विरक्त होऊन एकांतवासाचें सेवन केलें. तो तत्वार्थ समजून घेऊन विरक्त व फकीर झाला होता. केवळ गोधडी पांघरून जरूरीच्या वस्तूंकरितां दारोदार हात पसरीत फिरण्याकरितां नव्हे. संसाऱ्यांचीं द्वारें त्याला जणूं बंद झालीं होतीं तरी शांतीनें त्याच्या करितां आपलें द्वार खोललें होतें. सर्व लोक त्याला टाळीत होते.

एक हीनबुद्धी कवी मूर्खपणानें त्या सद्गृहस्थाची निंदा करण्याच्या उद्देशानें म्हणूं लागला कीं, 'अशा ढोंगी, लबाड व लुच्चा लोकांपासून ईश्वरच रक्षण करो. हे दिसण्यांत **सुलेमान** पैगंबराच्या जागीं बसण्यायोग्य, पण खरोखर असुरांप्रमाणें आहेत. ते वरचेवर मांजराप्रमाणें तोंड धुवून साफ करतात व केवळ लोकांत प्रसिद्धी होऊन स्तोम वाढावें म्हणूनच हे भजनाचा अट्टहास

---

* **वखष** नांवाचें **बदकशान** देशांत एक शहर होतें.

करितात. पोकळ तबल्याचा आवाज दूरपर्यंत जातो, अशीच यांची स्थिती आहे.'

याप्रमाणें तो बडबडत होता, व त्याच्या सभोंवार जमलेला स्त्रीपुरुषांचा समाज आनंदानें हंसत होता.

असें ऐकतों कीं, इकडे तो वरघचा विद्वान गृहस्थ दीनपणें 'या पुरुषावर क्षमाकर,' ह्मणून ईश्वराची प्रार्थना करून ह्मणत होता कीं, 'शुद्धसत्व परमेश्वरसाक्ष खरोखर सांगतो कीं, मी मरण्यापुर्वी त्याला परमेश्वर क्षमा करो,' कारण तो माझे दुर्गुण मला कळवितो.*

तू शत्रू ह्मणतो तसा असशील तर खेद मानूं नको, व तसा नसशील तर तो वेडा आहे असें समज. कोणी वेड्यानें कस्तुरीला दुर्गंधी ह्मटलें व त्यानें कांद्यास कसा उत्तम सुवास येतो असें ह्मटलें, तरी तू स्वस्थ रहा, नाराज होऊं नको.

खरा शहाणा मनुष्य डोंबाऱ्याच्या खोट्या खेळास खरा मानील, ही गोष्ट शहाणपणा, विद्वत्ता किंवा बुद्धिवाद यांस शोभत नाहीं. शहाणा मनुष्य स्वकार्यसाधू असतो, व तो परनिंदेची पर्वा करीत नाहीं.

तू स्वतः सन्मार्गी हो, ह्मणजे शत्रूला तुझे दोष काढून निंदा करण्याला रीघच सांपडणार नाहीं. शत्रूनें तुला शिव्या दिल्या ह्मणून तू दुर्बलावर त्याचा राग काढूं नको.

माझे दोष मला दाखविणाऱ्या पेक्षां, माझी अधिक स्तुती करणारा मनुष्यच मला आढळत नाहीं.

---

* निंदकाचें घर असावें शेजारी, तुकाराम.

गोष्ट पंचविसावी.

मुसलमानांत श्रेष्ठ व सर्दार असे अली यांचा थोरपणा.

एक गृहस्थ एक कठीण कोडें अलीकडे सोडविण्याकरितां घेऊन गेला तेव्हां त्या शत्रुतापद व प्रजातोषद सर्दारानें अपल्या बुद्धिचातुर्यानें व विचारानें त्याचें उत्तर दिलें. त्यावर जवळच्या एका गृहस्थानें म्हटलें, 'अहो हसनचे आजोबा, तुम्ही म्हणतां असें नव्हे.'

हें ऐकून तो यशस्वी नरव्याघ्र अगदीं विषाद न मानितां म्हणाला, 'तुला यापेक्षां चांगलें कळत असेल तर बोल' तेव्हां तो गृहस्थ आपल्या बुद्धीप्रमाणें बोलला तें अगदीं यथार्थ होतें.—सूर्यबिंब गाऱ्यानें लिंपून आच्छादितां येत नाहीं त्या थोर सर्दारानें त्याचें बोलणें मान्य करून म्हटलें 'मी चुकलों व तू खरा आहेस. तू मजहून चांगलें बोललास, तू मजहून शहाणा आहेस. एकाहून एक शहाणा असणें, हें त्या सर्वांत शहण्या परमेश्वराचें शहाणपण आहे. त्याच्या शहाणपणापुढें कोणाचेंच शहाणपण नाहीं.'

याप्रसंगीं दुसरा कोणी श्रेष्ठ सर्दार असता तर तो स्वतःविषयीं व त्याच्याविषयीं गर्वाची व झिटकाऱ्याची दृष्टी केल्या वांचून न राहता व त्याचे सेवक त्याला दरबारांतून हांकून देऊन पुष्कळसा मार देऊन म्हणते, 'असा अवमान पुनः करूं नको, कारण थोरांसमक्ष विरुद्ध बोलणें त्यांच्या मानास पुरत नाहीं.'

ज्ञानाचा मद डोक्यांत भरलेला मनुष्य, एखादी खरी गोष्ट देखील ऐकेल असें समजूं नको कारण त्याला विद्वत्तेची चीड व उपदेशाची लाज वाटत असते. अफूच्या

झाडाला खडकावर पर्जन्यवृष्टी होऊनही फुलें न येतां, पातेत व तुच्छ मानलेल्या मातीपासूनच रंगीबेरंगी फुलें येऊन उमलत नाहींत कां?

हे विद्वान गृहस्था, अहंमन्य सर्दारापुढें सुभाषित बोधवचनरूप मौक्तिकवृष्टी करूं नको. स्वतःचीच बढाई मारणारा मनुष्य थोर लोकांच्या मनांत अगदीं उतरत नाहीं. तू स्वतःविषयीं बोलणार नाहींस तोंवर, लोक तुझे सहस्रशः आभार मानून तुझी प्रशंसा करतील, पण तूच आपली बढाई करूं लागलास कीं, दुसऱ्यांनीं तुझी प्रशंसा करण्याची उमेद ठेऊं नको.

गोष्ट सव्विसावी.

मुसलमानांतील श्रेष्ठ सर्दार उमर बिन खत्ताब याची गोष्ट.

(ईश्वर त्याच्याशीं राजी राहो, व त्याला सुखी राखो.)

एका अडचणीच्या जागीं एका फकीराच्या पायावर उमरचा पाय पडला. त्या बिचाऱ्या दरवेशानें उमरला न ओळखितां संतापून ओरडून झटलें, 'काय तू आंधळा आहेस?' त्रस्ताला मित्र व शत्रू यांची ओळख रहात नाहीं. हें ऐकून, त्या थोर व न्यायी उमरनें त्याला झटलें, 'मी अंधळा नाहीं, पण माझ्या हातून चूक घडली, मी तुला पाहिलें नाहीं, मला क्षमा कर.'

धर्मसंस्थापक व धर्माचे आधारस्तंभ असे पुराणे पुरुष किती न्यायी होते! गरीब व दीन लोकांशीं त्याचें असें उत्तम वर्तन होतें. खरे विद्वान व बुद्धिवान लोक नेहमीं विनम्रतनू असतात. फळानें लादलेली वृक्षशाखा भूमीवर

नम्र होऊन मस्तक लवविते.* विनम्र लोक पुढें स्वर्गांत आनंदानें राहतात व गर्वमदाचा ताठा वळगणारे लोक पुढें लज्जेनें अधोमुख होतात.

न्यायाच्या दिवसाला भीत असशील तर तुला भिणाऱ्याच्या अपराधांची क्षमा कर, अनाथांवर जबरदस्ती करूं नको, कारण तुजहून जबरदस्त असा कोणी असेलच.

गोष्ट सत्ताविसावी.

एक सदाचारसंपन्न, सन्मार्गी व सुशील गृहस्थ होता. तो दुर्जनाचीही नेहमीं प्रशंसाच करीत असे. तो मरण पावल्यानंतर कांहीं दिवसांनीं त्याला एकानें स्वप्नांत पाहून ह्मटलें, 'मरणानंतर तुझी कशी काय स्थिती आहे तें सांग.'

हें ऐकून तो गृहस्थ प्रफुल्लित पुष्पाप्रमाणें ईषत्स्मित करीत, मुख उघडून बुलबुलाप्रमाणें मधुर स्वरयुक्त वाणीनें बोलला, 'मी कोणासही कठोर भाषण कधींच करीत नव्हतों, सबब मजशींही स्वर्गांत कोणी कठोर भाषण करीत नाहीं.'

गोष्ट अठ्ठाविसावी.

जुन्नूनेमिस्री याचा स्वतःविषयीं झिद्दकारा.—ईश्वर त्याच्यावर कृपा करो.

एकदां नीलनदीरूप जलवाहानें मिसर देशांत एक वर्षभर जलवृष्टी केली नाहीं, तेव्हां लोकांचे थवेच्याथवे पर्वताकडे जाऊन शोकाक्रोश करीत पर्जन्या-

---

* 'नम्र होती, फलभारें वृक्षही सारे' **संगीत शाकुंतल.**

विषयीं याचना करूं लागले. ते लोक रडत व आक्रोश करीत होते, त्यांचा अश्रुप्रवाहच जणूं खुद्द आकाशाच्या शोकाश्रुरूप पर्जन्यवृष्टीचा प्रवाह झाला होता. त्यांच्या अश्रूचा पूर वाहिला, पण पर्जन्यवृष्टी झाली नाहीं.

या सर्व जगतावर कहर कोसळला असून सर्व लोक कष्टी झाले आहेत असें जुन्नूनला कोणी कळवून झटलें, 'तूं या अनाथ लोकांकरितां ईश्वराजवळ वर माग, कारण ज्यांची प्रार्थना ईश्वरास मान्य होते अशांपैकीं तू एक आहेस. तुझी प्रार्थना व्यर्थ जाणार नाहीं.'

हें ऐकून **जुन्नून** तेथून पळून **मद्दियन*** शहरांत जाऊन राहिला. पुढें फार दिवस झाले नाहींत तोंच पर्जन्यवृष्टी झाली. कृष्णहृदयमेघानें हतभागी लोकांचे अश्रूच जणों अशी जलवृष्टी केली, अशी वीस दिवसांनंतर **मद्दियन** शहरांत बातमी आली. तेव्हां त्या वृद्ध महात्म्यानें पुनः **मिसर** देशांत लौकर परत जाण्याचा यत्न केला. त्यावेळीं पर्जन्यामुळें नदी, नाले, व तलाव भरून गेले होते.

एका भक्तानें त्याला हळूच विचारलें, 'या तुझ्या देशत्यागाचें इंगित काय?' तो झणाला, 'पक्षी, कीटक व संदत पशू वगैरे प्राण्यावर क्षोभ होतो, तो गुणहीन व दुष्ट लोकांच्या कुकर्मांमुळेंच होय. मी पुष्कळसा विचार करून पाहतां या देशांत मजहून गुणहीन कोणीच मला दिसला नाहीं, व माझ्या पापाकरितां सर्वत्रास सुभिक्षतेचें द्वार बंद न व्हावें झणून मी देशत्याग केला.'

---

* **मद्दियन** नांवाचें एक शहर पश्चिम समुद्रावर **मिसर** देशाच्या हद्दीपासून आठ मजलीच्या अंतरावर होतें.

तू स्वतःस तुच्छ समजशील तेव्हांच सर्वांच्या दृष्टीनें प्रिय होशील. आपल्यास तुच्छ मानणारे महात्मे लोक इहपर दोन्ही लोकांत मान्य होतात. स्वतःस अत्यंत दीनाहून दीन मनुष्याच्या पायधूळीप्रमाणें. मानणारा मनुष्यच शुद्धसत्व झाला ह्मणावयाचा.

हे सद्गृहस्था, माझ्या कबरेवरून जाशील तेव्हां मज विषयीं तुझ्या मनांत सुविचार येवोत, न येतील तर तुला तुझ्या प्रियकराची शपथ आहे. सादीच्या शरीराची मृत्तिका झाली याचा काय खेद!! तो जिवंतपणींच मुळीं मृत्तिकेप्रमाणें लीन व दीन झालेला होता. त्यानें दीन होऊन आपलें शरीर मृत्तिकेच्या स्वाधीन केलें, त्या अर्थी वायूनें त्याचे रजःकण सर्व भूमंडळावर पसरले तरी काय नुकसान आहे. तो मेल्यावर लौकरच मृत्तिकेनें त्याचें शरीर पार करून टाकलें तरी वायू त्याचे कीर्तिरज सर्व भूमंडळावर पसरील.

तू नीट पहाशील तर तुला तत्वज्ञानरूप प्रफुल्लित उपवन दिसेल व त्या उपवनांत आजवर अशा मधुर वाणीनें दुसरा कोणचाही बुलबुल बोलला नाहीं, असें तुला आढळेल. असा बुलबुल मरण पावल्यावर त्याच्या अस्थींवर एक फूलही उगवलें नाहीं तर आश्चर्यच ह्मणावयाचें!

भाग चौथा समाप्त.

भाग पांचवा.

—:0:—

ईश्वरदत्त स्थितींत समाधानवृत्ती राहणें.

मी एकदां रात्रीं विचाररूप तेल जाळून, ईश्वरगुण-जिज्ञासारूप दीप प्रज्वलित करून व्याख्यान देत असतांनां, एका बाप्कळ भाषण करणाऱ्याला माझा उपदेश ऐकून 'वाहवा फार चांगलें' असें ह्मणण्यावांचून दुसरा मार्गच दिसला नाहीं. तरी त्यानें त्यांतच आपल्या वाईट स्वभावास अनुसरून एक गोम काढून ह्मटलें कीं, 'गरीब मनुष्य दुःख होतांच रडूं ओरडूं लागतो, तशी याची स्थिती आहे. याचा विचार गहन व बुद्धी कुशाग्र आहे खरी, पण ती उपदेश व धर्मचर्चा करण्यापुर्तीच आहे. समरांगण, किल्ले, कोट व शस्त्रास्त्रें इत्यादिकांचें वर्णन करण्याचें काम याचें नाहीं. या गोष्टी तर दुसऱ्यांनींच कराव्या.'

तो हें जाणत नव्हता कीं, युद्धप्रसंग वर्णन करण्याची मला इच्छा किंवा अवकाशच नाहीं; बाकी असें वर्णन करण्याची योग्यता व शक्ती माझ्यांत कमी आहे असें नाहीं. मी आपली वाणीरूप तरवार खेंचली तर मागील सर्व सृष्टीला हरताळ लावून तिला मागें टाकण्याची माझ्यांत शक्ती आहे*. पण हें जाऊं द्या, चला आपण पूर्ववतच लेखनमार्गक्रमण करूं व अशा शत्रूचें मस्तक दगडानें फोडून त्याला गाडून टाकूं.

---

* **टीप** ॥ ये नामकेचिदिहनःप्रथयंत्यवज्ञां । जानन्ति ते किमपितान्प्रतिनैषयत्नः ॥ भवभूति.

बोधवचन.

भवितव्यतेनुरूप समाधानवृत्तीनें ईश्वरी आज्ञा पालणें.

थोरवी ही ईश्वराची देणगी आहे. ती जबरदस्तीनें किंवा कवळ बाहुबलानें प्राप्य आहे असें नाहीं. आपले उच्च ग्रह आपल्यास संपत्ती न मिळवून देतील तर, केवळ शौर्यानें ती आपल्या तावडींत आणितां येईल असें नाहीं. मुंगी दुर्बळ आहे म्हणून तिच्यावर कोणी जुलूम करूं शकतो, किंवा वाघांनां तरी त्यांच्याच शौर्यानें व शक्तीनें खावयास मिळतें असें नाहीं.

आकाशस्थ अदृष्टांशीं चार हात मारण्याचें आपल्यांत सामर्थ्य नाहींच, त्या अर्थीं या भवचक्रभ्रमणांत सामील राहून त्याच्याबरोबर फिरावें हेंच योग्य, व जरूर आहे. तुझ्या आयुष्याची दोरी अवशेष व बळकट असली तर तुला सर्प, व्याघ्र किंवा शस्त्रादिक यांच्यापासून कांहीं पीडा होणार नाहीं; पण तुझें आयुष्यच अवशिष्ट नसलें, तर अमृतही तुला विष होऊन मारील. प्रत्यक्ष **रुस्तुमा**नेंही आयुष्याची दोरी बळकट होती तोंवरच या जगाचा उपभोग घेतला, पण पुढें त्याचाच सरखा भाऊ **शिगाद*** यानेंच नाहीं कां त्याचा प्राण घेतला?

गोष्ट पहिली.

एक इस्पहानी चालाख व शूर गृहस्थ.

इस्पहान † शहरांत एक माझा मित्र होता. तो मोठा

---

* **शिगाद** नांवाचा एक **रुस्तमा**चा भाऊ होता. त्यानें **रुस्तुमाला** कपटानें मारण्याच्या हेतूनें एका विहरींत पाडपाडून एका तीरानें त्याचा प्राण घेतला.

† हें शहर **इराण** देशाची प्राचीन राजधानी होतें.

भांडखोर, अविचारी व चालाख असे. त्याचा हात नेहमीं रक्तानें भरलेला व तो जणूं रक्तानें न्हालेला असे. त्याच्यामुळें शत्रूंचीं मनें निखाऱ्यावर कबाब भाजल्याप्रमाणें जळत असत. त्यानें भाता बांधलेला नाहीं व त्याच्या पोलादी बरचीनें अग्नीच्या ठिणग्या उडाल्या नाहींत, असें मीं एक दिवस देखील पाहिलें नाहीं.

तो मन मिळाऊ व युद्धांत सांडासारखा बलाढ्य होता व त्याच्या भीतीमुळें वाघाची देखील पांचावर धारण बसली होती. तो असें हटकून निशाण मारी कीं, द्राक्षाच्या घडांतील एकेक द्राक्ष टाळून पाडीत असे, व त्याच्या बरचीच्या प्रहरानें डालीवर काढलेलें प्रत्येक निष्कंटकफूल कंटकित होत असे. त्यानें एखाद्याच्या मस्तकावर असा नेमानें तीर मारावा कीं त्या तीरानें शिरस्त्राण व मस्तक या दोहोंसही एकदम भेदून जावें. युद्धाच्या दिवशीं त्याला असा त्वेष येई कीं त्यामुळें शत्रूची त्याच्यापुढें, चिमणी पुढें टोळाची स्थिती होते तशी स्थिती होई व त्याच्या सपाट्यांत माणसें व चिमण्या एकसारख्याच होत्या. तो प्रत्यक्ष फरीदूनशीं युद्ध करणें इच्छिता तर, अशा आवेशानें व जलदीनें घाव मारिता कीं, त्याला शस्त्र खेंचण्याला देखील सवड मिळूं न देता. त्याच्या बाहुबलापुढें चित्तेही चित होते, व त्यानें थपडीसरशीं वाघाचें डोकें फोडलें होतें. एकदां त्यानें कोणी पर्वतप्राय मल्लाचा लंगोट धरला कीं त्याला तो सहज उखडून टाकीत असे. चिलखत घातलेल्या स्वारावर तो तर्वारीचा वार करी तेव्हां त्याची तरवार स्वाराच्या शरीरांतून पार निघून जिनास भेदीत असे. तत्तुल्य पराक्रमी व भिडस्त

असा दुसरा कोणीही भूमंडळावर माझ्या ऐकण्यांत नव्हता.

मला तो क्षणभरही दूर सोडीत नसे, कारण सत्यप्रिय प्रकृतीच्या मनुष्याचा तो फार भुकेला होता. त्या प्रांतांतून माझें अन्नजल संपल्यानें मी एकाएकीं दूर देशीं जाण्यास निघालों, तों दैवगतीनें मला इराक देशांतून रूमशामकडे नेलें. त्या पुण्यभूमींत वास करण्यापासून मला फार आनंद वाटला. पुढें त्या रूमशाम देशांतूनही माझें अन्नजलाचें माप पूर्ण झालें, व जन्मभूमीच्या दर्शनेच्छेनें मला पुनः ओढलें.

दैवयोगानें मला पुनः इराकमध्यें एक दिवस वास करावा लागला. त्या रात्रीं माझ्या डोक्यांत अनेकविध विचार येत होते. त्या कुशल शिपायाचें मला पुनः स्मरण होऊन तद्विरहरूप प्राचीन व्रणावर, मी त्याच्या घरीं पुष्कळशी मीठभाकर खाल्ली असल्यानें पुनः मीठ पडल्याप्रमाणें झालें, व तद्दर्शनेच्छु व त्याचा स्नेहाचा भुकेला होऊन मी इस्पहान शहराकडे वळलों.

तेथें त्यास पाहतों तों त्याचें तारुण्य जाऊन कालगतीनें त्याला वार्धक्य आलें होतें. त्याचें तीराप्रमाणें ताठ शरीर कमानीप्रमाणें लवलें होतें. त्याच्या तोंडावरील गुलाबी जाऊन पिंवळेपणा आला होता. त्याचें मस्तक शुभ्र केसांमुळें, बर्फानें शुभ्र झालेल्या पर्वताप्रमाणें दिसत होतें, व जरारूप बर्फापासून त्याच्या तोंडावर अश्रुजल प्रवाह चालला होता. देवतांनीं जणूं त्याच्यावर बलाढ्य असा हात साफ फिरवून त्याचा शौर्यरूप हस्त तोडला होता. कालचक्रानें त्याच्या मस्तकांतील गर्व दूर करून अशक्ततेनें त्याचें मस्तक गुडघ्यावर लोंबविलें होतें.

मीं त्याला म्हटलें, 'हे वायमाऱ्या, नरवृषभा, तुझ्या स्थितींत असा काय पालट झाला? तू एखाद्या वृद्ध कोल्ह्याप्रमाणें दीन कसा झालास?'

तो हंसून म्हणाला, 'तातारवाल्यांशीं लढाई झाली त्या दिवसापासून माझ्या डोक्यांतून युद्धेच्छा दूर झाली. त्या दिवशीं समरभूमी भाल्यांच्यामुळें बांसाच्या झाडीप्रमाणें व अनेकशः भरगच्ची झेंड्यांच्या योगानें जणूं पेटल्याप्रमाणें दिसत होती, व युद्धाच्या गर्दीमुळें उडालेली धूळ धुराप्रमाणें दिसत होती.

'दैव प्रतिकूळ असलें तर केवळ शौर्याचाच काय फायदा? मी युद्धांत तीरानें हातांतील अंगठी उडविण्यास समर्थ होतों, पण ग्रहबल नाहींसें झालें तेव्हां, शत्रूचें माझ्याच सभोंवार कडें पडलें. अशा स्थितींत पळण्याचा रस्ता धरणेंच मला योग्य दिसलें, कारण मूर्तिमंत मृत्यूशीं मोर्चा मारणें मूर्खाचें काम होय.

'उच्चग्रहाचें पाठबळ नसेल तर मला शिरस्त्राण व चिलखत यापासून काय सहाय्य होणार? विजयाची किल्ली हातीं नसेल तर केवळ बाहुबलानेंच विजयद्वार खोलतां येत नाहीं.

'वायमारे व नागबली योद्धे, डोक्यापासून घोड्याच्या खुरापर्यंत लोखंडांत गढलेले, रणभूमीवर आमच्या दृष्टीस पडले व त्यांच्या योगानें उडालेली धूळ दृष्टीस पडतांच आम्ही अंगांत चिलखतें व डोकीवर शिरस्त्राणें घातलीं. चपळ अश्वसमुदायरूप मेघावर स्वार होऊन आम्हीं तीर व बरच्छीरूप जलधारांचा वर्षाव करूं लागलों. प्रथम दोन्ही सैन्यें छिपून आडून एकमेकांवर,

आकाश पृथ्वीशीं लढत असल्याप्रमाणेंच, जणों हल्ला करीत होतीं. तीररूप गारांच्या वर्षावामुळें हरएक कोन्या कोपऱ्यांत देखील मृत्यूचें तुफान उठलें. जागोजागीं शूर व युद्धोद्यत नरव्याघ्र व घातक नरसर्प शिकारीकरितां आ पसरून बसले होते. आकाश व समरभूमी धुळीमुळें काळी धुंद झाली, व तारे व विद्युल्लता यांच्याप्रमाणें शिरस्त्राणें व तर्वारी चमकूं लागल्या.

'शत्रूचे स्वार आलेले पाहतांच आम्हीं त्यांच्या तोंडावर पायदळरूप ढाल दिली, पण ईश्वरी कृपारूप ढाल नसली तर मनुष्याच्याच यत्नानें काय पराक्रम होणार? शस्त्रधाऱ्यांची तर्वार कुंद होती असें नसून उच्चग्रहांच्या पाठबलाचीच उणीव होती. लढाईंत सकवच सर्वांग रक्तानें भरल्याशिवाय आमच्या सैन्यापैकीं कोणीही परत आला नाहीं. त्या दिवशीं तीरानें लोखंडी ऐरण छेदणाऱ्याचा देखील, एकही तीर, शत्रूच्या रेशमी अंगरख्यास भेदूं शकला नाहीं. आम्हीं कणसांत असलेले शंभर दाणे एकेक बाणानें वेगळे वेगळे पाडीत होतों, तेच विखरलेल्या दाण्याप्रमाणें स्वतःच एकेक कोन्याकोपऱ्यांत जाऊन पडलों व दीनपणानें परस्पर मदत करण्यास असमर्थ होत्साते जाळ्यांत सांपडलेल्या माशांप्रमाणें आपल्याच चिलखतांत तडफडत होतों.

'ईश्वरानेंच आमच्या कडून आपलें प्रसन्न मुख फिरविल्यानें कालशरवर्षावापुढें आमच्या ढाली कःपदार्थ होऊन गेल्या.'

गोष्ट दुसरी.

अर्दबील येथील शूर व बलाढ्य योद्धा.

एक अयोबाहू शूर गृहस्थ अर्दबील* शहरांत रहात होता. त्याच्या अंगीं लोखंडाच्या फावड्यांतून बाण मारण्याचें सामर्थ्य असें.

एकदां एक त्रैलोक्यतापद युद्धकुशल व ऊर्णावस्त्रें परिधान केलेला असा युद्धार्थी तरुण गृहस्थ **बैराम गोरी**-प्रमाणें खांद्यावर नील गायीचें चामडें घेतलेला त्याचा शोध करीत आला. पहिल्या गृहस्थानें त्याला पन्नास बाण मारले, पण त्यांतून एकही त्या बुर्णुसांतून पार गेला नाहीं. पुढें त्या दुसऱ्या गृहस्थानें सहज **दस्तान** पहिलवानाप्रमाणें पुढें सरसाऊन त्याला आपल्या जाळ्यांत फांसून ओढून नेऊन पडावाच्या जागीं तंबूच्या दारापुढें, एखाद्या खुनी चोराप्रमाणें दाव्याला बांधून ठेवलें. रात्रभर भीतीनें व लज्जेनें त्याला झोंप आली नाहीं, तेव्हां पहाटें डेऱ्यांतून एक सेवक म्हणाला, 'तूं लोखंडांतून बाण पार मारीत होतास, तो या बुर्णूस पांघरणाराच्या फासांत कसा सांपडलास?'

हें ऐकून तो गृहस्थ नेत्रांतून जणों रक्ताश्रू गाळून म्हणाला, 'अंतकाळ प्राप्त झाला म्हणजे कोणी वांचूं शकत नाहीं, हें तूं जाणत नाहींस कां? तीर व तर्वारीची युद्धकला मी प्रत्यक्ष **रुस्तुमा**ला शिकवूं शकतों. दैवबलरूप सामर्थ्य होतें तेव्हां कठिणतर असा लोहपट्ट मला बुर्णुसाप्रमाणें

---

* **अर्दबील** नांवाचें एक **इराण** देशांत शहर होतें तें **नोशेरवाना**चा आजा **फीरोज** यानें वसविलें होतें.

मृदु होता. पण हल्लीं तेंच माझ्या हातीं नाहीं तेव्हां माझ्या तीरापुढें बुर्णूसही लोहपट्टाहून कमी नाहीं. मरण ओढवलें म्हणजे बरची चिलखताचाही भेद करिते, नाहीं तर तीच कापसाच्या तुकड्यांतूनही पार जात नाहीं.'

मृत्यूची तीक्ष्ण व घातक तरवार मागें लागली असेल त्याच्या अंगांत अनेक पदरी चिलखत असूनही तो नागवा उघडाच होय; पण सुदैव पाठराखी असलें तर तो उघडा असला तरी खाटिकाचा तीक्ष्ण सुरा देखील त्याला तोडूं शकत नाहीं. शहाणा मनुष्य स्वतःच्या उद्योगानेंच मृत्यूपासून प्राण वांचवूं शकतो, असें नाहीं, व मूर्ख मनुष्य कुपथ्य करूनही मृत्यूची वेळ आल्याशिवाय मरतो असेंही नाहीं.

गोष्ट तिसरी.

वैद्य व गांवढळ कुर्द*.

एका रात्रीं एका कुर्द जातीच्या शेतकऱ्यास पोटशुळामुळें झोंप आली नाहीं. तेथें जवळ एक वैद्य होता तो म्हणाला, 'या शेतकऱ्यानें द्राक्षाचीं पानें खाल्लीं आहेत तेव्हां याची ही रात्र सुखरूप पार पडली तर मोठें आश्चर्य होय, कारण अशा मनुष्यास युद्धांत तार्तार लोकांच्या हातून छातींत तीर लागलेला कुपथ्यकर असे सुंदर वेळादाणे खाण्यापेक्षां बेहत्तर आहे. कारण एका

---

* कुर्द नांवाचे जंगली लोक मध्य एशियेंत आहेत. ते या देशांतील लमाणासारखे नेहमीं फिरत असतात, व ढोरें चारून त्यांच्यावर उपजीविका करितात.

घासानें आंतड्यांत पीळ पडलेला सर्व आयुष्यभर कशाहीं उपायानें निघत नाहीं.'

दैवगतीनें तो वैद्य त्याच रात्रीं मरण पावला व तो कुर्द या गोष्टीला चाळीस वर्षें झालीं तरी अद्याप जिवंत आहे.

गोष्ट चौथी.

गाढवाच्या डोक्याचें बुजगावणें करणारा गांवढेकरी.

एका गांवढेकऱ्याचें गाढव मेलें. त्याचें डोकें काढून त्यानें तें आपल्या बागेच्या कोटांत पक्ष्यांस भिवविण्याकरितां बुजगावण्याप्रमाणें लावलें होतें.

एक अनुभविक वृद्ध गृहस्थ तिकडून चालला व त्यानें त्या मूर्ख शेतकऱ्यास म्हटलें, 'हे आपल्या बापाच्या लाडक्या, हें गाढव म्हणजे तुझी हिरवीगार शेती राखील असें समजूं नको. कारण जिवंतपणीं सर्वांगावर बसणाऱ्या काळ्या ज्याच्यानें बंद करविल्या गेल्या नाहींत, तो बिचारा मेल्यावर काय दुसऱ्याचें रक्षण करणार?'

स्वतःच रोगानें मरणारा वैद्य बिचारा दुसऱ्याचे रोग काय दूर करणार?

गोष्ट पांचवी.

दीनार हरवलेला मनुष्य.

एका गरीबाच्या हातांतून एक दीनार पडला. तो त्या गरीबानें पुष्कळ धुंडला, पण न मिळाल्यानें शेवटीं निराश होऊन तेथून तो चालता झाला दुसऱ्या एकाला तो दीनार न शोधितां सांपडला.

दुर्दैव व सुदैव या दोहोंविषयीं त्या परमेश्वरानें मातेच्या उदरांतच आमच्या कपाळीं अक्षरें लिहून ठेवलीं आहेत. कोणीही केवळ स्वबाहुबलानेंच आपला चरितार्थ चालवूं शकत नाहीं. किंबहुना आपल्या बाहुबलाचीच घमंड ठेवणारे लोक अधिक अकिंचन असतात.

गोष्ट सहावी.

मुलास मार देणारा ह्यातारा.

एक ह्यातारा आपल्या मुलास काठीनें ठोकीत होता. त्याला त्या मुलानें ह्मटलें, 'बाबा मला विना अपराध मारूं नको. दुसऱ्यानें जुलूम केला तर तुजकडे येऊन रडावयास सांपडतें पण तूंच जुलूम करशील तर 'शरण कुणा जावें?'

ज्ञानी सत्पुरुष ईश्वराजवळ परपीडेचें गाऱ्हाणें गात असतात. पण खुद्द ईश्वराच्या जुलूमाविषयीं ते कोठेंही गाऱ्हाणें गात नाहींत.

गोष्ट सातवी.

श्रीमान व गरीब.

एक बख्तयार या (दैवमित्र) अन्वर्थक नांवाचा मनुष्य चांगला संपन्न व बलाढ्य होता. त्या प्रांतांत तोच एक धनिक व मालदार होता व इतर सर्व लोक गरीब, कम नशीब व काळ फिरलेले असे होते. त्यांपैकीं एकजण रात्रीं रिकाम्या हातानें आपल्या बायकोकडे गेला. तेव्हां तिनें त्याच्याशीं भांडण सुरू करून ह्मटलें,

'तुजप्रमाणें कोणी कंगाल व दुर्दैवी नाहीं. कारण कीं तुजजवळ गांधील माशीप्रमाणें लाल नांगीशिवाय कांहीं नाहीं. आपल्या शेजाऱ्यापासून शौर्य व गुण शीख. मी कांहीं तुझी बटिक नाहीं, कीं तूं मजकडे नुसते हात हलवीत यावेंस. इतर लोकांजवळ द्रव्य, राज्य व संपत्ती असल्यानें ते दैववान आहेत. त्याप्रमाणें तू कां नाहींस.'

त्या शुभ्र वस्त्रें धारण करणाऱ्या शुद्ध मनाच्या गृहस्थानें मृदंगाप्रमाणें गंभीर स्वरानें झटलें, 'कोणचीही सुखाची वस्तु मला दैवानें दिलीच नाहीं, त्या अर्थीं दांडगाई करून दैवाशीं सामना करण्याचा यत्न करून फळ काय? ईश्वरानें मला भाग्यशाली होण्याची शक्तीच दिली नाहीं.'

गोष्ट आठवी.

कुरूपाविषयीं नवऱ्याचा बायकोस उपदेश.

केश नांवाच्या इराण देशांतील एका शहरांत एक गरीब गृहस्थ आपल्या बायकोस किती चांगलें बोलला कीं, 'ईश्वरानें स्वहस्तानेंच तुला कुरूप बनविलें आहे, त्या अर्थीं आपल्या कुरूप मुखावर व्यर्थ सुंदर उटणें लावूं नको.'

सौभाग्य जबरदस्तीनें कोण मिळवूं शकतो? व अंधाचे नेत्र सुर्म्यानें किंवा अंजनानें कोण चांगले करूं शकतो? दुष्टांच्या हातून सदाचरण होत नाहीं. कुत्र्याच्या हातून शिंप्याचें काम कधीं होणार नाहीं. यूनान व

रूम येथील सर्व मोठमोठ्या विद्वान व कुशल लोकांतून एकालाही दगडाची कांच कधीं करतां येत नाहीं. पशूचा मनुष्य होऊं शकत नाहीं, उलट त्याला पढविण्याकरितां केलेले श्रम मात्र व्यर्थ जातात. कांचेवर बसलेला मळ काढतां येतो, पण दगडाची कधीं कांच बनत नाहीं. कितीही परिश्रम केले तरी वेताच्या डहाळीस फुलें आणतां येणार नाहींत व हबशाला किती धुतलें तरी गोरा करितां येणार नाहीं. दुर्दैवाचे तीर एखाद्याचा वध करूं लागले तर त्या विचाऱ्याला ईश्वराशिवाय दुसरी ढालच नाहीं.

गोष्ट नववी.

गृध्र व घार.

एका गृध्रानें घारीस ह्मटलें, 'मजपेक्षां जास्त तीक्ष्ण व दूरदृष्टी दुसरा कोणी नाहीं.' घार ह्मणाली 'या नुसत्या बोलण्यांत काय जीव आहे? अरण्यांत चल ह्मणजे तुझी कोठवर नजर पोहोंचते पाहूं.'

असें ह्मणून दोघांनींही सुमारें एक दिवसाच्या मजली इतकें उंच उडून जाऊन तेथून खालीं दृष्टी फेंकली तेव्हां गृध्र ह्मणाला, 'तुला माझें ह्मणणें खरें वाटत असेल तर सांगतों, या जंगलांत त्या अमुक जागीं एक गव्हाचा दाणा पडला आहे.' हें ऐकून घारीला आश्चर्यामुळें पुढें उडण्याचें भान राहिलें नाहीं, व दोघेंही त्या प्रदेशांतून एकदम खालीं उतरलीं. त्या गृध्रानें गव्हाच्या दाण्यावर झांप घातली तोंच त्याचा गळा

जाळ्यांत अडकला. घांस खाण्याच्या नादांत काळानें आपल्या गळ्यांत फांस घातला, हें त्याला कळलें नाहीं. तेव्हां घारीनें ह्मटलें, 'शत्रूनें दाण्याभोंवतें टाकलेलें जाळें दिसत नाहीं, असें दाणे वेंचणें काय कामाचें?'

प्रत्येक शिंप मौक्तिकगर्भ असते असें नाहीं, व चतुर मनुष्य नेहमींच निशाणावर तीर मारील असें नाहीं.

जाळ्यांत मान फसलेली असतांना गृध्र ह्मणत होता, कीं सारांसारं विचार,व दूर दृष्टीचा दुर्दैवापुढें कांहीं फायदा होत नाहीं,* मृत्यूनें त्याच्या रक्तानें हात धुण्याचें मनांत आणलें तेव्हां कालचक्रानें त्याचे सूक्ष्मदृष्टी डोळे बांधले. तीराचा थांग नाहीं अशा जलाशयामध्यें तीरणाऱ्याचा गर्व कामीं येत नाहीं.

गोष्ट दहावी.

कोष्टी व त्याचा शिष्य.

एका जरीचें कापड विणणाराच्या शिष्यानें शहामृग, हत्ती व जिराफ, वगैरेचीं चित्रें जरांत उठाविल्यानंतर काय उत्तम भाषण केलें कीं, 'परम श्रेष्ठ अशा गुरूनें वरून चित्रें रेखून दिल्यावांचून मला हातांनीं अशीं रूपें विणतां येत नाहींत.'

तुझें रूप चांगलें वाईट जसें असेल तसें त्या परमेश्वराच्या हातून रेखलें गेलें आहे. अमक्यानें मला त्रास दिला, व तमक्यानें मला वांचविलें, असें ह्मणशील तर तू

---

* यद्धात्रा निजभालपट्टलिखितं तन्मार्जितुं कः क्षमः
भर्तृहरी.

ईश्वराबरोबरीचा दुसरा एक साथीदार उत्पन्न केल्याप्रमाणें होईल. पण सर्वेश्वर तुला दिव्य ज्ञानदृष्टी देईल तर, अमका तमका हा सर्व भ्रम आहे, असें तुला दिसून येईल. ईश्वर आपल्या दासाला आमरणांत अन्नपाणी देण्यांत आपला हात मागें घेईल असें मी कधीं मानणार नाहीं.

जगत्स्रष्टा परमेश्वरच तुला जीवन्मुक्त करून ज्ञानाचें द्वार खुलें ठेवो, कारण त्यानेंच तें बंद केलें तर तें कोणी खोलूं शकणार नाहीं,

---

गोष्ट अकरावी.

सांडणी व तिच्या पोराचा संवाद.

एका उंटाच्या पोरानें आपल्या आईस म्हटलें, 'तूं एक क्षणभर देखील विसावा घेत नाहींस हें काय?' तिनें म्हटलें, 'माझ्याच हातीं माझी वेसण असती तर पहाडाच्या कटारीवरून ओझें लादून नेतांना कोणी मला न पाहते.'

तांडेलानें आपल्या अंगावरील कपडे त्रासानें फाडून जंग जंग पछाडले तरी कालचक्र जेथें नाव नेणार असेल तेथें ती गेल्यावांचून राहणार नाहीं. हे सादी, तू कोणाच्याही हाताकडे लालचीनें दृष्टी ठेवूं नको. कारण सर्वांस इच्छितफल देणारा केवळ एक जगत्पालकच आहे. तू एका ईश्वराचीच सेवा करशील तर तुला इतरांच्या दारांपुढें जावें लागणार नाहीं. व तोच तुला आपल्या दारापुढून हांकून लावील तर तुला कोणी जवळ बोलावणार नाहीं. तोंच तुला भाग्यशाली

लोकांपैकीं एक करील तरच तू थोर होशील, नाहीं तर तुला निराशेनें डोकें खाजवीत रहावें लागेल. तरी या दोन्ही गोष्टींत तू समाधान वृत्तीच रहा.

बोधवचन.

ईश्वराच्या ठायीं प्रेम व त्याचें फळ, व ढोंग व त्याचे संकटकारक परिणाम.

ईश्वरभजन प्रेमळ बुद्धीनें केलें तरच चांगलें. गीरा-शिवाय सालीचेंच सेवन केल्यानें काय फल मिळणार? केवळ लोकांस दाखविण्याच्या इच्छेनेंच तूं जानवें घातलेंस किंवा अग्निपूजकांचा वेष घेतलास, किंवा गोधडी पांघरलास, ह्मणून काय फायदा?

मी तुला सांगतों, तू, आपला पुरुषार्थ, आपणच प्रगट करूं नको, व बाह्यतः पुरुषार्थ दाखवून अंतर्यामीं खरोखर पंढ राहूं नको. आपण कसे आहों तें लोकांनीं अंदाजानें जाणलें पाहिजे.

आपलें खरें स्वरूप बाहेर दाखविणाऱ्याला शर्मिंदें व्हावें लागत नाहीं. कारण अंगांतील भाड्याचे कपडे काढून घेतले तरी त्याच्या अंगांत पुराणे कपडे हीन राहतील, असें होणार नाहीं.

तू ठेंगणा असशील तर लांकडाचे पाय बांधूं नको. कारण त्या योगानें केवळ पोरांना मात्र तू उंच दिसशील. चांदीचा मुलामा केलेले तांब्याचे तुकडे अजाण मनुष्या-पुढेंच रुपये म्हणून चालवितां येतील.

हे माझ्या प्राणा, कवडीवर सोन्याचा मुलामा करूं

नको, कारण हुषार सराफ तिला कशाच्याही बदल्यांत घेणार नाहीं. सोन्याचा मुलामा केलेली वस्तू आगींत जाळतात. म्हणजे तांबें आहे किंवा सोनें आहे तें तेव्हांच दृष्टोत्पत्तीस येतें.

गोष्ट बारावी.

पहाडी बाबा व एक ढोंगी भक्त.

एक गृहस्थ लोकलज्जेस्तव रात्रभर निजला नाहीं. त्याला **पहाडी बाबानें*** काय म्हटलें, तें तुला ठाऊक नाहींका? तो म्हणाला, 'हे बापाच्या लाडक्या, खऱ्या ईश्वरप्रेमांत लीन हो, कारण या दृश्य सृष्टींतून तुला, त्याशिवाय बरोबर कांहीं बांधून नेतां येणार नाहीं.'

ज्यांनां तुझीं कर्में आवडतात त्यांनां अद्याप तुझें बाह्यरूप मात्र माहित आहे, तुझें अंतरंग माहीत नाहीं. एखादा दास अप्सरेप्रमाणें सुंदरमुख असला पण त्याच्या कातड्यावर वस्त्रानें झांकून टाकण्याजोगे डाग असले तर त्या दासाची काय किंमत होणार? तुला ढोंग करून स्वर्गांत कधीं जातां येणार नाहीं, कारण तेथें तूं आपल्या कुरूप मुखावर दोष लपविण्याकरितां घेतलेलें स्वच्छ पांघरूण फाडून टाकलें जाईल. तेथें तुझें ढोंग बाहेर पडणारच.

---

* पहाडी बाबा, कोणीही वृद्ध व पांढऱ्या दाढीच्या मनुष्यास म्हणण्याचा प्रघात आहे. तसेंच कलंदर नांवाच्या जंगलांत व पहाडांत राहणाऱ्या फकीराच्या जमातीच्या मुख्य गुरूसही म्हणतात.

गोष्ट तेरावी.

रोजे किंवा उपास करणारा मुलगा.

एका अज्ञान मुलानें एक रोजा ठेवला, व शंभर तऱ्हेनें श्रम करून कसा तरी एक प्रहर लोटला. त्या दिवशीं त्याला शाळेंतून पंतोजीनें सुट्टी दिली, त्यामुळें तर त्या लहान मुलाची अधिकच भक्ति बसली. बापानें त्याच्या डोळ्यांचें व आईनें शिराचें चुंबन केलें, व त्याच्या तोंडावरून आनंदानें बदाम व द्रव्य ओवाळून टाकलें.

अर्धा दिवस गेला नाहीं तोंच त्याच्या पोटांत भुकेनें आग पेटली, तेव्हां तो मनांत म्हणाला, 'मी चार घांस चोरून खाल्ले, तर माझें हें गुप्त कर्म आईबापांनां काय कळणार आहे?' त्या मुलाच्या मनांत केवळ बाप व जातीचे लोक यांचीच पर्वा असल्यानें त्यानें चोरून खाल्लें व बाहेरून तर रोजा ठेवला असें दाखविलें.

कोणीही मनुष्य ईश्वराच्या आज्ञेनुसार व जनांकरितां निमाज पढण्यास उभा राहील तर कोणास कळणार आहे? केवळ लोकांकरितांच ईश्वरभजन करणारा असा हा गृहस्थ वृद्ध असला तरी या मुलापेक्षां अधिक पापी व मूर्ख होय. लोकांनीं पाहण्याकरितांच केवळ पढलेला निमाज नर्कद्वाराची किल्लीच होय.

तुझा वर्तनक्रममार्ग ईश्वरास सोडून दुसरीकडे जाणारा असला तर तुझें तें निमाजाचें आसन **फरिष्ते** आगींत नेऊन जाळतील. सुशील व निर्मल अंतःकरणाचा व साध्या गृहस्थी पोषाखाचा मनुष्य, दुष्ट अंतःकरणाच्या भक्तापेक्षां बरा. माझ्या दृष्टीनें, उघड रात्रिचर चोर व वाटमाऱ्या मनुष्य, भक्ताचा वेश घेऊन दुष्ट आचरण कर-

णाऱ्यापेक्षां बरा. केवळ लोकांनीं पहावें ह्मणूनच भक्ति-रूप त्रास सोसणाऱ्याला शेवटीं ईश्वराकडून कसा चांगला बंदला मिळणार? सोम्याच्या घरीं काम केल्याबद्दल गोम्याच्या घरून मजुरी मिळण्याची उमेद ठेवूं नको.

दीन, दरिद्री, ईश्वरी मार्गानें चालणारा, व त्याच्या विषयीं भुकेला, अशा मनुष्याशिवाय दुसऱ्याला ईश्वरप्राप्ति होईल असें मी कधीं म्हणणार नाहीं. खऱ्या सरळ मार्गानें जा म्हणजे मुकामावर पोंचशील. तूं मुळी त्या मार्गांतच नाहींस, तेव्हां पूर्वीच परत आलेला आहेस. तेल्याच्या डोळे बांधलेल्या बैलाप्रमाणें सारी रात्र दवडून शेवटीं जागच्याजागींच राहिल्याप्रमाणें तुझी स्थिती आहे.

ईश्वरभजनमंदिरापासून मस्तक फिरविणारा मनुष्य नास्तिक आहे अशी त्याच्या शेजारीं राहणारे सर्व लोक साक्ष देतील. तुझें मन प्रेमानें ईश्वराच्या ठायीं रत नसतां तूं किब्ल्याकडे तोंड करून निमाज पढत असलास तरी तिकडे पाठ केल्याप्रमाणेंच आहेस.

मूळ कायम असेल असेंच झाड, गोड फळ खावयास मिळावें ह्मणून पाळ. तुझीं ईश्वरप्रेमरूप मुळें जमीनींत दृढ नसलीं तर तुजसारखा अभागी तूच. दगडावर बीज पेरणाऱ्याच्या हातीं खळें जमाकरण्याच्या वेळीं एक दाणाही येत नाहीं ढोंगरूप उदकानें मुखप्रक्षालन करण्याच्या नादीं लागूं नको, कारण त्या उदकाच्या तळाशीं पापरूप कर्दम आहे. मी आंतून दुष्ट व मातीसारखा हीन असलों तर बाहेरून लज्जारूप उदकानें तोंड धूण्याचा किंवा गरीबी दाखविण्याचा काय फायदा? लज्जारूप गोधडी ईश्वराजवळ खपवितां येईल तरच ती आपल्या तोंडावर

पांवरणें शहाणपणाचें होईल वस्त्राआड कायं आहे, हें लोकांस काय ठाऊक? एखाद्या पुस्तकांत काय लिहिलें आहे हें, लिहणाऱ्यासच ठाऊक.

जेथें न्यायरूप कांटा व प्रत्यक्ष न्यायमूर्ति परमेश्वर तोलणारा, अशा त्या स्वर्गांत, हवेच्या मोटिचें काय वजन होणार. अशा तऱ्हेनें भक्ती दाखविणाऱ्या ढोंगी मनुष्याला पाहून त्याचा क्षुद्रपणा लोक तेव्हांच ओळखतात.

अभ्रा अस्तरापेक्षां अधिक चांगला स्वच्छ वालतात, कारण तो बाहेर दिसणारा व तें झांकलेलें असतें. थोर लोक बाह्यडौलापासून दूर असतात, कारण त्यांना बाह्यडौलरूप रेशमी कपड्यापेक्षां साधें अस्तर पसंत असतें. तुझ्या जन्मभूमींत तुझा भपका व्हावा अशी तुला इच्छा असेल तर वरून भपकेदार पोषाख कर, मग आंतून घाणेरडी भरती व अस्तर असलें तरी चालेल.

'सर्वस्वाचा त्याग केल्यानेंच मी मोठमोठ्या थोर व मानी लोकांपेक्षां अधीक बिनघोर आहें,' असें **बायजीद बुस्तामी** या महात्म्यानें म्हटलें तें थट्टेनें नव्हे. मोठमोठे सुलतान व सार्वभौम बादशहा होऊन गेले, ते देखील या ईश्वरी दरबारांत खरोखर अत्यंत दरिद्री आहेत. ईश्वरैकनिष्ठ फकीराच्या अंतःकरणांत लालसेला रीघच मिळत नाहीं.

स्वतः पतित असून दुसऱ्यास हात देण्याची खटपट करणें योग्य नाहीं. मोत्याच्या शिंपेप्रमाणें मौक्तिकगर्भ व अंतःशुद्धमुख होणें बरें. खरोखरच ईश्वरभजनीं तुझें मन रत असेल तर तें तुझें भजन प्रत्यक्ष **जिब्रईलनें** न पाहिलें तरी हरकत नाहीं.

सादीचा उपदेश नीट लक्ष्य देऊन ऐकशील तर तोच तुला गुरूपदेशाप्रमाणें बस आहे. आज माझा उपदेश न ऐकशील तर न जाणों उद्यां तुला शर्मिंदें व्हावें लागेल.

पांचवा भाग समाप्त.

भाग सहावा.

—:o:—

शांतता व तृप्ती.

भाग्योदयाच्या वेळीं समाधान पावला नाहीं अशा मनुष्यास ईश्वरज्ञान झालें नाहीं व त्यानें ईश्वरभजनही केलें नाहीं म्हणावयाचें. तृप्तीमुळेंच मनुष्य सधन होतो, ही गोष्ट तूं देशोदेशीं फिरणाऱ्या लालची लोकांनां कळीव.

हे अधीर गृहस्था, खडकाळ व हीनकस जमीनीवर हिरवीगार शेती होत नाहीं, ही गोष्ट नीट लक्षांत ठेव. तू खरा शहाणा व विचारी असशील तर केवळ स्वशरीर-पोषक होऊं नको. कारण त्या योगानें तू स्वतःचा नाश करतोस. शहाणे लोक गुणाचे पोषक असतात व केवळ उदरंभर व पुष्ट लोक गुणहीन असतात. मनरूप श्वानास आवरणाऱ्या मनुष्यानेंच खरी माणुसकी मिळविली म्हणावयाचें. आहार व निद्रा केवळ पशुधर्म होत. त्यांच्यांतच निमग्न राहणें हें अत्यंत हीन बुद्धीचें काम आहे.

सुदैव व सद्वर्तन फार चांगलें व आनंदकारक आहे. कारण त्यामुळें एकांतवासांतही ईश्वरीसाक्षात्काररूप पुण्यफल हातीं येतें. ईश्वराचें खरें तत्व एकदां पूर्णपणें कळून आलेले लोक पुनः मिथ्यावादाच्या नादीं लागत नाहींत. अज्ञानतम ज्ञानतेजापासून ओळखतां न येणाऱ्याला सुंदर नेत्र व अप्सरेप्रमाणें मनोहर मुख असून

नेसून सारखेंच. या अज्ञानतमामुळेंच तूं स्वतः कुठ्यांत पडतोस. व तुला भररस्त्यांत कुवा असलेला दिसत नाहीं.

मनरूप ससाण्याच्या पंखास लालसारूप दगड बांधलेला असेल तर त्याला या भुवनांतरालांत कसा स्वच्छंदानें विहार करितां येईल? पण त्याचा पदर कामरूप हातांतून सोडविशील तर तुला **सिद्रतुल् मुंतहा** या जिब्रईलच्या वसतिस्थानापर्यंत सुद्धां सहज भरारी मारतां येईल.

अल्पाहाराच्या संवयीनें स्वतःच्या अंगीं देवदूतांचीही योग्यता आणितां येते. पशूंचा स्वभाव देवदूतांच्या स्वभावास पोंचून त्यांस अंतराळांत कोठून उडतां येणार? प्रथम खरी माणुसकी अंगीं आण व नंतर देवदूतांच्या योग्यतेची विवंचना कर.

तू एका अल्लड घोड्याच्या बच्चावर स्वार आहेस. तेव्हां आसनावर लक्ष देऊन तो तुझ्या हुकुमाबाहेर न चाले यावर लक्ष दे, कारण तुझ्या हातचा लगाम सुटला तर तो स्वतःचा व तुझाही घात करील. खरें मनुष्यपण तुझ्या अंगीं असेल तर थोडें व बेतानें खात जा, कारण अतिशय अन्न उदरांत ओतणारा, मनुष्य कशाचा, तो एक माठच झटला पाहिजे.

मनुष्यांचें शरीर, ईश्वरनामस्मरण ईश्वरी शक्तीच्या प्रभावाचा विचार व त्याच्या उपकारांचा धन्यवाद करणें यांच्याच योग्य आहे. पण तें केवळ अन्न भरण्याकरितां आहे असें तू समजतोस. लालसारूप ओझें असल्या जागीं ईश्वरनामस्मरणाचा समावेश कोठून होणार? अशा भरलेल्या जागेंत सुमनांचा मोळ्या कष्टानेंच विकास होतो

विशाल उदराचा मनुष्य हीनबुद्धी असतो, ही गोष्ट केवळ उदरपूरणपरायण मनुष्यास माहीत नसते.

हे नेत्र व उदर कशानेंही तृप्त होत नाहींत, म्हणून हीं पोळदार आंतडीं रिकामीं असलेलीं बरीं. नर्कांतील अग्निकुंडाप्रमाणें वरचेवर इंधन पडत असूनही तीं आणखी येऊं द्या असा शब्द करीत असतात. इकडे तुझा आत्मा-रूप **ईसा पैगंबर** क्षीण होऊन मरत असून तू त्याचें वाहनरूप शरीर गर्दभ पोसण्याच्या काळजींत असतोस.

हे अभागी मनुष्या, परलोकसुखद धर्म देऊन ऐहिक सुखरूप संसार विकत घेऊं नको, व **बायबल** देऊन ईसाच्या गाढवाकरितां दाणा विकत घेऊं नको. जंगली श्वापदें व पक्षी यांनां अन्नाची लालूचच जाळ्यांत फसविते, हें तुला माहीत नाहीं वांटतें? हिंस्र पशूंत श्रेष्ठ असा व्याघ्र देखील खाण्याच्या आशे मुळेंच उंदराप्रमाणें जाळ्यांत सांपडतो. तू एखाद्याचें अन्न किंवा पनीर खाशील तर तुला उंदराप्रमाणें त्याच्या जाळ्यांत फसावें लागेल; व त्याचा तीरही खावा लागेल.

गोष्ट पहिली.

सादी व कंगवा देणारा हाजी.

एका हाजीनें, मी त्याच्याशीं प्रेमानें वागावें म्हणून, मला एक हस्तिदंताचा कंगवा दिला. एकदां कांहीं एका गोष्टीमुळें त्याचें मन माझ्या हातून दुखविलें गेलें होतें, यामुळें त्यानें मला कुत्रा म्हटल्याचें मी ऐकिलें होतें. मीं तो कंगवा फेंकून देऊन म्हटलें, 'हें हाडूकही मला नको व

मत्ता पुनः तू कुत्राही म्हणूं नको. मी स्वकष्टार्जित शिर्का खाण्यास तयार असतांना मिठाईवाल्याचा त्रास सोशीन असें समजूं नको'.

हे मना, तू अल्पसंतुष्ट रहा ह्मणजे तुला राजा व रंक एकसारखे दिसतील. याचना करण्याकरितां राजापुढें कशाला जातोस? लालसा सोडलीस कीं तू स्वतःच राजा आहेस. केवळ स्वोदरपूरणपरायणच असशील तर पोटाचा तबला करून प्रत्येक गृहद्वार, मंदिरद्वार आहे असें समजून, भजन कर.

गोष्ट दुसरी.

हांजी हांजी करणारा गृहस्थ व त्याचा मुलगा.

एक गृहस्थ कांहीं अशानें ख्वार्जम्च्या* एका बादशहासमोर ऐन पहाटें गेला, व त्याच्या सेवेंत अगदीं तत्पर असल्याचें दाखवून बादशहाची किंचित नजरानजर होतांच अगदीं जमीनीवर डोकें घांसून पुनः उभा राही.

हें पाहून त्याच्या मुलानें त्याला ह्मटलें, 'बाबा, मी तुला एक कठिण गोष्ट विचारतों तिचें उत्तर दे. क्किब्लयाकडेच तोंड करून निमाज पढावा असें तूच सांगत असून आज तू इकडे तोंड करून निमाज कां पढलास?'

केवळ कामपूजक मनुष्य वंदनीय नसतो. कारण प्रतिक्षणीं त्याची देवता बदलत असते. हे बांधवा,

---

* **ख्वार्जम**, तुर्कस्थानांतील एका प्रदेशाचें मुख्य शहर.

ज्याच्या स्वाधीन न राहणारा मनुष्यमात्र मुक्त होतो अशा मनाची आज्ञा तू पाळूं नको. हे शहाण्या व विचारा गृहस्था, तृप्तीच मनुष्यास उन्नती देते, व लालचीनें भरलेला मनुष्य कधीं मोठेपणा पावत नाहीं. लालसा ही तुझ्या तोंडचें अब्रूरूप पाणी पळविते, व दीन जवाकरितां तुझी मोत्यांनीं भरलेली ओटी सांडून देते.

निर्झरोदकानें तृषा शमवितां येत असतांना व्यर्थ बर्फाकरितां अब्रू कां गमवितोस? एक तर लब्धप्रतिष्ठा सोड किंवा कशाची जरूर पडली कीं क्षणोक्षणीं दारोदार फीर.

हे सद्गृहस्था लालसारूप हात आंवर ह्मणजे तुला संपन्न मनुष्याजवळ याचना करण्याची कशाला जरूर राहील? लालसारूप डबा फोडून टाकणाऱ्याला कोणाचाही दास किंवा नौकर ह्मणविण्याची जरूर पडत नाहीं. लालसा तुला हरएक सभेंतून हांकून देते. याकरितां दुसऱ्यांनीं तुला दारांपुढून हांकून लावण्यापूर्वी तूंच तेथून निघून जा.

गोष्ट तिसरी.

दुसऱ्याजवळ याचना करण्यापेक्षां त्रास पतकरणारा तापकरी.

एका महात्म्याला ताप येत होता. त्याला कोणीं ह्मटलें, 'अमक्याकडून साखर मागून आणून खा.' तो ह्मणाला, 'बाबा त्या दुर्मुखलेल्या मनुष्याचें दुर्दर्शन

होण्यापेक्षां मला तापानें कडू तोंड होऊन मरणें बरें वाटतें.'

गर्वानें नेहमीं कपाळास आंठ्या घालणाऱ्या व दुर्मुखलेल्या मनुष्याच्या हातून शहाणा मनुष्य साखर देखील घेत नाहीं. मनास आवडणाऱ्या प्रत्येक वस्तूमागें धांव घेऊं नको. कारण केवळ शरीरपोषणपरायणता तुझें तेज घटवील. मनुष्याचें मनच त्याला संसारमग्न करून खराब करतें. ह्मणून शहाणा असशील तर तू त्याचे लाड करूं नको. त्याची प्रत्येक आशा पूर्ण करीत गेल्यास तरी शेवटीं त्याला तृप्त करण्याची तुझी उमेद कधींही पुरी होणार नाहीं.

प्रत्यहीं जठराग्निकुंड पेटवीत राहिल्यास फाका पडेल त्या दिवशीं फार त्रास होईल. भाग्याच्या दिवसांत पोट तुडुंब भरण्याची संवय केलीस तर कधीं ताण पडतांच तुझें तोंड मुकून रंगरूप बदलून जाईल. खादाड मनुष्यास अन्न मिळेल तेव्हां भरलेल्या पोटाचा, व तें न मिळेल तेव्हां कष्टाचा भार सोसावा लागतो. उदरपरायण मनुष्य फार श्रमलेला असतो, याकरितां मन बुंद असण्यापेक्षां पोट तंग असलेलें पतकरलें.

गोष्ट चौथी.

खादाडपणाचा वाईट परिणाम.

मी बसरा शहरांतून खजुरापेक्षांही मिष्ट अशी एक आश्चर्यकारक व उपदेशपर गोष्ट आणली ती ही कीं, 'एकदां आह्मीं कांहीं भक्तलोक मिळून एका खजूराच्या

बाग्गांतून चालल्यें होतें. आमच्यांत एक विशाळ उदराचा गृहस्थ होता. तो फार खादाड व तसाच दुर्गुण परिपूर्ण होता. तो बिचारा खजूराच्या आशेनें कंवर बांधून झाडावर चढला व तेथून जोरानें जमीनीवर उलटा आपटून मृत्यू पावला.

नेहमींच खजूर स्वस्थपणें खाऊन पचवितां येतो असें नाहीं—त्यानें आपल्या उदराच्या लालसेंत फसून खजूर खाल्ला व प्राण गमविला.

पुढें गांवच्या पाटलानें येऊन याला कोणी मारलें, म्हणून दरडावून विचारलें तेव्हां आम्हीं म्हटलें, 'अम्हांस असें व्यर्थ दरडावूं नको. याच्या पोटानें याला झाडाच्या फांदीवरून खेंचून पाडून मारलें.'

ज्याचीं आतडीं मोठीं तो नेहमीं कष्टी. पोट हें हाताला हातकडी व पायाला बेडीप्रमाणें आहे. उदरपूजक क्वचितच ईश्वरपूजक असतो. टोळास पाहिलें तर त्याचें बहुतेक शरीरभर पोटच असतें, पण त्याला सूक्ष्म उदराची मुंगी पाय धरून सहज ओढीत असते.

जा, प्रथम मन शुद्ध करून स्वाधीन करून घे, कारण पोट मृत्तिकेशिवाय कशानेंही भरत नाहीं.

गोष्ट पांचवी.

भूक व कामेच्छा यांची कधींही पूर्तता होत नाहीं याविषयीं.

एका गृहस्थानें एका दीनाराचा भुकेचा परिहार करण्याकडे व दुसऱ्याचा कामेच्छा परिपूर्ण करण्याकडे विनि-

योग केला. त्याच्या मित्रांपैकीं एकानें त्यास हळूंच झटलें, 'तूं या दोन्ही दीनारांचें काय केलेंस?' तो म्हणाला, 'एकानें स्त्रीसंग करून पाठींतून रेत स्खलन करविलें, व दुसऱ्यानें पोटाकरितां पक्कान्नाचें ताट घेतलें. पण यांत मीं मूर्खपणा व अविचारीपणा केला. कारण या योगानें माझी पाठ रिती किंवा पोट परिपूर्ण झालें नाहीं.

अन्न साधें पण शुद्ध असलें व तेंही उशीरानें तुझ्या हातीं पडलें तर तें खाण्यापासून तुला विशेष आनंद होईल. झोंपेनें ऐन घेरल्यावरच शहाण्या मनुष्यानें डोकें उशीवर ठेवावें.

चांगलें बोलण्याची शक्ती अंगीं नसेल तोंवर बोलूं नको, व चांगलें मैदान आढळणार नाहीं तोंवर गेंदावर नीटपणें दृष्टी ठेव. होईल तेथवर अंदाजा बाहेर बोलूं नको, व आपल्या अंदाजाच्या आंत पाऊल वैऊं नको.

गोष्ट सहावी.

उधार जिन्नस न घेणारा विद्वान् गृहस्थ.

तबकरी नांवाच्या इराण देशांतील एका शहरांत, एक फेरीवाला पाटींत गंडेरी घालून इकडे तिकडे गिऱ्हाइक पहात फिरत असतांना एका आत्मसंयमनी विद्वान गृहस्थास एका गल्लींत गांठून म्हणाला, 'तूं ही गंडेरी घे व तुझ्या हातीं पैसा येईल तेव्हां दे.' तेव्हां तो शहाणा व सन्मार्गी गृहस्थ म्हणाला,—तें त्याचें उत्तर मनावर कोरून ठेवण्याजोगें आहे—'तुला कदाचित माझ्याकडून दाम घेण्याचा धीर धर-

वणार नाहीं, पण मी गंडेरी खाण्यापासून धीर धरू शकतों. जिच्या मागें दाम देण्याबद्दलचा कडू व तीव्र तगादा आहे अशा गंडेरीच्या अंगीं खरी गोडीच नाहीं, असें म्हटलें पाहिजे.'

गोष्ट सातवी.

सुसंतुष्ट वृद्ध तपस्वी.

खुतनच्या एका बादशहानें एक रेशमी कापडाचा पोषाख एका ज्ञानी व तपस्वी अशा वृद्ध गृहस्थाकडे पाठविला. त्यानें तो अंगांत घालून हात व जमीन चुंबून, 'या भूपतीचा मी सहस्रशः आभारी आहें,' असें म्हणून पुनः म्हणाला कीं, 'खुतनच्या बादशहानें पाठविलेला पोषाख किती चांगला आहे तरी पण आपली ही गोधडी त्याहून चांगली आहे.'

तूं सर्वस्व परित्याग करून मुक्त झाला असशील तर जमीनीवरच नीज व गालीच्याकरितां कोणापुढें दीनपणें याचना करूं नको.

गोष्ट आठवी.

याचना करणारा दीन गृहस्थ.

एका गृहस्थाजवळ इतराप्रमाणें खाण्याचा सरंजाम नसून भाकरीबरोबर खाण्यास त्याच्या जवळ कांद्याशिवाय कांहीं नव्हतें. त्याला एका हीनबुद्धीनें म्हटलें, 'अरे दरिद्र्या, जा, कोणा श्रीमानाच्या घरून वाढलेलें ताट

घेऊन ये. जाऊन माग, कोणास भिऊं नको, कारण लाजणाऱ्या मनुष्याला पोटभर खाण्यास मिळत नाहीं.'

हें ऐकून तो गृहस्थ अंगांत अंगरखा चढवून, तो मोड्या शिताफीनें हातास लपेटून एका श्रीमानाच्या घरीं गेला. तेथील लोकांनीं त्याचा अंगरखा फाडला व मारून मारून त्याचे हात मोडले.

तेव्हां तो सानंदाश्रू गाळीत म्हणत होता कीं, 'आपणच चुकल्यावर उपाय काय? लालचींत फसलेला मनुष्य स्वतःवर जणूं अनेक संकटें ओढून आणतो. याकरितां माझें तें घर व माझी ती कांदाभाकरीच मला अधिक प्रिय होत.'

कोणा थोर मनुष्याच्या पक्कान्नदानानें पोट भरण्यापेक्षां स्वकष्टार्जित जवाची भाकरी खाणें मला अधिक प्रिय आहे. दुसऱ्याच्या ताटाकडे पाहणारा मूर्ख व दरिद्री मनुष्य उद्यां खाण्यास कसें मिळेल या विवंचनेंतच कष्टानें तळमळतो.

गोष्ट नववी.

लालची मांजर.

एका म्हातारीच्या घरीं एक मांजर होतें. तेथें त्याची मोठी आवळ होती, व त्याचे दिवसच जणूं फिरलेले होते. म्हणून तें एकदां एका अमीराच्या घरीं गेलें. तेथें घरच्या सेवकांनीं त्याला तीर मारणें सुरूं केलें. तेव्हां त्याच्या व्रणित हाडांतून रक्त टपकत होतें. व भीतीमुळें पळतां पळतां त्याचे प्राणच जणूं पळून जात होते.

तें बडबडत होते कीं, 'या तीर मारणाऱ्यांच्या हातून मी जिवंत सुटलों तर मी व ते उंदीर व त्या म्हातारीचें तें पुराणें घर, हींच मला लखलाभ असोत.

हे माझ्या लाडक्या मना, नांगीचा डंख खाऊन मिळालेला मध फायदा करीत नाहीं. व उत्तम शरबतापेक्षांही तृप्ति अधीक मधुर व कुशल परिणामी असते. ईश्वरानें ज्या ज्या गोष्टी आपल्या कपाळीं लिहिल्या आहेत त्यांत समाधान न मानणाऱ्या भक्तावर ईश्वर प्रसन्न नसतो.

गोष्ट दहावी.

क्षुद्रदृष्टी नवरा व धैर्यवान बायको.

एका मुलास दांत येऊं लागलेले पाहून त्याचा बाप काळजीनें अधोवदन करून बायकोस म्हणूं लागला कीं, 'मी आतां याला अन्न खाण्यास कोठून आणूं? याला तसाच उपाशी सोडणेंही योग्य नाहीं.'

हें ऐकून त्याच्या अर्धांगीनें कसें पुरुषार्थाचें भाषण केलें पहा! ती म्हणाली 'दांत आलेले पाहून व्यर्थ, भीतिरूप भुताच्या स्वाधीन होऊं नको. ज्यानें दांत दिले तोच डाळरोटीही देईल. ईश्वर सर्वसमर्थ आहे. तो रोजचें अन्नपाणी पोंचवील. व्यर्थ कष्टी होऊन रडूं नको. कारण मातेच्या उदरांत मुलाचें रूप रेंखणारा परमेश्वरच-प्रत्येकाचें आयुष्यमान व अन्नपाणी लिहून ठेवीत असतो.'

एखादा दास विकत घेणारा धनी देखील त्याच्या

खाण्यापिण्याचा बंदोबस्त करतो. मग त्याला उत्पन्न करणारा परमेश्वर त्याचा बंदोबस्त करण्यास कसा चुकेल? दासाची धन्यावर निष्ठा असते तितकी देखील तुझी ईश्वरावर नाहीं. प्राचीन काळीं अवलीया व महात्मे लोकांच्या हातचे दगड चांदीचे होत होते, व त्यांना दगड व चांदी एक सारखी होती. हें तूं ऐकलें आहेसना? समाधान वृत्ती धरलीस तर दगड व चांदी तुला सारखी भासेल हें पक्कें समज.

लहान मुलाचें अंतःकरण निर्मळ असून त्यांत लालसेचा गंध नसतो तेव्हां त्याला सोन्यानें किंवा मातीनें भरलेली मूठ सारखीच वाटते. राजाची सेवा करणाऱ्या व संसारी दरवेशाला, राजा दरवेशाहून ही अधिक दरिद्री असतो, म्हणून सांग, कारण गरीब एक रुपयांत तृप्त होतो, पण राजा दुसरें नवें राज्य मिळालें तरी यत्किंचितही तृप्त होत नाहीं.

राज्य व संपत्ती यांचें संरक्षण करणें एक संकटच आहे, म्हणून दरवेशी हा नांवानें दरवेशी असला तरी तोच खरोखर राजा आहे. मनावर कष्टरूप भार नसलेला फकीर वास्तविक सुखहीन बादशहापेक्षां बरा. एखादा शेतकरी आपल्या बायकोसह आनंदानें निद्रासुख घेतो तसें राजाला त्याच्या रंगमहालांत ही मिळत नाहीं.

निद्राजलाच्या लहरी मनुष्यास घेरूं लागल्यावर राजसिंहासन व गांवढेकराचें साधें अंथरूण दोन्ही सारखेंच सुख देतात. राजा व कंथा शिवणारा रंक दोघेही रात्रीं निजतात व दोघांसही दुसरे दिवशीं सारखेंच उजाडतें.

हे द्रव्यहीन गृहस्था, तू गर्वानें मस्तक फिरलेला कोणी धनिक पाहशील तेव्हां त्या उन्मत्ताप्रमाणें दुसऱ्या कोणास पीडा होण्याजोगें देवाच्या दयेनें तुझें भाग्य नाहीं, याबद्दल ईश्वराचे आभार मान.

गोष्ट अकरावी.

कृपण गृहस्थ व त्याचा मुलगा.

एक व्याजबट्टा करणारा गृहस्थ जिन्यावरून पडून मेला, तेव्हां त्याचा मुलगा कांहीं दिवस शोक करून पुढें आपल्या मित्र मंडळींत चैनींत बसूं उठूं लागला.

एकदां मुलानें बापास स्वप्नांत पाहून विचारलें कीं, 'तू यमधर्माच्या प्रश्नोत्तरांच्या जाचांतून कसा सुटलास?' तो ह्मणाला, 'मुला, माझी गोष्टच विचारूं नको. मी त्या जिन्यावरून पडलों तो थेट नरकांतच.'

गोष्ट बारावी.

लहानसे घर बांधणारा विचारी गृहस्थ.

एका सज्जन व संयमनी गृहस्थानें आपल्या योग्यतेप्रमाणें एक लहानसें घर बांधलें. तेव्हां त्याला कोणी ह्मटलें, 'मी तुला चांगला समर्थ व यापेक्षां बरें घर बांधण्याजोगा समजत होतों.' तो ह्मणाला. 'चुप पुरे, पुरे, माझ्या घराची गच्ची उंच असावी असें तुला कां वाटतें? मरतांनां मागें सोडून जाण्याला एवढेंच पुष्कळ आहे, नव्हेकां?'

हे भक्ता, पाण्याच्या प्रवाहांत घर बांधूं नको, कारण तें कोणाच्याच हातून पुरें झालें नाहीं, व कोणाला ही शेवटपर्यंत पुरलें नाहीं. प्रवाशानें प्रवासांत उतरण्याकरितां पक्कें घर बांधणें शहाणपणा, विचार किंवा दूरदृष्टी, यांच्या विरुद्ध आहे.

गोष्ट तेरावी

एकदम राजा झालेला लोभी फकीर.

एका समर्थ व राज्यकर्त्या बादशहाचा प्राणरूप सूर्य आस्ताचलास जाऊं लागला, तेव्हां त्यानें पोटीं संतान नसल्यानें तेथल्याच एका फकीरास आपलें राज्य सोंपलें. पुढें सिंहासनारूढ होऊन राज्यदुंदुभीचा ध्वनी ऐकून त्या फकीरास एकांतवासांत कांहीं स्वास्थ्य दिसेनासें झालें, व त्यानें चारी बाजूंस आपल्या सैन्याची धामधूम सुरू केली. यामुळें मोठमोठ्या शूर लोकांचीं मनें त्याच्या पासून विटलीं.

तो असा बलाढ्य युद्धकुशल, व युद्धांत निर्घृण झाला कीं, त्यानें मोठमोठ्या योद्धयांशीं युद्ध करून हतवीर्य थवेच्याथवे शत्रूंचे कापून काढले. तेव्हां सर्व अवाशिष्ट शत्रूंनीं, एकत्र जमून परस्पर सहाय्यकारी होऊन त्याच्याशीं लढण्याची तयारी केली व त्याच्या सभोंवती पक्का वेढा घातला.

त्या शत्रूंचे दगड व बाण यांच्या वृष्टीनें तो फकीर अगदीं दीन झाला व त्यानें एका साधूकडे एकाच्या हातीं निरोप पाठविला कीं, 'मी फारच अडचणींत

सांपडलों आहें, तर आतां माझी ईश्वराजवळ दाद लाव, व आशीर्वादानें मला मदत कर. कारण बाण व तर्वार हीं शस्त्रें नेहमींच लढाईत सहाय्यकारी होतात असें नाहीं.'

हा निरोप त्या महात्म्या साधूनें ऐकून हंसून झटलें, 'तो पूर्ववत अर्धी भाकर खाऊन स्वस्थ कां बसला नाहीं? एकांत वासांत राहून भगवद्भजन करण्यांतच खरा बिनघोर खजीना आहे, हें त्या धनलोभ्याला कळलें नाहीं.'

बोधवचन.

गरीबींत समाधानवृत्ती ठेऊन भावी सुखावर दृष्टी देणें याविषयीं.

मनुष्याच्या अंतःकरणांत दया व कृपा असावी, मग त्याच्याजवळ द्रव्य नसलें झणून काय नुकसान किंवा भय आहे? कृपणास कुबेराची संपत्ती मिळाली तरी त्याचा हलकट व कृपण स्वभाव बदलेल असें समजूं नको. दयाळु व उदार मनुष्य अकिंचन झाला तरी, त्याचा उपजत स्वभाव तसाच भाग्यशाली कायम राहतो.

औदार्य हें भूमी, व संपत्ती ही तिजवरील शेती आहे. याकरितां दान करीत जा, कारण फांदी तोडल्यानें झाडाचें मूळ उचडें पडत नाहीं. ज्यानें मृत्तिकेपासून मनुष्यास उत्पन्न केलें, तोच परमेश्वर जगांतून मनुष्यपणा नाहींसा करील तर आश्चर्यच झणावयाचें.

केवळ संपत्ती सांठवून ठेवण्यांतच मोठेपणा मानूं नको, कारण सांचलेल्या पाण्याला घाण सुटते. परोपकाराविषयीं झट, कारण द्रव्यजलाभिषेकानें देवांचीही

कृपा संपादन होते. मोठेपणा व संपत्ती यांच्यापासून भ्रष्ट झालेला नीच मनुष्य पुनः क्वचित् सावरतो. तू एक मौल्यवान रत्न आहेस, याकरितां स्वतःसच बुडवून घेऊं नको. नाहींतर हें भवचक्र तुला त्रास देईल.

रस्त्यांत पडलेल्या एखाद्या ढेंकळाकडे कोणी पहात देखील नाहीं, पण कात्रीच्या तोंडांतून एखादा सोन्याचा कण पडला तर दिवा घेऊन त्याला शोधितात. दगडापासून कांचेला अलग करितात कारण जडता असेल तेथें कांचेचें स्वच्छ रूप कोठून राहणार?

मनुष्याचें वर्तन व स्वभाव सर्वमान्य व उत्तम पाहिजेत. कारण संपत्ती व थोरवी चंचल आहे. ती आज आहे उद्यां नाहीं.

गोष्ट चौदावी.

दुःखामागून सुख होणें.

मिष्टभाषणी वृद्ध लोकांच्या तोंडून मीं ऐकिलें आहें कीं पूर्वीं या शहरांत एक फार जुना म्हातारा गृहस्थ होता. त्यानें पुष्कळशा बादशहांच्या कारकीर्दी व अंमलदाऱ्या पाहिल्या होत्या. तो **उम्रोलेस** बादशहाच्यावेळीं जन्मला होता.

तो असा वृद्ध होता पण एखाद्या जीर्ण वृक्षाच्या ताज्या फलाप्रमाणें त्याला एक अगदीं तरुण मुलगा होता. त्याच्या सौंदर्याची प्रशंसा सर्व शहरभर दुमदुमून गेली होती. शेवफळावर किंवा सुरूच्या झाडावर देखील न दृष्टीस पडणाऱ्या मोहक व आश्चर्यकारक टव-

टवीप्रमाणें त्या मनोहरण करणाऱ्या मुलाच्या गालावर रोमावली आलेली होती.

त्या मूर्ख, बहुवयस व अल्पआशायुक्त ह्याताऱ्यानें त्या मुलाच्या डोक्याचे सर्व केश काढविण्यांतच मोठा संतोष मानून, वस्तऱ्यानें त्याचें डोकें मूसा पैगंबराच्या हाताप्रमाणें तासून पांढरें केलें. त्या पाषाणोत्पन्न कठीण लोखंडी वस्तऱ्यानें त्या अप्सरेच्या मुखावरून जणों कुरुपतारूप जीभ फिरविली व शिरोभूषण असे केश कातरून शिरावरून खालीं पोटावर पाडले, तेव्हां त्या मुलानेंही आपली मान खालीं घातली. त्या सुकुमाराचें शिरही जणों लज्जेनें त्या केंसाच्या मागोमाग तारा तुटलेल्या चंगवाद्याच्या तुंब्याप्रमाणें उलटें पडलें.

एका गृहस्थाचें मन त्याच्यावर फारच आसक्त झालें होतें, व त्याचे नेत्र व अंतःकरणही अगदीं तल्लीन होऊन गेलें होतें. कोणी त्याला ह्मटलें, 'ज्याच्याकरितां तूं त्रास व कष्ट सोशीत होतास त्याचें रूपांतर झालें आहे, तेव्हां आतां त्याचा व्यर्थ नाद धरूं नको. त्याच्या स्नेहदीपावर पतंगाप्रमाणें न पडतां आपली पाठ फिरीव, कारण दीपरूप कात्रीनें त्याचे केंसरूप पंख तोडले आहेत.' हें ऐकून तो चालाख, चतूर व आपक गृहस्थ ओरडून ह्मणाला, 'मूर्ख व पापी प्रेमपाशबद्ध असतील त्यांचेच कौलकरार खोटे असतात. माझें मन तत्प्रेममग्न झालें आहे. तत्केशलग्न नव्हे.'

मुख्य रूप सुंदर असलें तर मनाला व्यर्थ दुःखाचे झोंके देऊं नको, कारण कापलेले केंस पुनः येतील द्राक्षवेल नेहमींच उत्तम द्राक्षगुच्छ देणारी राहील असें

नाहीं. ती कधीं पर्णहीन व कधी फलभारनम्र अशी ही होईल.

महात्मे लोक कधीं कष्टरूप पडद्याआड गेल्यानें अभ्र-छन्न सूर्याप्रमाणें लुप्ततेज होतात आणि त्यांचे शत्रू अग्नि-कणाप्रमाणें पाण्याजवळ उडतात. सूर्य पुनः तेव्हांच हळूं हळूं बाहेर येतो, पण ते अग्निकण मात्र पाण्यांत पडून पार नष्ट होतात.

हे मित्रमान्य गृहस्था, केवळ बाह्य तमाला भिऊं नको. कदाचित् त्याच्या आड अमृत असेल. ही पृथ्वी तरी प्रथमतः पुष्कळ हेलकावे खाऊनच शेंवटीं स्थिर नाहीं कां झाली? तसेंच **सादी**ला प्रवासाचे कष्ट सोसल्यानेंच इष्टहेतुसिद्धी नाहीं कां प्राप्त झाली? इच्छितफल प्राप्त झालें नाहीं म्हणून चिंताग्नींत मन जाळूं नको, कारण रात्रीच्या पोटांत नेहमीं दिवसरूप सतेज गर्भ असतो. दुःखामागें सुख सुखामागें दुःख हा क्रमच आहे.

भाग सहावा समाप्त.

भाग सातवा.

शिक्षण.

या भागांत मी घोडे, रणांगण, गेंद वोथाटी, सल्ला मसलत इत्यादिकांविषयीं न लिहतां, सद्वर्तन, उपाय योजना, व चांगल्या संवयी यांच्याविषयीं लिहिणार आहें. तूं व तुझे वैरी एका घरांत रहातां आहां, तेव्हां व्यर्थ खटपट व परशुश्रूषा यांच्या कां नादीं लागला आहेस? मनरूपी अश्वाची लगाम कुमार्गापासून मागें परतविणाऱ्यांनीं खरोखर आत्मसंयमनरूप सामर्थ्यांत **रुस्तुम** व **साम*** या प्रसिद्ध मल्लांसही मागें टाकलें म्हणावयाचें. तुझ्या हातून मनोजय होत नाहीं तेव्हां तुला बाह्यशत्रूचें भय कसें असणार नाहीं?

लहान मुलांस काठीच्या माराच्या भयानें सन्मार्गास लावतात, तसें तूं स्वतःस लावून, नंतर भारी गदा घेऊन दुसऱ्याचा कपाळमोक्ष करण्याचा यत्न कर. तुझें शरीर ही एक राजधानी आहे. त्यांतील इंद्रियेंरूप भल्या व वाईट दोन्ही लोकांवर, शहाणा व बुद्धिवान राजा व मंत्री यांच्याप्रमाणें लक्ष ठेव, त्या खऱ्या शहराप्रमाणें या मानसिक शहरांतही ढोंग असत्प्रेम व लालसा इत्यादि हलकट, दुष्ट व मानी लोक व तृप्ती व निर्वृत्तता, सदाचारी व निर्वृत्त लोक आहेत. राजा

---

*साम रुस्तुमचा आजा. हाही फार शूर व बलाढ्य मल्लयोद्धा होता.

दुष्टांवर कृपा करूं लागला तर भल्या व चांगल्या लोकांस कोठून सुख मिळणार?

तुजमध्यें काम, मत्सर, लालसा व हलकेपणा हे दुर्गुण, शिरांत रक्त किंवा शरीरांत प्राण यांच्याप्रमाणें खिळले आहेत. या दुष्टांचेंच पोषण झालें तर ते तुझे शत्रू तुझ्या आज्ञा पाळणारे होऊन तुजपुढें येण्यास कधीं तत्पर राहणार नाहींत. धनी, समर्थ व तीव्रबुद्धी असला तर लालसा व मत्सररूप सेवकांनां त्यांच्यावर आपला पगडा बसवितां येत नाहीं. कोतवाल फिरत असलेल्या जागीं रात्रिंचर चोर, लुटारू व भामटे लोक फिरकत नाहींत हें तूं पहात नाहींस कां? शत्रूस दंड न करणारा राजा त्याच शत्रूच्या त्रासामुळें राज्य करण्यास असमर्थ होतो.

अशा तऱ्हेचा उपदेश मी पुष्कळसा करूं इच्छित नाहीं, कारण उपदेशानुसार कोणी वर्तन ठेवील तर त्याला यांतील एक अक्षरच पुरें आहे.

बोधवचन.

मौनमाहात्म्य, व आत्मसंयमनाची मधुरता व थोरवी.

आपल्या ठिकाणीं आपले पाय पर्वताप्रमाणें पक्के करून ठेवशील तर, मानमान्यतेंत तूं आकाशाइतका उन्नतशिर होशील. हे बहुजाण गृहस्था आपली जीभ आटोपून ठेव. कारण उद्यां न्यायाच्या दिवशीं मितभाषी मनुष्याच्या नांवावर हरताळ लागणार नाहीं.

तत्वज्ञानाविषयीं मोत्यांच्या शिंपीप्रमाणें रत्न परीक्षक हो. त्या शिंपा मौक्तिकबिंदु दृष्टी पडल्याशिवाय कधीं तोंड उघडीत नाहींत.

बहुभाषी मनुष्याचे कान भरलेले असतात, व तो मौन धरीपर्यंत त्याच्या मनावर उपदेशाचा ठसा उमटत नाहीं. तूं स्वतःच सारखा बोलत सुटशील तर दुसऱ्याच्या भाषणाची तुला खरी गोडीच कळणार नाहीं. तोलल्यावांचून बोलणें व कोणाचें भाषण संपल्यावांचून त्याचें पत्युत्तर देऊं लागणें, योग्य नाहीं. बऱ्यावाईटाचा विचार करून मित बोलणारे लोक, अद्वातद्वा बोलणाऱ्या हजरजबाब्यापेक्षां बरे.

मनुष्याच्या सर्व नैसर्गिक गुणांत एक वाणीच त्याला श्रेष्ठपणा देणारी आहे. त्याअर्थीं व्यर्थ वाचाळपणा करून तू स्वतःस हीनगुण ह्मणवून घेऊं नको. अल्पभाषी मनुष्य कधीं लज्जित झालेला आढळणार नाहीं. मासाभर कस्तुरी चिखलाच्या ढेराहून बरी.

दहा भाषणें करणाऱ्या मूर्खाविषयीं जप. शहाण्याप्रमाणें एकच भाषण कर पण तें नीट विचाराचें असूं दे. शंभर तीर मारून ते सर्व चुकून जाण्यापेक्षां, शहाणा असशील तर, तूं एकच तीर, पण नेमानें मार. एखादें भाषण उघडकीस आलें तर खालीं पहावें लागेल असें, एखाद्याच्या मागें कशाला करावें?

एखाद्या भिंतीपुढें सुद्धां कोणाची निंदा करूं नको— कदाचित् तिच्यामागें कोणी अडून ऐकत असेल. तुझें अंतःकरण हें तुझ्या मनांतील गुप्त गोष्टींना कोटाप्रमाणें आहे. त्या कोटाचें द्वार कोणासही उघडें न सांपड-

ण्याविषयीं तूं नेहमीं जप. मेणबत्तीची वात रूप जीभ लांब असल्यानेंच ती जळते, हें पाहूनच शहाणे लोक आपलें तोंड जणूं शिवून टाकतात.

गोष्ट पहिली.

गुह्यगोपन.

तकष नांवाच्या एका तुर्कस्थानच्या बादशहानें एकदां आपल्या सेवकांस एक गुप्त गोष्ट सांगून, ती बाहेर न फोडण्याबद्दल ताकीद केली, तेव्हां जी गोष्ट एक वर्षभर त्याच्या हृदयांतून तोंडाबाहेर गेली नव्हती, तीच एका दिवसांत सर्वत्र पसरली. हें पाहून त्यानें एकदम त्या सेवकांचीं तर्वारीनें डोकीं मारण्याचा मांगास हुकूम केला.

हें ऐकून त्याच्या जवळील एका सर्दारानें अभय मागून झटलें, 'या सेवकांस मारूं नका, कारण हा अपराध आपल्याच हातून घडला आहे. आपण प्रथमच हा गुह्यज्ञानरूपपक्षरा लहान असतांनां अडविला नाहीं. तेव्हां आतां मोठा ओघ झाल्यावर त्याला अडविण्याचा यत्न करून काय उपयोग?'

आपल्या मनांतील गुह्य गोष्ट तूं कोणाला सांगूं नको, कारण मग तो ती दुसऱ्यांस सांगूं लागेल. बहुमोल रत्नें रक्षणार्थ खजीनदाराच्या स्वाधीन कर, पण मनांतील गुह्य गोष्टीचें स्वतःच संरक्षण कर. एखादी गोष्ट न बोलशील तोंवर ती तुझ्या स्वाधीन आहे, पण ती

एकदां प्रकट झाली कीं तूं तिच्या स्वाधीन होतोस. एखाद्या प्रचंड पिशाचासही पुनः डव्यांत बंद करितां येतें, परंतु कपटी व ढोंगी मनुष्यास कळलेली गोष्ट परत घेतां येत नाहीं. एकदां पिशाच्च पिंजऱ्यांतून बाहेर पडल्यावर कितीही पश्चात्ताप केला तरी तें परत हातीं येत नाहीं, हें तूं जाणतोसच. एखादें पोर सहज घोड्याची काढणी किंवा लगाम सोडतें, पण मग तो घोडा शंभर **रुस्तुमा**सारख्या मल्लांच्यानेंही धरला जात नाहीं.

बाहेर फुटली तर तुलाच संकटांत पाडील, अशी गोष्ट तोंडाबाहेरच काढूं नको.

एकदां एका गावढळाला त्याच्या बायकोनें किती सुंदर उपदेश केला कीं, 'शहाणपणानें व विचारानें बोल, नाहीं तर चुप बैस.'

गोष्ट दुसरी.

मौख्र्याचा मौनरूप पडद्यानें बचाव करणें.

एक सुंदर पण ढोंगी असा कंथाधारी फकीर **मिसर** देशांत कांहीं काळपर्यंत मौन धरून राहिला होता. त्याच्याकडे जवळचे व दूरचे विद्वान व शहाणे लोक, पतंग दिव्याकडे प्रकाशाचा शोध करीत येतो, तसे माहात्म्याचा शोध करीत येत असत.

त्यानें मनांत विचार केला कीं, 'मनुष्य आपल्या जिव्हेच्या आड जणूं छपून राहिलेला असतो. मी या

मौनरूप पडद्याच्या आड बसली आहे, तेव्हां मी मोठा ज्ञानी आहें असें लोकांस कां वाटणार नाहीं?'

पुढें त्यानें एकदां मौन सोडून भाषण केलें, त्यावरोबर त्याचे मित्र व शत्रू या दोघांनींही; त्याच्या सारखा मूर्ख मिसर देशांत तोच आहे, असें जाणलें, तेव्हां त्याच्या पुढील दाटी मोडली व त्यांच्या सर्व कृत्यांत धूळ पडली. व तो तेथून निघून गेला.

जातांनां त्यानें मशीदींतील एका देवळीवर लिहून ठेवलें कीं, 'मी स्वबुद्धिरूप आरशांत आपलें रूप पाहतों तर मूर्खपणानें आपल्या तोंडापुढील पडदा कंधीं न फाडतों. इतके दिवसपर्यंत या मौनरूप पडद्याआड माझे सर्व दोष मीं असे छिपविले होते कीं, त्यामुळें स्वतःला मी अगदीं दोषहीन समजूं लागलों होतों.'

मितभाषी मनुष्याचें भाषण वजनदार असतें. एकदां भाषण केल्यावर, तुझी शोभा न राहिली तर, तेथून पळून जा. हे शहाण्या व बुद्धिवान मनुष्या, मौन तुला भूषण, व मूर्खाला दोष लपविणारा पडदा आहे. तू शहाणा असशील तर तुझ्या विषयींचा दुसऱ्याच्या मनांतील आव घालवूं नको, व मूर्ख असशील तर आड असलेला पडदा फाडूं नको. मनांतील गुह्य गोष्ट सहसा प्रकट करूं नको, कारण ती वाटेल तेव्हां प्रकट करतां येईल. पण एकदां ती बाहेर फुटली कीं कशाही श्रमानें पुनः छिपवितां येणार नाहीं. लेखणी पहा राज-रहस्य कसें चांगलें जपून ठेविते, मानेवर सुरी फेरल्या-शिवाय ती तें कधीं प्रकट करीत नाहीं.

पशू हे मुके व सर्व माणसें बोलणारीं आहेत खरीं, तरी मूर्खासारखें भाषण करणें, पशूपेक्षांही वाईट आहे. कांहीं बोलणें तें विचारानें बोलावें नाहीं तर पशूप्रमाणें मौन धरावें हें बरें. वाणी व विचार या दोन्हीमुळेंच मनुष्य श्रेष्ठ आहे, तेव्हां पोपटाप्रमाणें केवळ बडबड करणारा व मूर्ख होऊं नकोस.

गोष्ट तिसरी.

अप्रासंगिक भाषण करणारा शिपाई.

एका मनुष्यानें युद्धाच्या प्रसंगीं मूर्खपणाचें भाषण केलें, तेव्हां जवळच्यांनीं त्याला मारमारून त्याचीं वस्त्रें फाडून, चंगाच्या तारांप्रमाणें त्याचे केंस धरून ओढले. असा तो मार खाऊन, नागवा उघडा, खिन्नवदन, रडत एकीकडे बसला होता. त्याला एका अनुभविक गृहस्थानें झटलें, 'हे स्वयंमन्या, पुष्पकलिकेप्रमाणें तुझें तोंड मिटलेलें असतें तर, कोमेजलेल्या फुलांच्या पाकळ्यांप्रमाणें तुझीं वस्त्रें न फाटतीं.'

वृथाप्रलाप करणारा मनुष्य विण्याच्या सुकलेल्या तुंब्याप्रमाणें निष्फल होय. वाणी तप्तांगाराप्रमाणें आहे हें तूं जाणत नाहींस कां? ती बाहेर पडण्यापूर्वी मनांतल्या मनांत विचाररूप पाण्यानें तिला शांत केली पाहिजे.

एखादा मनुष्य खरा गुणवान असल्याचें त्याचे गुणच प्रकट करितात, तो स्वतः प्रकट करित फिरत नाहीं.

तुजजवळ खरी कस्तुरी नसली तर बोलूं नको, व असली तर तिच्या सुवासानें ती प्रकट होईलच. उत्तम प्राच्य सोन्याला 'हें बावनकशी सोनें आहे' म्हणून शपथेवर सांगण्याची काय जरूर आहे? कसोटीच तें प्रत्यक्ष कसें आहे तें दाखवील.

यावरून कदाचित् हजारों दोषैकदृक् लोक म्हणतील कीं, 'सादी'च्या अंगीं खरे सद्गुण व दुसऱ्यांशीं मेळानें राहण्याची विद्या नाहीं. असें लोक माझ्या मागें माझे दोष प्रकट करतील तर करोत, पण ते समोर येऊन मला त्रास देऊन माझें डोकें खातील तर मात्र तें सोसण्याची माझ्या अंगीं शक्ती नाहीं.

गोष्ट चौथी.

स्वतःच्या मिष्ट भाषणामुळें त्रास सोसावा लागतो, याविषयीं.

उजदुद्दौलादेलमी नांवाच्या शिराजच्या एका बादशहाचा चांगला व सद्गुणी मुलगा फार दुखणाईत असल्यानें त्याच्या बापाचें सर्व धैर्य पळालें होतें. तेव्हां एका भगवद्भक्तानें उपदेशाच्या तोरावर त्याला सांगितलें कीं, 'तूं जंगली पक्षी धरून ठेवलेले सर्व सोडून दे.'

त्यावरून त्यानें पहाटें सुस्वर गायन करणाऱ्या अशा अनेक पक्षांचे सर्व पिंजरे मोडून टाकले—कारागृह भग्न

झाल्यावर कैदेंत कोण राहील? पण त्यानें उपवनांतील क्रीडागृहांच्या कोपऱ्यांत एक नामी व फारच मधुर आवाजाचा बुलबुल होता त्याला मात्र जपून ठेवलें.

सकाळीं राजपुत्र बरा होऊन उपवनांत फिरण्यास गेला तेव्हां तेथें त्याला त्या बुलबुलाशिवाय एकही पक्षी आढळला नाहीं. त्याला पाहून तो हसून म्हणाला, 'हे मधुर स्वराच्या बुलबुला, तू स्वतःच्याच मधुर वाणीनें पिंजऱ्यांत राहिला आहेस. तू न बोलशील तर तुला कोणी विचारणार नाहीं, पण बोलतोस त्या अर्थी त्याचें प्रायश्चित्त भोग.'

सादी, इतके दिवस मौन धरून बसल्यामुळेंच, दोषैकदृक् लोकांच्या निंदापर वाग्बाणापासून सुटला होता.

संसार मोहपाशापासून अलिप्त राहणाऱ्यालाच स्वसुख स्वाधीन ठेवतां येतें. हे शहाण्या गृहस्था, लोकांचे दोष बाहेर न काढतां स्वतःच्या दोषावर दृष्टी दे. लोकांचे दोष काढणें सोड व सर्वत्र समता ठेऊन सर्वांशीं मिळून रहा. कोणी वेड्यासारखें गात असेल तर तिकडे कानच देऊं नको, व कोणी नग्न पाहिलास तर स्वतःचेच डोळे झांक.

गोष्ट पांचवी.

उठाठेवी शिष्य.

असें ऐकतों कीं, 'बजम देशांत कांहीं मस्त तुर्की गवयी लोकांचे, चंग व डफ एका शिप्यानें फोडले.

तेव्हां त्यांच्या सेवकांनीं, चंगाच्या तारांप्रमाणें त्याचे केंस ओढले व डफाप्रमाणें त्याच्या तोंडावर थपडा मारल्या. रात्रीं त्याला काळ्या व थपडा यांच्या वेदनेमुळें झोंप लागली नाहीं.

दुसरे दिवशीं त्याला त्याच्या वृद्ध गुरूनें म्हटलें, 'तू पुनः डफाप्रमाणें तोंडावर थपडा मिळून दुःखी होऊं इच्छित नसशील तर चंगाप्रमाणें आपलें मस्तक लीन करून नमून रहा.'

गोष्ट सहावी.

व्यर्थ दुसऱ्याच्या फंदांत पडल्यानें नुकसान होतें याविषयीं.

दोन गृहस्थांनीं रस्त्यांत चालतांना एके जागीं गडबड, मारामारी व दंगा चाललेला व कांहीं लोक एकमेकांस जोडे व दगड मारीत असलेले पाहिले. एकानें हा मारामारीचा प्रकार पाहून किनारा खेंचला, व दुसऱ्यानें त्या मारामारीच्या गर्दींत शिरून आपलें डोकें फोडून घेतलें.*

स्वतःस जपणाऱ्याहून कोणीही अधिक सुखी नसतो. कारण तो दुसऱ्याच्या बऱ्यावाईटाशीं संबंधच ठेवीत नाहीं. तुझ्या मस्तकांत पाहण्या, ऐकण्या व बोलण्याकरितां डोळे, व कान व तोंड, व तुला विचार करण्या-

---

* अव्यापारेषु व्यापारः यो नरः कर्तुमिच्छति । स एव निधनं याति कीलोत्पाटीव वानरः ॥

करितां मन दिलेलें आहे खरें, परंतु तुला भेदाभेदाचें ज्ञान असलें तरी, तू होऊन हा लहान, व तो मोठा आहे असें आपल्या तोंडानें ह्मणूं नको.

गोष्ट सातवी.

मौनापासून सुख व बहुभाषीपणापासून संकट.

वृद्ध वचनें फार कर्णमधुर असतात—एक वृद्ध विद्वान व सदसद्विद् गृहस्थ ह्मणाला, ' मी एकदां हिंदुस्थानांतील एका शहरच्या एका लांबचलांब गल्लींतून चाललों असतांना अमावास्येच्या रात्रीप्रमाणें काळा व धिप्पाड असा एक शिद्दी पाहिला. त्याच्या बगलेंत एक चंद्राप्रमाणें सुंदर मुलगी होती. तिच्या ओठांत त्यानें आपले दांत जोरानें रोंवले होते व कालरात्रीनें दिवस पार लोपून टाकावा, त्याप्रमाणें त्यानें तिला गाढालिंगन दिलें होतें.

हें पाहून माझ्या मनांत धर्माज्ञा मूर्तिमंत उभी राहून असंबद्ध प्रलापरूप अग्नी माझ्या मनांत भडकून गेला, व त्याला मारण्याकरितां तेथूनच दगड व लांकडें जमा करून मी त्याला ह्मटलें, ' तू ईश्वरास न भिणारा, पापी व दांडगेश्वर आहेस. तुला कांहीं लाज नाहीं.' याप्रमाणें त्याला शिव्या दिल्या व धुत्कारून, फजीत करून त्या गौरवर्ण स्त्रीला त्या कृष्णवर्ण हबशापासून, प्रातःकाळीं प्रकाश अंधःकारापासून दूर व्हावा तसें दूर केलें. जणूं त्या सुंदर उपवनावर आलेले त्रासदायक ढग नाहींसे केले, किंवा त्या काकाच्या पोटाखालन शुभ्र अंडें बाहेर काढलें,

किंवा 'लाहोल'* मंत्राच्या पठणानें त्या पिशाच रूपाला हांकून लावलें.

त्याबरोबर त्या सुंदरीनें माझ्या अंगावर येऊन म्हटलें. हे, नीलवर्ण आसन व वस्त्रें बाळगणाऱ्या,† कृष्ण-कर्मी, धर्म देऊन संसार विकत घेणाऱ्या ढोंगी गृहस्था, माझें मन कितीक दिवसांपासून उन्मत्त होऊन, या पुरुषावर माझे पंचप्राण गुंतून मोहून गेलें होतें. तो माझा मनोरथपूर्तिरूपग्रास नुकता कोठें पिकून मुखांत जाण्याच्या बेतांत आलेला त्वां एकाएकीं माझ्या तोंडांतून ओढलास. असें बोलून ती मोठ्यानें ओर-डून ह्राही बालीत म्हणाली, 'या जगांतील उपकार नष्ट झाला व कृपेचें नांवही राहिलें नाहीं. या थेरड्यानें माझा हा घात केला त्याचा बदला घेणारा कोणी तरुण गृहस्थच येथें राहिला नाहीं. हा मेला इतका म्हातारा झाला असूनही याला, न पाहण्याजोग्या वस्तूच्या आड

---

* **लाहोलः**—हें सर्व वाक्य मूळ कुराणांत आहे तें. "**लाहोला व लाकुव्वत्ता इल्लाबिल्ला, हिलअली इल् अजीम**" याचा अर्थः—पातकापासून आम्ही स्वशक्तीनेंच फिरूं शकत नाहीं व ईश्वरभजन करण्याचीही शक्ती आमच्यांत स्वतःची नाहीं, शिवाय परमेश्वराच्या सहाय्याच्या. कारण तोच श्रेष्ठ व थोर आहे."

या मंत्राच्या पठनानें पिशाच व भुतें वगैरे सर्व नाहींशीं होतात असा समज आहे. व या वाक्याचे पहिले चार शब्द मुसलमान लोक बहुशः कोणच्याही तऱ्हेचें आश्चर्य किंवा झिटकारा व्यक्त करण्याच्या जागीं म्हणतात.

† आपल्या लोकांत ज्याप्रमाणें विरक्त लोक भगवीं वस्त्रें नेसतात व पांघरतात त्याप्रमाणें मुसलमानांत निळीं वस्त्रें बाळगण्याची चाल आहे.

असलेला पडदा फाडण्याला, लाज देखील वाटली नाहीं. याप्रमाणें ती चडफडत होती व तिनें माझा पदर धरला होता.

इकडे मी लज्जेनें अधोमुख झालों व शेवटीं आबाल-वृद्धांकडून फजीती होण्याच्या भीतीनें लसणेच्या पातीप्रमाणें वस्त्रें टाकून तेथून उघडाच पळालों. कारण शरीरापेक्षां वस्त्रें तिच्या हातीं सांपडलेलीं बरीं असें मला वाटलें.

पुढें पुष्कळ दिवसांनीं तिची माझी गांठ पडली. तेव्हां ती म्हणाली, 'मी तुला ओळखतें'. त्यावर मी म्हटलें, 'हो खरेंच, व तेव्हांपासून पुनः फाजील भाषण न करण्याविषयीं मी कानाला खडा लावून घेतला.

'दुसऱ्याच्या कामांत मूर्खपणाचें व स्वार्थसाधनांत मात्र शहाणपणाचें वर्तन करण्याचा शहाण्या मनुष्याला प्रसंग कधीं न येवो. या कर्मापासून मीं हा एक उपदेश घेतला कीं, पुढें कोणाचीही गोष्ट पाहिली तरी ती न पाहिल्याप्रमाणेंच समजावी.'

सदसद्विचार, बुद्धी, उपायज्ञान व देहभान असेल तर तू **सादी**प्रमाणें भाषणें कर व तसें न करितां आलें तर चुप रहा.

गोष्ट आठवी.

दोषगोपनमहत्व.

दाउदतायी या विद्वान् गृहस्थाजवळ बसणाऱ्या एका गृहस्थानें म्हटलें, 'अमका फकीर मस्त होऊन

रस्त्यांत लोळत असलेला मीं पाहिला. तसेंच तो ओकीनें भरलेला, व त्याचें पागोटें व पैरण कोठें जणों गहाण पडलेली व सभोंवार कुत्रे जमलेले होते.'

हें ऐकून तो सज्जन नाराज होऊन त्यानें रागानें तोंड फिरविलें. थोडा वेळ उद्विग्न व क्रुद्ध राहून तो ह्मणाला, 'हे मित्रा आज तुझा मित्रस्नेह खरोखर कामास येणार आहे. जा त्याला त्या घाणींतून इकडे आण, त्याला तसा पडूं देणें शास्त्राज्ञेस विरुद्ध व आपणा कंथाधाऱ्यास लाजिरवाणें आहे. त्याला पाठीवर घेऊं नये, कारण झिंगलेल्या मनुष्याच्या हातीं योग्यायोग्य विचाररूप लगाम रहात नाहीं.'

हें ऐकून तो गृहस्थ मनांत कष्टी होऊन पंकनिमग्न गर्दभाप्रमाणें काळजींत पडला. कारण त्याची आज्ञा मोडण्याचें त्याच्यांत सामर्थ्य नव्हतें किंवा त्या मस्त मनुष्याला वाहून घरीं नेण्याची त्याला इच्छा नव्हती. त्यानें बरेच आढेवेढे घेतले, तरी त्याला कांहीं उपाय सुचेना, व त्याची आज्ञा मोडण्याचा मार्गही त्यास दिसेना. शेवटीं त्यानें जाऊन कंबर बांधून निरुपायानें त्यास खांद्यावर घेतलें.

तेव्हां सर्व शहरचे लोक त्याच्या मागें लागून थट्टा करीत सुटले. एकानें ताणा मारीत ह्मटलें, 'हे पहा फकीर! वाः हे कसे उत्तम सद्भक्त व धर्माचे आधारस्तंभ आहेत पहा!! या राजश्रीनीं दारू पिऊन तिच्या-करितां कंथा गहाण टाकली आहे.' दुसऱ्यानें याच्या व त्याच्याकडे हातानें खुणा करीत ह्मटलें, 'हें पहा! हा पुरा झिंगलेला व हा दुसरा अर्धवट झिंगलेला आहे.'

शहरचे लोक असे नांवें ठेवीत मागें लागण्यापेक्षां, कोणीही मनुष्य शत्रूची तीक्ष्ण तर्वार मानेवर मारलेली सोशील.

याप्रमाणें मोठ्या संकटानें सर्व दिवस श्रम करून त्यानें निरुपायानें त्याला त्यांच्या घरीं पोंचविलें. रात्रभर त्याला लज्जा व काळजी यांमुळें झोंप आली नाहीं. दुसरे दिवशीं त्याला ताई हंसून ह्मणाला, 'अरे बाबा, कोणाचीही पाठीमागें गल्लींत अब्रू घालवूं नको. नाहीं तर दुर्दैवानें तुझीच शहरभर बेअब्रू होईल.'

गोष्ट नववी.

वऱ्याबाइटांची निंदा करण्याविषयीं.

हे शूर व शहाण्या गृहस्था, चांगल्या व वाईट दोन्ही लोकांची निंदा करूं नको, कारण त्यामुळें दुष्ट मनुष्य तुझा शत्रू होतो व खरा मनुष्य सज्जन असला तर, असें करण्यांत तू स्वतः पापांत पडतोस. अमका दुष्ट आहे, म्हणून तुला कोणी सांगेल तर तो सांगणाराच दुष्ट अंतःकरणाचा आहे असें समज. कारण अमक्याचीं कर्में वाईट आहेत, असें कोणी सांगावयाला कशास पाहिजे? त्याचा वाईटपणा त्याच्या त्या वाईट कर्मांपासूनच बाहेर फुटूं लागतो. तूं लोकनिंदेचाच धंदा पतकरून, कोणाचे खरे दोष बाहेर काढलेस, तरी देखील त्यांत तूं पापच केलेंस असें होतें.

गोष्ट दहावी.

परोक्ष निंदेचे दोष.

एकाजवळ एकानें एकाची पाठीमागें निंदा केली. ती ऐकून तो शहाणा व श्रेष्ठ श्रोता म्हणाला, 'मजपुढें कोणाची निंदा करून तुझ्या विषयींच माझ्या मनांत वाईट भाव आणूं नको. इतर लोकांहून त्याची कमी योग्यता होती, असें मानलें तरीं, त्याची निंदा केल्यानें म्हणजे तुझी योग्यता वाढते असें नाहीं.'

गोष्ट अकरावी.

चोरी व परोक्ष निंदा यांचें तारतम्य.

कोणी एकानें म्हटलें, 'चोरी, परोक्ष निंदेपेक्षां अधिक फायदेशीर आहे, ही गोष्ट थट्टेची आहे असें मी समजतों.' मी त्याला म्हटलें, 'हे वेड्या मित्रा, या तुझ्या भाषणाचें मला आश्चर्य वाटतें. चोरी किंवा दगाबाजी परोक्ष निंदेपेक्षां कशामुळें तू अधिक फायदेशीर व चांगली समजलास?' तो म्हणाला, 'ठीक, ऐक. चोर कांहींतरी पुरुषार्थ करून स्वबाहुबलपराक्रमानें पोट भरतात, पण परोक्षनिंदक अधिक पापी नव्हे कां? तो ईश्वराजवळ पुढें स्वतः पापाचरणामुळें दोषी होतो, व चित्रगुप्ताकडे आपलें पापपुण्याचें खातें काळें करतो व इतकेंही करून त्याला कांहीं फल प्राप्त होत नाहीं.'

गोष्ट बारावी.

परोक्ष निंदा, व समक्ष केलेली स्पर्धा.

निजामिया* नांवाच्या पाठशाळेंत मला रोजगार होता. तेथें रात्रंदिवस अध्ययन व अध्यापन याविषयीं चर्चा होत असे. एकदां मीं आपल्या शिक्षकाला झटलें, 'अहो थोर गुरूजी, अमुक मनुष्य माझी फार स्पर्धा करतो, मीं यथार्थ उत्तरें दिलीं तरी तो स्वतः कुटील असल्यानें, माझ्यावर खेंकसतो.'

हें ऐकून त्या गुरुजीनें त्रासानें थोडासा रागाचा आविर्भाव आणून ओरडून झटलें, ' अरे मला तुझें मोठें आश्चर्य वाटतें, प्रत्यक्ष तुझ्या मित्रानें समक्ष केलेली स्पर्धा तुला सहन होत नाहीं. अशा स्थितींत परोक्ष निंदा करणें चांगलें आहे, असें तुला कोणी सांगितलें तें कळत नाहीं. त्यानें तुझी स्पर्धा करून नर्काचा मार्ग धरला असला तरी, या दुसऱ्या रस्त्यानें तूही तेथेंच पोचशील.

गोष्ट तेरावी.

हिज्जाज बिन यूसफ बादशहाची कागाळी.

'**हिज्जाज** हा राक्षस असून त्याचें मन काळ्या दगडाप्रमाणें कठिण आहे, व तो सर्व प्रजेच्या दुःखोद्गाराला व दीन रोदनाला अगदीं भीत नाहीं, याकरितां, हे ईश्वरा, तूं त्याच्याजवळून सर्व प्रजेची दाद अवश्य घे,' असें कोणी झटलेलें ऐकून एका वृद्ध अनुभविक व जगद्दृष्टचा गृहस्थानें त्याला एक पोक्त बोधवचन सांगि-

* **हिरात**च्या प्रदेशांत एक मोठें प्रासिद्ध मुसलमानी लोकांचें विद्यापीठ होतें.

तलें कीं, 'त्या जुलमी व दुष्ट मनुष्यापासून जुलूम पावलेले लोक, यमलोकांत त्याचा बदला घेतील व शेवटीं त्याला त्या लोकांपासून दुःख सोसावें लागेलच तेव्हां तूं त्याच्या नाशाविषयीं प्रार्थना करण्याकरितां हात उचलले मागें घे, कारण पुढें हें कालचक्र त्यास स्वतःच खालीं पाडणार आहे. त्याचा तो जुलूम व तूं त्याच्या मागें केलेली निंदा दोन्ही मला मान्य नाहींत.'

दुष्टाला त्याचीं पापेंच नर्कांत नेतात. त्याचा पापाचा घडा भरून चित्रगुप्ताकडील त्याचें खातें काळें झालें असलें तरी तो एकटाच नर्कांत जाऊन न पडावा या हेतूनेंच जणों, दुसरा मनुष्य त्याची मागें निंदा करून त्याच्या मागोमाग नरकाकडे धांव घेत असतो.

गोष्ट चौदावी.

काममोहित होणें व परदोषाविष्करण.

असें ऐकण्यांत आहे कीं एका भक्तसमूहापैकीं एकजण एका मुलावर खुष होऊन हंसला. तेव्हां तेथें एकांतवास करणारे दुसरे भक्त त्याची मागें निंदा व थट्टा करूं लागले.

पुढें ही गोष्ट छिपून न राहतां त्यांतीलच एकानें एका थोर महात्म्याला सांगितली. तेव्हां तो म्हणाला, 'आपल्या एखाद्या काममोहित मित्राच्या दोषावरील पडदा काढूं नको, कारण काममोहित होणें म्हणजेच पाप व एखाद्याची मागें निंदा करणें मोठें पुण्यकर्म आहे असें नाहीं.

गोष्ट पंधरावी.

नमाज पढण्याचा व रोजे करण्याचा विधि व आत्म-स्तुतीचे दोष.

लहानपणीं एकदां मला रोजे करण्याची इच्छा झाली, पण मला डावें उजवें, योग्यायोग्य, कांहीं कळत नव्हतें.

तेव्हां आमच्या त्या गल्लींतील भक्तांपैकीं एकाजवळून मी प्रथम हातपाय धुण्यास शिकलों. त्यानें सांगितलें कीं, 'प्रथम 'बिस्मिल्ला' असें स्वस्थपणें म्हणावें. नंतर निमाज पढण्याची इच्छा मनोभावानें मनांत आणावी, व हाताचे पंजे धुवून, तोंड धुवून, तीन वेळां नाक धुवून, नाक पुड्या कनिष्टिकेनें खाजवून, तर्जनीनें पुढील दांत घासावे. कारण तिसऱ्या प्रहरापुढें रोज्यामध्यें दांत घासणें मना आहे. नंतर तीन ओंजळी पाणी तोंडावर केंसांपासून हनुवटीपर्यंत मारावें. व पुनः हात कोपरापर्यंत धुवावे. इतकें झाल्यावर हातांत स्मरणी घेऊन नित्यपाठापैकीं जें कांहीं येत असेल तें म्हणावें. नंतर हातांत पाणी घेऊन नाकापासून डोक्यावर घालावें व पाय धुवावे, म्हणजे झालें. हाच निमाज होय, व हा सर्व विधी झाल्यावर ईश्वराचें नांव घेऊन त्याची समाप्ती करावी.' या गोष्टी मजहून चांगल्या येथें कोणीही जाणत नाहीं. हें करितां करितांच येथें मी वृद्ध व श्रेष्ठ झालों, हें पहात नाहींस काय?

त्या गांवच्या वृद्ध काजीनें हें भाषण ऐकून रागानें ओरडून म्हटलें, 'हे मूर्ख व दुष्टबुद्धी मनुष्या, तूं दंतधावनकाष्टानें रोज्यांत दांत घासणें योग्य नाहीं. म्हणून

सांगितलेंस परंतु लोकांची परोक्ष निंदा करणें—ज्याला कुराणांत नरमांसभक्षणतुल्य मानलें आहे—असें काम करणें योग्य आहे नाहीं वरें? रोज्यांत अन्नापासून तोंड धुणें योग्य आहे तसें, तूं प्रथम मौनरूप उदकानें आपलें तोंड धूत जा. आपल्या बोलण्यांत कोणाचेंही नांव येईल तें प्रशंसा करीत व चांगलें म्हणतच घेत असावें.'

सरसकट सर्व लोकांस गाढव म्हणत सुटलास तर तुलाही लोक मनुष्य म्हणतील असें समजूं नको. एखाद्याच्या पाठीमागें जसें बोलला असतास तसेंच त्याच्या तोंडावर बोलत जा. लोकदृष्टीची तुला जशी लाज वाटते तशी गुह्यकर्मज्ञ परमेश्वराची तुला भीती किंवा लाज कशी वाटत नाहीं? स्वतःच्या दुष्कर्माची किंवा परमेश्वराची तुला लाज वाटत नाहीं, पण अम्हांस मात्र लाजतोस, हें आश्चर्य नव्हे कां?

गोष्ट सोळावी.

खऱ्या ज्ञानी लोकांनां नांवें ठेवण्याचे दोष.

ईश्वरमार्गानुवर्ती, स्थिरपद, व एकांतवासी, असे कांहीं भक्तलोक एकत्र जमून कांहीं विषयाची चर्चा करूं लागले. त्यांतून एकानें दुसऱ्याची पाठीमागें निंदा सुरू करून विषयप्रतिपादनरूप द्वार खोललें.

तेव्हां त्याला कोणीं म्हटलें, 'वेड्या मित्रा, तूं कधीं फिरंगी लोकांशीं जिहाद* करण्यास गेला होतास?'

---

* जिहाद—धर्माची प्रवृत्ती करण्याकरितां व परधर्मी व अधर्मी शत्रूशीं युद्ध करण्याकरितां सर्व खऱ्या मुसलमानांनीं केलेलें युद्ध.

तो ह्मणाला 'या माझ्या कोठडीच्या चार भिंतींवाहेर मी आजन्मांत पाऊल टाकलें नाहीं.'

हें ऐकून तो सत्यप्रिय भक्त ह्मणाला, 'याच्यासारखा वाईट व दुर्दैवी मनुष्यच मी पाहिला नाहीं. कारण काफर शत्रू याच्या वादरूप शौर्यापासून बिनघोर असून खरे मुसलमान मात्र याच्या वाक्पारुष्यांतून सुटले नाहींत.'

गोष्ट सतरावी.

परानिंदेविषयीं एका वेड्याचे उद्गार.

मरगिज नांवाच्या तुर्कस्थान देशांतील एका खेडे गांवांतील एक वेडा काय मिष्ट व उत्तम उपदेशपर भाषण बोलला! तें ऐकून कोणीही जिभळ्याच चाटूं लागेल. तो ह्मणाला, 'मी कोणाची निंदा करीन तर ती मी आपल्या आईशिवाय दुसऱ्या कोणाची केली नाहींसें होईल.'

आपल्या आईलाही ज्यापासून सद्गती मिळेल, तेंच ईश्वरभजन उत्तम होय, असें विद्वान व बुद्धिवान लोक जाणतात.

हे यशस्वी गृहस्था, मृत मित्राच्या खऱ्या मित्रांनीं, त्याच्या मागें दोन गोष्टी करणें पाप आहे, एक तर त्याच्या मालाचा अपहार करणें व दुसरें त्याला नांवें ठेवणें.

जननिंदकाकडून कोणाची स्तुती होण्याची उमेद ठेवूं नको. कारण तो तुजपुढें दुसऱ्याची निंदा करतो तशी दुसऱ्यापुढें तुझी निंदा केल्यावांचून राहणार नाहीं.

स्वहिततत्पर, लीन सर्व जगताविषयीं उदासीन मनुष्यच्च या जगांत खरा बुद्धिवान होय.

गोष्ट अठरावी.

ज्याची निंदा करण्यांत पाप नाहीं अशा लोकांविषयीं.

तिघांची पाठीमागें निंदा करणें वाजवी आहे, यांहून चौथ्याची करणें महत्पाप आहे.

एकतर अत्यंत प्रजापीडक व प्रजेवर जुलूम करण्यांत कोणाचेंही भय न बाळगणारा असा बादशहा. त्याच्या पीडेची प्रसिद्धी करणें उचित आहे, परंतु सर्व लोकांस त्याचें मोठें भय असतें.

दुसरा, स्वदोषाविष्करण करणारा मूर्ख, त्याची आपण कशास निंदा करावी? त्याची योग्यता आपोआप प्रकट होणारच आहे. तो स्वतःच उलटा कुव्यांत पडतो, तेव्हां त्याची मागें निंदा करण्यांत पाप लागेल अशी शंकाच नकोच.

तिसरा, खोटी तराजू बाळगणारा व खोटें भाषण करणारा, त्यांचीं कुकर्में तुला ठाऊक असतील तितकीं प्रकट कर.

गोष्ट एकोणिसावी.

परोक्ष निंदा करणाऱ्यापेक्षां ती केलेली सांगणाऱ्याचें दोषाधिक्य.

एक चोर जंगलांतून शाइस्तान*च्या दरवाज्यावर

---

* **रुस्तुम**ची जन्मभूमी–मध्यएशियेंतील एक प्रदेश.

आला, व तेथील गल्लींतील एका वाण्याकडून त्यानें आपल्या मर्जीप्रमाणें, खाण्या पिण्याचें सामान विकत घेतलें. वाण्यानें त्यांतून अर्धा दांगभर जिन्नस चोरला तेव्हां तो कृष्णकर्मी चोर ओरडून म्हणाला, 'हे परमेश्वरा, तूं या लुच्चांनां जाळून भस्म कर, कारण या शाइस्तानचे लोक दिवसांढवळ्यां वाटा मारतात.'

तेव्हां एकानें तेथील एका साधू वाण्याला सहज म्हटलें, 'अमका तुला पाठीमागें काय म्हणाला तें तुला ठाऊक नाहीं कां?' तो म्हणाला, 'चुप रहा, अरे बाबा, शत्रूनें शिव्या दिलेल्या ऐकण्यापूर्वीच निजणें बरें.'

शत्रूचा निरोप आणणारे लोक खरोखर त्याच्याहून अधिक शत्रुत्व करणारे होत. शत्रूचा निरोप मित्राला सांगणारा असा मनुष्य खरोखर त्या शत्रूच्या मित्रावांचून कोणी नाहीं. शत्रूनें माझी मागें अमुक निंदा केली असें कोणी सांगितलेलें ऐकून जसें माझें शरीर कांपतें, तसें त्या शत्रूनें माझी समक्ष निंदा केल्यानेंही कांपत नाहीं. माझ्या शत्रूनें मागें मला असें म्हटलें म्हणून मला तू सांगणाराच त्याच्यापेक्षां माझा जास्त शत्रू आहेस.

चाहाडखोर मनुष्य जुनें भांडणरूप व्रण नवीन करतो, व चांगल्या सज्जनालाही राग आणतो. विझलेलें भांडण पुनः चेतविणाऱ्या दुर्जनस्नेह्याच्या सहवासापासून दूर पळ. इकडून तिकडे भांडणें पसरणाऱ्या कृष्णकर्मी मनुष्याचे पाय बांधले असलेलेच बरे. दोघां माणसांच्या मध्यें भांडण ही आग आणि लुच्चा व चहाडखोर मनुष्य तिच्यावर सर्पण ओढून टाकणारा होय.

गोष्ट विसावी.

फरीदून वादशहा व वजीर.

फरीदून बादशहाजवळ एक फार आवडता वजीर होता. तो प्रसन्नांतःकरणी व दूरदृष्टी होता. तो ईश्वरास मान्य अशा गोष्टींवर दृष्टी देऊन नंतर बादशहाच्या हुकूमाची बजावणी करीत असे. मूर्ख कारभारी, सर्व प्रजेस त्रास देणें हीच राज्याची व्यवस्था व धनवृद्धी समजतो. कोणी ईश्वराज्ञेनुसार न चालेल तर स्वतः राजाच त्याला नुकसान पोंचवील.

एक गृहस्थ बादशहापुढें पहाटें जाऊन ह्मणाला, 'प्रतिदिनीं आपली अधिकाधिक सौख्यवृद्धी व मनोरथपूर्ती होवो. मी बोलतों तें कांहीं स्वार्थबुद्धीचें न मानतां माझें सांगणें ऐका. हा वजीर मनांतून आपला मोठा वैरी आहे, कारण आपले खास शिपाई व प्रजा यांच्या पैकी याच्या-पासून कर्ज घेतलें नाहीं असा कोणीही नाहीं. आपण श्रेष्ठ व मानी असे बादशहा मेल्यावर परत देण्याच्या शर्थीवर सर्वांनीं याच्यापासून कर्ज घेतलें आहे. हा स्वयंमन्य, आपण जिवंत असावें असें इच्छित नाहीं, कारण मग दिलेलें द्रव्य परत मिळणार नाहीं असें त्यास वाटतें.'

हें ऐकून बादशहानें एक क्षणमात्र त्या लोभी वजी-राकडे शासन करण्याच्या इच्छेनेंच जणों पाहून ह्मटलें, 'तू माझा वैरी असून मजसमोर मित्ररूपानें कां आलास?'

त्या वजीरानें सिंहासनापुढील भूमीचें चुंबन करून, साष्टांगनमस्कार घालून ह्मटलें, 'आतां आपण विचार-

लेंच तेव्हां छिपविणें योग्य नाहीं. हे प्रार्थित बादशहा, सर्व प्रजेनें आपलें अभीष्ट चिंतन करीत राहावें असें मी इच्छितो. आपलें मरण हाच माझ्या कर्जाच्या फेडीचा वायदा असल्यानें माझ्या ऋणाच्या धाकानें सर्व लोक आपण दीर्घायु व्हावें असेंच इच्छितील. लोकांनीं मनोभावानें व नवानवसांनीं आपलें मस्तक काळेंभोर व आपलें आयुष्य दीर्घ होण्याची इच्छा करणें आपल्याला मान्य नाहीं कां? लोकांचे आशीर्वाद कालशरवर्षावापुढें लोहकवचाप्रमाणें होतात, म्हणून प्रत्येक मनुष्य ते मिळविण्याची इच्छा करीत असतो.'

त्याचें हें भाषण बादशहास पसंत झालें तेव्हां, राजभयानें म्लान झालेली त्याच्या वदनकमलाची कळी पुनः उमलली व बादशहानें त्याची पहिली पदवी व योग्यता होती ती पुष्कळ वाढविली.

दोघां मित्रांमध्यें मूर्खपणानें व हीन बुद्धीनें वैर आणणारा मनुष्य खट्टू व शर्मिंदा होतो. ते दोघे पुनः लौकरच आपसांत मेळ करून घेतात. दोघांत आग पेटवावी आणि आपण स्वतः तींत जळून जावें, हें शहाणपण नव्हे.

सादीप्रमाणें या जगांतील प्रत्येक बऱ्यावाईट मनुष्यापासून आपली जीभ आंखडून धरणाऱ्यानेंच खऱ्या एकांतवासरूप मद्याचा घोंट घेतला.

तुला ठाऊक असलेली फायदेशीर गोष्टच बोल, कारण —दुसरें कांहीं कोणालाही आवडणार नाहीं—म्हणजे उद्यां लज्जित होऊन 'अरेरे मी व्यर्थ चांगली गोष्ट ऐकिली नाहीं.' असें ऐकणारा ओरडूं लागेल.

गोष्ट एकविसावी.

सुंदर, सुशील व आज्ञाधारक स्त्रीची प्रशंसा.

सुंदर आज्ञाधारक व भक्तिमान स्त्री गरीबालाही जणूं राज्यपद देते. अनुकूल स्त्री मिळाली असेल, तर आनंदानें आपल्या दारावर पांच वेळ चौघडा वाजीव.

तुला रात्रीं कष्टहारक प्रियतमेचें आलिंगन मिळण्याजोगें असेल तर दिवसभर परिश्रम व त्रास पडले तरी वाईट मानूं नको. समृद्ध घर व मनाजोगी भार्या असणाऱ्यावर, ईश्वराची कृपादृष्टीच आहे म्हणावयाचे.

स्त्री सुंदर असून शिवाय पवित्र, पतिव्रता व पडद्यांत राहणारी असेल तर, तिच्या दर्शनानेंच नवऱ्यास स्वर्गाधिक सुख मिळतें. मनोल्हादिनी व अनुकूलवर्तिनी स्त्री असेल तोच मनुष्य या जगांत सफलमनोरथ झाला म्हणावयाचा. स्त्री पतिव्रता, पवित्र व मिष्टभाषणी असेल तर तिच्या सौंदर्याकडे किंवा कुरूपाकडे लक्ष्य देऊं नको.

सुंदर बायकोपेक्षां सद्गुर्तनी बायको अधिक मनांत भरणारी असते, कारण पतिमनानुकूलवर्तिनी स्त्री असल्यानें सर्व दोष छिपतात. पतिहस्तप्राप्त शिर्का मिष्टान्न मानून खाणारी स्त्री असावी, मिष्टान्न शिर्क्याप्रमाणें वेडें वांकडें तोंड करून खाणारी नव्हे.

अप्सरोमुखी पण दुष्ट, दुर्वृत्त व दुर्मुखलेल्या स्त्रियेपुढून कुरूप पण हंसतमुख स्त्री गेंद घेऊन जाते व तिला मागें टाकते. पतिहितैकनिष्ठ स्त्री मनास आनंद देते. पण दुष्ट स्त्रीपासून तर ईश्वरानेंच रक्षण करावें. चांगला पती व वाईट स्त्री यांचा जोड, पिक व काक एका पिंजऱ्यांत,

कोंडून ठेविल्याप्रमाणें होतो. त्यांतून सुटका होईल तो सुदिन.

स्त्रीच्या संगतींत एक तर जीवन्मुक्त होऊन रहा, किंवा मन त्रस्त व दीन करून दिवस काढ. घरांत कपाळावर आंठ्या पाहण्यापेक्षां काजीच्या कारागृहांत कैद भोगिलेली बरी. घरीं दुष्ट स्त्री असेल त्याला **ईदी**चा* सणाचा महिना **सफर**च्या कष्टाच्या महिन्याप्रमाणें जातो. ज्या गृहांतून स्त्रियांच्या भांडणाचे दीर्घ स्वर बाहेर पडतात, तेथें सुखाचें द्वार बंदच झालें म्हणावयाचें.

बायको बाजारची वाट धरील तर तिला मार, नाहींतर तू स्वतः बायको होऊन घरांत रहा. स्त्री पतीचें न ऐकेल तर मग पतीनेंच लुगडें चोळी नेसावी. स्त्री दुर्वृत्त व लबाड असेल तर ती बायको कशाची, तू एक आपल्या बोकांडीं कृत्याच बसविलीस म्हणावयाचें. बायको जव मापण्यांत चोरी करील तर मग गव्हाच्या ढेराची आशा सोड. बायकोचें मन व वर्तन प्रेमळ व शुद्ध असलेल्या सुदैवी भगवद्भक्तावर ईश्वराची कृपादृष्टीच आहे म्हणावयाचें.

परक्यांच्या तोंडाकडे पाहून कोणी स्त्री हंसेल तर तिच्या नवऱ्यास व्यर्थ पुरुषार्थाची फुशारकी मारूं नको म्हणून सांग. लबाड स्त्रीनें एकदां बदकर्मांत हात घातला कीं

---

* **रमजान** महिन्याच्या अखेरीस **ईद** येते, सर्व मुसलमान लोकांत तो आनंदाचा व शुभ महिना मानतात. व **सफर**च्या महिन्यांत **पैगंबरा**ला **मक्के**हून **मदीने**स पळून जावें लागलें म्हणून त्याला कष्टाचा व अशुभ महिना समजतात.

तिनें नवऱ्याच्या तोंडावर थप्पड मारलीच समज. परक्याच्याविषयीं स्त्रीचे नेत्र अंधळे असावेत. तिनें पडद्यांतून किंवा घरांतून बाहेर पडावें तें कबरेंत जाण्याकरितांच.

स्त्रीचें पाऊल मर्यादेबाहेर आहे असें दिसलें तर तिच्या विचार व शहाणपणाचा लोप झाला असें समज. अशा लाजिरवाण्या रीतीनें आयुष्य गमविण्यापेक्षां या पिंजऱ्यांतून सुटून मगरमुखांत उडी घालणें बरें. स्त्रीस परक्यासमोर मुख झांकण्यास सांग. ती न ऐकेल तर कशाची स्त्री व कशाचा नवरा. सुंदर व चैनी स्त्री प्रतिकूलवर्तिनी व दुष्ट असेल तर तिचा त्याग कर.

बायकोच्या त्रासामुळें भ्रमिष्ट व वेडे झालेल्या दोघां गृहस्थांच्या तोंडून दोन वाक्यें किती उत्तम निघालेलीं माझ्या कानीं आलीं आहेत!! एक ह्मणाला 'कोणालाही वाईट बायको न मिळो.' दुसरा ह्मणाला, 'अशी बायको मुळीं या जगांतच न राहो.'

हे मित्रा, वरचेवर नवी नवी तरुण बायको कर, कारण एक सालचें वर्षफल पुनः कामास येत नाहीं. गृहकलहापेक्षां प्रवासदुःख व तंग जोड्याच्या त्रासापेक्षां अनवाणी चालणें बरें. बायका चालाख, मनस्वी, सत्ताप्रिय व मानी असतात खऱ्या पण त्या नवऱ्याच्या दृढालिंगनानें दबल्या असल्या ह्मणजे खुष असतात.

हे **सादी,** एखादा स्त्रैण मनुष्य पाहून त्याच्यावर अगदीं ताणा मारूं नको. कारण तुलाही स्त्रियांच्या जुलुमाचा अनुभव आहे. व तूही केवळ एक क्षणभर त्यांस बगलेंत घेण्याकरितां नेहमीं त्यांचा भार सोसतोस.

गोष्ट बाविसावी.

प्रतिकूलवर्तिनी स्त्री.

एक तरुण गृहस्थ बायकोच्या प्रतिकूळ वर्तनामुळें त्रासून एका म्हाताऱ्याजवळ रडत होता कीं, 'या दुष्ट व चालाख स्त्रीच्या संगतीनें मी जणूं जात्याच्या खालच्या पेंडाप्रमाणें त्रासरूप भार सोसतों आहें.'

त्याला त्या वृद्ध गृहस्थानें झटलें, 'हे भल्या गृहस्था, आपलें मन घट्ट कर. कारण धीर धरल्यानें कोणीही लंज्जित होत नाहीं. हे घर बुडव्या, तू रात्रीं जात्याचा वरचा पेंड होतोस तेव्हां दिवसां कां खालचा होईनास? पुष्पगुच्छ पाहून तुला संतोष होतो त्या अर्थीं, त्याच्या कांट्यांचा त्रास सोसणेंही तुला उचित आहे. नेहमीं ज्या झाडाचें फल खाऊं इच्छितोस त्याचे कांटे बोंचले तर खेद करूं नको.

बोधवचन.

मुलांचें शिक्षण.

मुलाचें वय दहा वर्षांहून अधिक झालें कीं, त्याला बायकांपासून दूर राहण्यास सांगावें. कापसाच्या राशींत अग्नी घालणें योग्य नाहीं, नाहीं तर एका निमिषमात्रांत घराची राखरांगोळी होणार. आपलें नांव मागें कायम राहावें असें इच्छित असशील तर मुलास विद्या व शहाणपण शिकीव, कारण त्याला पुष्कळशी विद्या व शहाणपण नसेल तर तुझ्या मागें कांहीं शेष राहणार नाहीं.

बाप मुलाचे लाड करील तर पुढें त्याला संसारांत अनेक तऱ्हेचीं संकटें सोसावीं लागतील. मुलाला शहाणा, विद्वान, व पापभीरू कर. त्याचा खरा हितचिंतक असशील तर त्याचे लाड करूं नको. लहानपणापासूनच त्याला झिट्कारून सुशिक्षण लाव. चांगल्या व वाईट गोष्टींबद्दल त्याला शाबासकी व धाक दाखवीत जा. नवशिक्याची तू स्वतः प्रशंसाच करीत जा, व धाक दाखविणें व शिक्षा करणें हें काम पंतोजीकडे सोंप.

तुजजवळ कारूनप्रमाणें संपत्ती असली तरी मुलाला कांहीं अंगमेहनतीचा धंदा शिकीव. सुस्थितीचा भरंतसा धरून राहूं नको, कारण संपत्ती सदां सारखी स्वाधीन राहील असें कदाचित होणार नाहीं. संचित सुवर्णराजतादि संपत्तीचा क्षय होतो, परंतु धंदा करणाऱ्याची पोतडी कधीं रिकामी रहात नाहीं. त्याला हें संसारचक्र शहरोशहरीं फिरविणार नाहीं कशावरून? हातानें कांहीं धंदा करितां येत असणाऱ्याला कशाचीही जरूरी पडली तरी दुसऱ्यापुढें कशाला हात पसरावे लागणार?

सादीला ही योग्यता कशानें मिळाली हें तुला ठाऊक आहे? त्यानें भूजलपर्यटण केलें असें नाहीं, तर लहानपणीं मोठ्यांच्या हातून थप्पडा खाल्ल्या, व त्यामुळेंच ईश्वरानें त्यास मोठ्या लोकांत स्थळ दिलें.

सेवारूप जोखड मानेवर घेणारा मनुष्य लौकरच स्वतः यजमान व धनी होतो. गुरूच्या हातून मार खाल्ला नाहीं अशा मुलाला कालचक्राचा त्रास सोसावा लागतो. कोणाच्या तोंडाकडे पहावें न लागावें म्हणून मुलाला नीट जप व सुख दे.

आपल्या मुलाचा त्रास न सोसणाऱ्याच्या मुलाचा त्रास दुसरे सोसून त्याला कुमार्गास लावून खराब करितात. मुलाला वाईट सोबतीपासून जप, नाहींतर दुष्ट लोक त्याला स्वतःप्रमाणें दुर्दैवी व खराब करतील. दाढी येऊन काळें होण्यापुर्वीच ज्याचें मुख दुर्वर्तनानें काळें झालें असेल, त्याच्याहून पंढ अधिक वाईट आहे असें म्हणूं नको. ज्याच्या नपूंसकपणामुळें चांगल्या पुरूषाची अब्रू जाणार, अशा निर्लज्जापासून पळून गेलें पाहिजे. सोद्या लोकांत बसूं लागणाऱ्या मुलाच्या पित्याला, तो सुधारण्याची उमेद सोड म्हणून सांग. असा मुलगा मरून नाहींसा झाला तरी खेद मानूं नको, कारण असा कुलकलंक पुत्र बापापूर्वीच मेलेला बरा.

गोष्ट तेविसावी.

एका रात्रीं आमच्या मोहल्ल्यांत मेजवानी होती व तेथें एक सुंदर मापुक व सर्व तऱ्हेचे लोक एकत्र जमले होते. तेथून गाण्याचा आवाज कानीं पडतांच, वाहवा, शाबास, असा ध्वनी थेट आकाशांत दुमदुमून गेला.

तेव्हां माझें एक सुंदर मापुक पात्र होतें त्याला मीं म्हटलें, 'हे माझ्या सुंदर चित्रा, तू इतर तरुण लोकांबरोबर त्या समाजांत कां आला नाहींस? तुझ्या येण्यानें आमच्या मंडळींत जणूं दीपप्रभा पडली असती.'

असें ऐकतों कीं, हें ऐकून तो भव्याकृती सुंदर, व रजतगौर मापुक जातां जातां आपल्याशीं म्हणत होता कीं, 'तरुण लोकांप्रमाणें मला अद्याप दाढी आली नाहीं, अशा स्थितींत पुरुषांपुढें जाणें मला योग्य नव्हे.'

गोष्ट चोविसावी.

लहान मुलाशीं सोहवत किंवा लंवडेवाजी करण्याचे दोष.

तुझें मापुक तुझें जणों घर खोदून सत्यानाश करील, याकरितां आपलें घर लग्न करून नीट व्यवस्थेस लाव, कारण दररोज सकाळीं नवीन बुलबुल ज्याच्यावर बसणार अशा फुलावर आपली आशा गुंतवून ठेवणें योग्य नाहीं. जें मापूक हरएक मंडळींत पाजळणार त्याच्या आसपास तू पुनः पतंगाप्रमाणें फिरूं नको.

सुंदर, सुशील व शृंगारलेली स्त्री, व नवीन, अल्हड व मूर्ख, पोर यांची काय साम्यता होणार? अशा स्त्रीवर तू प्रेमरूप प्रभातवायूची एखादी झुळूक सोड, कीं, ती तेव्हांच एखाद्या पुष्पकलिकेप्रमाणें प्रफुल्लित होऊन हंसत तुझ्यामागें लागेल. ती त्या लटकदार व लबाड पोराप्रमाणें, दगडाशिवाय फोडतां न येणाऱ्या कठिण फलाप्रमाणें, लबाड व कठिणहृदय असत नाहीं.

असें पोर बाहेरून स्वर्गींच्या अप्सरेप्रमाणें सुंदर असलें तरी त्याला मनमोहक समजूं नको. कारण त्याचें याशिवाय दुसरें एक पिशाचाप्रमाणें आंतील कुरूप रूप आहे. त्याच्या पायां पडलास तरी तो तुझी पर्वा करीत नाहीं व त्याची पायधूळ झालास तरी त्याच्या मनाला कींव येत नाहीं. पोरावर मन ठेवलेंस तर तुला त्यापायीं शिर मगजानें व हात द्रव्यानें रिकामे करावे लागतील. तू कोणाच्या मुलाकडे वाईट दृष्टीनें पाहूं नको, नाहींतर तुझ्या मुलाचाही सत्यानाश होईल.

गोष्ट पंचविसावी.

व्यापारी वे त्याचा सुंदर तुर्की गुलाम.

असें ऐकतों कीं, या शहरांत एकदां एका व्यापाऱ्यानें एक तुर्की दास विकत घेतला. त्याचा वर्ण रजताप्रमाणें शुभ्र व गौर व त्याची हनुवटी मोहक होती. तो मन भुलविणारा असल्यानें त्यानें रात्रीं त्याच्यावर बलात्कार करण्याचा यत्न केला तेव्हां त्या अप्सरोमुखानें हातीं लागला तो जिन्नस उचलून रागानें त्याच्या डोक्यांत मारून त्याचें डोकें फोडलें. तेव्हां त्या व्यापाऱ्यानें पुनः असा मूर्खपणा करणारा नाहीं ह्मणून सर्वशक्तिमान परमेश्वराची शपथ घेतली.

पुढें त्याला त्याच आठवड्यांत कोठें बाहेर प्रवासास जावें लागलें. तेव्हां तो त्रस्तमन व व्रणितशिर व खिन्नवदन होत्साता निघाला. पुढें **गाजरून*** नांवाच्या शहराबाहेर एक दोन मैल गेल्यावर एक मोठा भयंकर दुर्ग त्याच्या नजरेस पडला, तेव्हां त्यानें,—या दुर्गाचें नांव काय,—ह्मणून विचारलें. वयोवृद्ध मनुष्य अनेक आश्चर्यकारक गोष्टी पाहतो—त्याच्या बरोबरचा एक वृद्ध वाटसरू ह्मणाला, 'तूं **तंगतुरकांना**† जाणत नाहींस वांटतें?'

हें नांव ऐकतांच त्या व्यापाऱ्यानें आपल्या हबशी दासांनां मोठ्यानें ओरडून ह्मटलें, 'पुढें कोठें चाललां? सामान उतरवा. **तंगतुरकांना** सोडून मी दुसरीकडे

---

* **शिराज**पासून दोन कोसांवरील एक शहर.

† **बदकशान** येथील एक प्रदेश. तेथील लोक सौंदर्याविषयीं प्रसिद्ध आहेत.

जाईन तर, मला एक रतीभर शहाणपण नाहीं ह्मणावयाचें.'

पापी मनाचें कामेच्छारूप द्वार बंद कर, किंवा खरा आपक झाला असलास तर काव्यांचा मार खा व डोक्यास पट्टचा बांध. आपल्या दासांचें व मुलाचें पाळण पोषण करतोस त्या अर्थी त्यांनां तुझी भीती राहूं दे तरच त्यांच्यापासून तुला सुफलप्राप्ती होईल. धनी सेवकांचें चुंबन घेऊं लागला तर त्याला धनीपणा सोडला पाहिजे. सेवक सशक्त, काम करणारा व मेहनती पाहिजे, कारण नाजूक सेवक धन्याहून वरचढ होतो. जें जें मनमोहक रूप पाहशील त्या प्रत्येकाचा ह्मणजे तुला अभिलाष करितां येईल असें नाहीं.

गोष्ट सव्विसावी.

निरुपायामुळें घडणारें सद्वर्तन.

एका सुंदर मुलाजवळ कांहीं मंडळीचा एक थोक बसून ह्मणत होता, 'आह्मी शुद्धाचरणी व निरिच्छ भक्तजन आहों.' पण त्यांच्या मनांतली खरी गोष्ट कालचक्रघर्षण पावलेल्या मला विचार. खरे रोजे करणारा मनुष्य सिद्धपात्र पाहून खेद करतो. खजूराचें पोतें कुलपांत बंद असतें ह्मणूनच शेळी खजूराच्या बिया खाते व तिळांपर्यंत तोंड न पोहोंचें इतकें दावें आंखूड असल्यानेंच तेल्याचा बैल बिचारा गवत खातो.

गोष्ट सत्ताविसावी.

सुंदर मुलास पाहून हवालदिल झालेला भक्त व बुकरात हकीम.*

एका अत्यंत सुंदर मुलास पाहतांच एक गृहस्थ मोहित होऊन त्याचें देहभान उडालें व त्याला डवडववून घाम सुटल्यानें तो रक्तपुष्पपटलांवर दंव बिंदू पडल्या-सारखा दिसूं लागला.

बुकरात नांवाचा प्रख्यात हकीम त्या रस्त्यानें चालला होता. त्यानें विचारलें याला काय झालें. तेव्हां एकानें म्हटलें, 'हा एक सद्भक्त आहे, याच्या हातून कधींही पाप घडलें नाहीं. हा रात्रंदिवस वनांत व पहा-डांत राहणारा, मनुष्यसहवासापासून दूर पळणारा व लोकांनां भिऊन वागणारा आहे. पण एका मनमोहक माणुकानें याचें मन मोहिलें असल्यानें याचा पाय जणू गाळांत फसल्यासारखा झाला आहे.'

सर्व लोकांनीं निंदा केलेली ऐंकून तो मोहित गृहस्थ रडून म्हणाला, 'इतकी निंदा झाली तेवढी पुरे आहे, मी रडतों म्हणून मला पश्चात्ताप होत नाहीं, किंवा माझें रडणें निष्प्रयोजन आहे, असें नाहीं, कारण माझे प्राण व्याकुळ झाले ते या सुंदर नकलेनें नसून ती उत्पन्न कर-णाऱ्याच्या ध्यानानेंच होत.

---

* **बुकरात** नांवाचा एक मोठा विद्वान गृहस्थ **शिकंदर** बादश-हाच्या दरबारांत होता. तो **अफ्लातून**चा गुरू होता. ह्याच्याच जोडीचा एक **सुकरात** नांवाचा हकीम होता. त्या दोघांच्या अंगीं **विश्वा-मित्र**ाप्रमाणें प्रतिसृष्टी करण्याचें सामर्थ्य होतें असें म्हणतात.

हें भाषण त्या कार्यकुशल, वयोज्ञानवृद्ध, व विद्वान गृहस्थानें ऐकून म्हटलें, 'उपदेशकाचा आवाज चांगला असला तरी प्रत्येक मनुष्याच्या मनांत प्रत्येक सदुपदेश रुचेलच असें नाहीं. या गृहस्थाचें मन लुटून नेणाऱ्या रूपासारखेंच तें रेखणाऱ्या परमेश्वराचेंही रूप असल्यानें त्याच्या ध्यानानें हा मोहून गेला तर मग एक दिवसाच्या बालकाच्या रूपानें याला कां वेड लागलें नाहीं? कारण ईश्वराचें सृष्टिघटनाचातुर्यच पाहण्याला युवा काय व बालक काय, सारखाच.'

खऱ्या ईश्वरी प्रेमांत रंगलेल्या मनुष्याच्या मनांत **चीन** व **चगल*** येथील सुंदर माणुक व उंट या दोहोंचीं रूपें पाहून एकसारखाच विकार झाला पाहिजे.

या माझ्या ग्रंथांतील प्रत्येक ओळीवर मनोहर मापुकाच्या मुखावर असणाऱ्या बुरख्याप्रमाणें पडदा आहे. व प्रत्येक ओळीचा तात्विक अर्थ गूढ आहे. या काळ्या अक्षरांआड तत्त्वार्थ भरलेला आहे यामुळें व अशा पडद्याआड अप्रतिम सौंदर्य भरलें असल्यानेंच **सादी**चा रिकामा वेळ कष्टकारक भासत नाहीं. अग्निप्रमाणें प्रखर तेज व तापयुक्त असे हे बोधवचनरूप सभादीप मजजवळ असल्यानें माझे शत्रू मजवर कितीही संतापले तरी मला त्याचा खेद नाहीं. कारण ते या मद्भक्तिरूप अग्नीच्या तेजानेंच जणों दग्ध होतात.

---

* **चीन** व **चगल** या देशांतील पोरें व बायका सुंदर असल्यामुळें मुसलमान लोक त्यांना धरून आणून दास दासीप्रमाणें विकीत असत.

बोधवचन.

संसारमग्न लोकांच्या गोष्टीवर अविश्वास.

या संसरांत असूनही त्यापासून कोणी अलिप्त राहूं इच्छील तर त्यानें जनसहवासरूपद्वार स्वतःवर बंदकरून घेतलें पाहिजे. कारण दुर्जननिंदेपासून या जगांत गर्वी, ढोंगी किंवा खरा भगवद्भक्त कोणीही वांचला नाहीं.

तूं देवदूतांप्रमाणें अंतरिक्षांत संचार केलास तरी, तेथें पोंचण्याकरितां, दुर्जन तुझ्या पदराला लटकतील. मोठ्या परिश्रमानें झरा बंद होऊं शकेल व समुद्रालाही पूल बांधून अडवितां येईल, पण दुष्ट निंदकांची जीभ अडवितां येणार नाहीं.

दुर्जन एकत्र जमून ह्मणत असतात कीं, 'अमका व्यर्थ खटपट करीत व ढोंग माजवीत बसला आहे, व तमका पोटाच्या जाळ्यांत फसला आहे.'

तूं ईश्वरभजनविमुख न होतां लोकांचा नाद सोड, तरच तुला कोणी त्रास देणार नाहींत, व तुला अगदीं यःकश्चित समजतील. शुद्धसत्त्व परमेश्वर आपल्या भक्तांवर प्रसन्न असेल तर हे जगांतील लोक प्रसन्न न झाले ह्मणून काय भय?

संसारमग्न दुर्जनास ईश्वराची ओळखच नसते, व तो या भवचक्रभ्रमणांत गर्क असल्यानें त्याला ईश्वराकडे जाण्याचा मार्गच कळत नाहीं. दुर्जनांनीं आरंभींच उलटें पाऊल टाकलें असल्यानें त्यांना मुक्तिप्रद मार्गास लागतांच येत नाहीं. परमेश्वरप्रणीत धर्मवचनें देवदूत व राक्षस हे दोघेही लक्ष्यपूर्वक ऐकतात. एक त्यांपासून मनावर

उपदेश ठसवून घेतात, व दुसरे छिद्रान्वेषी व निंदक असल्यानें त्या उपदेशाचें बुद्ध्या गृहण करीत नाहींत. एखाद्या अंधेऱ्या जागेंत खालीं मान घालून बसणाऱ्या मूर्खाला, सृष्टींतील सर्व चमत्कार दाखविणाऱ्या मांत्रिक* पेल्याचा काय उपयोग?

तू प्रत्यक्ष नरव्याघ्र किंवा त्याहूनही श्रेष्ठ असलास तरी केवळ स्वशौर्यानें किंवा शहाणपणानें, दुर्जननिंदेपासून सुटशील असें समजूं नको. कारण केवळ एकांतवास पतकरून जनसहवासाची पर्वा न करणाऱ्या साधूला दुर्जन नांवें ठेवून म्हणतात कीं, 'हा लुच्चा व ढोंगी असल्यामुळेंच लोकसहवासाला भिऊन पिशाचाप्रमाणें पळतो.' तसेंच कोणी हंसतमुख व मंडळींत मिसळणारा असला तरी त्याला शुद्धाचरणी व भक्तिमान समजत नाहींत.

धनवानाचें निंदारूप सुरीनें जणों चामडें सोलून म्हणतात कीं,'या भूमंडळांत कोणी **फिरओन** प्रमाणें गर्विष्ठ असला, तर हाच आहे. कोणी गरीब बिचारा विपत्तींत पडला असला तर, 'स्वतःच्या मूर्खपणानें त्यानें स्वतःवर संकट ओढवलें,' असें म्हणतात. कोणी संपन्न मनुष्य खालावला म्हणजे यांनां मोठा आनंद होतो, व ते ईश्वराचे आभार मानून म्हणतात कीं, 'असें हें सौख्य व ही आढ्यता कोठवर चालणार? सुखापाठीं दुःख लागलेंच आहे.'

एखाद्या दरिद्री व अडचणींत फसलेल्या मनुष्याला

---

*मांत्रिक पेला. हा पेला **जमशेद** बादशहाजवळ होता, व त्यांत त्याला सर्व सृष्टींतील भूत, भविष्य, वर्तमान गोष्टी दिसत असत अशी दंतकथा आहे.

सुदैवानें थोरवी व संपत्ती प्राप्त झाली तर जणों विपदिग्ध दातांनीं ओंठ चावून मत्सरानें म्हणतात कीं, 'हल्लींचा हा दुष्ट काळच हलकट लोकांस उन्नती देणारा असा विपरीत आला आहे.' तुझ्या हातून एखादें काम चांगलें झालें तर तुझी लालची व संसारमग्न लोकांत गणना करतील व पुढें होऊन हिमतीनें एखाद्या कामांत हात घालशील तर तुला भिकारी व आयत्या पिठावर रेघा ओढणारा म्हणतील. कोणी विशेष बोलका असेल तर त्याला मौर्ख्यपूर्ण मृदंग आहे असें व मितभाषी असेल तर स्नानगृहांतील चित्र आहे असें, म्हणतात. क्षमाशीलाला, 'हा विचारहीन व पौरुषहीन असल्यामुळेंच भयानें डोकें उचलूं शकत नाहीं,' असें म्हणतात. व त्याच्या डोक्यांत शक्तीची घमंड असली तर त्याला वेड लागलें म्हणून त्याच्या पुढून पळतात.*

तो अल्पभोजी असला तर, 'यानें परोपभोगाकरितां धन सांठविलेलें आहे' असें, व त्याचा आहार स्वच्छ व चांगला असला तर, 'तो काय उदरपरायण व स्वशरीरपोषक आहे' असें म्हणून ताणा मारतात. कोणी संपन्न मनुष्य, नटणें गृहस्थपणाला लाजिरवाणें समजून साधेपणानें व टापटिपीनें आनंदांत रहात असला तर त्याला तीक्ष्ण वाग्बाण मारून, 'हा कसा अभागी आहे पहा, याला स्वसंपत्तीचा उपभोग देखील घेतां येत नाहीं.'

---

* ॥ मौनान्मूकः प्रवचनपटुर्वातिकोजल्पको वा ॥
॥ धृष्टःपार्श्वे वसतिच सदादूरतस्त्वप्रगल्भः ॥
॥ क्षांत्याभीरुर्यदि न सहते प्रायशो नाभिजातः ॥
भर्तृहरी.

असें म्हणतात. तो आपलें घर व वसण्याचा महाल चांगला चित्रें वगैरेंनीं सुशोभित करील व स्वतः चांगलीं वस्त्रें पांघरील तर निंदक लोकांच्या जिवावर आल्याप्रमाणें होऊन, ते म्हणतात कीं, 'हा पहा कसा बायकांप्रमाणें नटतो.'

कोणी सद्गृहस्थ प्रवास न करील तर प्रवास केलेले लोक त्याला 'याच्यांत कांहीं पौरुष नाहीं व हा स्त्रिया व अंतर्गृह सोडून बाहेर गेला नाहीं, तेव्हां त्याला विद्या, कला व गुण कोठून असणार?' असें ह्मणतात. ते, पृथ्वी पर्यटण करून जगाचा अनुभव घेतलेल्याचेंही जणूं चामडें सोलतात. व 'हा अभागी व माथेफिराऊ आहे, याच्या नशीबीं सौख्य व आंनद असता तर भवचक्र याला शहरोंशहरीं कां फिरवितें?' असें ह्मणतात. निंदक लोक ब्रह्मचाऱ्याला 'याच्या निजण्याबसण्याचा जणूं भूमीला भार होतो,' असें व त्यानें लग्न केलें तर, 'हा मूर्ख पहा, कामवश होऊन गाळांत फसलेल्या गाढवाप्रमाणें संसारपाशांत व्यर्थ फसला,' असें ह्मणतात. कुरूप किंवा सुस्वरूप कोणीही दुर्जन निंदेपासून सुटत नाहींत.

गोष्ट अठ्ठाविसावी.

व्यर्थ कोणावर नाराज होण्याचे दोष.

मिसरदेशांत मजजवळ एक मुलगा पढण्याकरितां रहात होता. तो नेहमीं लाजेनें अधोवदन असे. कोणी मला ह्मटलें, 'हा मुलगा अगदीं बुद्धिहीन व

ज्ञानहीन आहे. त्याला कांहीं शिक्षण लागावें ह्मणून तुह्मी त्याचे कान पिळा.' तेव्हां मी एकदां रात्रीं त्याच्यावर मोठ्यानें दरडावून ओरडलों. तें ऐकून तो ह्मणाला, 'तुमच्या या निष्कारण त्रासानें मी अर्धींच अर्धमेला व वेडा झालों आहें, आणखी कशास ओरडतां.'

रागानें तोंड वेडेंवाकडें करून तू कोणावर उखडलास, तर लोक तुला माथेफिरू व हीनबुद्धी समजतील व सहनशिलपणा धरशील तर अगदीं मानहीन ह्मणतील. तेव्ह लोक दात्याला उपदेशाच्या तोरावर सांगतील, कीं, 'आतां दातृत्व पुरें कर, नाहींतर उद्यां हात रिकामे होऊन हलवावे लागतील.' कोणी गम खाऊन आत्मसंयमन केलें, तर निंदक लोक त्याला नांवें ठेऊन त्रास देऊन, 'हा मूर्खही आपल्या बापाप्रमाणेंच मरणार. तोही द्रव्य जमाकरून शेवटीं हाय खाऊनच मेला,' असें ह्मणतील.

खुद्द **पैगंबर** देखील दुर्जननिंदेपासून सुटले नाहींत. तेव्हां शांतिरूप कोपऱ्यांत कोण स्वस्थ बसूं शकतो? निर्द्वंद्व व निःसंग अशा परमेश्वराला देखील **यहूदी** लोक काय म्हणतात तें जाणतोस? कोणाच्याही हातून कोणीही सुटत नाहीं. अशा स्थितींत विपन्नानें धीर धरणें हाच एक केवळ उपाय आहे.

गोष्ट एकुणतिसावी.

अनेक गुण सोडून एखाद्या दोषाचेंच आविष्करण करण्याचे दोष.

एक तरुण गृहस्थ गुणवान, कलावान, विद्वान, उप-

देशचतुर, शूर, सुप्रसिद्ध, उदार मनाचा, व भगवद्भक्त, असा होता. व त्याचें रूप त्याच्या हस्ताक्षराहूनही दिव्य होतें. तो वक्तृत्वांत पटाईत व व्याकरणशास्त्रांत निष्णात होता. पण बोलण्यांत अडखळत असल्यामुळें त्याला ओनामा देखील स्पष्ट म्हणतां येत नसे.

मी एका भक्ताला म्हटलें, 'अमक्याला पुढचे दांत नसल्यानें स्पष्ट बोलतां येत नाहीं.' हें ऐकून तो गृहस्थ रागावून म्हणाला, 'इतःपर असें दुष्ट व निंदेचें भाषण मजपुढें बोलूं नको. त्याच्या सर्व चांगल्या गुणांविषयीं तर तुझ्या बुद्धीनें डोळेझांक केली, व हा एक दोष मात्र त्वां पाहिलास. मी तुला खात्रीनें सांगतों कीं त्या शेंवटच्या न्यायाच्या दिवशीं लोकांचे सद्गुण पाहणारा परमेश्वर कोणाच्याही एखाद्या दोषावरच दृष्टी देणार नाहीं.'

विद्वान, चतुर व बुद्धिवान अशा एखाद्या मनुष्याचा पाय चुकून भलतीकडे पडला तर त्या एका दोषावरूनच त्याच्यावर आग पाखडूं लागूं नको. कारण थोर लोकांनीं म्हटलें आहे कीं, 'ज्याच्या अंगीं जें कांहीं चांगलें असेल त्याचेंच ग्रहण करावें.'

हे शहण्या मनुष्या, कांटे व फुलें एकाच जागीं असतात. तेव्हां तू कांट्यांची काळजी काय करतोस? फुलांचा गजरा तयार कर. उपजत छिद्रान्वेषी मनुष्यास मोराचे कुरूप पाय तेव्हढे दिसतात.

हे हीनबुद्धी व मलिन मनाच्या गृहस्था, निर्मळपणा धर, कारण आरसा देखील निर्मळ असल्यावांचून प्रतिबिंब दाखवीत नाहीं. धर्ममार्गावलंबन कर म्हणजे शेवटीं पापापासून मुक्त होशील. एखाद्याचें चुकलेलें

अक्षर किंवा दोष, बोट ठेवण्याकरितां धुंडूं नको. हे मूर्खा, सर्व जगाचें दोषाविष्करण करीत बसूं नको. कारण तुझ्याच दोषांनीं तुझे नेत्र जणों शिवून टाकले आहेत. माझा पदर पापपूरित असल्याचें मला समजत असून मी दुसऱ्या कोणा पाप्याला फुशारकीनें कां नांवें ठेवूं? स्वतः दुष्टपणानें स्वकार्यसाधनार्थ दुष्कर्माचें साहाय्य घेत असतांनां, दुसऱ्याला त्याच्या दुष्टपणाबद्दल नांवें ठेवणें योग्य नाहीं.

वाईट गोष्ट तुला न आवडली तर प्रथम तूं ती करणें सोड व नंतर आपल्या शेजाऱ्यांनां 'असें कुकर्म करूं नका' म्हण. मी खरा ईश्वरास जाणणारा किंवा ढोंगी असलों तरी माझें बाह्यरूप मात्र तुला दिसतें पण माझें मन ईश्वरास दिसतें आहे. माझें बाह्यरूप सद्वर्तनानें शृंगारित दिसत असल्यावर माझ्या अंतस्थ खरे खोटेपणाविषयीं तूं चर्चा करीत बसूं नको. मी चांगला किंवा वाईट असलों तरी तू स्वस्थ रहा. कारण माझ्या बऱ्या वाइटाचा भार मीच सहन करणारा आहें. माझें आचरण शुद्ध किंवा पापाचें असलें तरी, परमेश्वर तुजहून पुष्कळ ज्ञानी आहे, त्याला तें सर्व कळतें. आपल्या पापाबद्दल तुजकडून इतकें बोलून घेण्याची भीती बाळगण्याला मी तुजपासून आपल्या पापपुण्याचें योग्य फल मिळण्याची उमेदच ठेवीत नाहीं.

सुबुद्धी सज्जनाचें एकच सत्कर्म ईश्वर दसपट लिहून ठेवतो, याकरितां हे भल्या गृहस्था, एखाद्याच्या अंगचा एक गुण पाहून त्याच्या दहा दोषांवर तूंही डोळेझांक करशील तर किती चांगलें होईल? त्याच्या

एकच दोषाचा अंगुलिनिर्देश न करितां त्याच्या एवढ्या-शाही गुणाची पुष्कळशी वडेजाव कर.

कोणी शत्रू सादीच्या कवनाकडे नावडीची दृष्टी-करून मनांत कष्टी होईल, व शेंकडों उत्तम कवितांपैकीं एकही पसंत न करितां, एकादा दोष पाहतांच खुष होऊन बोभाटा करूं लागेल व या दोषाशिवाय दुसरें कांहींच पसंत न करील तर, मत्सरानें त्याचे गुणग्रहणाचे नेत्रच फोडले म्हणावयाचें.

खुद्द परमेश्वराच्या कर्तृत्वांत व सृष्टींतही काळा पांढरा, व सुंदर कुरूप, असा भेद नाहीं कां? तुझ्या पाहण्यांत आलेले हरएक नेत्र व भ्रुकुटी म्हणजे सुंदरच असतात असें नाहीं, याकरितां पिस्त्यांचा गीर खाऊन साली टाकून दे, व गुणैकग्राही हो.

भाग सातवा समाप्त.

भाग आठवा.

कृतज्ञता व धन्यवाद.

ईश्वराचा धन्यवाद करण्याच्या कामीं, मी कांहीं एक अक्षर तोंडांतून काढूं शकत नाहीं, कारण त्याच्या योग्य असा धन्यवादच मला दिसत नाहीं. माझ्या शरीरावरील प्रत्येक रोमरंध्रागणिक त्याचा एकेक उपकार आहे. तेव्हां हरएक रोमागणिक एकेक धन्यवाद मी कसा करूं शकतों?

ज्या परमसमर्थ व कृपाळु परमेश्वरानें या दासाला अभावापासून अस्तित्वांत आणलें तो धन्य होय! त्याची प्रशंसा व स्तुती होवो! त्याच्या कृपारूप गुणाची योग्य स्तुती करण्याची कोणाला शक्ती आहे? कारण त्याचे गुण त्याच्या रूपांत अंतर्भूत आहेत. त्या ईश्वरानें मातीपासून मनुष्यास उत्पन्न करून त्याच्यांत प्राण, बुद्धी, विचार, व अंःतकरण घातलें.

मूळ पित्याच्या पार्थीतील रेतरूपापासून, तो, वृद्धावस्थेच्या रूपापर्यंत नीट विचार करून पहा, ह्मणजे त्यानें तुला गुप्तपणें किती वैभव दिलें आहे, तें दिसून येईल. त्यानें तुला शुद्धसत्व उत्पन्न केलें आहे, तेव्हां तू विचारी व शुद्धाचरणी हो. पापी राहून मातींत मिळणें लाजिरवाणें आहे. क्षणोक्षणीं अंःतकरणरूप आरशावरील मळ झाडून टाक. जंगलेल्या हत्यारावर जिल्हई चढत नाहीं. तू पुरुषाच्या रेतापासून झाला आहेस तेव्हां, तू पुरुष असून

बायकोपणा डोक्यांत ठेऊं नको. तसेंच स्वकष्टानें रोजची पोटगी मिळवितोस म्हणून आपल्याच बाहुबलाच्या भरंवशावर राहूं नको.

हे स्वयंमन्या, स्वपूजका, तूं ईश्वराकडे कां दृष्टी देत नाहींस? कालचक्राच्या फेऱ्यांत हात घालून त्यास कोण अडवूं शकतो? तूं केलेल्या श्रमाचें सार्थक झालें तर, तें ईशकृपेनें व साह्यानें झालें, तुझ्याच श्रमानें झालें असें समजूं नको. कोणीही केवळ स्वबलानेंच यश मिळवूं शकतो असें नाहीं. याकरितां ईशसहाय्याचे आभार मानून त्याचा धन्यवाद केला पाहिजे. तू स्वशक्तीनें एक पाऊलभर देखील स्थिर रहात नाहींस. तुला गुप्तपणें क्षणोक्षणीं ईश्वराचें सहाय्य पोंचतें.

तू आईच्या गर्भांत असतांनां मुका होतास व तू एक शब्द देखील उच्चारूं शकत नव्हतास तेव्हां तेथेंच तुला तिच्यापासून रोजचें अन्न मिळत नव्हतें कां? तिची नाळ कापल्यानें तुझें अन्नपाणी बंद होतांच तूं मातेच्या स्तनास हात लटकविलेस.

एखाद्याला प्रवासांत मोक्तृत्वानें अतिशय दुखणें येतें तेव्हां त्याला त्याच्या जन्मभूमीचें पाणी औषध म्हणून देत असतात याचें कारण, तो जन्मदात्रीच्या उदरांत पोसिंला गेला असतो व तिच्या आंतड्यापासून त्याला दूध मिळालेलें असतें हेंच होय. तरुणपणीं त्याला बायकोचे स्तन मनोहर वाटतात याचें कारण तरी तसलेच दोन दुधाचे झरे बालपणीं त्याचें पोषण करणारे होते हेंच होय. मातेच्या मनमोहक ओटी व कडा ह्या स्वर्गभूमीप्रमाणें असून दोन्ही स्तन हे त्यांच्यांतील दोन

दुधाच्या झऱ्याप्रमाणें होत. तसेंच मातेचें सुंदर व उंच शरीर हा एक बालकप्राणपोषक वृक्ष असून शाखामूल-रूप खाकेमध्यें बालक हें एक नाजूक व मिष्ट फळ आहे.

मातृस्तनाच्या शिरा अगदीं काळजाच्या आंत पोंच-लेल्या नाहींत कां! तेव्हां नीट विचार करशील तर, मातेचें दूध हें तिच्या काळजाचें रक्तच असल्याचें तुला दिसून येईल. तिच्या रक्तांत तू आपले दांत रोंवतोस, तरी अशा दुःख देत असणाऱ्या रक्तपावरही तिच्या मनांत प्रेमच असतें.

मुलाचे हात सशक्त व दांत तीक्ष्ण झाले म्हणजे, मुलानें त्रास देणें सोडावें म्हणून दायी स्तनावर कडूबोळाचा लेप करिते. त्यामुळें त्याचा दुधाचा नाद असा सुटतो कीं पुढें तो त्या मधुर अशा स्तनांलाही विसरून जातो.

हे भल्या गृहस्था, तूही ईश्वराची क्षमा मागण्याच्या व पश्चात्ताप करण्याच्या कार्मी बालकाप्रमाणें आहेस म्हणून तुझे अपराध तू पश्चात्ताप केल्यानें ईश्वर विसरेल.

गोष्ट पहिली.

मातृस्नेह व उपकार विसरण्याचे दोष.

एक तरुण गृहस्थ आईचा उपदेश व बुद्धिवाद यांच्या-पासून विमुख झाला असल्यानें तिचें मन कष्टानें जणों जळत होतें. ती म्हणाली, 'हे पूर्ववृत्त विसरणाऱ्या गर्वी गृहस्था, तू अगदीं दीन व दुर्बल होतास, तेव्हां तुजकरितां मीं पाळणा तयार केला, तसेंच तू अगदीं

लहान, रडका व रोगी होतास तेव्हां मी रात्रीच्या रात्री, झोंपेवांचून काढल्या नाहींत कां?'

बालपणीं आपल्या अंगावरून एक माशीही हांकण्याचें सामर्थ्य तुझ्या अंगांत नव्हतें व एका माशीमुळेंही तुला मोठें दुःख होत होतें तोच तू आतां एक मोठा बलाढ्य सर्दार झाला आहेस. आणि तू कबरेच्या गडुचांत पडशील तेव्हां पुनः तुला स्वशरीरावरून एक मुंगीही दूर करितां येणार नाहीं. कबरेंतील कृमी तुझ्या मस्तकांतील मेंदूची चरबी खाऊं लागतील तेव्हां तुझ्या नेत्रांस पुनः दीप सतेज करील कां? तू निमीलितनेत्र असल्यागुळें चालतांना वाटेंतील कुवे व खरे व सरळ मार्ग यांच्यांतील भेद तुला दिसत नाहीं. तू ईश्वराचे उपकार मानून त्याचा धन्यवाद करशील तरच तुला सनेत्र म्हणावयाचें, नाहीं तर तुझे नेत्र नाहींसेच होत.

शहाणपणा व बुद्धी तुला गुरूनें शिकविली असें नाहीं, तर ते गुण तुझ्या अंगीं ईश्वरानेंच भिनवून दिले आहेत. ईश्वरानें तुला सत्यासत्यपरिज्ञान दिलें नसतें तर तुझ्या कानीं पडलेल्या सत्य गोष्टीही तुला अत्यंत खोट्या भासल्या असत्या.

बोधवचन.

मनुष्यास उत्पन्न करण्यांत ईश्वराचें चातुर्य.

एकेक बोट कसें असंख्य तंतूंनीं ग्रथित व विश्वकर्म्याच्या-पेक्षांही अधिक चातुर्यानें जडलेलें आहे, हें लक्षपूर्वक पाहशील

तर सहज तुझ्या ध्यानांत येईल. व नंतर त्या अत्यंत चतुर कारागिराच्या कुशलतारूप अक्षरावर वोट ठेऊन खोड काढण्याचा यत्न करणें म्हणजे केवळ मूर्खपणा होय असें तुला समजेल. तू विचार कर कीं, मनुष्यास चालतां यावें म्हणून त्यानें किती हाडें जमवून एकांत एक जोडलीं आहेत!! पायाचें मनगट, गुडघा व पाय फिरविल्या वांचून पाऊल जमीनीवरून उचलतां व फिरवितां येत नाहीं. पाठीचा कणा एकच हाडाचा नसून त्याच्यांत अनेक मणके जडले असल्यामुळेंच मनुष्याला निमाज पढण्यास कठिण पडत नाहीं. तुजसारखा हा मातीचा पुतळा बनविण्यास त्यानें दोनशें मणके एकमेकांत बसविलेले आहेत.

हे सन्मान्य व शुद्धाचरणी गृहस्था, शिरा या तुझ्या शरीरावर पृथ्वीवरील ३६० नद्यांप्रमाणें आहित. तूं आपल्या डोक्यांत दूरदर्शीपणा, विचार, बुद्धी व सारासार विचार, यांनां अवकाश दे. व स्वतः कष्ट सोसून ही परपीडा न होऊं देतां शहाणपणानें मनोजयाचें साधन ठेव.

पशू योग्यताहीन व केवळ पोटार्थी असल्यानेंच अधोमुख झाले आहित. पण तू अलिफ् अक्षराप्रमाणें किंवा कान्याप्रमाणें ताठ उभा आहेस. ईश्वरानें त्यांचें मस्तक खाण्याकरितांच लीन केलें आहे, पण तू मोठ्या डौलानें व आढ्यतेनें अन्न उचलून त्या मस्तकाकडे नेतोस. तेव्हां तू असा श्रेष्ठ असतांना ईश्वराव्यतिरिक्त दुसऱ्यापुढें शिर झुकविणें तुला शोभत नाहीं. तसेंच तुझें रूप असें मनमोहक व सुंदर अहे तेव्हां तू वेडा न होतां तदनरूप सद्व-

र्तन ठेव. मनुष्याचें आचरण सरळ पाहिजे, केवळ शरीर उंच सरळ व धिप्पाड असलेलें कामाचें नाहीं. धर्महीन काफर लोकांचेंही रूप आमच्या सारखेंच असतें. तुला परमेश्वरानें डोळे तोंड व कान दिले अहित. तेव्हां तू शहाणा असशील तर त्यांच्या हातून कुकर्म करविण्याचा यत्न करूं नको.

तू शत्रूचें मस्तक दगडानें फोडीत नाहींस हें मीं गृहीत केलें तरी पण मूर्खपणानें तू आपल्या मित्रांशीं भांडणही करूं नको. शहाणे व सद्गुणी लोक संपत्तीला ईश्वरभजनरूप मेखांनीं दृढ करीत असतात.

गोष्ट दुसरी.

उपकार न स्मरण्याचें फळ.

एक रणशूर सरदार आपल्या शामकर्ण घोड्यावरून पडला, तेव्हां त्याचें डोकें दबून दोन्ही खांद्यांच्या मध्यें घुसलें व हत्तीच्या डोक्याप्रमाणें त्याचें डोकें शरीरांत गढल्याप्रमाणें झालें. सर्व शरीर फिरविल्याशिवाय त्याला डोकें फिरवितां येईना. याचा उपाय करण्यांत तेथील सर्व वैद्य थकले, पण एका वृद्ध व बुद्धिवान युनानी वैद्यराजानें त्याची मान फिरवून नीट केली. तेव्हां त्याचें शरीरही सरळ झालें. तो वैद्यराज न मिळता तर त्याला तसेंच बिछान्यावर पडून राहावें लागतें.

पुढें तो वैद्यराज पुनः एकदां त्या सरदाराकडे गेला, तेव्हां त्या नीचानें त्याच्याकडे नुसतें पाहिलें सुद्धां नाहीं, त्यामुळें तो बिचारा विद्वान वैद्य लज्जेनें अधोवदन झाला.

परत जातांना तो पुटपुटत होता कीं, 'याची मुरगळलेली मान मी त्या दिवशीं नीट न करितों तर हा नीच आज मजवर तोंड न फिरविता.'

त्यानें आपल्या एका गुलामाच्या हातीं त्या सरदाराकडे एक बी पाठवून सांगितलें कीं, 'हें आगविर जाळून याचा त्याला धूप दे.'

त्या धूपानें त्या सरदाराला एक शिंक आली त्यासरसें त्याची मान व डोकें पूर्ववत वांकडें झालें. तेव्हां त्याचे मागोमाग नाकदुराया काढीत नोकर लोक धांवून त्यांनीं त्याचा पुष्कळ शोध केला पण तो सांपडला नाहीं.

ईश्वराचे किंवा थोरांचे आभार मानण्याच्या कामीं शिर फिरवूं नको, नाहींतर एखादे दिवशीं थोड्याकरितां शिरोभंग करून वेशील.

बोधवचन.

ईशकौशल्य निरूपण.

रात्रीं व दिवसां तुला सुख व्हावें म्हणून राकापती चंद्र व दिनमणी सूर्य ईश्वरानें प्रज्वलित केले आहेत. हें गालीच्याप्रमाणें सुंदर आकाश तुजकारितांच त्यानें फरासाप्रमाणें पसरून ठेवलें आहे. झंझावात, थंडी, बर्फ, वृष्टी, व गडगडाट किंवा विद्युल्लतेनें मेघरूपरणदुंदुभीवर जोरानें प्रहार केल्यानें होणारा मोठा भयंकर आवाज, हे सर्व तुजकरितांच त्याच्या आज्ञेनें होत आहेत. त्याचे सर्व कामगार त्याच्या आज्ञा पाळतात व तुजकरितां मातींत पडलेल्या बीजाची जतन करितात.

तूं तृषाक्रांत असलास तरी तिच्या त्रासानें कष्टी होऊं नकोस, कारण तुजकरितां मेघरूप जलवाह खांद्यावरून पाणी वाहणारा आहे. तो **परमेश्वर** मातीपासून रंग, रूप, रस व गंध उत्पन्न करतो व त्यानें जणों मनुष्याचे नेत्र, मेंदू व मन यांच्या इच्छापूर्तीकरितां ही एक मयसभाच रचिली आहे. तो मधमाशांकडून मध, वायूकडून सुगंध, खारकेच्या झाडापासून खारका व त्यांच्या बिजापासून पुनः खारकेचें झाड, तुजकरितां उत्पन्न करितो. असें अपूर्व कलम आजवर कोणी लावलें नाहीं, ह्मणून सर्व माळी लोक जणों आश्चर्यानें मनगटें चावतात.

सूर्य, चंद्र व सर्व तारागण, तुजकरितांच आहेत. ते जणूं तुझ्या छतावर तुला उजेड देण्याकरितांच मंगलदीप लावले आहेत. तुजकरितां तो कंटकापासून फूल, मृगनाभीपासून कस्तुरी, खाणींतून सोनें व शुष्क काष्टांतून ओलीं पानें उत्पन्न करितो. त्यानें स्वहस्तानें तुझे नेत्र व भोंवया रेंखल्या, कारण त्या मर्मज्ञास हें काम तिऱ्हाइताच्या हातीं सोपणें नीट वाटलें नाहीं. तो तुला किती काळजीनें व तऱ्हेतऱ्हेच्या सुंदर वस्तु देऊन पाळतो आहे! याचे उपकार स्मरणें व धन्यवाद करणें हें वाणीचें काम नाहीं असें आपण क्षणोक्षणीं म्हटलें पाहिजे. वाणीच्या हातून हें काम होऊंच शकत नाहीं.

हे **परमेश्वरा,** त्वत्कृपारूप संपदा माझ्या वाणीनें अवर्णनीय असलेली पाहून, माझे प्राण व नेत्र व्याकूळ व मंद होऊन जातात. ग्राम्य व वन्यपशू, मुंग्या वगैरे कृमीकीटक व मत्स्य वगैरे जलचर प्राणी, यांची तर कथा काय, पण प्रत्यक्ष आकाशपटलनिवासी देवदू-

तांची सेनाही अद्याप तुझी थोडीच स्तुती करूं शकली असेल. त्यांनीं तुझ्या अनंतसहस्र गुणांमधून कदाचित एकाचेंही वर्णन नुकतें पुरें केलें नसेल.

हे सादी, आपले हात व आपले ग्रंथाचे दफ्तर धुऊन टाक व अगम्य व दुर्ज्ञेय मार्गांत उडण्याचा यत्न करूं नको!!

गोष्ट तिसरी.

पंचेंद्रियांचीं योग्यकर्में

एका गृहस्थानें एका मुलाचे जोरानें कान पिळून म्हटलें. 'हे मूर्खा, बकणाऱ्या, व दैवहीन पोरा, मी तुला कुऱ्हाड लांकडें फोंडण्याकरितां दिली होती. मशीदीची भिंत खोदण्याकरितां नव्हे.'

ईश्वरानें मनुष्यास वाणी दिली, ती त्याचा धन्यवाद व स्तुती करण्याकरितांच होय. म्हणूनच ईश्वरास जाणणारा मनुष्य, तिला परोक्ष निंदेनें विटाळीत नाहीं. कानांस ऐकण्यायोग्य विषय कुराण व बोधवचनें हेच होत. याकरितां परनिंदा व असत्प्रलाप ऐकण्याच्या नादीं लागूं नको. हे नेत्रयुगुल, ईश्वरी कौशल्य व चातुर्य पाहण्याकरितांच आहेत. याकरितां, आपले आप्त व मित्र यांच्या दोषांकडे क्षुद्रदृष्टी देऊं नको.

गोष्ट चवथी.

दुर्बलांच्या स्थितीवर लक्ष देणें व ईशकृपेबद्दल आभार मानणें.

संकटाचा दिवस येईपर्यंत, सुखांत गेलेल्या दिवसांची योग्यता मनुष्याच्या ध्यानांत येत नाहीं. थंडीचे दिवस दरिद्री व दीन मनुष्याला दुःख देतात, धनाढ्य व दैववान यांस त्यांचा काय त्रास? रोगग्रस्त, सर्पदंश झालेला व क्षणभरही झोंप न लागणारा मनुष्यच आराम झाल्यावर ईश्वराचे खरे आभार मानतो, व धन्यवाद करतो.

तू मोठा शक्तिमान, चपल व नेटानें चालणारा असलास तरी तुजबरोबर हळूं चालणारे व दुर्बल लोक असतील त्यांच्याबरोबर, तुला परमेश्वरानें पुष्कळ शक्ती दिल्याबद्दल आभार मानीत सावकाश जा. वृद्धांवर तरुणांनीं व अशक्तांवर सशक्तांनीं कृपादृष्टी ठेवावी.

नदीतीरीं राहणाऱ्याला पाण्याची खरी योग्यता व किंमत काय कळणार, तेथून दूर उष्ण प्रदेशांत राहणाऱ्यांना ती विचार. एखाद्या झऱ्यावर बंदोबस्तास नेमलेला अरब चौकीदार, जंगलांतून तृषाक्रांत व दीन होऊन आलेल्या प्रवाशाची कोठून कींव करणार? कांहीं दिवस तरी तापानें तडफडत पडलेल्या मनुष्यासच शरीरीं आरोग्य असण्याचें मोल कळतें. तू रात्रीं त्रासानें अंथरूणावर धडपडत असतोस, तेव्हां तुला ही अंधेरी रात्र किती मोठी वाटते. तापानें तडफडणाऱ्याविषयीं विचार कर, कारण खरोखर रोगीच रात्रीचा मोठेपणा जाणतो. चौघड्याच्या आवाजानें जागा होणाऱ्या सरदाराला, विचाऱ्या पाहरेवाल्यांना रात्र कशी गेली तें काय ठाऊक?

गोष्ट पांचवी.

सुल्तान तुगरल* व हिंदू चौकीदार.

सुल्तान तुरगल हिंवाळ्यांत एका रात्रीं फिरत फिरत एका हिंदू चौकीदाराजवळ आला, तेव्हां बर्फ व शीतजल-वृष्टी होऊन त्यांचे लोट चालल्यामुळें त्या बिचाऱ्या चौकी-दाराच्या अंगांत सुहेल† नामक चंचल ताऱ्याप्रमाणें कांपरें भरलें होतें. हें पाहून त्याच्याविषयीं सुल्तानाच्या मनांत दया आली, व प्रसन्न होऊन तो त्यास म्हणाला, 'हा माझा पोस्तीनाचा अंगरखा घेऊन पांघर. तू थोडा वेळपर्यंत या अटारीकडे वाट पहात रहा. मी आतां हा एका गुलामाच्या हातीं बाहेर पाठवून देतों.'

तो चौकीदार या आशेंत राहिला. इकडे पहाटचा सुगंध व शीतल वायू चालला व बादशहा अंतर्गृहांत गेला. त्याच्याजवळ एक अप्सरोमुखी गुलाम होता, त्याच्यावर त्याचें मन बरेंच मोहून गेलें होतें. त्या तुर्की गुलामाच्या क्रीडा बादशहास अशा कौतुकाच्या वाटल्या कीं, त्यांच्या नादांत त्या हिंदूचें त्याला विस्मरण पडलें. 'पोस्ती-नचा अंगरखा पाठवीन,' हे बादशहाचे शब्द मात्र त्या चौकीदाराच्या कानावरून गेले होते. पण त्याच्या दुर्दै-वामुळें तो प्रत्यक्ष अंगरखा त्याच्या अंगावर कांहीं आला नाहीं. कदाचित त्याला थंडीची बाधाही विशेष झाली

---

* **तुगरल** बेग **विनमिकाईल बिनसल्जूक**, हा **सल्जू-किया** या घराण्यांतील पहिला बादशहा होऊन गेला.

† **सुहेल**, नांवाचा दक्षिण दिशेकडील तारा, तो नेहमीं चंचल दिसतो. यासच अगस्ती म्हणतात.

नाहीं, कारण जसजसी थंडी जास्त वाढे तसतशी त्याची अंगरखा मिळण्याची उमेदही वाढत होती.

इकडे बादशहा विस्मृतींत स्वस्थ झोंपीं गेला. पहाटें नगारचीनें त्याला झटलें, 'त्या गुलामास बगलेंत घेऊन निजल्यावर आपल्याला त्या दैवहीन चौकीदाराची कदाचित विस्मृती पडली असावी. आपण रात्र आनंदरंगांत घालविली पण तीच त्याच्यावर कशी कहराची गुजरली तें आपल्याला काय ठाऊक?'

भाताच्या राशीवर खालीं मान घालून मजेंत हात मारीत असलेल्या व्यापाऱ्याला, मागें रेतींत उन्हानें थकून दीन झालेल्या दुर्बळ पांथस्ताची काय कींव येणार? हे समर्थ नौनायका, थांब, नाहीं तर बिचाऱ्या अशक्त लोकांना या जलप्रवाहांतून कोण पार उतरील? हे समर्थ व बलवान तरुण गृहस्थहो, थोडे हळूं हळूं चाला, कारण या यात्रेंत झातारे कोतारे, व हळूं हळूं चालणारेही आहेत.

तू स्वतः उंटावरील कजाव्यांत मजेंत निजला आहेस, पण उंटाची वेसण बिचाऱ्या पादचारी सारवानाच्या हातीं आहे. तुला जंगल, पहाड, दगड व रेती यांचें दुःख काय ठाऊक? तें रस्त्यांत दमून मागें राहिलेल्यांना विचार. तू एका पर्वतप्राय घोड्यावर स्वार आहेस तेव्हां पायीं चालणाऱ्याचें कसें रक्त आटतें, तें तुला कसें समजणार? दार लावून प्रसन्नमनानें सुखशयन करणाऱ्यांनां उपोषितांची स्थिती कळत नाहीं.

गोष्ट सहावी.

दारिद्र्याहून स्वातंत्र्याची थोरवी.

कोतवालानें मुसक्या बांधल्यामुळें रात्रभर एका मनुष्याचें मन दुःखी, कष्टी व खट्टू होतें. अशा स्थितींत त्या अंधेऱ्या रात्रीं एकजण दारिद्र्य व उपासमार यामुळें रडत होता. तें रडणें त्या कैद्याच्या कानीं आलें तेव्हां तो म्हणाला, 'तूं अशा दारिद्र्यावद्दल इतका कां रडतोस? जा. जाऊन नीज. हे दरिद्री गृहस्था, परमेश्वराचे आभार मान कीं, कोतवालानें तुझ्या मुसक्या बांधल्या नाहींत.'

स्वतःहूनही दरिद्री मनुष्य पाहशील तेव्हां ईश्वरानें तुला दरिद्री केलें म्हणून फारसा रडूं नको.

गोष्ट सातवी.

आपल्याहून अधिक दुःखी पाहून स्वतःचें दुःख कमी मानणें.

एका वस्त्रहीन गृहस्थानें एक दिरम कर्ज काढून आपल्या अंगांत घालण्याकरितां थोडेसे कऱ्या चामड्याचे कपडे करविले, व पुढें रडूं लागला कीं, 'हे परमेश्वरा व हे माझ्या दुर्दैवा, मी या कऱ्या चामड्यांत गरमीमुळें जणूं शिजतों आहें.'

असा तो मूर्ख गृहस्थ आपल्या दैवास दोष देऊन, त्रासून, ओरडत गागत होता हें पाहून कुंड्यांत कैद केलेल्या कांहीं कैद्यांपैकीं कोणीएकानें त्यास म्हटलें, 'चूप, हे कऱ्या काळजाच्या गृहस्था, आमच्याप्रमाणें कऱ्या

कांतड्याच्या वाद्या तुझ्या हातांपायांवर बांधलेल्या नाहींत, याबद्दल ईश्वराचे आभार मान.'

गोष्ट आठवी.

बाह्य वेशापेक्षां मनाच्या निर्मलतेचें महत्त्व.

एकजण एका भक्ताजवळ गेला. तो भक्त त्याला यहुद्याप्रमाणें दिसला, तेव्हां त्यानें त्याच्या मानेवर थप्पड दिली. पण पुढें नीटपणें पाहिल्यावर तो गृहस्थ शर्मिंदा होऊन म्हणाला, 'माझ्या हातून चूक घडली, कृपा करून मला क्षमा कर. मी त्वत्कृपेच्या पात्र नाहीं.' तेव्हां त्या फकीरानें त्याचे आभार मानून म्हटलें, 'मी कोणाच्या वाइटाकरितां उभा नाहीं, तू मला समजतोस तसा नव्हे, असा मी आहें.'

सद्वर्तनी व बाह्यतः साध्या वेशांचे लोक, बाह्यतः स्वच्छ व उत्तम वेशांच्या पण आंतून दुष्ट अतःकरणाच्या लोकांपेक्षां बरे. माझ्या हिशेबीं वाटमाऱ्या व रात्रिचर चोर भक्तवेशानें राहणाऱ्या लुच्चा व ढोंगी मनुष्यापेक्षां बरा.

गोष्ट नववी.

एक दुःखी प्रवाशी व भारवाह खर.

जंगलांत वाट चालतांना थकून मागें राहिलेला एक गृहस्थ रडत म्हणत होता कीं, 'या जंगलांत मजहून कोणीही दीन नाहीं.' तेव्हां एका भारवाह खरानें

त्यास झटलें, 'हे अविचारी गृहस्था, तूही ईश्वरी क्षोभाच्या नांवानें अमा कां रडतो आहेस? जा, ईश्वराचे आभार मान व धन्यवाद कर, कीं, जरी तू खरावर स्वार नाहींस तरी, निदान खराप्रमाणें माणसाच्या खालीं भारवाहही नाहींस.'

गोष्ट दहावी.

भक्त व मद्यपी.

दुसऱ्यास आपल्याहून दीन पाहून गर्व करणें योग्य नाहीं याविषयीं.

एक भक्त एका नशेनें गुंग होऊन पडलेल्या तरुण गृहस्थाजवळून जातांना त्याला आपल्या भक्तीचा व योग्यतेचा गर्व झाला व त्यानें त्या गृहस्थावर कृपादृष्टी केली नाहीं. तेव्हां तो तरुण गृहस्थ आपलें डोकें वर उचलून झणाला, 'हे वृद्ध गृहस्था, तूं स्वतः सुस्थितींत आहेस याबद्दल ईश्वराचे आभार मान. कारण गर्वाचें घर खालीं. एखाद्याला कैदेंत पाहून हसूं नको, नाहीं तर न जाणों एकाएकीं कदाचित् तूंच कैदेंत पडशील. उद्यां तूंच मजप्रमाणें गुंगून पडण्याजोगी तुझी स्थिती करण्याची परमेश्वरामध्यें शक्ती नाहीं कीं काय? दैवानें तुझ्या कपाळीं मंदिरवास लिहिला झणून, दुसरा कोणी पापभूमींत पडलेला पाहून त्याच्यावर ताणा मारूं नको.'

हे खऱ्या मुसलमान गृहस्था, दैवानें तुझ्या कंबरेला जानवें बांधलें नाहीं, तुला मुसलमानच केलें, याबद्दल

ईश्वराचे हात जोडून आभार मान. परमेश्वराला धुंडणाऱ्याच्या शक्तीनेंच त्याचें मन परमेश्वराकडे आकर्षलें जातें. असें नाहीं, तर तो ईशप्रेमानेंच आकर्षला जाऊन तिकडे वळत असतो. ईश्वरी ज्ञान मूळीं कोठून निघतें तें स्वतः पहा, कारण, 'मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः.'

बोधवचन.

तत्त्वार्थी लोक ईश्वरैकदृष्टी असतात, व ऐहिक वस्तूंकडे दृष्टी देत नाहींत याविषयीं.

ईश्वरानें झाडांझुडपांत रोगनाशक गुण उत्पन्न केलेले आहेत, पण ते आयुष्य बाकी असेल तरच कामास येतात. सजीव मनुष्याच्या प्रकृतीला मध गुणकारी होतो, परंतु तो प्रत्यक्ष मृत्युरूप रोगानें ग्रासलेल्याला पथ्यकर नाहीं. शरीरांत केवळ कंठगत प्राण अवशेष असेल त्याला नुसता तोंडांत मध घातल्यानें काय फायदा होणार?

एकाच्या डोक्यावर लोहांगीचा भयंकर घाव लागला होता. त्याला त्या दुःखावर चंदन लावून मळण्यास कोणी सांगितलें! होईल तेथवर भयप्रद गोष्टीपासून दूर पळ, व मृत्यूबरोबर दोन हात खेळून सामना करण्याच्या नादीं लागूं नको.

आंतडीं, खाणेंपिणें पचविण्यास समर्थ असतील तोंवरच तोंडावर तेज व रूपावर प्रेक्षणीयता दिसेल, हें समज. हें गृह सर्व दूषित होईल तेव्हां, प्रकृती व अन्न यांची परस्पर अपेक्षा व रुची राहणार नाहीं. तुझी प्रकृती

रुक्ष व सर्द, उष्ण व थंड, अशी चार गुणांनीं* जमलेली आहे. यांपैकीं एखादा गुण प्रबल होतो तेव्हां प्रकृतीचा समतोल कांटा बिघडतो. वायू थंड हवा श्वासोच्छ्वासानें शरीरांत न नेईल तर उरांतील उष्णता जीवाला उमाळा आणील. उदररूप भांड्यांत खाल्लेल्या अन्नास ऊत आला तर या सूक्ष्म अशा प्रकृतीचे सर्व व्यापार कच्चे होतात. म्हणून ज्ञानी मनुष्याचें चित्त, या नेहमीं, अपसांत विरुद्ध राहणाऱ्या गोष्टींत गढून रहात नाहीं. अन्न खाण्यापासूनच शरीरांत शक्ती आहे असें समजूं नको, तर ईश्वरी कृपाच तुला पोशीत आहे.

ईश्वरसाक्ष तूं आपले नेत्र सुरीनें चिरलेस तरी त्याच्या उपकाराची उतराई होणार नाहीं. ईश्वरसेवेंत शिर नमविशील तेव्हां ईश्वराचीच स्तुती कर व स्वतःकडे दृष्टी देऊं नको. खरी फकीरी, नामस्मरण, ईश्वरगुणानुवादवर्णन, व ईश्वराशीं मनोभावें रत होणें, यांतच आहे. फकीराला गर्व असणें योग्य नाहीं. तूंही ईश्वराची कांहींशी सेवा केलीस असें मानलें, तरी त्यांत विशेष काय झालें? तूं त्याच्याकडून जणों सदोदित एक जहागीर उपभोगीत नाहींस कां?

बोधवचन.

ईश्वराज्ञेचें अनुल्लंघनीयत्व व सुदैव साहाय्य.

कोणी दासानें देवालयाच्या उमरठ्यावर मस्तक ठेवण्या-

---

* **युनानी** वैद्यांच्या मतानें मनुष्याची प्रकृती, पृथ्वी, आप, वायू व अग्नी, या महाभूतांच्या रुक्ष, सर्द शीत व उष्ण या गुणांस अनुसरून सदरहू लिहिल्या प्रकारची आहे असें मानलें गेलें आहे.

पूर्वी, असें करण्याविषयीं त्याच्या मनाला ईश्वरी व सुदैवी साहाय्य, इच्छा व प्रेरणा होते असें सहाय्य परमेश्वराकडून न पोंचलें तर दुसऱ्याकोणाडून पोंचणार? व या दासापासून दुसऱ्याचें साहाय्य तरी काय होणार? आपल्या वाणीकडे काय पाहतोस? ज्यानें जिव्हेंत वाचाशक्ती दिली, त्याच्याकडे पहा.

मनुष्याचे नेत्र हें एक ईश्वरप्राप्तीचें द्वार आहे, व त्याच्यापुढें हें सर्व आकाश व ही भूमी जणूं पाहण्याकरितां पसरून ठेवलीं आहेत. तुझ्या मुखावर हीं द्वारें ठेवलीं गेलीं नसतीं तर, उंच सखलपणाचा तुला कसा बोध होता? त्या परमेश्वरानें अभावापासून तुझ्यामध्यें हात व मस्तक उत्पन्न करून पहिल्यांत कृपा व दुसऱ्यांत नमन हे गुण ठेवले नसते तर हातांपासून दान व मस्तकापासून नमन कोठून होतें? त्यानें मोठ्या युक्तीनें अंतःकरणरूप पेटीला किल्लीप्रमाणें, जिव्हा व कान उत्पन्न केले आहेत. जिव्हेनें भाषण सोडून दिल्यावर मनांतील मर्में कोण जाणूं शकता, व कानरूप जासूद नसते किंवा ते श्रम न करते तर बुद्धिरूप नृपाला बातमी कोण देता?

त्यानें मला मिष्टभाषण व उपदेशशक्ती दिली आहे व तुला ज्ञानी व ऐकणारे असे कान दिले आहेत. दारावरील दोन जासुदांप्रमाणें हे दोघेही कायम आहेत व ते एकापासून दुसऱ्या राजाकडे बातमी पोंचवितात. तू आपलें आचरण फार चांगलें आहे असा मनांत विचार कशाचा करतोस? या द्वारांच्या आंत दृष्टी दे, म्हणजे ही सर्व लीला त्याचीच आहे, असें तुला दिसून

येईल. बागवान बगीच्यांतून राजवाड्यांत राजाकडे उपायन किंवा डाली नेतो खरा पण त्यांतील सर्व फळें व फुलें वास्तविकपणें त्या राजाच्या बागांतीलच असतात.

गोष्ट अकरावी.

हिंदुस्थानांतील प्रवास व मूर्तिपूजकांचा मूर्खपणा.

सोमनाथ * येथें मी एक देवाची हस्तिदंती मूर्ती पाहिली. **पैगंबर** प्रकट होणाच्यापूर्वी आपणां मुसलमान लोकांत जशा दुष्ट देवतामूर्ती जडावाच्या केलेल्या असत तशीच ती मूर्ती हस्तिदंताची जडलेली होती. तिचें रूप कारागिरानें अप्रतिम सुंदर घडलें होतें. त्या अचल मूर्तीच्या दर्शनाकरितां चोहींकडून यात्रेकरू लोक येत असत, व **चीन** व **चगल** देशापर्यंतचे राजे त्या पाषाणमय मूर्तीजवळ **सादीस** ईशकृपेनें मिळालेल्या साक्षात्काराप्रमाणें—साक्षात्कार मिळण्याची उमेद करीत होते. मोठमोठे विद्वान कवीश्वरलोक देशोदेशीहून येऊन त्या मुक्या मूर्तीपुढें स्तुती करीत रडत असत.

हा सर्व प्रकार पाहून मी आश्चर्यचकित व खिन्न झालों. व सजीव लोक निर्जीव वस्तूचें पूजन कसें करितात याचें मला नवल वाटलें.

तेथें एका ब्राह्मणाची व माझी ओळख व मैत्री होती व तो आमचा स्नेही, सहनशील व मिष्टभाषणी होता. त्याला मी मार्दवानें म्हटलें, 'हे ब्राह्मणा, या देशांतील ही तऱ्हा पाहून मला मोठें आश्चर्य वाटतें. येथील

---

*सोमनाथ गुजराथेंतील प्रसिद्ध प्राचीन देवस्थान.

लोक वेडे होऊन या निर्बल व निर्जीव मूर्तीच्या नादीं लागले आहेत, या मूर्तीच्या हातांत शक्ती नाहीं, व तिला चालण्याला पाय नाहींत, व तिला उपटून खालीं टाकलें तर जमीनीवरून पुनः उठतां येत नाहीं. त्या मूर्तीचे नेत्र पिंवळे केहरवाचे किंवा पुष्कराजाचे बनले आहेत, हें तुला दिसत नाहीं कां? तेव्हां अशा अंधाच्या हातून साक्षात्काराची इच्छा ठेवणें चुकी आहे.'

हें माझें भाषण ऐकतांच तो माझा मित्र एकदम माझा वैरी झाला व कोपानें अग्नीप्रमाणें लाल होऊन त्यानें मला धरून ठेऊन, तेथील ब्राह्मणांना व त्या देवळांतील वृद्ध वृद्ध ब्राह्मणपूजाऱ्यांना त्यानें ही गोष्ट कळविली. तेव्हां त्या मंडळींत मला माझी धडगत दिसली नाहीं. त्यांना वांकडा मार्ग सरळ दिसत होता, तसा सरळ मार्ग त्यांच्या दृष्टीनें वांकडा दिसूं लागला.—एखादा मनुष्य पुष्कळ शहाणा व बुद्धिवान असला तरी मूर्खांच्या जवळ तो वेडाच ठरतो—त्या प्रसंगीं मी एखाद्या पाण्यांत डुबलेल्या मनुष्याप्रमाणें निरुपाय होऊन गेलों व त्यांची खुषामत केल्यावांचून तेथून सुटण्याचा मला मार्गच दिसेना—एखाद्या मूर्ख मनुष्याशीं वैर पडल्यावर त्याच्यापासून लीनता व खुषामत केल्यानेंच धडपणें सुटका होणार, हें ध्यानांत ठेव.

मी तेथील महंताची मोठमोठ्यानें पुष्कळ स्तुती करूं लागून म्हटलें, 'हे जिंद* ग्रंथांत निष्णात अशा वृद्ध उपदे-

---

* **जिंद पारशी** लोकांचा मुख्य धर्मग्रंथ. येथें **सादी**नें पारशी व ब्राह्मणी धर्मग्रथाचा घोटाळा केला आहे. या ठिकाणीं वास्तविकपणें वेद असें पाहिजे.

शका, मलाही या मूर्तीचें सुंदर रूप पाहून आनंद होतो, कारण, तिचा डौल चांगला व रूप माझ्या दृष्टीला अत्यंत मोहक दिसतें. परंतु या रूपाचा तत्त्वार्थ मला माहीत नाहीं. इकडे मी नुकतांच फिरत आलों आहें.— प्रवाशास बरेंवाईट एकदम क्वचितच कळूं शकतें.— यांतील रहस्य तू जाणतोस, कारण तू या देशांतील प्रधानपुरुष व इकडील उपदेशकांचा राजा आहेस. कोणचीही पूजा केवळ रूढिमार्ग किंवा वृद्ध लोक सांगतात म्हणूनच करणें हें कुमार्गसेवन होय. तोच एखाद्या मार्गाचा नीट समजून घेऊन केलेला स्वीकार, योग्य व कुशलपरिणामी होतो. या रूपाचा तत्त्वार्थ मला कळला कीं, मी याचा सर्वांत अग्रणी असा पूजक व भक्त होईन.'

हें ऐकून, त्या ब्राह्मणाचें मुख आनंदानें प्रफुल्लित व सुप्रसन्न झालें, व त्यानें माझें बोलणें मान्य करून म्हटलें, 'हे योग्य भाषण करणाऱ्या, तुझा प्रश्न योग्य व तुझें काम चोख आहे. कोणच्याही गोष्टीचा ऊहापोह करणारा मनुष्य, तिच्या तत्त्वार्थास जरूर पोंहोचतो. तू म्हणतोस हें खरें, पण ही मूर्ती प्रत्यहीं प्रातःकाळीं, त्या न्यायी व परमसमर्थ **परमेश्वरा**चा आम्हां लोकांवर अनुग्रह होण्याकरितां हात वर करिते. तुला वाटेल तर आज रात्रीं येथेंच रहा, म्हणजे उद्यां हें सर्व रहस्य तुला स्पष्ट कळून येईल.'

त्या म्हाताऱ्याच्या सांगण्याप्रमाणें, एखाद्या कूपांत पडल्यामुळें दीन झालेल्या मल्लाप्रमाणें, निरुपायानें मी तेथेंच राहिलों. ती रात्र मला त्या शेवटच्या न्यायाच्या दिवसाप्रमाणें दीर्घ वाटली. ते ब्राह्मण मजसभोंवती

हातपाय न धुतां संध्यावंदन करीत बसले, व ते मज-भोंवतीं बसल्यानें मला वजू न करितांच निमाज पढावा लागला. त्यांच्यांतले मोठेमोठे पंडित सुद्धां कधींच पाण्याचा स्पर्श करीत नसत, व त्यामुळें त्यांच्या खाकेंतून उन्हांत प्रेत सडत असल्याप्रमाणें घाण येत होती. कदा-चित माझ्या हातून एखादें महत्पाप घडलें असेल ह्मणू-नच जणूं मला त्या रात्रीं असें हें अत्यंत कठिण शासन भोगावें लागलें. याप्रमाणें प्रतिबंधांत व संकटांत, एक हात छातीवर व दुसऱ्या हातानें ईश्वराची दुवा मागत, मी ती सर्व रात्र काढली.

इतक्यांत एकाएकीं नगारचीनें नगारा वाजविला, व त्या ब्राह्मणांचा मरणशब्दच जणूं, अशी कोंबड्यानेंही आरोळी दिली. कृष्णवस्त्र परिधान करणाऱ्या शुद्ध काळ्या रात्रिरूप लेखकानें आपल्या म्यानांतून जणों दिन-रूप तेजस्वी तर्वार बाहेर काढली, किंवा चकमकीचा तोडारूप जो रात्रीचा अंधकार त्यांत प्रभातप्रभारूप आग चेतली व तिच्या योगानें सर्व सृष्टी एकदम प्रका-शमान झाली, किंवा जसें कांहीं **संगबार**च्या* काळ्या मुलुखांत एकीकडून एकदम कांहीं गौरवर्ण **तार्तार** लोकच येऊन पडले असें झालें.

त्या आवाजाबरोबर नष्टबुद्धि व तोंडही न धुतलेलें, असे असंख्य ब्राह्मण, घरें, गल्ल्याकुच्या वगैरेमधून दवडत देवळांत आले. शहरांत व गल्ल्यांत पुरुष असा कोणी राहिला नाहीं. त्या पिशाच्यालयांत एका सुई इतकी

---

* **संगबार, जगंबार,** किंवा **झाजीबार**चा मुलुख **आफ्रिका** खंडाच्या पूर्वेस आहे. तेथील लोक अतिशय काळे आहेत.

देखील जागा रिकामी राहिली नाहीं. मी तर रागानें त्रस्त व जागरणानें मस्त झालों होतों. इतक्यांत त्या मूर्तीनें एकाएकीं हात वर उचलला, तेव्हां तेथें जमलेल्या लोकांतून, एकदम जणूं समुद्रावर तुफान होऊन समुद्र उचंबळला आहे असें वाटण्याजोगा ध्वनी उठला.

पुढें कांहीं वेळानें देवालय रिकामें झाल्यावर, तो ब्राह्मण हंसत मजकडे पहात म्हणाला, 'आतां तर तुला कांहीं शंका राहिली नाहीं असें वाटतें. कारण खरें रहस्य प्रगट झालें व आतां लवाडी राहिली नाहीं.'

त्यांच्या मनांत मूर्खपणा पक्का भरलेला, व अशक्य गोष्टीविषयीं श्रद्धा पक्की बिंबलेली पाहून त्यांना सत्य-व्यतिरिक्त कांहीं तरी सांगितल्याशिवाय मला गत्यंतर नाहींसें झालें, कारण मूर्तिमंत असत्यावर विश्वास ठेवणाऱ्यापासून सत्य लपविलें पाहिजे—आपण दुर्बल असून प्रबलाची गांठ पडल्यावर, त्याच्याशीं भांडून हात मोडून घेणें पुरुषार्थ नव्हे—थोडा वेळ ढोंगानें रडून म्हटलें, 'मीं प्रथम बोललों, त्याची मला लाज वाटते.' अशा खोट्या अश्रूप्रवाहानें मी त्या धर्महीनांचीं मनें मिळवून घेतलीं, तेव्हां खऱ्या जलप्रवाहानें पाषाण जागेवरून चळले तर कांहीं आश्चर्य नाहीं. माझी ती स्थिती पाहून ते ब्राह्मण माझी सेवा करण्याकरितां मजकडे धांवले, व त्यांनीं मोठ्या डौलानें माझे हात धरले. मी त्या चंदनी व सोनेरी सिंहासनावर स्थापिलेल्या हस्तिदंती मूर्तीपुढें जाऊन कृतकर्माबद्दल बाह्यतः पश्चात्ताप केला, व त्या क्षुद्र देवतेच्या हाताचें चुंबन केलें व मनांत म्हटलें कीं, या दुष्ट मूर्तीचा व मूर्तिपूजकांचा सत्यनास होवो, पण बाह्यतः

त्याच्याप्रमाणेंच काफर झालों व थोडे दिवस जिंद या ग्रंथाचें अध्ययन करून बाह्यतः बोलण्याचालण्यांत ब्राह्मण झालों. पुढें तेथें मीही पांडितांपैकीं एक झालेला पाहून माझा आनंद त्या भूमींत व माझ्या अंगांत मावेनासा झाला.

एका रात्रीं मी त्या देवळाचें दार घट्ट बंद करून विंचवाप्रमाणें डावी उजवीकडे दवडूं लागलों व त्या सिंहासनाच्या वर व खालीं नीटपणें दृष्टी दिली तों मला एक सोनेरी पडदा दिसला. त्याच्यामागें एक अग्निउपासक पुजारी हातांत एक दोरीचें टोंक धरून बसला होता. हें पाहतांच, **दाऊद*** पैगंबराच्या हातीं पडतांच लोखंड मेणासारखें मऊ होत असें, तसें तेथील गूढ एकदम माझ्या ध्यानांत येऊन कळलें कीं, दोरी ओढतांच मूर्तीचा हात ईश्वराची दुवा मागण्याकरितां वर होतो.

मला पहातांच तो ब्राह्मण लज्जित झाला, कारण

---

* **दाऊद**:—लोखंडी चिलखतें बनविण्याची कला प्रथम **दाऊद** पैगंबरानें शोधून काढली अशी दंतकथा आहे. **दाऊद** पैगंबर गुप्तपणें बाजारांत फिरून स्वतःविषयीं लोक काय ह्मणतात याबद्दल शोध करीत असे. तेव्हां नेहमीं लोक त्याची मागें देखील स्तुतीच करीत. एकदां एकानें ह्मटलें कीं **दाऊद** आहे चांगला पण तो सरकारी पैशावर आपलें पोट न भरता तर याहून चांगला होता. हें ऐकून **दाऊदाला** वाईट वाटलें व त्यानें लोहाराचा धंदा पतकरिला. **परमेश्वरानें** त्याच्यावर कृपा करून त्याच्या हातीं जातांच लोखंड मेणाप्रमाणें मऊ होई असें केलें. तो लोखंडाचीं चिलखतें बनवून ४००० दिरमांस विकीत असे व त्यांतून स्वतःचें व कुटुंबाचें पोषण करून बाकीचें दान करीत असे. (कुराण, सूरा २५, श्लो. १०.)

गुह्यस्फोट महादोषास्पद व भयंकर होय. तो तेथून पळाला तेव्हां मीही त्याच्या मागोमाम धावलों व हा ब्राह्मण जिवंत राहिला तर आपलें गुह्य मी बाहेर फोडीन असें त्यास वाटून तो माझा कपाळमोक्ष करूं इच्छील व माझा प्राण घेण्याचा यत्न करील, असें समजून मीं त्याला एका कुव्यांत ढकलून दिलें.

शत्रूच्या गुह्य कार्याचें ज्ञान झालें तर तेव्हांच त्याचा स्वहस्तानें उच्छेद कर, कारण त्या दुष्टाला जिवंत सोडशील तर तू पुनः जगण्याची आशा करूं नको. त्यानें एकदां त्वत्सेवेंत त्वद्द्वारीं शिर नम्र केलें तरी, डाव साधेल तेव्हां तो तुझें शिर कापल्यावांचून राहणार नाहीं. कपटी मनुष्यामागें जाऊं नको, व जाऊन त्याचें दुष्कर्म पाहशील तर त्याच्यावर क्षमा करूं नको.

मी त्या दुष्ट ब्राह्मणाचें शिर, त्या प्रेतापासून देखील दुसऱ्यास हें रहस्य कळूं नये म्हणून, दगडानें पार चेंचून टाकलें. व नंतर मी तेथें गडबड उडविलीसें पाहून तो प्रदेश सोडून पळालों.

वाघ असलेल्या बांसांच्या जाळींत आग घातल्यावर शहाणा असशील तर तेथें असलेल्या वाघास भिऊन त्याविषयीं जप. दंश धरणाऱ्या सांपाचीं पोरें मारूं नको, व मारलींस तर पुनः त्या जागीं राहूं नको. घरांत लागलेला मधमाशीचा मोहोळ उठविलास तर तेथून पळ काढ, नाहींतर तुजवर जणों आग पाखडेल. सहसा हातांतून तीर मारूं नको, व मारल्यावर वस्त्रें दांतांनीं सांवरून पळ मार. उभ्या भिंतीचा पाया खोदलास कीं त्या जागीं उभा राहूं नको. यासारखा **सादी**च्या ग्रंथांत दुसरा एकही उपदेश नाहीं.

नंतर मी **हिंदुस्थानां**तून निघून, धडपडत त्या संकटां-

तून सुटून हज्जचा रस्ता धरून **यमन**कडे दवडलों. त्या ठिकाणीं मजवर जे जे दुःखाचे डोंगर कोसळले, व विषाचे प्याले मला प्यावे लागले होते त्यांतून आजपर्यंत माझें मुख गोड झालें नाहीं.

आज मी या **अबूबकर सादच्या** छायेंत येऊन पोंचलों. कोणीही माता आजवर याच्यासारखा सुपुत्र प्रसवली नाहीं किंवा पुढें प्रसवणार नाहीं. दुर्दैवाच्या कहरांतून आश्रय मागण्याला, मी येथें या छाया पसरणाराच्या आश्रयाला आलों आहें. मी एक या दौलतीचा शुभचिंतक नंदीजन व **ईश्वरा**ची प्रार्थना करणारा आहें. हे **परमेश्वरा,** तू ही छाया कायम राख, कारण त्यानें माझ्या व्रणावर, व्रणाच्या किंवा माझ्या योग्यतेनुरूपच नव्हे तर आपला मोठेपणा व कृपा यांच्या अनुरूप मलम लावलें आहे. आपल्या मस्तकाचे पाय करून त्याची सेवा केली तरी त्याचे आभार व धन्यवाद मी कसे पूर्णपणें मानूं शकतों?!

त्या त्रासानंतर मला पुष्कळ सुख मिळालें व अद्याप माझ्या कानांतून त्या देवतामूर्तिविषयक गडबड नाहींशी झाली नाहीं. ज्या वेळीं मी प्रेमानें, गुह्यज्ञ **परमेश्वरा**ची प्रार्थना करण्याकरितां आपले हात उचलतों, तेव्हां त्या **चिनी** हस्तिदंती बाहुलीचें मला स्मरण होतें व माझ्या अहंकारपूरित नेत्रांत जणों धूळ पडते. प्रार्थना करण्याकरितां मी हात वर उचलतों तो स्वतःच्या सामर्थ्यानें नव्हे असें मला कळतें. तसेंच मनस्वी महात्मे लोक हात वर उचलतात, तेही अदृश्य स्थळांतून कोणी त्यांचें चालक सूत्र चाळवितात तेव्हांच नव्हे कां?!

सुखाचें व ईश्वरभजनाचें द्वार उघडें आहे खरें पण

प्रत्येक मनुष्य म्हणजे सत्कर्माचरणानेंच त्यांत शिरण्यास समर्थ होतो असें नाहीं. **ईश्वरा**च्या राजसभेंत, त्याच्याच आज्ञेविना कांहीं गोष्ट न घडणें, हाच एक प्रबल प्रतिहारी आहे. दैवाची किल्ली कोणाच्याही कबज्यांत नाहीं. सर्व शक्तिमान असा एक **परमेश्वर**च आहे. तेव्हां हे सत्यमार्गगामी गृहस्था, तूं जें जें सत्कर्म करशील, तें तें तुझ्याच सामर्थ्यानें नव्हे, तर त्या सत्यसंकल्पद **परमेश्वरा**च्याच कृपेमुळें होत आहे. तो तुझ्या कपाळीं सद्वर्तनसूत्र बांधील तर, तुजकडून दुष्कर्म कधींही घडणार नाहीं. ज्यानें सर्पमुखांत विष उत्पन्न केलें त्याच **महेश्वरा**नें मधुमक्षिकामुखांत मिष्ट मधही उत्पन्न केला आहे.

तुझें राज्य उध्वस्त करण्याचें त्याच्या मनांत असेल तर, तो प्रथम तुझ्या हातूनच सर्व प्रजेला पीडा देववितो, व त्याची तुजवर कृपा असली तर सर्व प्रजेला तुझ्या हातून सुख देववितो. तू आपल्या सन्मार्गावलंबनाचा गर्व करूं नको, कारण दैवबल तुझा हात धरितें तेव्हांच तू उठूं शकतोस.

नीटपणें ऐकिलेंस तर एकच बोधवचन हितकर आहे, व गुरुपरंपरागत सन्मार्गानें जाशील तरच महात्मे लोकांत पोंचशील. ते मार्ग दाखवितील तरच तुला स्वर्गस्थळ मिळेल, व ते पूज्यतारूप पंक्तींत तुझेंही पान मांडतील. पण त्या पंक्तींत तूं एकट्यानेंच खाणें प्रशस्त नाहीं. गरीब, अनाथ, भिकारी, व थकलेल्यांचेंहि तुला स्मरण असलें पाहिजे.

हे **परमेश्वरा**, तूच माझ्यावर मरणानंतर एखादा कृपाकटाक्ष टाकशील तर बरें, कारण मी स्वतः स्वोद्धारक्षम नाहीं.

आठवा भाग समाप्त.

भाग नववा.

—:o:—

पश्चात्ताप.

हे भल्या गृहस्था, ये, तुझें वय बहुतसें—सत्तर वर्षें—गत झालें. हें अगदीं व्यर्थ गेलें. तेव्हां तू कां निजला होतास? तूं येथें संसारांत लागणारें सर्व सामान सिद्ध केलेंस, पण येथून जाण्याच्या सामग्रीची काळजी केली नाहींस.

स्वर्गींच्या बाजारांत नानाविध वरींवाईट फळें ठेवलेलीं आहेत. त्यांतून ज्याच्या त्याच्या पुण्यपापानुरूप तीं प्रत्येकास प्राप्त होतात. तू येथें इतकी संपत्ती व सामान सज्ज करून सापसारीत असतोस तरी तू केवळ दरिद्री आहेस, व तुला त्या बाजारांत लज्जितपणा पतकरावा लागेल. कारण तेथें जो बाजार गच्च भरलेला आहे, त्यांत रिकाम्या हातानें जाणाऱ्यांचें मन कष्टीच होणार.

पन्नास दिरमांतून पांच कमी झाले तर तुझें मन दुःखी कष्टी व उदास होतें. पण तुझ्या हातून पन्नास वर्षें हरवलीं आहेत. तेव्हां आतां जे पांच दिवस उरले आहेत तेच अधिक मान. एखादें बिचारें प्रेत बोलूं शकतें तर तें रडारड व शोक यांमुळें कल्होळ करून म्हणतें कीं, हे जिवंत प्राण्या, तुझ्यांत बोलण्याची शक्ती असेल

तोंवर, आपले ओंठ ईश्वरगुणानुवादापासून, प्रेताच्या ओंठाप्रमाणें बंद ठेवूं नको. आमचा आयुष्याचा काळ फसगतीनें गेला, तेव्हां तू तरी जो क्षणभर अवकाश सांपडेल तोच विशेष समज.

गोष्ट पहिली.

एका वृद्धाचा तारुण्य व्यर्थ घालविल्याबद्दल पश्चात्तापविलाप.

एकदां एका रात्रीं आह्मीं कांहीं तरुण गृहस्थ मिळून तारुण्यमद, आनंद व धनगर्व यांच्या डौलांत आपसांत बोलत बसलों होतों. आह्मी बुलबुलाप्रमाणें गाणारे व आनंदी मनुष्याप्रमाणें प्रसन्नमुख असे होतों व आपल्या मदांत दंग होऊन त्या मोहल्ल्यांत आह्मीं धुमाकूळ मांडला होता.

इतक्यांत एक जगाचा अनुभव घेतलेला व आपल्या आयुष्याच्या शिखरास पोंचलेला व कालचक्रघर्षणानें कृष्णवर्णकेश शुभ्र झालेला असा वृद्ध गृहस्थ आमच्या जवळून निघाला. उमललेल्या पिस्त्याप्रमाणें हंसण्यामुळें आमचे ओठ खुललेले होते तसें त्याचे नसून, फणसांतील गऱ्याप्रमाणें त्याची जिव्हा मुखांत बंद होती.

आमच्यांतील एका तरुण गृहस्थानें त्याला जवळ जाऊन थट्टेनें ह्मटलें, 'तू औदासिन्यरूप कोन्यांत दुःख करीत एकटा स्वस्थ कां बसलास? कष्टरूप पदराखालून तू एकवार स्वशिर वर कर, व प्रसन्नमनानें आह्मां तरुणांबरोबर चल.'

हें ऐकून त्या जरठ वृद्धानें मस्तक वर करून त्याला किती पोक्त व सुंदर उत्तर दिलें पहा! तो ह्मणाला, 'प्रभातकालचा मंद वायू उपवनांत संचार करीत असेल, तेव्हांच तरुण वृक्षांनां ऐटीनें डोलणें शोभतें. जवाचें झाड हिरवेंगार व जोमांत असतांनांच डोलतें पण तेंच फिकें पडलें कीं कापलें जातें. वेदमुष्क या सुगंधी वनस्पतीवरून उत्तम सुगंध आणणाऱ्या वायूनेंच, तरुण वृक्षांचीं शुष्क पानें गळतात.

'मला तरुणांबरोबर डौलानें बोलणें शोभत नाहीं, कारण माझ्या गालांवर वार्धक्याची छटा पडूं लागली आहे. मी एखाद्या शिकारी ससाण्याप्रमाणें प्रतिबंधांत पडलों असून, माझ्या पायांस बांधलेल्या दोरीचें शेंवट क्षणोक्षणीं तुटूं पहात आहे. या पूर्णपात्रावर बसणें तुह्मांलाच शोभतें, कारण आतां आह्मी संपदा वगैरेला आंचवलों आहों. जरेमुळें शिरावर शुभ्रशिरोरुहरूप धूळ बसूं लागली कीं पुनः यौवनोपभोगाची आशा धरूं नको. माझ्या काकपक्षसम कृष्णकेशकलापावर शुभ्र बर्फवृष्टी झाली आहे, तेव्हां आतां मला बुलबुलाप्रमाणें उपवनक्रीडा करणें योग्य नाहीं.

'सुंदर व सुरंग असा सारसच नाचरंग करूं शकतो. पण पलितपंख ससाण्याच्या हातून याची कां आशा ठेवतोस? माझें शेत अगदीं कांपणाच्या वेतांत आलें आहे, पण तुमचें अद्याप ऐन हिरवेंगार व जोमांत आहे. माझ्या बागाची शोभा गत झाली आहे. कोमेजलेल्या फुलाचें कोण गेंद बांधतो? मला हल्लीं जिवाचा आधार अशी कायती ही यष्टी आहे, अशा स्थितींत मी पुनः आयुष्यावर भरंवसा

ठेवणें चुकीचें होईल. तरुण लोकांनांच आपल्या पायांनीं उड्या मारणें योग्य आहे, कारण वृद्धांना दुसऱ्यांच्या हातून सहाय्य घ्यावें लागतें. माझें फुलाप्रमाणें लाल मुख सोन्याप्रमाणें पिवळें पडलें आहे व अस्ताचलास चाललेल्या पीतवर्ण सूर्याप्रमाणें अधोमुख झालें आहे.'

एखाद्या अपक्व मुलाशीं थट्टामस्करी करणें जरठ वृद्धाशीं खेळण्याइतकें वाईट होत नाहीं. स्वपातकाच्या लाजेनें मला आतां मुलाप्रमाणें रडलें पाहिजे, त्याच्याप्रमाणें खुशालपणें राहणें योग्य नाहीं. **लुक्मान** हकीमाचें पुढील वचन फारच योग्य व यथार्थ आहे कीं, 'अनेक वर्षें पातकें करीत जगण्यापेक्षां, मुळींच न जगणें बरें; तसेंच आपणच आपलें द्रव्य व्याजानें देण्यापेक्षां अगदीं पहाटपासून दुकान लावून बसणें बरें.'

तरुण मनुष्याच्या तारुण्याची काळिमा त्याच्या केंसावर पुर्ती येते न येते, तोंपावेतों बिचाऱ्या वृद्धाची काळिमा मसणांत पोंचतें.

गोष्ट दुसरी.

संसारमग्न वृद्ध गृहस्थास एका वैद्याचा उपदेश.

एक जख्ख म्हातारा एका वैद्याकडे येऊन अगदीं प्राण जातात अशा काकळुतीनें रडत रडत म्हणला, 'हे चतुर व शहाण्या गृहस्था, माझी नाडी पहा, बसल्या जागेवरून मला पाय देखील उचलवत नाहीं. अशा स्थितींत मी जणों अगदीं गाळांत फसल्याप्रमाणें झालों आहें.'

त्याला तो वैद्य म्हणाला, 'तुझे पाय त्या शेवटच्या

दिवशीं गाळांतून वर निघावे ह्मणून, तू या संसारापासून आपले हात धू.'

तरुणपणांत तूं आपले हातपाय हलविले असलेस तर वृद्धापकाळांत तुला स्वस्थ सुविचारानें राहण्यास सांपडेल. आयुष्याचें पाऊल चाळीस वर्षांच्या पुढें पडलें ह्मणजे व्यर्थ उठाठेवींत हात पाय हलवूं नको, कारण, तेव्हां पाणी तुझ्या डोक्यावरून गेलें असें समज. माझ्या काळ्या केसांत पांढरी झांक झळकूं लागली तेव्हांपासूनच मजपासून सौख्य दूर पळून जाऊं लागलें.

ज्ञानपोकीचा काळ सरत येण्याच्या सुमारापूर्वीच लालसेची सवय मस्तकांतून घालविली पाहिजे. शरीररूप मृत्तिकेंतून कृष्णवर्ण केशरूप हिरवेगार गवत उगवण्याची शक्ती राहिली नाहीं, तेव्हां आतां मला हिरव्या गार वस्तूंपासून कोठून सुख होणार? लालसा व आशा यांच्या तमाशांत निमग्न होऊन आह्मी पुष्कळ लोकांच्या कबरेवरून चालत गेलों आहों, तसेच पुढें जन्मास येणारे अनेकशः लोक आमच्या कबरेवरून चालतील. तारुण्याचा सुंदर काळ व त्याच्या बरोबरच खेळण्याकूदण्यांत आयुष्यही व्यर्थ गेलें, तसेंच असा हा लावण्यपोषक तारुण्याचा काळ आमच्यावरून विद्युत्प्रभेप्रमाणें एकदम निघून गेला. हें वस्त्र वापरूं व हें अन्न खावूं, याच हव्यासांत गर्क होऊन आह्मी धर्मा-करितां कांहीं करीत नाहीं, याचा कांहींच विचार केला नाहीं व अप्रयोजक गोष्टींत निमग्न होऊन परमेश्वरा-पासून दूर, सुस्त व बेशुद्ध राहिलों याबद्दल फार वाईट वाटतें.

एका मुलाला एक पंतोजी किती चांगलें बोलला कीं, 'मी अद्याप एकही काम नीट केलें नाहीं, इतक्यांत आयुष्याचा काळ नाहींसा झाला!'

उपदेश.

जरा व दौर्बल्य यांच्या पूर्वीच्या तारुण्याचा श्रेष्ठपणा व उपयोग.

तरुण लोकहो, भगवद्भजन मार्ग आतांच धरा, कारण, उद्यां म्हातारपणीं तरुणपणाचीं कामें तुमच्या हातून होणार नाहींत. आतां तुमच्या मनांस मोकळेपणा आहे. व शरीरांत शक्ती आहे. मैदान मोकळें आहे तोंवर गेंद खेळून घ्या. मला या दिवसांची योग्यता कळली नाहीं व ते व्यर्थ गमविले असें आजपर्यंत कळून आलें नाहीं. कृतांतकाळानें माझें आयुष्य चोरून नेलें त्यांतील एकेक दिवस **पवेकदर** किंवा कपिलापष्टीप्रमाणें होता.

लादलेल्या गाढवाप्रमाणें जराव्याप्तवृद्ध काय खटपट करूं शकणार? पण तू एका वायुवेग अश्वावर स्वार आहेस तोंवर पळ मार. एकदां फुटलेला प्याला कसाही सांधला तरी त्याचें पहिल्याप्रमाणें मोल कधींही येणार नाहीं. तरी तो तुझ्या चुकीमुळें तुझ्या हातून पडून फुटला तेव्हां त्याला पुनः सांधल्यावांचून दुसरा मार्गच नाहीं.

नदीच्या प्रवाहांत उडी मारण्यास तुला कोणी सांगितलें? आतां पडलासच तेव्हां हात पाय तरी हलीव. तूं चुकून आपल्या हातून उत्तम अमृत सांडलेंस तेव्हां

आतां तुला निमाज पढण्यापूर्वीं मृत्तिकेनेंच वजू केला पाहिजे. चपल लोकांबरोबर धांवण्याचें तुला सामर्थ्य नसेल तर निदान, उठत पडत जाणाऱ्यांबरोबर तरी जा. ते वायुगती जलद पळणारे व तू हस्तपादविहीन असलास तरी, केवळ बसून राहण्यापेक्षां उठून उभा रहा.*

गोष्ट तिसरी.

दूरदर्शीपणाचें व लौकर उठण्याचें फल.

एका रात्रीं मी मक्केजवळील फैदच्या जंगलांत मुक्कामास राहिलो होतो. माझे पाय चालून चालून थकले होते. मी निजलेला पाहून एक सारवान रागानें ओरडत येऊन माझ्या डोक्यावर उंटाच्या लगामाचा फटकारा देऊन म्हणाला, 'ऊठ, नगाऱ्याच्या आवाजानें ही उठत नाहींस तेव्हां मागें राहून मरण्याचा विचार आहे वाटतें? तुजसारखीच मलाही साखरझोंप घ्यावीसें वाटतें, पण अद्याप हें जंगल चालून काटावयाचें आहे ना? कूचाचा नगारा ऐकूनही तूं ही साखरझोंप न सोडलीस तर पुढच्या मुक्कामावर कसा पोहोंचशील?'

नगारचीनें उंटावरील नोबत वाजविण्यापूर्वीच रस्ता धरणारा व्यापारी सर्वांच्या पूर्वी मुक्कामावर पोहोंचतो. नगारचीच्याही पूर्वी सामानसुमान बांधून तयार असणारा मनुष्यच सुखी, हुषार व दैववान होय. मार्गात

---

* ॥ धर्मादर्थश्चकामश्च स च कस्मान्न सेव्यते ॥
॥ हस्तपादादि संपन्ना यूयं किमवसीदथ ॥ १ ॥ महाभारत.

निजणारे उठून शुद्धीवर येऊन डोकें हलवून वाटेस लागे तों, पूर्वी निघालेल्यांच्या पावलांच्या खुणा सुद्धां त्यांस सांपडत नाहींत. लौकर उठणारा मनुष्य सर्वांत श्रेष्ठ होतो. सर्व वाटसरू निघून गेल्यावर जागें होणें काय कामाचें?

यौवनयुक्त मुखश्रीवर शुभ्रपणा येऊं लागला कीं, रात्र सरून उजाडलें असें समजून, झोपेंतून डोळे उघड. कृष्ण-वर्ण केशांस शुभ्रता येऊं लागली त्याच दिवसांपासून मीं आयुष्याची आशा सोडून दिली. असें मधुर वय व्यर्थ हरवल्याबद्दल मला फार वाईट वाटतें. हे राहिलेले चार श्वासोच्छ्वासही केव्हांच निघून जातील. दुष्कर्मांत गमविलेला काळ तर गेलाच, तसाच हा थोडासा अवशिष्ट काळही त्याच्यांत सार्थक न करून घेतलें तर जाणारच आहे. हा पेरणीचा काळ आहे. तो तूं जपलास तरच तुला खळें जमाविण्याची उमेद करितां येईल.

शेवटीं स्वर्गरूप नगरांत भिकाऱ्याप्रमाणें जाऊं नको. या जगांत नेहमीं खेद करीत राहून शेवटीं त्यास सोडून जाणें योग्य नाहीं. तू शहाणा व सनेत्र असशील तर तुझे नेत्र कबरेंतील कृमींनीं खाल्ले नाहींत तोंवर आपल्या कबरेची काळजी कर. भांडवलापासून नफा मिळवितां येतो, पण भांडवलच गमविणाऱ्यास नफा कोठून होणार? हल्लीं कमरेवरोवरच पाणी चढलें आहे तोंवर उद्योग कर, पाण्याच्या लाटा डोक्यावरून जाऊं लागल्यावर नव्हे. तुला नेत्र आहेत तोंवर रड व मुखांत जीभ आहे तोंवर क्षमा माग, कारण हा प्राण शरीरांत व ही जीभ मुखांत शाश्वत फिरत रहाणार नाहीं. आज थोरांचा उपदेश

ऐकून तदनुरूप वाग. उद्यां काळानें धरलें कीं भीतीनें बोबडी वळून जाईल. हा श्रेष्ठ जीव शरीरांत आहे तोंवर गनीमत समज. कारण पक्ष्यावांचून पिंजऱ्याची कांहीं किंमत नाहीं. वृथा खेदांत व भीतींत आयुष्य गमवूं नको, कारण ही फुरसतीची वेळ फार प्रियकर आहे व काळ हा तीक्ष्ण तरवारीप्रमाणें आहे.

गोष्ट चवथी.

मृताविषयीं शोक करण्याचें वैफल्य.

कृतांतानें एकाच्या आयुष्याची दोरी तोडली, तेव्हां त्याचे आप्तइष्ट शोकानें वस्त्रें फाडूं लागले. हें पाहून व ऐकून एक दूरदर्शी व विचक्षण गृहस्थ त्यांस ह्मणाला, 'त्या प्रेताच्या हातांत सामर्थ्य असतें तर तें तुमच्या त्रासानें कफन फाडून ह्मणतें कीं, 'मी तुमच्या पूर्वी दोन दिवस प्रवासाला लागलों ह्मणून तुह्मी इतका खेद व कष्ट करून मला कां परतवितां? तुह्मांस माझ्या मरणानें इतकें दीन व दुःखी केलें यावरून स्वतः मरणार ही गोष्ट तुह्मी विसरलां वाटतें? !'

दूरदर्शी मनुष्य एखाद्या प्रेतावर माती लोटतो तेव्हां तो त्या प्रेताकरितां नव्हे तर स्वतःकरितां दुःखितांतःकरण होत असतो. एक लहानसें मूल मरून मातींत मिळालें ह्मणून कां रडतोस? तें शुद्ध जन्मास आलें व शुद्धपणें मेलें. तू शुद्ध जन्मास आला असून पापी व अशुद्ध असा मरून मातींत मिळणें तुला योग्य नाहीं. या प्राणरूप पक्ष्याचे आतांच पाय बांधले पाहिजेत, तो

तुझ्या हातांतील दोरीचें टोंक तोडून निघून जाईल तेंव्हां नव्हे. तूं दुसऱ्याची जागा बळकाविली आहेस, तसेंच पुढें तुझ्या जागेवरही दुसरे लोक वसतील.

तू मोठा मल्ल किंवा तर्वारबहादर असलास तरी या जगांतून कफनाशिवाय तुला कांहीं एक नेतां येणार नाहीं. जंगली गाढव दावें तोडून गेलें तरी रेतींत जातांच त्याचे पाय आपोआप बद्ध होतील. तुझ्या हातांत अद्याप शक्ती आहे व कबरस्थानांतील मृत्तिकारूप रेतींत तुझे पाय फसले नाहींत. तेंव्हां या जीर्ण इमारतीवर आपलें मन ठेवूं नको. बुमटावर गेंद कसा टिकेल? कालचा दिवस गेला व उद्यांचाही हातीं लागणार नाहीं, याकरितां हा जो एक निमिषाचा अवकाश आहे तोच हिशेबांत घे.

गोष्ट पांचवी.

ऐहिक वस्तूंचा नाश व त्यांचा बेभरंवसा.

जमशेद बादशहाची एक अत्यंत सुंदर स्त्री मरण पावली. तेंव्हां त्यानें तिजकरितां एक उत्तम रंगाचें रेशमी कफन तयार करविलें. पुढें कांहीं दिवसांनीं तो पुनः तिच्या कबरेवर दुःख व खेद करून रडण्याकरितां आला, व तें उत्तम रेशमी कफन जीर्ण झालेलें पाहून स्वतःस ह्मणाला, 'मीं हें रेशीम मोळ्या श्रमानें किड्यांपासून काढविलें होतें. तेंच हल्लीं कबरेंतील किडे जोरानें फाडताहेत!'

एके दिवशीं एक गवई रबाब वाद्याच्या सुरांत म्हणत असलेलीं दोन पद्यें ऐकून माझें काळीज शिजून जणों कबाबाप्रमाणें झालें. तो म्हणत होता कीं, 'आमच्या पूर्वीं अगणित कालपर्यंत सुरम्य व सुरंग पुष्पें उत्पन्न होऊन उमललीं व अनेक जेष्ठ, श्रावण व माघ मास, किंवा ग्रीष्म, वर्षा व शिशिर ऋतू निघून गेले. आह्मी मातींत मिळून जाऊं व त्याच मातीच्या विटा होतील व त्यानंतर ही असेच अनेक महिने व ऋतू जातील याबद्दल मला फार खेद वाटतो!'

गोष्ट सहावी.

संपत्तीची चंचलता.

एका अकिंचन व ईश्वरपूजक गृहस्थाला अकस्मात एक सोन्याची वीट सांपडली. तेव्हां त्या विचारी गृहस्थाचेंही मस्तक असें फिरून गेलें कीं त्यामुळें त्याचे उज्वल मनोविचार फिरून गाढ तमांत जाऊन पडले. तो रात्रभर विचार करीत होता कीं, 'ही संपत्ती जीवमानपर्यंत कशी कमी न होईल, व माझ्या या सुंदर शरीरास पुनः केव्हांही दुसऱ्या पुढें याचकवत् उभें ओणवें न व्हावें लागेल? मी एक उत्तम घर बांधीन व त्याचा पक्का दगडी पाया करीन व त्याला चंदनाच्या कड्या घालीन व त्यांत एक केवळ आपल्या मित्रांकरितां दिवाणखाना बनवीन व त्याचें दार बागांत ठेवीन. आजवर ठिगळावर ठिगळें शिवण्यामुळें मला मोठे कष्ट झाले व परपीडेनें माझें मस्तक व नेत्र जाळून टाकले. पण आतां

दुसरे गरीब लोक माझा स्वयंपाक करतील व मी आनंदांत स्वलावण्यपोषण करीन. आजवर या चुर्णुसाच्या अंथरुणानें मला जणूं मारून टाकलें. आतां मी जाऊन उत्तम किंमती व नरम विछान्यावर निजेन.'

अशा तऱ्हेच्या विचारांनीं त्याला वेडा व उन्मत्त करून सोडलें होतें, व त्याच्या मेंदूला जणों खरचंगानें किंवा खेंकड्यानें आपल्या पायांनीं फाडून टाकलें होतें. यामुळें त्याला ईश्वरभजन व ईश्वरगुणानुवाद करण्यास, तसेंच खाणें व निजणें यामुळें त्याला पूजाअर्चा व निमाज पढण्यास अवकाश मिळेना.

असा तो गर्वानें व वेडानें मस्तक फिरलेला, राहण्या वसण्याला पक्का ठाव ठिकाण नसल्यानें वनांत गेला. तेथें एकजण घर बांधण्यास विटा बनविण्याकरितां एका कबरस्थानाची माती खोदीत होता. त्याला पाहून, तो वृद्ध फकीर खिन्न होऊन स्वतःस म्हणाला, 'हे अदूरदृष्टी प्राण्या, यापासून उपदेश घे. या सोन्याच्या विटेंत आपलें मन काय गढवून ठेवलें आहेस? एखादे दिवशीं तुझ्याच मातीच्या लोक विटा करतील.'

लालसेचें मुख सदोदित असें पसरलेलें असतें कीं त्याच्यांत कितीही घास घातले तरी, त्यास आणखी घास पाहिजेच असतो. तेव्हां हे मूर्ख दरिद्र्या, अशा या अतृप्तिकर गोष्टींपासून आपला हात आटप. नदीप्रवाह एका विटेनें कधीं बंद करितां येत नाहीं. तू भांडवल व व्याज यांच्या काळजींत निमग्न असतोस पण इकडे तुझें आयुष्यरूप भांडवल बुडत चाललें आहे. या आमच्या शरीररूप मृत्तिकेवर असा जोराचा कालवायू वहात आहे

कीं त्यामुळें आमच्यांतिल एकेक कण निरनिराळ्या जागीं जात आहे. लालसाधुळीनें तुझे विचारनेत्र शिवून टाकले आहेत, पण काल झंझावातानें आमची लालसा मारून आयुष्य पार जाळून टाकलें आहे. आपल्या स्वच्छ चक्षूंतून विस्मरणरूप सुर्मा किंवा क़ाजळ धूवून टाक, कारण उद्यां तू स्वतःच मातीच्या पोटांत सुर्मा होशील.

गोष्ट सातवी.

दोन गृहस्थांमधील वैर.

दोघां गृहस्थांमध्यें वैर व भांडण होतें. ते दोन चित्र्याप्रमाणें एकमेकांवर गर्वानें व रागानें गुरगुरत होते. एकमेक दृष्टीसही न पडावें म्हणून दूर पळण्यास त्यांना गगनांतही अवकाश पुरेनासा झाला होता.

कांहीं दिवसांनीं काळानें त्यांतून एकाच्या शिरावर सैन्य दवडलें व त्याच्या चैनी आयुष्यक्रमाचा शेवट झाला, तेव्हां त्याच्या वैऱ्यास आनंद झाला.

पुढें तो वैरी कांहीं वर्षांनीं कबरस्थानांत जाऊन पाहतो तों, एकदां ज्या गृहस्थाचें घर जणूं सुवर्णानें सारवलेलें होतें त्याची कबरेची अंधारकोठडी धुळीनें भरून गेली होती. त्यानें अदावतीनें त्या कबरेचा एक तख्ता उखडला, तेव्हां पूर्वी मुकुटानें शोभिवंत असणारें त्याचें शिर खड्डचांत पडलेलें व सर्व सृष्टी पाहणारे दोन्ही नेत्र, मृत्तिकेनें भरलेले, व त्याची काया कबरस्थानरूप कारागृहांत कैद केलेली व कृमीकीटकांचे भक्ष होऊन मुंग्यांनीं

धुळीस मिळविलेली, अशी त्याच्या दृष्टीस पडली. काल-चक्रभ्रमणानें, त्याचें पूर्णचंद्राप्रमाणें प्रफुल्लित मुख प्रति-पदेच्या चंद्राप्रमाणें क्षीण झालें होतें, व कृतांताच्या सपा-ट्यामुळें त्याचें सुरूच्या झाडाप्रमाणें सुंदर व गोंडस शरीर एखाद्या दांतकोरण्यासारखें कृश झालें होतें. त्याच्या हाताचे पंजे व समर्थ व शक्तिमान असे बाहू यांचे एकून-एक स्नायू काळानें तोडून टाकले होते.

हें पाहून त्याला त्याची अशी दया आली कीं, त्यानें आपल्या अश्रुजलानेंच जणूं त्याच्या कबेरची माती भिजवून कबर लिंपून टाकली, व आपल्या दुष्ट कृत्यां-बद्दल लज्जित होऊन त्यानें त्या कबरेच्या शिलेवर शिला-लेख लिहून ठेवविला कीं, 'कोणाच्याही मरणाचा आनंद मानूं नको. कारण त्याच्या मागें तुझा फारसा काळ राहिला आहे असें नाहीं.'

ही गोष्ट एका हुषार भक्तानें ऐकून, शोकानें ह्मटलें कीं, 'हे सर्वोत्पादका परमेश्वरा, ज्याच्याविषयीं प्रत्यक्ष शत्रू पुष्कळसा रडला, अशावर तू कृपा न कर-शील तर आश्चर्यच ह्मणावयाचें! आमचें शरीरही केव्हां तरी असेंच होणार. पण मजवरील माझ्या शत्रूचा पश्चात्ताप पाहून तरी, मन्मित्र अशा परमेश्वराच्या मनांत मजविषयीं मोह येईल कां? हें मानी मस्तक शेंवटीं, लौकर किंवा उशीरां, या थराला पोंहोंचेल कीं, पुढें त्याच्यांत मुळींच नेत्र नव्हते असें भासूं लागेल.

एकदां एका मातीच्या ढेरावर मी फावडें मारतांच एक दुःखपूर्ण रोदनस्वर माझ्या कानीं आला कीं, 'अरे बाबा, तू मर्द असशील तर खबरदार, थोडे हळूं फावडे

मार, कारण येथें खालीं तुजप्रमाणेंच नेत्र, कर्ण, मुख व शिर आहेत.'*

गोष्ट आठवी.

कन्या व पिता.

एका रात्रीं, मी प्रवासास जाण्याच्या हेतूनें एका कारवानाची सोबत धरून निजलों होतों, तेव्हां एकाएकीं भयंकर वावटळ सुटून धुरळा उठल्यानें सर्वांचे नेत्र सृष्टि-दर्शनीं असमर्थ होऊन गेले.

त्या रस्त्यावर एका गृहस्थाचें घर होतें. त्याची मुलगी एका वस्त्रानें पित्याच्या तोंडावरून धूळ उडवीत होती. तिला बाप म्हणाला, 'हे नाजुक व सुंदर मुली, मत्प्रेमामुळें इतकें आपलें मन उद्विग्न कां करतेस? या माझ्या नेत्रांत, वस्त्रानें भार उडवून टाकण्याइतकी धूळ बसली आहे असें नाहीं.'

तुझा प्रियकर प्राण प्रमत्त वृषभाप्रमाणें कबररूप गर्तेंत पडेपर्यंत सारखा पळत असतो. काळानें तुझी रिकाबी अकस्मात तोडून टाकल्यावर, खालीं पडलेली लगाम तुला पुनः हातीं घेतां येत नाहीं.

बोधवचन.

देहाहून जीवाची श्रेष्ठता व इहलोकची निःसारता.

तू एका अस्थिपंजराची मात्र काळजी घेतोस, त्या

---

* 'शतंभीष्म, शतंभीष्म' असा भीष्मशवदाहाच्या वेळीं वसुंधरेनें केलेला शब्द या ठिकाणीं लक्ष्यांत आणण्याजोगा आहे.

पिंजऱ्यांत तुझा प्राण हा पक्षी व त्याचें नांव मन आहे. पक्षी पिंजऱ्यांतून बंद तोडून पळून गेल्यावर पुनः त्याची शिकार करण्याचा कांहीं मार्ग नाहीं. या संसाराची स्थिती केवळ क्षणिक आहे. याकरितां एकेक क्षणाविषयीं जप. शहाण्या लोकांच्या दृष्टीनें, सदुपयोगीं लागलेला एक क्षणही सर्व संसारापेक्षां श्रेष्ठ आहे. सार्वभौम शिकंदर बादशहाही श्वासोच्छ्वास बंद होतांच या सर्व पृथ्वीला सोडून गेला. त्याच्याकडून एकादें राज्य घेऊन-नही त्याचें आयुष्य एक क्षणभर वाढविणें कोणाच्या हातून झालें नाहीं.

कोणीही पेरतो तसें पीक पावतो व शेवटीं मेल्या-वर, मागें बऱ्यावाईट नांवाशिवाय कांहीं रहात नाहीं. या धर्मशाळेवर आपण कां मन ठेवावें? आमचे स्नेही गेले व आह्मांस ही जाणें सुटतें असें नाहीं. आमच्या मागेंही हे बागबगीचे अशींच फुलें देतील व त्यांच्यांत आतां प्रमाणेंच पुढें प्रियकर परस्पर भाषणें करीत बसतील. या मनमोहक सृष्टीवर मन गुंतवूं नको. कारण एकदां मन गुंतविल्यावर, पुढें उद्विग्न झाला नाहीं असा आजवर कोणी झाला नाहीं. एकदां कबरेंत निजलेल्या मनुष्या-वरील धूळ शेंवटच्या न्यायाच्या दिवशींच झाडली जाणार.

विस्मरणरूप अधोमुखतेपासून आपलें मस्तक आतांच वर कर, नाहीं तर उद्यां तें पश्चात्तापांत उलटेंच न राहून जावो! प्रवास करून शिराज शहरांत परत येतानां, तू प्रवासामुळें स्वशिरावर व शरीरावर बसलेली धूळ धुवून टाकून नंतर आंत येऊं चहात नाहींस कां?

तेव्हां हे मृण्मय व पातकपूरित गृहस्था, तू त्या शेंवटच्या प्रवासाच्या मुक्कामाच्या शहरांत असाच्च अमंगळ घुसूं इच्छितोस, हें काय? या तुझ्या दोन्ही नेत्ररूप झऱ्यांपासून अश्रुपूर वाहवून, तुझ्या दृष्टीनें तुझ्या अंगीं असलेलीं सर्व पातकें पार धुवून टाक.

गोष्ट नववी.

सादीचें बालपण.

माझ्या पित्यावर नेहमीं ईश्वराची कृपावृष्टी होवो. त्याचें मला वरचेवर स्मरण येतें. त्यानें लहापनणीं मजकरितां लिहिण्याची पाटी व दौत, तशीच्च एक सोन्याची अंगठीही विकत घेतली होती. एका ठगानें ती अंगठी माझ्या हातांतून झटकर विकतो ह्मणून काढून घेतली. लहान मुलाला अंगठीचें खरें मोल माहित नसतें तेव्हां ती त्याजवळून थोडासा खाऊ देऊन सहज घेतां येते.

तुला या आयुष्याचें मोल न कळल्यामुळेंच तू ऐषआरामरूप मिठाईच्या बदल्यांत त्याला गमवितोस. चांगले लोक अति नीच पदाहून अत्युच्च पदास पोचण्याच्या त्या शेवटच्या न्यायाच्या दिवशीं तुझें तोंड लज्जेनें आपोआप खालीं होईल. कारण तेव्हां तेथें तुझ्याभोंवतीं तुझीं कर्में उभीं राहतील. बाबारे, दुष्कर्माची लाज धर, नाहींतर सज्जनांसमोर तुला लज्जित व्हावें लागेल. त्या, प्रत्येकाच्या वचनांची व कर्माची विचारणा होण्याच्या दिवशीं, प्रत्यक्ष **पैगंबरा**चें ही शरीर भीतीनें कांपूं-

लागेल. अशा **पैगंबरा**सही 'भीती वाटणाऱ्या जागीं, स्वपातकक्षालनार्थ तूं काय पश्चात्ताप करणार तो सांग? मनापासून ईश्वरभजन करणाऱ्या स्त्रिया देखील अभक्त पुरुषांहून श्रेष्ठ होतील व त्या तुजहून ईश्वरास अधिक मान्य होतील, याबद्दल तुला आपल्या पौरुषाची लाज नाहीं कां वाटत? स्त्रियांनां वेळोवेळीं ईश्वरभजनांत व्यत्यय येण्यास एक योग्य (आर्तवाची) सबब तरी आहे. पण तू व्यर्थ स्त्रियांप्रमाणें एकीकडे बसतोस. तर हे स्त्रियांहूनही हीन प्राण्या, व्यर्थ स्वपौरुषप्रलाप करूं नको. असें सांगण्याची माझी काय शक्ती आहे? परंतु वागीश्वर अशा महात्म्या **उन्सरी*** कवीनेंही म्हटलें आहे कीं, 'मी मध्यमकालीन, ही गोष्ट सांगतों याचें आश्चर्य न मानतां पूर्वीच्या प्राचीनांनींही काय सांगितलें आहे तें पहा. सरळपणा सोडतांच वांकडेपणा येतो. स्त्रियांहूनही कमी होण्यांत काय पुरुषार्थ आहे. तू लाड, नाच, रंग व गाणें या योगानें आपल्या मनाला चैनींत वाढवितोस खरा, पण यांत तू पुढच्याकरितां एक शत्रूच पाळून दृढ करितो आहेस.

एकानें एक लांडग्याचें पोर पाळलें होतें. त्यानें मोठें होतांच त्या गृहस्थालाच फाडून टाकलें. तो गृहस्थ अगदीं आसन्नमरण झाला होता तेव्हां एका अनुभविक व विचक्षण गृहस्थानें त्याला म्हटलें, 'तूं आपल्या शत्रूला, तो एकाएकीं तुला जखमी करील असें न वाटल्यानें, मोठ्या लाडानें पाळलेंस.'

---

* **उन्सरी**, नांवाचा एक मोठा विद्वन्मुकुटमणी असा कवी सुल्तान **महमूद गझनवी**च्या वेळीं होऊन गेला.

खुद्द **सैतान** आह्मां मनुष्यांच्या हातून दुष्कर्माशिवाय कांहीं निष्पन्न होणार नाहीं, अशा ताणा मारीत नाहीं कां? आमच्या अंतःकरणांत असलेल्या असद्विचारां-विषयीं आह्मी अतिशय रडतों, कारण **सैतानानें** केलेलें भविष्यच खरें न होवो, अशी आम्हांस भीति आहे. त्या पतित पाप्याला आमचा सत्यनाश होणें आवडलेलें पाहूनच आमच्याकरितां **ईश्वरानें** त्यास स्वर्गातून हांकून दिलें. लज्जा व झिटकारा यांमुळें आह्मी कसें मस्तक वर उचलूं शकणार? कारण आह्मी तर **सैता-नाशीं** मेळांत व **ईश्वराशीं** भांडत असणार. त्या थोर सहाय्यकारी **परमेश्वरा**च्या शत्रूकडे तुझें मुख वळल्यावर तो क्वचितच तुजकडे पाहणार आहे. मित्रांपासून कांहीं हित इच्छित असशील तर, तुला त्याच्या शत्रूची ताबेदारीकरून चालणार नाहीं. **यूसफला** त्यांच्या भावांनीं हीन अशा चांदीच्या किंवा द्रव्याच्या लोभानें जणूं मृत्यूला विकलें, पण त्यांनां शेवटीं पाप व संकटेंच प्राप्त झालीं. तेव्हां त्यांच्याप्रमाणें तूं परमेश्वराशीं दगाबाजी करून काय मिळवूं इच्छितोस? शत्रूसह एक गृहांत राहण्याच्या इच्छेनें मित्राशीं परकेपणा ठेवणाऱ्यास काय ह्मणावें? आपल्या मित्राच्या घरांत आपला शत्रू असलेला पाहिल्यावर, तेथें तो मित्र पुनः कमीच पाय ठेवतो, हें तू जाणत नाहींस कां?

गोष्ट दहावी.

स्वामिद्रोहाचें योग्य फल व त्यावद्दल पश्चात्ताप.

एका राजाशीं एकानें वैर केल्यामुळें त्याचा प्राण

घेण्याकरितां त्यानें त्याला त्याच्या शत्रूच्या स्वाधीन केलें. त्या वधोद्युक्त शत्रूच्या हातीं फसलेला असा तो खेद करीत स्वतःशीं रडत ह्मणत होता कीं, 'मित्रास मी नाराज न करितों तर, मला या शत्रूच्या हातून कां त्रास सोसावा लागतां?'

शहाणा असशील तर आपल्या मित्राकडून मन फिरवूं नको, ह्मणजे शत्रू तुजकडे पाहूं देखील शकणार नाहीं. मित्र-तापदाचें नांव सोड. शत्रू कधींना कधीं त्याच्या पाठीचें चामडें सोलीलच. तू मित्राशीं एकमनी व एकवचनी रहा, ह्मणजे सहजच शत्रूचा समूळ उच्छेद होईल. शत्रूच्या खुपीकरितां मित्राला त्रास देऊन अपयश घेणें मी चांगलें समजत नाहीं.

गोष्ट अकरावी.

स्वतःच्या पापाबद्दल दुसऱ्यास व्यर्थ दोष देणें.

एका गृहस्थानें लबाडीनें लोकांचा माल लाटला व शेवटीं सैतानाला दोष दिला. तेव्हां त्याला वाटेंत सैतानानें गांठून म्हटलें, 'मी आजवर तुजसारखा मूर्ख कधीं पाहिला नाहीं. तुझी माझी प्रच्छन्न मैत्री आहे, असें असतां ही भांडणाची तर्वार कां उपसलीस?'

सैतानाच्या सुचनेसारखें तूं चालावें व त्याबद्दल फेरिष्ते लोकांनीं तुझीं पातकें लिहून ठेवण्याकरितां हात उचलावे, तसेंच तूं स्वतः मूर्खपणाचें व पातकी वर्तन ठेवावें व पुण्यवान लोकांनीं तुझ्या पातकांचा हिशेब लिहून ठेवावा, ही फार खेदाची गोष्ट आहे. सन्मार्ग स्वीकार व सर्वांशीं

सद्वर्तन व स्नेह धुंड. कोणी सहाय्यकर्त्याची कास धर व क्षमा माग, कारण एकदां कालचक्राचें माप भरलें कीं पुढें एक क्षणभर अवकाश राहणार नाहीं. सत्कर्म करण्याचें सामर्थ्य नसलें तर निदान दीनांप्रमाणें करुणा भाकण्याला तरी हात उचल.

तुझीं दुष्कर्में गिणतीबाहेर गेलीं असलीं तरी चिंता नाहीं. तूं एकदां पापमोचन झालें झटलेंस कीं शुद्ध झालास. सत्समागमाचें द्वार उघडें पाहिलेंस कीं, दीन होऊन शरण जा, नाहीं तर अवचित पश्चात्तापाचें द्वार बंद होऊन जाईल.

मुला, पापरूप भाराखालीं दबून जाऊं नको, कारण प्रवासांत अधिक लादलेला मजूर अधिक थकतो. सज्जनांच्या मार्गें लागलें तर भलेपणा इच्छिणाऱ्याला तो मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. पण तूं एका दुष्ट पिशाच्चाच्या मार्गें लागला आहेस, तेव्हां तूं सज्जनांच्या मध्यें कसा पोंचशील तें मला कळत नाहीं.

पैगंबरीधर्ममार्गाचें अवलंबन करणाऱ्या सर्व लोकांचे **पैगंबर** साहाय्य करणारे आहेत. सरळ व खऱ्या मार्गानें गेलास तर मुक्कामावर पोंचशील. तूं मुळीं मार्गावरच नाहींस, तेव्हां बहुतेक परत आल्या सारखाच आहेस. तेल्याच्या डोळे बांधलेल्या बैलाप्रमाणें रात्रभर चालून शेवटीं जागच्याजागींच असल्याप्रमाणें तुझी स्थिती आहे.

गोष्ट बारावी.

वेडा व मलिन भक्त व खरें भगवद्भजन.

एक चिखलानें भरलेला व दुर्दैवानें वेडसर झालेला भक्त

एका मशीदींत गेला, तेव्हां कोणी त्याला झिटकारून झटलें, 'छिः तुझे हात कापले जावोत, असा मलिन वस्त्रांनीं या पवित्र जागीं येऊं नको.' हें ऐकून मला मोठा खेद वाटला व या हिशेबानें त्या परम पवित्र बेहष्तबरी स्वर्गांत जाण्याजोगा कोण शुद्ध व निर्मल आहे याचा मला विचार वाटला, कारण त्या पुण्यवान लोकांनां ही उमेदवारी करावी लागणाऱ्या निर्मल जागेंत, पापरूप चिखलयुक्तांचें काय काम?

ईश्वरभजन करणाऱ्यासच स्वर्ग मिळतो व जवळ पुष्कळ नगदी द्रव्य असणाऱ्यालाच सौदा मिळतो. पातकरूप पंकापासून पदर धुतल्यावांचून राहूं नको, नाहींतर वरून तुझी आयुष्यरूप नदी अचानक अडविली जाईल. तारुण्यरूप बहुमोल विहंग हातांतून उडून गेला असें झणूं नको, अद्यापि त्याला बांधलेल्या दोरीचें टोंक तुझ्या हातीं आहे. उशीर झालासें वाटलें तर चपळ व त्वरितगति हो. केवळ उशीरां येण्यामुळेंच कांहीं भय आहे असें नाहीं.

अद्यापि मृत्यूनें तुझे इच्छारूप हात बांधले नाहींत तोंवर त्या परमन्यायी परमेश्वराच्या सिंहासनापुढें हात वर कर. हे पापकर्म्या, निजूं नको. प्रसुप्त आहेस तो ऊठ व पापक्षालनार्थ नेत्रांतून अश्रूं गाळ. ईश्वराची अनुल्लंघनीय आज्ञा एकदां सुटल्यावर तुझी अब्रू लोक गल्लोगल्लीं मातींत मिळवितील. तुझ्या डोळ्यांत पाणी राहिलें नसेल तर तुजहून अधिक अब्रूचा कोणी सहाय्यकर्ता पुढें कर. परमेश्वर रुष्ट होऊन मला आपल्या दारा-

पुढून हांकून देईल तर महात्मे व थोर लोकांस मी सहाय्याकरितां पुढें आणीन.

गोष्ट तेरावी.

गुरूच्या आज्ञेबाहेर चालण्याचे परिणाम.

लहानपणच्या एका गोष्टीची मला अद्याप आठवण होते कीं, एका ईदेच्या दिवशीं मी पित्याबरोबर बाहेर फिरावयास गेलों होतों. तेव्हां लोकांच्या गर्दीत व खेळण्याकुदण्यांत मी गर्क झालों व तेथील गडबडींत पित्यापासून चुकलों व भयानें गोंधळून जाऊन मी आरडा-ओरड केली त्याबरोबर बापानें माझे एकदम कान उपटून म्हटलें कीं, 'हे निर्लज्जा, मुर्खा, मीं तुला माझ्या पदराचा हात सोडूं नको म्हणून कितीदां सांगितलें आहे?'

लहान मुलगा एकटाच जाऊं शकत नाहीं, कारण अदृष्ट मार्गानें जाणें कठिण पडतें. हे फकीरा, तूही या मार्गावरील एक अर्भक आहेस म्हणून महात्मे लोकांचा पदर धर. नीच व हलकट लोकांचा सहवास करूं नको, करशील तर आपल्या खऱ्या योग्यतेची आशा पार सोडून दे. पुण्यवान लोकांच्या शिकारबंदास हात अडकीव, कारण खऱ्याभक्ताला भीक मागण्याची लाज वाटत नाहीं.

सामर्थ्याच्या संबंधांत शिष्य लोक अर्भकाहून अर्भक, व वृद्ध महात्मे लोक एखाद्या मितीप्रमाणें पक्के व मजबूत आहेत. बालकांपासून चालण्यास शीक, ते कसे मितीचा आश्रय धरतात तो पहा. भक्तजनसमुदायांत वसणारा मनुष्यच पापी लोकांच्या शृंखळेंतून सुटतो. तुला जरूर

असेल तर या समूहाचा आश्रय कर, कारण प्रत्यक्ष बादशहालाही याहून दुसरी गती नाहीं. जा, सादी-प्रमाणें, कणसें वेंचणारा हो, ह्मणजे भगवद्भक्तिरूप धान्याचें जणों तुजजवळ खळें जमा होईल.

गोष्ट चवदावी.

खळें जाळणारा मदांध मनुष्य.

एक गृहस्थ भाद्रपदांत पुष्कळसें धान्य जमाकरून, पुढें माघांत धान्य कसें मिळेल या काळजीपासून मुक्त झाला. पुढें एका रात्रीं एकदम मदांध होऊन त्या हतभाग्यानें वेडेपणानें तें खळें जाळून टाकलें. त्या खळ्यांतून एकही कण त्याच्या हातीं लागला नाहीं तेव्हां दुसऱ्या दिवशीं तो वेड्यासारखा कणसें वेंचूं लागला.

तो वेडा झालेला पाहून एकानें आपल्या मुलास ह्मटलें, 'याच्याप्रमाणें तू हतभागी व कष्टी न होऊं इच्छिशील तर वेड्याप्रमाणें खळें जाळूं नको. आजन्म तुझ्या हातून पातकें व दुष्कर्मेंच घडलीं असलीं तर तू खळें जाळणाराच आहेस. प्रथम खळें जमा करावें व नंतर त्याला स्वतःच आग लावावी यांत फार फजीती होते. हे मना, धर्म व न्याय यांचें बीज तुझ्या हातीं आलें असलेलें बुडवून आपल्या सुयशरूप खळ्याला आग घालूं नको.

एकादा उलट्या नशीबाचा मनुष्य संकटांत किंवा बंदींत पडतो तेव्हां त्यापासून दैवशाली लोक उपदेश घेतात. तू मृत्यू येण्यापूर्वीच क्षमेचें द्वार ठोठाव, कारण काळ्या बसूं लागल्यावर आरडण्यापासून कांहीं फायदा

होत नाहीं. विस्मरणरूप पदराखालून आतांच आपलें मस्तक उचल, नाहीं तर उद्यां लज्जितपणा तुझ्या पदरीं येईल.

गोष्ट पंधरावी.

लोकलज्जेचें मात्र भय वाळगणारा मूर्ख ढोंगी.

एक गृहस्थ निषिद्धाचरण करण्यांत निष्णात झाला होता. त्याच्याकडे त्याच मोहल्ल्यांतील एक सदाचारी काजी गेला. तेव्हां तो लज्जित होऊन व तोंड गोरें मोरें करून त्याला म्हणाला कीं, 'आपल्या भयानें मी लज्जित झालों आहें.' त्या वृद्ध उज्वलबुद्धि गृहस्थानें हें ऐकून रागानें ओरडून म्हटलें, 'अरे गृहस्था, ईश्वर सर्वव्यापी आहे, त्याच्या समोर तुला स्वतःची लाज वाटत नाहीं, व माझी मात्र तुला लाज वाटते?!'

यःकश्चित मनुष्याविषयीं मनांत कांहीं त्रास मानूं नको. जा, एका परमेश्वराविषयीं जप, म्हणजे झालें. परक्या मनुष्यासमोर स्वतःविषयीं तुला जशी लाज वाटते, तशीच तू सर्वेश्वर परमेश्वराविषयीं लाज धर.

गोष्ट सोळावी.

यूसफ व जुलेखा यांचा ईश्वराच्या भयाविषयीं वाद.

मिसर देशची राजकन्या जुलेखा कामरूप मद्यानें मदांध झाली. तेव्हां तिनें यूसफचा पदर हातानें घट्ट धरला. तिजवर कामेच्छारूप पिशाचाचा असा पगडा

बसला होता कीं, ती एखाद्या लांडग्याप्रमाणें त्याच्यावर तुटून पडली.

त्या राजकन्येजवळ एक दगडाची देवाची मूर्ती होती. तिच्या एकांत भजनपूजनांत ती रात्रंदिवस निमग्न असे. चाललेला प्रकार त्या मूर्तीला वाईट न दिसावा म्हणून तिनें त्या प्रसंगीं, त्या मूर्तीच्या तोंडावर पांघरूण घातलें होतें.

यूसफ अगदीं खिन्न होऊन एका कोपऱ्यांत बसला होता, व त्यानें त्या तापद मानसिक त्रासामुळें हातावर मस्तक टेंकलें होतें. **जुलेखा**नें त्याच्या दोन्ही हातापायांचें चुंबन करून म्हटलें, 'हे वचनभंगकरणाऱ्या हट्टी **यूसफा,** इकडे ये. ऐरणीसारखें कठिण मन करून मजकडून तोंड फिरवूं नको, व असा हा आनंदाचा प्रसंग व्यर्थ काळजीनें औदासिन्यांत घालवूं नको.'

हें ऐकून त्याच्या तोंडावर, नेत्रांतून अश्रुपूर वाहूं लागला व तो म्हणाला, 'मजकडून हें विरुद्ध व पापाचें आचरण होण्याची इच्छा करूं नको. तूं तर एका दगडाच्या मूर्तीचें मुख पाहून लाजलीस, तेव्हां मला त्या परमसमर्थ व सर्वसाक्षी जगत्पालकाची लाज नाहीं कां वाटणार?!'

आयुष्यरूप भांडवल उडवून दिल्यानंतर लज्जित होण्यापासून काय सार्थक होणार? लोक आपलें मुख आरक्त व प्रफुल्लित होण्याकरितां मद्य पितात, पण पुढें परिणामीं त्यांचें मुख लज्जेनें पिंवळें पडतें. आज क्षमा मागून ईश्वराची प्रार्थना कर, नाहींतर कदाचित उद्यां तुला बोलण्याचेंही सामर्थ्य राहणार नाहीं.

गोष्ट सतरावी.

स्वतः शुद्धाचरणी असल्यावर कोणाचेंही भय न वाळगण्याविषयीं.

मांजर शुद्ध व स्वच्छ जागेवर विष्टा करतें, व हें कर्म त्याला वाईट दिसतें म्हणून त्याच्यावर माती टाकून तें त्यास झांकतें. तू वाईट व असन्मान्य कर्मांपासून मुक्त असलास तर तुझीं कर्में कोणी पाहील याची तुला भीती नसते. अपराधी व धन्यापासून वरचेवर पळून जाणाऱ्या सेवकाविषयीं विचार कर. तो देखील खऱ्या भावानें व प्रेमानें परत येऊन धन्याजवळ हजर झाला तर, धनी त्याला पुनः बंदींत ठेवीत नाहीं किंवा साखळीनें बांधीत नाहीं.

तू अशा मनुष्याशीं शत्रुत्वानें भांड कीं, ज्यापासून तू कांहीं उपाय करूं किंवा पळून जाऊं शकशील. आपल्या वाऱ्यावाईट कर्मांचा आतां हिशोब केला पाहिजे, सर्व हिशेबाची वही भरून पक्की झाल्यावर नव्हे. शेवटच्या दिवसापूर्वीच जो मनुष्य स्वतःच्या दुष्कर्मांविषयीं पश्चात्ताप करून क्षमा मागतो, त्यानें पाप केलें असलें तरी तें न केल्यासारखेंच होतें. आरसा उच्छ्वासामुळें मलिन होतो व त्यानेंच पुनः स्वच्छ होतो तसेंच मनरूप मलिन आरसा पश्चात्तापयुक्त दुःखोद्गारानें पुनः स्वच्छ होतो. शेवटच्या दिवशीं कोणाचेंही भय न राहावें म्हणून आतांच तू आपल्या पापाला भीत जा.

गोष्ट अठरावी.

चोराला चांद्ण्याचें भय. खऱ्या दोषी मनुष्यासच अधिकाऱ्यांना भ्यावें लागतें याविषयीं.

एकदां मी फिरत फिरत **हबस*** देशाकडे गेलों, त्या वेळीं माझें मन कालचक्राच्या काळजीपासून मुक्त व माझी प्रकृती सुखोपभोगामुळें आनंदी होती.

वाटेंत एका उंच चबुत्र्यावर कांहीं गरीब बिचारे कैदी पाय बांधलेले पाहतांच मी पुनः प्रवासास जाण्याचा निश्चय करून, एखाद्या पिंजऱ्यांतून सुटलेल्या पक्ष्याप्रमाणें एकदम रान घेतलें. तेव्हां एकानें मला म्हटलें, 'हे कैदी रात्रिंचर चोर आहेत, कितीही उपदेश केला तरी ते ऐकत नाहींत व सत्य किंवा **परमेश्वर** यांस मानीत नाहींत. तुझ्या हातून कोणावर जुलूम होत नसेल तर तुला एक काय पण पृथ्वीवरील प्रत्येक मनुष्य कोतवाल होऊन धरील तर काय भय?'

प्रामाणिकपणा व सदाचारी मनुष्यास कोणी कैद करीत नाहीं. एका परमेश्वराला भी मग तुला कोणाही सर्दारला भिण्याचें कारण नाहीं. कारकून कामांत लबाडी न करील तर कोणीही तपासनीस आले तरी तो भीणार नाहीं. बाह्यतः स्वच्छ वर्तन दिसणाऱ्याचें आंतून खरोखर ढोंग असेल तर, त्याच्या हिरोची बोलण्याचा विश्वास सहसा पटत नाहीं.

खरी मनापासून सेवा करीन तर, कलुषितांतःकरण

---

* **हबस, अबिसिनिया** नांवाचा **आफ्रिका** खंडाच्या पूर्वेचा एक देश.

अशा शत्रूला मी कधीं भीणार नाहीं. खऱ्या सेवकधर्मास स्मरून सेवक परिश्रम करील तर, तो परमसमर्थ परमेश्वरास खचित प्रिय होईल. तोच सेवेंत मंदबुद्धि असला तर वेडेपणानें गाढवाप्रमाणें न जाणतां कष्ट करीत राहील. फेरिष्टचांच्याही पुढें जातां येण्याकरितां पुढें पाऊल ठेव म्हणजे, त्यांच्याही पुढें सरसावशील व मागें राहशील तर पशूंपेक्षांही तू कमी आहेस असें म्हटलें पाहिजे.

गोष्ट एकोणिसावी.

अपराधावद्दल क्षमा मागितल्यानें फजीती कमी होते याविषयीं.

दामगानच्या* बादशहानें काठीनें मार दिल्यामुळें एकजण ढोलाप्रमाणें ओरडूं लागला व रात्रीं त्याला दुःखामुळें स्वस्थपणा किंवा झोंप मिळाली नाहीं. तेव्हां एका भक्तानें त्याला म्हटलें. 'तू रात्रीं कोतवालाजवळ जाऊन दीनपणें रडला असतास, तर आपल्या अपराधाकरितां तुला भरदिवसां अब्रू घालवावी न लागती.'

रात्रीं मनापासून **ईश्वरा**जवळ पापाचा पश्चात्ताप करणाऱ्या मनुष्याला, शेवटीं लज्जित व्हावें लागत नाहीं. तू शहाणा असशील तर दिवसां केलेल्या पातकाबद्दल रात्रीं ईश्वराजवळ क्षमा मागत जा. तुझ्या मनांत अद्यापि **ईश्वरा**शीं मेळ करण्याचा विचार असेल तर काय भय आहे? परम कृपाळू **परमेश्वर** क्षमा मागणाऱ्यावर आपलें कृपाद्वार केव्हांही बंद करीत नाहीं. ज्या शुद्ध

---

* **दामगान तिब्रिस्तान**च्या हद्दींतील एक शहर.

सत्व भगवंतानें तुला अभावापासून भावांत आणलें, तो तू पायां पडल्यावर तुझा हात न धरील तर मोठेंच आश्चर्यच ह्मणावयाचें.

खरा सेवक असशील तर तू ईश्वरापुढें इष्ट हेतूंविषयीं प्रार्थना करण्याकरितां हात पसर व लज्जित झाला असशील तर पश्चात्तापाश्रुबिंदूंचा वर्षाव कर. लज्जारूप जलाचा पूर, ज्याच्या तोंडावरील धुरळा धुवून टाकीत नाहीं, असा कोणीही या परमेश्वराच्या द्वारीं नाहीं. स्वपापक्षालनार्थ अश्रुपूर वाहविणाऱ्याची अब्रू परमेश्वर कधींही घालवित नाहीं.

गोष्ट विसावी.

बालपणीं मरण्याची थोरवी, व सादीचा पुत्रशोक.

सनआच्या मुलुखांत माझें एक मूल मेलें, त्यामुळें माझ्या डोक्यावर कसें दुःख कोसळलें त्याचें मी काय वर्णन करूं? या मृत्यूनें कोणास सोडलें आहे?! असा अत्यंत रूपवान यूसफ, पण त्याला देखील यूनसचा मच्छानें ग्रास केल्याप्रमाणें कबरेनें ग्रासलें नाहीं कां? मृत्युरूप झंझावातानें समूळ खोदून टाकिलें नाहीं असा आजवर एकही सुरूचा शोभिवंत वृक्ष या उपवनांत वाढला नाहीं. मृत्तिकेंतून पुष्पें उत्पन्न होऊन प्रफुल्लित झालीं तर, मोठेंसें आश्चर्य नाहीं, कारण असंख्य पुष्पमय शरीराचे लोक तिच्यांत निजलेले आहेत.

मी आपल्या मनांत ह्मटलें, 'हे पौरुषास लाज आणणाऱ्या प्राण्या, तूही मर, कारण बालक मरतें तें शुद्ध

पणांत मरतें, पण वृद्ध मनुष्य पापमलानें भरलेला असा या जगांतून जातो.

ईराच्या ध्यानानें विमनस्क व कष्टी होत्साता मी मोठ्या दुःखानें त्या मुलाच्या अंगावर कबेर दाखल एक दगड टांकला. तेव्हां त्या अंधेऱ्या व लहानशा जागेंत भीतीमुळें माझी गाळण झाली व माझा वर्ण पालटून गेला. त्यांतून मी पुनः शुद्धींत आलों तों त्या माझ्या मनमोहक मुलाच्या मुखांतून निघालेले शब्द माझ्या कानीं आले कीं, 'तुला, ही अंधेरी जागा पाहूनच देह-भान उडून भय वाटलें, तर आतां सावध रहा, व येथें सप्रकाश ये. कबरस्थानांतील रात्रिरूप तम, दिवसां-प्रमाणें प्रकाशमान पाहिजे असेल तर, इहलोकाहूनच सत्कर्मरूप दीप प्रज्वलित करून घे.

खारकांचीं झाडें लावणाऱ्या बागवानाचें शरीर, झाडें सफल न होतील कीं काय, या भीतीनें नेहमीं कांपत असतें. इहलोकच्या लोकांची स्थिती अशी आहे कीं, ते एक मोठा थोक जमवून लालचीच्या विचारांत फसले आहेत. व त्यांपैकीं कोणीही गहूं पेरीत नसतांही खळें जमा करून नेण्याचा त्यांचा इरादा असतो.

हें **सादी**, ज्यानें जड लावली त्यालाच फळ खाण्यास मिळतें, व ज्यानें बीज पेरलें तोच मनुष्य खळें जमा करूं शकतो.

भाग नववा समाप्त.

भाग दहावा.

——:o:——

ईश्वरस्तुस्ति व आशीर्वादप्रार्थना.

छातीवर हात ठेऊन आतांच **ईश्वरा**ची प्रार्थना करूं या कारण उद्यां मातींत मिळाल्यावर आपल्याला तसें करितां येणार नाहीं. चांगल्या ऋतूंत वृक्ष ईशाज्ञे मुळेंच सपर्ण व सुंदर दिसतात. तेच कडक हिवाळ्यांत विपर्ण होऊन जातात. तो लडिवाळपणानें प्रार्थना करणाऱ्याचे रिक्तहस्त परिपूर्ण करितो. त्याच्या कृपेंतून कोणीही रिक्तहस्त याचक विन्मुख रहात नाहीं. कधींही बंद न असणाऱ्या या द्वारापुढून केव्हांही हात पसरणारा याचक रिकामा जाईल असें समजूं नको. सर्व लोक त्याच दीनबंधु व दीनपालकाची स्तुती व पूजन करतात, तेव्हां चला आपणही त्याच्याच द्वारीं जाऊं व एखाद्या विपर्णफल वृक्षशाखेप्रमाणें आपला हात पसरूं, कारण तो तसाच विपर्ण कधींहीं राहणार नाहीं.

हे **परमेश्वरा**, तू समर्थासमर्थ लोकांवर कृपादृष्टी ठेव, कारण पातक सर्व सेवकांच्या अंगीं जणूं जन्मापासून जडलेलें आहे. परम समर्थ **परमेश्वरा**कडून क्षमा होण्याची आशा असल्यामुळेंच. या मृत्तिकेप्रमाणें दीन दासाकडून दुष्कर्में घडतात. हे **कृपाघना**, तुझ्या अन्नदानानेंच आम्हीं पोसले गेलों व जात आहो, व तुझी दया व तुझी कृपा यांची आम्हांस जणों संवयच झाली आहे! ज्या दात्याच्या हातून कृपा, दया व लाड, मिळत असलेले एकदां एखादा फकीर पाहतो त्याची तो पुनः पाठ सोडीत नाहीं.

आह्मांस तूं या संसारांत जसें कृपापात्र केलें आहेस, तसेंच शेंवटीं स्वर्गांतही करण्याची आह्मी आशा ठेवतो. प्रेम व कोप, दोन्हींचा दाता तूच आहेस. त्वत्कृपा व त्वत्प्रेम यांस पात्र झालेल्याला कोणापासूनही त्रास पोंहोंचत नाहीं. हे **परमेश्वरा,** तुला तुझ्या वैभवाची शपथ आहे, तू मला माझ्या हातून घडलेल्या पापाबद्दल दोषी समजून लज्जित करूं नको. पश्चात्तापरूप हस्तक्रियेनें शेवटीं मला चांगलें होतां येण्यासारखें असलें तरी तिकडे लक्ष न देतां मला माझ्या दुष्कर्मानुरूपच योग्य बदला देण्याचें ठरवूं नको. तुजसारख्या कृपाघनाच्या हातून दुष्कर्माबद्दल शासन पावणें, यासारखी या जगांत दुसरी कोणचीही वाईट गोष्ट नाहीं. तुजपुढेंच लज्जित होणें मला पुरें आहे. तू मला दुसऱ्यासमोर मात्र लज्जित होऊं देऊं नको.

त्वच्छाया या यःकश्चित दीन दासाच्या मस्तकावर पडली तर त्याचें शिर आकाशास लागेल. तू कृपा करून मजला राजमुकुट देशील तर मी उन्नतशिर होईन व तूं मला हात देऊन उठविशील तर मग मला कोणीही खालीं पाडणार नाहीं.

गोष्ट पहिली.

वेडसर मनुष्याची केलेली परमेश्वरप्रार्थना.

पुढील गोष्टीचें स्मरण झालें कीं माझें अंग कांपू लागतें. एक वेडसर गृहस्थ आपल्या वाड्याच्या दाराशीं बसून, आपल्याशींच ईश्वराबरोबर पुष्कळ आक्रोश करून

बोलत होता कीं,' तू मला आपल्या हातानें पाडवूं नको, कारण मग कोणीही माझा हात धरूं शकणार नाहीं. तूं कृपा करून मला जवळ बोलाव, किंवा आपल्या द्वारा-पुढून हांकून लाव तरी, तुझ्या उंबरठ्याशिवाय मी कोठेंही आपलें शिर ठेवणार नाहीं. माझ्या मस्तकाला दुसरें आश्रयस्थानच नाहीं.'

हे भल्या गृहस्था, तू समजत असशील कीं, आपण दीन, अनाथ, व पतित आहोंत. पण खरोखर आपण धृष्ट, अपराधी व उन्मत्त असें जें मन त्याच्या आधीन आहोंत. हें माझें दांडगें मन असें ओढाळ व स्वयंमन्य झालें आहे कीं, माझी बुद्धी त्याला कशीही आवरूं शकत नाहीं किंवा त्याला लगाम घालूं शकत नाहीं. आपलें मन व **सैतान** यांच्याशीं दांडगाई करून कोण विजयी होऊं शकतो? हत्तीशीं मुंग्या लढूं शकत नाहींत. सर्व लोकांनां तुजपासूनच सौख्य मिळतें. तेव्हां तें मिळण्याचा मार्ग मला दे. तसेंच माझ्या शत्रूपासून माझें संरक्षण कर.

हे वांछित फल देणाऱ्या **परमेश्वरा**, तू स्वतः व तुझी थोरवी, तुझे अनुपम व अद्वितीय गुण, तसेंच सर्व लोक जेथें यात्रेकरितां जातात अशी **पैगंबरा**ची पवित्र जन्म-भूमी **मक्का** शहर व परमपूज्य **पैगंबरा**ची जेथें कबर आहे असें जें पवित्र **मदीना** शहर, व प्रतियोध्यांस अबलांप्रमाणें गणणारे शूर योद्धे, व ईश्वरभजन तत्पर महात्मे लोक, व सत्यवादी तरुण बांड लोक, या सर्वांची शपथ घेऊन तुजजवळ मी मागणें मागतों कीं, त्या शेवटच्या भवचक्राच्या फेऱ्याच्या वेळीं, किंवा मरणसमयीं मला द्वैतवादीपणाच्या लज्जेपासून राख.

ईश्वरभजन पराङ्मुखांसही, ईश्वरभक्तिनिरत लोक मुक्त करवितील अशी मला आशा आहे. पवित्र लोकांच्या पवित्रपणाच्या शपथ तू मला पापापासून अलिप्त ठेव व मजकडून एखादें पातक घडलें असलें तरी क्षमा कर. ईश्वरभजनपूजनांत पाठ लववणारे व स्वकृत पातकाच्या लाजेनें आपल्या पावलावर नेत्र जणूं शिवून टाकून अधोवदन असणारे, अशा वृद्धमहात्म्यांच्या शपथ मला भलेपणाविषयीं निराश करूं नको, व मरण-समयीं तुझ्या एकत्वाची साक्ष देण्याच्या कामीं माझें मुख शिवून टाकूं नको. त्वदैकनिष्ठारूप दीप माझ्या मार्गांत ठेव, व कुकर्माविषयीं माझा कर कोता राहूं दे. अदर्शनीय गोष्टींकडे माझी दृष्टी फिरूं देऊं नको, व असत्कर्मांकडे माझे हात जाऊं देऊं नको. माझें कांहीं चालूं देऊं नको. त्वच्छ्वासरूप हवेपुढें मी एक यःकश्चित दीन अणुरेणू आहें. अज्ञानतमांत माझें अस्तित्व व अभाव सारखेच आहेत. त्वत्कृपारूप रविकिरणांतून मला थोडीशी झुळूक पुरे आहे. कारण त्वत्कृपाप्रकाशाविना मला कोणीही पाहूं शकत नाहीं.

तू एखाद्या दीन मनुष्याकडे थोडेंसें कृपादृष्टीनें पाहतांच तो सर्वांत श्रेष्ठ होतो. बादशहाच्या कृपाभांडारांतून एक कृपाही एखाद्या फकीरास पुरेशी आहे. पण जर न्यायच चालवून बसशील तर, माझ्या अपराधाची क्षमा होण्याला ही शर्थ नव्हती, असें मी तुझ्या नांवानें ओरडेन. हे **परमेश्वरा**, वाईटपणानें मला तू आपल्या द्वारापुढून हांकून देऊं नको, कारण मला तुजशिवाय दुसरें कोणचेंच द्वार नाहीं. मी कांहीं दिवसपर्यंत मूर्खपणानें उन्मार्गगामी झालों असलों

तरी आतां तुझ्या द्वारापुढें आलों आहें तेव्हां मजवर आपलें द्वार बंद करूं नको. मी लज्जित व अपराधी आहें त्याअर्थीं काय सबबी सांगूं? तरी हे धनिका, मी दरिद्री आहें व मी पातकी असलों तरी मला तू अपराधी समजूं नको. धनिकांनीं दरिद्र्यांवर सर्वथा कृपादृष्टी करणेंच योग्य आहे.

आपल्या दैन्याविषयीं मी कां रडूं? मी दीन व दुर्बल असलों तरी माझा आश्रयदाता परमसमर्थ आहे. हे **परमेश्वरा**, आम्ही चुकून तुजशीं केलेले करार तोडले आहेत. प्रत्यक्ष ईश्वरीनेमांपुढें कोणाचा जोर चालणार? आम्ही केलेल्या उपायांपासून काय फळश्रुती होणार? तेव्हां अपराधांची क्षमा होण्यास हा एकच विचार पुरे आहे कीं, आमची सर्व क्रीडा केवळ तुझीच स्वतःची लीला आहे. स्वतःचाच स्वतःशीं काय जोर चालणार?! त्वदाज्ञेबाहेर आम्ही कापलें मस्तक नेऊं शकत नाहीं, कारण ती माझ्या मस्तकावर तशीच प्रखर व जागृत आहे.

गोष्ट दुसरी.

उपजत वऱ्यावाईट गोष्टींबद्दल कोणास कोणी हंसूं नये याबद्दल.

एका कृष्णवर्ण मनुष्यास एकानें नांवें ठेवलीं, तेव्हां त्यानें दिलेलें प्रत्युत्तर ऐकूनच तो आपल्या ठिकाणीं विरमून गेला. तो म्हणाला, 'माझें रूप कांहीं मी स्वतः घडलें नाहीं, तेव्हां माझ्या हातून कांहीं वावगें काम घडलें असें समजून त्वां मला कां नांवें ठेवावींस? माझ्या कुरूपाशीं

तुला काय करावयाचें आहे? चांगलेंवाईट रूप रेंखणारा कांहीं मी नाहीं. जन्मापूर्वीच विधीनें ज्यांच्या कपाळावर बरें वाईट लिहून ठेवलें आहे, त्यांपैकींच मी एक आहें. व त्या लिखितांतून, हे भल्या गृहस्था, मीं कांहीं कमी जास्ती केलेलें नाहीं.'

हे **परमेश्वरा**, तू समर्थ व मी परम हीनबल आहें. तू प्रत्यक्ष आदिशक्तीच आहेस. तुजपुढें मी कोण पदार्थ आहें?! तू मला मार्ग दाखविशील तरच मी सुखास पोचूं शकतों, व तू रस्ता चुकविशील तर मग त्वद्भजनरूप यात्रेपासून मला विन्मुख व्हावें लागेल.

जगदुत्पादक, सर्वस्रष्टा, सर्वेश्वर, या सेवकाचें साहाय्य न करील तर, त्याच्या हातून सद्वर्तन कसें होणार आहे?!

गोष्ट तिसरी.

सन्मार्गवर्तनाच्या कामीं मनुष्यांचें दौर्बल्य.

एकदां एक दरिद्री फकीर काय उत्तम बोलला कीं, 'मनुष्य रात्रीं पश्चात्ताप करितो व पुनः पहांटे तो सर्व विसरून जातो. रात्रीं सद्वर्तन करण्याचा नेम करितो व तो पहांटेच मोडून टाकतो. **परमेश्वर** पश्चात्तापानुरूप वर्तन करण्याचें कृपाकरून सामर्थ्य देईल तरच मनुष्य ठीक राहतो. आह्मां मूढ जनांचे नियम अस्थिर व धिरपाईचे असतात.'

हे **परमेश्वरा**, तुझें सत्य व तेज यांच्या शपथ तू असद्गोष्टींविषयीं माझे नेत्र शिवून टाक, ह्मणजे उद्यां मला तू अग्नींत जाळणार नाहींस. माझ्या मौर्ख्यामुळें माझें

मुख मातींत मिळालें आहे व माझे अपराधरूप धूळ वर आकाशांत उडून गेली आहे. हे **परमेश्वरा**, तू एकदां कृपामेघाची वृष्टी कर, कारण वृष्टीपुढें धूळ टिकत नाहीं. माझ्या पापामुळें माझी आतां या तुझ्या राज्यांत कांहीं योग्यता नाहीं व या राज्याशिवाय मला दुसरीकडे गतीही नाहीं. मुक्या लोकांच्या मनांतील गुह्य गोष्टीही तू जाणूं शकतोस, तसेंच व्रणितांतःकरणावर मलमही तूंच लावतोस.

गोष्ट चवथी.

एक मूर्तिपूजक व परमसमर्थ परमेश्वर.

एक **मगी*** किंवा ब्राह्मण संसारविमुख होऊन एका मूर्तीच्या सेवेंत फार तत्पर झाला होता. कांहीं काळानें त्या धर्महीन ब्राह्मणास दुर्दैवानें एक मोठें संकट प्राप्त झालें. तेव्हां तो मोठ्या आशेनें त्या मूर्तीच्या पायाशीं त्या देवालयांतील धुळींत पुष्कळसें रडून ह्मणाला, 'हे मूर्तिगत देवते, मी संकटांत फसलों आहें, तर तू मला हात दे. माझ्या अगदीं जिवावर बेतलें आहे, याकरितां माझ्या या शरीरावर कृपा कर.'

याप्रमाणें तो त्याच्या सेवेंत राहून पुष्कळ रडला, पण त्याचा यत्किंचितही उपयोग झाला नाहीं.—जी मूर्ती अंगावरील माशी उडवूं शकत नाहीं, ती लोकांचीं संकटें काय दूर करणार!—तो ब्राह्मण रागानें ओरडून म्हणाला,

---

* **मगी**, अग्न्युपासक पारसी किंवा हिंदुलोकांतील उपाध्ये लोकांस प्राचीन मुसलमान लोक **मगी** ह्मणत असत.

'हे अचल व फसविणाऱ्या देवते, मी तुझी इतकीं वर्षें व्यर्थच पूजा केली म्हणावयाचें. मजवर आलेलें संकट दूर कर, नाहीं तर मी आतां त्या जगत्पालक परमेश्वराची करुणा भाकतों.' असें म्हणत त्याचें मस्तक त्या मूर्तीच्या पायधुळींत तसेंच भरलेलें होतें इतक्यांतच, त्या परमपवित्र **परमेश्वरा**नें त्याची प्रार्थना परिपूर्ण केली.

हा झालेला प्रकार पाहून दुसऱ्या एका विवेकी भक्ताला मोठें गूढ व आश्चर्य वाटलें व तो प्रकार त्याच्या लक्ष्यांत येईना. धर्मभ्रष्ट व मंदिरांतील मूर्तीपुढें नमस्कार घालण्यानें जो मलिन व मस्त झालेला व खऱ्या परमेश्वरास नुकतांच भजूं लागलेला, व ज्याचें मन व हात अधर्म व पाप यांपासून स्वच्छ धुतले गेले नाहींत, अशा या पतिताचे इच्छित मनोरथ **परमेश्वरा**नें एकदम परिपूर्ण केले, हें कसें, असें त्यांस वाटलें. या अतर्क्य गोष्टीच्या विचारांत त्याचें मन दीन होऊन गेलें होतें, इतक्यांत त्याच्या मानसिक कर्णरंध्रांत ईश्वराचा संदेश आला कीं, 'त्या मूर्ख हीनबुद्धि वृद्धानें त्या मुर्तीपुढें पुष्कळसी याचना केली पण ती मान्य झाली नाहीं. ती याचना आमच्या द्वारींही अमान्य झाली असती तर तिच्यांत व आमच्यांत भेद तो काय ?!'

हे मित्रा, आपलें मन परमेश्वराच्या ठायीं दृढ केलें पाहिजे, कारण यच्चयावत वस्तुमात्र त्याच्याहून हीनच आहे. या द्वारावर मस्तक ठेवलें असून तुझ्या हातीं मनोरथपूर्तिरूप फल न लागणें अशक्य आहे. हे **परमेश्वरा**, आम्हीं त्वदाराधनाविषयीं अपराधी आहोंत. आम्हीं पापी आहोंत तरी तुजपुढें आशेनें आलों आहोंत.

गोष्ट पांचवी.

परमेश्वराचा धन्यवाद व खरी भक्ती.

एकदां एक मनुष्य दारू पिऊन गुंग होऊन एका मशीदींतिल एका भक्ताच्या कोठडींत धांवत जाऊन शिरला व त्या ईश्वरीकृपेच्या उमरव्यावरच जणूं बसून, 'हे **परमेश्वरा**, तू मला आपल्या उत्तम स्वर्गास पोंहोचीव,' असें रडत होता. मशीदींतील मवज्जन किंवा पुजारी यानें त्यास झिटकारून त्याचा पदर ओढून झटलें, 'तू धर्म व विचारहीन, केवळ श्वानवत् असतांना या मशीदींत कसा आलास? तुला उत्तम स्वर्ग मिळावा, असें तुझें कोणचें सद्धर्माचें वर्तन आहे? अशा या कृष्णमुखानें तुला ईश्वराशीं लडिवाळपणा करणें शोभत नाहीं.'

हें त्या वृद्धानें केलेलें भाषण ऐकून, तो मस्त मनुष्य रडून झणाला, 'हे थोर गृहस्था, मी मस्त आहें, माझा नाद सोड. मजवर राग करूं नको. ईश्वराजवळ कोणी कांहीं आशेनें जाणें झणजे महत्पाप होय. ही एक ईश्वरीकृपेची तूं नवीनच तऱ्हा काढलीस. मी माझ्या पापाकरितां केलेला पश्चात्ताप तू मान्य कर, असें मी तुला झणत नाहीं, तर पश्चात्तापाचें द्वार खुलें असून, परमसमर्थ परमेश्वर पावन करणारा आहे. त्याच्या कृपाभांडाराहूनही माझीं पातकें अधिक आहेत असें मी कसें झणूं, याचीच मला मोठी लाज वाटते.'

जरा एखाद्याला पाडते तेव्हां कोणी हात दिल्यावांचून त्याला उठतां येत नाहीं. हे **परमेश्वरा**, मी अशाच पैकीं एक वृद्ध व पतित आहें, तर तूं मला कृपाकरून

हात दे. मी मोठेपणा व वैभव मागत नसून मूढपणा व पातकें यांच्याबद्दल क्षमा मागतों. माझा यत्किंचितही दोष पाहतांच, माझा मित्र देखील वेडेपणानें, त्याबद्दल सर्वत्र दांडोरा पिटवितो. तू सर्वद्रष्टा व आम्ही अपसांत भिणारे आहोंत. तू आमच्या दोषांवर पांघरूण घालणारा, व आम्ही दुसऱ्याच्या दोषांवरील पांघरूण फाडणारे आहोंत.

संसारीलोक तर अंदाजानेंच आरडाओरड करितात, पण तूं आपल्या दासांना पडद्याप्रमाणें व त्यांचे दोष छिपविणारा आहेस. मूढ सेवकानें मूर्खपणानें गर्वाचें वर्तन केलें तर धनी त्याचें नाक कांपतो, पण तू तसा नाहींस. तू स्वयोग्यतेनुरूप आमच्या पातकाची क्षमा करशील तर आमच्या अंगीं एकही डाग राहणार नाहीं. पण आमच्या पातकांच्या प्रमाणानें आमच्यावर कोप करशील तर आम्हांस एकदम नरकांत पाठवि. आमच्या पापाची तुला करण्याची इच्छा करूं नको. तू माझा हात धरशील तर मी वैभवास चढेन, पण तूच मला पाडशील तर मला कोणीही उठवूं शकणार नाहीं. तू साह्य देशील तर मजशीं कोण जबरदस्ती करूं शकेल, व तूच मला सोडशील तर मग मला कोण पतकरील?

स्वर्गाची इच्छा करणारे, परस्पर विरोधी असे दोन थोक आहेत. त्यांतून खरा मार्ग मला कोणाकडून मिळेल तें कळत नाहीं. मला सरळ मार्ग मिळेल तर मोठें आश्चर्यच म्हणावयाचें! कारण माझ्या हातून कुत्सित वर्तनाशिवाय कांहीं घडलें नाहीं.

परमेश्वर शुभ्र केसांची लाज राखतो, अशी माझ्या

मनाला वरचेवर आशा वाटते, पण मला माझ्या स्वतःची लाज वाटत नाहीं. तेव्हां माझी लाज **परमेश्वर** कशी ठेवील याचें मला आश्चर्य वाटतें. **यूसफ**नें इतकीं संकटें व कष्ट व कैद सोसली, त्यालाही ईश्वरानें हात देऊन त्याचें वैभव व त्याची सत्ता वाढविली नाहीं कां? तसेंच त्यानें **याकूबा**च्या इतर मुलांचेही अपराध क्षमा केले., सुंदर व रूपवानांचे गुणही सुंदर व चांगले असले पाहिजेत. त्यानें प्रथम त्यांनां दुष्कर्माकरितां कैदेंत टाकलें, व पुढें त्यांच्या सत्कर्मरूप उपायनास प्रसन्न होऊन त्यांची त्यानें मुक्तता केली नाहीं कां?

हे **परमेश्वरा,** त्वत्कृपेपासून आम्हीही हीच आशा ठेवतों कीं, अम्हांजवळ अशीं उपायनें नाहींत तरी, तू अम्हांवर कृपा कर. हे **परमेश्वरा,** अम्हांजवळ आशे-शिवाय दुसरें उपायनच नाहीं, तथापि तुझ्या क्षमे-विषयीं आम्हांस निराश करूं नको.

समाप्त.

BOMBAY—PRINTED AT THE "TATTVA-VIVECHAKA" PRESS.

(पुस्तकें वा. मो. पोतदार कॉं-
व ग्रंथकर्त्याकडे विकत ।- स्वत:ची

रा. रा. गाधवनाथ [illegible] कशी
कटें व
वा. ए. एल्. सी. ई. कृत [illegible] ग्रंथ

म्युनिसिपालिट्या व त्यांचीं

अनेक इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें तयार केलेला
द्वादशपत्री पृष्ठें १३९, कि० ८ आणे टं. ग्र, २
(हें पुस्तक सार्वजनिक व गृहसंबंधी आरोग्याविषयीं शिक्षण
करणाऱ्या गृहस्थांच्या व प्रत्येक म्युनिसिपाल्टमेंबराच्या
मेंबरास अत्यंत उपयोगी आहे.)

सुमनोविकास

किंवा

फारसींतील शेख सादीकृत बोस्तान्चें

मराठी भाषांतर.

द्वादशपत्री पृष्ठें ४०० कि० अवघी १॥ रु० टं. ग्र. ४ आणे
(वाचतां येणाऱ्या प्रत्येक गृहस्थानें निदान एकवेळ तरी अवश्य
वाचण्याजोगा ग्रंथ.)

पुष्पवन.

किंवा.

शेख सादीकृत प्रसिद्ध गुलिस्तान् नामक ग्रंथाचें

सरळ भाषांतर.

(छापत आहे, डिसेंबर १८९० अखेर प्रसिद्ध होईल.)
द्वादशपत्री पृष्ठें सुमारें ३५०, कि० १॥ रु० टं. ग्र. ४ आणे.
(गुलिस्तान व बोस्तान हे दोन्ही ग्रंथ सर्व फारसी ग्रंथांचे
मुकुटमणी मानले गेले आहेत.)